एम. ए. भाग १

अभ्यासपत्रिका -३ (अ)

युरोपचा इतिहास
(१७८९ - १९१९)

Syllabus
M.A. Part – I Paper – III (Option A)
History Of Europe – (1789 – 1919)

1. **French Revolution of 1789**
   a) Background of the Revolution.
   b) Contribution of the Philosophy.
   c) Work of National Assembly (1789-91) Legislative Assembly (1791-92), National Convention (1792-95), Directory (1795-99)

2. **Rise and Fall of Napoleon Bonaparte.**
   a) Rise to Power.
   b) Domestic Policy.
   c) Expansion, Consolidation and Downfall.

3. **Era of Meternich.**
   a) The Congress of Vienna (1815)
   b) The Concert of Europe.
   c) Revolutions of 1830 and 1848.

4. **Economic Transformation.**
   a) Agrarian Revolution.
   b) Industrial Revolution.
   c) Development of Socialism (Utopian and Marxist)

5. **Formation of Nation States.**
   a) Themes of Nationalism.
   b) Unification of Italy.
   c) Unification of Germany.

6. **Eastern Question. (General Background)**
   a) The Greek War of Independence (1821 – 31)
   b) The Crimean War (1854 – 56)
   c) The Russo – Turkish War (1877-78)

7. **Road to War and Peace.**
   a) Diplomacy and the System of Alliances (1871-1907)
   b) Causes and Consequences of World War – I
   c) Paris Peace Conference.

8. **Transformation of Russia.**
   a) Reforms under Czar Nicholas I and Alexander II
   b) Revolution of 1971.
   c) Impact of the Revolution.

❖❖❖

१

फ्रेंच राज्यक्रांती - १

प्रकरण रुपरेषा

१.० उद्दिष्टे
१.१ प्रस्तावना
१.२ फ्रेंच राज्यक्रांतीची पार्श्वभूमी
  १.२.१ राजकीय पार्श्वभूमी
  १.२.२ सामाजिक परिस्थिती
  १.२.३ आर्थिक परिस्थिती
१.३ अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दाचा परिणाम
१.४ आपली प्रगती तपासा
१.५ फ्रेंच तत्वज्ञांची कामगिरी
१.६ आपली प्रगती तपासा
१.७ सारांश
१.८ दीर्घोत्तरी प्रश्न

१.०. अभ्यासाचे उद्देश:

१. इ.स.१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या पार्श्वभूमीवर 'जुन्या व्यवस्थेचे' स्वरूप समजून घेणे.
२. इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीस कारणीभूत राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.
३. इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीची वैचारिक पार्श्वभूमी समजून घेणे.
४. फ्रेंच विचारवंताचा राज्य व समाज याविषयीचा दृष्टीकोन जाणून घेणे.

१.१. प्रस्तावना:

इ.स. १७८९ ची फ्रेंच राज्यक्रांती ही फ्रान्स व युरोपच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना आहे. या क्रांतीने प्रसुत केलेली 'स्वातंत्र्य, समता व बंधुत्व' ही तत्त्व जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. फ्रेंच राज्यक्रांतीने राष्ट्रवादी विचारांना चालना दिली. आधुनिक काळातील सर्व क्रांत्यांपेक्षा फ्रेंच राज्यक्रांतीने इतिहासावर सर्वात जास्त प्रभाव पाडला. एकोणीसाव्या शतकातील युरोपमध्ये घडलेल्या सर्वच महत्त्वाच्या घटनांवर फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रभाव दिसून येतो. इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतर काही काळासाठी युरोपचा इतिहास हा एका राष्ट्राचा, एका घटनेचा व एका व्यक्तीचा होता; ते राष्ट्र म्हणजे फ्रान्स, ती घटना म्हणजे फ्रेंच राज्यक्रांती व ती व्यक्ती म्हणजे नेपोलियन बोनापार्ट.

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे युरोप खंड हादरला व युरोपातील 'जुन्या व्यवस्थेला' धक्का बसला. ही जुनी व्यवस्था अनियंत्रित राजेशाही, सरंजामशाही व्यवस्था यावर आधारित होती. युरोपमध्ये ब्रिटन वगळता इतर देशात अनियंत्रित राजेशाही अस्तित्वात होती. अनियंत्रित राजेशाही प्रस्थापित झाल्याने सरंजामशाही दुर्बळ झाली होती मात्र लोप पावली नव्हती. स्थानिक सत्ता सरंजामदारांच्या हातात होती. जमिनीच्या माध्यमातून सरंजामदार व त्यांची कुळे यांचे राजकीय, आर्थिक व सामाजिक संबंध प्रस्थापित झाल्याने कुळांच्या शोषणावर आधारित सरंजामशाही समाजव्यवस्था विकसित झाली होती. सर्वसामान्य लोकांना कोणतेही राजकीय अधिकार नव्हते. अनियंत्रित राजेशाही व सरंजामशाही व्यवस्थेच्या कारभाराखाली सामान्य जनता दडपून गेली होती. या पार्श्वभूमीवर अठराव्या शतकाच्या अखेरीस घडून आलेली फ्रेंच राज्यक्रांती मानवी इतिहासात महत्त्वपूर्ण आहे.

१.२. फ्रेंच राज्यक्रांतीची पार्श्वभूमी:

फ्रेंच राज्यक्रांतीस कारणीभूत विविध घटकांचे विश्लेषण विविध विचारवंतानी केले आहे. काही विचारवंतानी आर्थिक कारणावर भर दिला आहे तर काहींनी शोषणावर आधारित फ्रेंच समाजव्यवस्थेला कारण मानले आहे. या क्रांतीने केवळ फ्रान्समधील नव्हे तर युरोपातील सर्व अनियंत्रित राजसत्तांना आव्हान दिले. इ.स. १७८९ च्या या राज्यक्रांतीची कारणे फ्रान्समधील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीत आढळतात. अठराव्या शतकात फ्रेंच विचारवंतानी उभी केलेली बौध्दिक चळवळ आणि उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही या तत्त्वांचा केलेला पुरस्कार यामुळे या क्रांतीला वैचारिक पार्श्वभूमी प्राप्त झाली. जुनी व्यवस्था युरोपात सर्वत्र असली तरी क्रांतीची सुरूवात फ्रान्समध्ये झाली. फ्रेंच राज्यक्रांतीचे स्वरूप जाणून घेण्यासाठी क्रांतीस कारणीभूत ठरलेल्या फ्रान्समधील परिस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे

१.२.१. राजकीय पार्श्वभूमी :

अ. अनियंत्रित राजसत्ता :

फ्रान्समध्ये राज्यक्रांतीचा उद्रेक होण्यास तेथील राजकीय परिस्थिती महत्त्वाची ठरली. फ्रान्समध्ये राजकीय असंतोष पराकोटीला पोहोचला होता. १६व्या शतकात फ्रान्समध्ये स्थापन झालेली बुरबाँ घराण्याची राजसत्ता ही अनियंत्रित राजेशाहीचे प्रतीक होती. या घराण्यातील राजांना दैवी अधिकाराचा सिध्दान्त मंजूर होता. फ्रान्सचे राजे स्वत:ला देशाचे भाग्यविधाते समजत. कोणत्याही गोष्टीचा कायदेशीरपणा किंवा गैरकायदेशीरपणा हा फ्रेंच राजाच्या मर्जीवर अवलंबून असे. फ्रेंच राजा लोकांच्या जीविताचा आणि मालमत्तेचा मालक बनला होता. राजाचा शब्द म्हणजे कायदा झाला होता. फ्रान्सचे राजे आपल्या कृत्याबद्दल कोणालाही उत्तर देण्यास बांधील नव्हते. राजाने मन मानेल तसा कारभार करावा, युध्द करावीत, संपत्तीची उधळपट्टी करावी असा जणू अलिखित नियम बनला होता. बुरबाँ घराण्यातील शासक चौदावा लुई (१६४३-१७१५)च्या काळात अनियंत्रित राजसत्तेचा कळस गाठला गेला. वास्तविक राजकीय कामात प्रजेचा सल्ला घेण्याकरिता फ्रान्समध्ये 'स्टेटस् जनरल' नावाची विविध वर्गांचे प्रतिनिधीत्व करणारी सभा होती. मात्र या सभेचे अधिवेशन इ.स.१६१४ पासून बोलाविण्यात आले नव्हते. इ.स.१७८९ मध्ये भरलेली 'स्टेटस् जनरल' जवळजवळ १७५ वर्षांनी भरत होती.

ब. बुरबाँ राजसत्तेचे स्वरूप :

अनियंत्रित राजसत्तेचे प्रतीक असलेल्या बुरबाँ राजघराण्याचा फ्रान्सवर अंमल १६व्या शतकाच्या मध्यापासून होता. तेरावा लुई (१६१०-१६४३), चौदावा लुई (१६४३-१७१५), पंधरावा लुई (१७१५ ते १७७४) व सोळावा लुई (१७७४-१७९३) या राजांच्या काळात फ्रान्समध्ये असंतोषात वाढ होत गेली.

चौदावा लुई खऱ्या अर्थाने निरंकुश सत्ताधीश होता. चौदावा लुई अतिशय शक्तिशाली व महत्त्वाकांक्षी होता. चौदाव्या लुईच्या काळात फ्रान्सला युरोपच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. फ्रान्सची संपूर्ण सत्ता त्याच्या हाती केंद्रित झाली होती. 'मी म्हणजे राज्य' (I am the State) या त्याच्या वाक्यावरून त्याच्या अमर्याद सत्तेची कल्पना येते. पण त्याच्याच काळात फ्रान्सच्या अधोगतीला सुरुवात झाली. फ्रान्सचे साम्राज्य वाढविण्यासाठी चौदाव्या लुईने फ्रान्सला शेजारी देशांशी युध्दात गुंतवले. परिणामी देशाची आर्थिक स्थिती ढासळू लागली. चौदाव्या लुईच्या उधळपट्टीचे उदाहरण म्हणजे व्हर्साय येथे त्याने बांधलेला राजमहाल. व्हर्सायचा राजमहाल व विशेषतः त्यातील आरसेमहाल आपल्या वैभवासाठी युरोपमध्ये प्रसिध्द होता. चौदाव्या लुईने घोषित केलेल्या युध्दांमुळे आणि त्याच्या उधळपट्टीमुळे फ्रान्सवरील कर्ज वाढले. त्याचा फटका जनतेला बसू लागल्याने जनतेमध्ये असंतोष निर्माण होऊ लागला. चौदाव्या लुईच्या मृत्यूसमयी फ्रान्सची तिजोरी रिकामी झाली होती. चौदाव्या लुईच्या कारभाराला फ्रेंच जनता किती त्रस्त झाली होती याचे उदाहरण म्हणजे सायमन नावाचा धर्मगुरू लिहितो की, 'चौदाव्या लुईच्या मृत्यूची बातमी ऐकून फ्रेंच जनतेला आनंदाचे कापरे भरले व आपली सुटका झाल्याबद्दल जनतेने परमेश्वराचे आभार मानले.'

चौदाव्या लुईनंतर त्याचा पणतू पंधरावा लुई (१७१५-१७७४) सत्तेवर आला. चौदाव्या लुईने मृत्यूपूर्वी आपल्या उत्तराधिकाऱ्याला 'माझ्यासारखा युद्धाकरिता वेडा बनू नकोस. देशाची आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न कर' असा सल्ला दिला असला तरी त्याचा काहीही परिणाम झाला नाही. फ्रान्समधील परिस्थितीचे गांभीर्य त्याला कधी पटले नाही. 'माझ्यानंतर प्रलय' हे त्याचे उत्तर असे. पंधरावा लुई आळशी व विलासी होता. ५९ वर्षांची दीर्घ कारकिर्द असणाऱ्या पंधराव्या लुईचे इ.स. १७४३ पासून खऱ्या अर्थाने राजसत्तेवर नियंत्रण होते. पंधराव्या लुईच्या कारभाराचे वर्णन करताना कॉम्त द मर्सी हा ऑस्ट्रियन राजदूत लिहितो, 'फ्रेंच राजदरबारात गोंधळ, कारस्थान व अन्याय याशिवाय दुसरं काहीही नाही. प्रशासन नावाची गोष्ट अस्तित्वात नाही.' पंधराव्या लुईने दुर्बळ परराष्ट्र धोरण राबविले. 'सप्तवार्षिक युध्दात'(१७५६-१७६३) फ्रान्सचा पराभव झाला.

पंधराव्या लुईनंतर त्याचा नातू सोळावा लुई (१७७४-१७९३) अवघ्या विसाव्या वर्षी फ्रान्सचा राजा बनला. फ्रान्सची अवस्था अत्यंत बिकट झालेली असल्याने सोळावा लुई राज्य करण्यास अयोग्य होता. वस्तुतः सोळावा लुई हा पापभीरू, सामान्य जनतेबद्दल सहानुभूती बाळगणारा होता. मात्र स्वतंत्र बुध्दिने राज्यकारभार करण्याची त्याच्यात कुवत नव्हती. राज्यारोहणाच्या प्रसंगी ''सारे विश्व माझ्यावर कोसळल्यासारखे वाटत आहे'' असे त्याने उद्‌गार काढले. मंत्रिमंडळाच्या बैठकीचे संचालन करण्यास तो घाबरत असे. मालेशर्ब्स नावाच्या त्याच्या मंत्र्याने राजीनामा दिल्या त्यावेळी ''तू किती नशिबवान आहेस! मलाही असा राजीनामा देता आला तर?''असे त्याने उद्‌गार काढले. आर्थिक दुरावस्था त्याच्या काळात पराकोटीला पोहोचल्याने त्याच्या काळात क्रांती घडून आली.

क. राणी मेरी अन्त्वानेतचा प्रभाव :

बुरबाँ राजघराण्यातील स्त्रियांचा राज्यकारभारावर वरचष्मा असे. सोळाव्या लुईची पत्नी मेरी अन्त्वानेत हिचा प्रभाव मात्र फ्रेंच जनतेच्या दृष्टीने वाईट ठरला. मेरी अन्त्वानेत ही ऑस्ट्रियाची राजकन्या आणि महाराणी मारीया थेरेसा हिची कन्या होती. ऑस्ट्रियाबद्दल प्रेम असलेल्या आपल्या राणीबद्दल फ्रेंच जनतेला प्रेम वाटले नाही त्याचप्रमाणे राणीलाही फ्रेंच जनतेबद्दल आपुलकी नव्हती. सोळावा लुई आपल्या राणीच्या धाकात असे. मेरी अन्त्वानेतकडे चांगले, योग्य निर्णय घेण्याची कुवत होती. मात्र ती अतिशय अहंकारी, दिखाऊ, अविचारी आणि चंचल होती. तिने राजाला कधीही योग्य सल्ला दिला नाही. तिच्याभोवती नेहमी लोभी, बेशिस्त आणि राज्यकारभाराचा गैरफायदा घ्यायला उत्सुक असलेल्या खुशमस्कऱ्या लोकांची गर्दी असे. फ्रान्सचा राज्यकारभार तिच्या तंत्राने चालत असे. फ्रेंच जनतेला तिचा हस्तक्षेप सहन होत नव्हता.

ड. अकार्यक्षम प्रशासन व्यवस्था :

फ्रान्समधील राज्यव्यवस्था अनियंत्रित असूनही प्रशासनात कोठेही एकसूत्रीपणा नव्हता. चौदाव्या व पंधराव्या लुईच्या काळात प्रशासन व्यवस्थेत अकार्यक्षमता व भ्रष्टाचार माजला होता. राजा प्रशासन व्यवस्थेच्या सर्वोच्च स्थानी असून मंत्री आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची नेमणूक राजाच करीत असे. मंत्र्याच्या नेमणूका करताना उमरावांना प्राधान्य दिले जात असे. राज्यक्रांतीपूर्वीचे फ्रेंच प्रशासन अकार्यक्षम, बेशिस्त, भ्रष्टाचारी व महागडे होते.

फ्रेंच राजाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी पाच समित्या होत्या. कायदे करणे, राजाच्या नावे हुकूम काढणे, अंतर्गत व बहिर्गत व्यवहारांची देखरेख करणे हे त्यांचे काम होते. राज्याचे ४० भाग पाडण्यात आले होते. त्यावरील 'गव्हर्नर' हा उच्च अधिकारी उमराव वर्गातील असे. फ्रान्सचे खरे प्रशासन 'जनरॅलिटी' या नावाच्या ३४ विभागांकडून चालत असे. त्यावरील अधिकारी 'इन्टेडंट' या नावाने ओळखले जात व त्यांची नेमणूक राजा करीत असे. अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखणे, कर वसूल करणे ही कामे 'इन्टेडंट' करीत असत. त्यांच्या सत्तेवर अंकुश नसल्याने फक्त राजाचे हुकूम अंमलात आणणे व स्वत:चे उत्पन्न वाढविण्याचे ते प्रयत्न करीत असत.

फ्रान्समध्ये कायद्याच्या बाबतीत समानता आणि एकसूत्रता नव्हती. देशाच्या विविध भागात विविध कायदे अस्तित्वात होते. काही ठिकाणी रोमन कायदा तर काही ठिकाणी जर्मन कायदा अस्तित्वात होता. फ्रान्समध्ये वेगवेगळ्या अशा ४०० कायदेपध्दती अस्तित्वात होत्या. एकट्या मैन प्रांतात १२५ प्रकारच्या कायदेपध्दती होत्या. कायदे लॅटिन भाषेत असल्याने सर्वसामान्यांना त्याचे ज्ञान नव्हते.

न्यायदानाची पध्दती सदोष होती. साध्या गुन्ह्याकरीता कठोर शिक्षा दिल्या जात. विविध वर्गातील लोकांना वेगवेगळा न्याय असे. कायद्यात 'हेबिअस कॉर्पर्स' ची तरतूद नव्हती. राजाची न्यायालये, लष्करी न्यायालये, धर्मगुरूंची न्यायालये अशी विविध न्यायालये असत. पण त्यांच्या अधिकारकक्षा ठरविलेल्या नव्हत्या.

कनिष्ठ न्यायालयातील निर्णयांचा फेरविचार करण्यासाठी फ्रान्समध्ये १३ वरिष्ठ न्यायालये (पार्लमेंट) होती. राजाच्या विविध आज्ञा व वटहूकूम यांची नोंद ते घेत असत. या न्यायालयातील न्यायाधीशांच्या पदांची विक्री होत असे.

लष्कर व्यवस्थेत गोंधळ होता. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी एक लाख पस्तीस हजार सैनिकांवर ३५,००० अधिकारी होते. त्यापैकी ११७१ अधिकारी 'जनरल' या हुद्यावर होते. अधिकाऱ्यांपैकी फक्त २५,००० अधिकारी प्रत्यक्ष नोकरीत होते. अधिकाऱ्यांना पगार व भत्ते भरपूर मिळत होते. सैन्यभरती निष्काळजीपणाने केली जात असे.

इ. राजघराण्याची उधळपट्टी :

राजघराण्यातील लोक प्रचंड प्रमाणात उधळपट्टी करत असत. फ्रान्सची राजधानी पॅरिस होती मात्र सर्व निर्णय व्हर्सायच्या राजवाड्यातून घेतले जात. व्हर्सायचा राजवाडा चौदाव्या लुईच्या काळात बांधला गेला होता व त्यास ३० कोटी रुपये खर्च आला होता. व्हर्सायच्या राजवाड्यात राजाचा अवाढव्य लवाजमा होता. राजाराणीच्या तैनातीला १५०० नोकर होते, तर राणीच्या खास तैनातीला ५०० नोकर होते. राजवाड्यात १८७५ घोडी व २१७ वाहने होती. राजाच्या पंक्तीला जवळजवळ ४०० अधिकारी जेवत असत. व्हर्सायच्या राजवाड्याचा वार्षिक खर्च १० कोटी फ्रँक होता. फ्रेंच राजाचा दरबार युरोपात वैभवशाली म्हणून ओळखला जात असे. या दरबारात दोन हजार अमीर उमराव असत.

१.२.२. सामाजिक परिस्थिती :

क्रांतिपूर्वकाळातील फ्रेंच समाजातील विषमता आणि अन्याय हे फ्रेंच राज्यक्रांतीचे महत्त्वाचे कारण मानले जाते. फ्रेंच समाजरचना विषमतेवर आधारीत होती. समाजात तीन प्रमुख वर्ग अस्तित्वात होते. ते म्हणजे - उमराव, धर्मगुरू व सामान्य वर्ग. यापैकी उमराव व धर्मगुरू यांना विशेष सवलती होत्या. विशेषाधिकार असलेल्या लोकांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या फक्त एक टक्का होते. क्रांतीपूर्व काळात फ्रान्सची लोकसंख्या अडीच कोटी होती. त्यात १,४०,००० उमराव वर्गातील, तर १,५०,००० धर्मगुरू या वर्गातील लोक होते. बिगर सवलतदार वर्गात सामान्य वर्गाचा (Third Estate)चा समावेश होता. त्यांची संख्या लोकसंख्येच्या ९९ टक्के असून मध्यमवर्गीय व अतिनिम्नवर्ग यांचा समावेश होता. फ्रान्सच्या एकूण मालमत्तेपैकी एक पंचमांश मालमत्ता पहिल्या दोन वर्गांकडे होती. मात्र या दोन वर्गांवर कोणतेही कर नव्हते. याउलट सामान्य वर्गावर करांचा बोजा होता.

अ. उमराव वर्ग :

उमराव वर्गाची लोकसंख्या १ टक्क्यांहून कमी असूनही त्यांच्याकडे ६० टक्के जमीन होती. उमराव वर्गात समानता, एकसंघपणा नव्हता. आर्थिक दृष्ट्या सर्व उमराव समान नव्हते. विशेष अधिकार, कर न देण्याची सवलत व त्यांना मिळणारी फ्रान्सच्या प्रशासनातील उच्च पद याबाबत समानता होती. कुळांकडून जबरदस्त खंड वसूल करणे, कुळांना विनामूल्य शेतांवर राबवून घेणे, सक्तीने नजराणा मागणे इ. सवलती असत. सामान्य वर्गाला उमराव वर्गाचा आदर करावा लागे. चर्च व सैन्यातील उच्च पद उमरावांसाठी असत. दारूचे मक्ते, पूल, पाणवठा, गायरान इत्यादींपासून उमरावांना वहिवाटीने उत्पन्न मिळत असे. मासेमारी व शिकार असे विशेषाधिकार उमरावांना असत. उमरावांच्या शिकारीपायी कुळांची पिके उद्ध्वस्त होत असत.

ब. धर्मगुरू:

फ्रान्समधील बहुसंख्य जनता रोमन कॅथॉलिक पंथाची होती. चर्चची फ्रान्समध्ये प्रचंड मालमत्ता व यंत्रणा होती. धर्मगुरूंना समाजात प्रतिष्ठेचे स्थान व सरकारकडून सवलती तसेच

विशेषाधिकार मिळाले होते. एकूण जमिनीचा पाचवा हिस्सा धर्मगुरूंच्या ताब्यात होता. स्ट्रॉसबर्गच्या आर्चबिशपच्या वार्षिक उत्पन्न तीन लाख डॉलर्स इतके, तर रोहनच्या कार्डिनलचे वार्षिक उत्पन्न २५ लाख लिव्हर्स इतके होते. चर्चची मालमत्ता करमुक्त होती. विशेष अधिकार व विस्तृत वर्चस्व यामुळे चर्च ऑफ फ्रान्सला 'राज्यांतर्गत राज्य' असे म्हटले जात असे. फ्रान्समधील धर्मसंस्था सुखविलास व चैन यात अडकल्याने अध्यात्मिक क्षेत्रात त्यांचे अध:पतन झाले होते. अठराव्या शतकात चर्चची लोकप्रियता बरीच घटली. धर्मगुरूंच्या विधिनिषेधशून्य विलासी जीवनामुळे लोकांना त्यांची व चर्चची घृणा वाटू लागली.

धर्मोपदेशकांमध्ये उच्च व सामान्य असे दोन वर्ग होते. आर्चबिशप ते ॲबट या प्रकारचे धर्मगुरू उच्चवर्गीय मानले जात. ते उमराव वर्गातील असत. त्यांची जीवनशैली आरामशीर, सुखासीन व चैनीची होती. सामान्य धर्मोपदेशक हे सामान्य वर्गातून आलेले असत. उत्पन्न तुटपुंजे होते. सामान्य धर्मोपदेशक सामान्यांच्या दु:खात सहभागी होत असत.

क. सामान्य वर्ग (Third Estate) :

सामान्य वर्ग हा फ्रान्समधील सवलती नसलेला वर्ग होता. या वर्गामध्ये दाटलेल्या असंतोषाने १७८९ची क्रांती घडून आली. सामान्य वर्गाचे तीन वर्गात वर्गीकरण झालेले होते. ते म्हणजे मध्यम वर्ग (बुर्ज्वा), कारागीर वर्ग आणि शेतकरी वर्ग.

मध्यमवर्ग हा फ्रान्समधील जागृत वर्ग असून त्याची लोकसंख्या सुमारे २.५ लाख होती. या वर्गात शिक्षक, वकील, साहित्यिक, डॉक्टर, व्यापारी, सावकार इ. चा समावेश होता. या वर्गाजवळ बुध्दी व पैसा होता. हा वर्ग असंतुष्ट होता. कारण मध्यमवर्गाला उमरावांसारखे सामाजिक सन्मान नव्हते किंवा शासनातील महत्त्वाची पद त्यांच्याकडे नव्हती. शासनाने आपल्याला निष्कृष्ट स्थान द्यावे ही या वर्गाची खंत होती. या वर्गानेच फ्रान्समधील क्रांतीचे नेतृत्व केले.

श्रमजीवी वर्गाचा दुसरा विभाग म्हणजे कारागीर. त्यांची परिस्थिती वाईट होती. फ्रान्समधील अद्यापही विशेष विकसित न झालेल्या औद्योगिकीकरणामुळे तयार झालेला वर्ग होता. कामगारांना १८-१८ तास काम करावे लागे. त्यांना मिळणारी मजुरी अतिशय कमी होती.

सामाजिक स्थितीमध्ये सर्वात दयनीय अवस्था शेतकरी वर्गाची होती. ९०% लोकसंख्या शेतकऱ्यांची होती. त्यात दहा लक्ष भूदास होते. हा वर्ग करांच्या प्रचंड ओझ्याखाली दबलेला होता. सरकारचा जवळजवळ सर्व महसूल सामान्य वर्गाकडून वसूल केला जात असे. शेतकरी वर्ग आपल्या उत्पन्नातील ५५% भाग कर म्हणून भरत असे. शेतकऱ्यांवर राज्याव्यतिरिक्त धर्म संस्थेचा 'टीथ' हा कर तसेच सरंजामदारांची देणी असत.

शेतकऱ्यांना शेतांना कुंपण घालण्याची परवानगी नव्हती. पिकांची मळणी करण्याकरीता जमिनदारांच्या चक्कीवर धान्य न्यावे लागे व या चक्क्या दूरवर असत. कर वसूल करण्याची पध्दत निर्दयी होती. सामान्यांवर लावलेला मिठावरील कर हा अन्यायाची परिसीमा होती. सात वर्षावरील प्रत्येकाने आवश्यकता नसली तरी दरवर्षी किमान ७ पौंड मीठ घेतले पाहिजे असा नियम होता. या मिठाचा दर प्रत्यक्ष दरापेक्षा १० पटीने जास्त होता. वेगवेगळ्या करांमुळे उत्पन्नातील ८० % भाग करापोटी खर्च होत होता. परिणामी कंदमुळे, गवत, सडके बटाटे खाऊन ही गरीब जनता अर्धपोटी रहात होती. फ्रान्सची समाजरचना शोषणावर आधारित असल्याने समान्य वर्गाने क्रांतीमध्ये हिरिरीने भाग घेतला.

१.२.३. आर्थिक परिस्थिती :

फ्रेंच राज्यक्रांतीच्या मुळाशी आर्थिक कारणे होती असे मत अनेक नामवंत इतिहासकारांनी दिलेले आहे. युध्द आणि राजघराण्यातील व्यक्तिंचे विलासी जीवन यामुळे फ्रान्स दिवाळखोरीपर्यंत आला होता. कोणत्याही आर्थिक सुधारणांना उमराव व धर्मगुरू हे विशेषाधिकार असलेले वर्ग विरोध करत. फ्रान्समधील कर पध्दतीचा सर्वात जास्त फटका सामान्य वर्गाला बसत होता. जास्त मालमत्ता बाळगणारे उमराव व धर्मगुरू या वर्गांना करांपासून मुक्ती होती. परिणामी सरकारी तिजोरी सामान्य वर्गामुळे भरत होती. मात्र या वर्गाची आर्थिक अवस्था वाईट होती.

अ. फ्रेंच सरकारची दिवाळखोरी :

फ्रेंच राजांच्या एकतंत्री कारभारावर कोणाचाही अंकुश नव्हता. चौदाव्या लुईने आपल्या महत्त्वाकांक्षेपाई युध्द केल्याने फ्रान्सचा खजिना रिकामा होवू लागले. पंधराव्या लुईने फ्रान्सची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. चौदाव्या लुईने व्हर्साय येथे आलिशान राजवाडा बांधला होता त्याचा खर्च बेसुमार होता. शेकडो सरंजामदार तेथे मुक्काम ठेवून असत. या राजवाड्यात जवळ-जवळ १६ हजार व्यक्ति रहात ज्याचा खर्च कित्येक कोटी होता. सोळाव्या लुईची पत्नी मेरी अन्त्वानेत उधळपट्टीसाठी इतकी प्रसिध्द होती की फ्रेंच जनता तिला 'तुटीची राणी' म्हणत असत. त्यातच 'सप्तवार्षिक युध्द' (१७५६-६३) आणि अमेरिकेचे स्वातंत्र्ययुध्द यात फ्रान्स सहभागी झाल्याने सरकारी तिजोरीवर भार पडला. अर्थव्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचे नियोजन नव्हते. अर्थसंकल्प मांडला जात नसे. राष्ट्रीय कर्जात वाढ होत चालली होती. देशाचे अर्धेअधिक उत्पन्न राष्ट्रीय कर्जाची फेड करण्यात खर्च होऊ लागले. कर्ज कमी होण्याच्या ऐवजी कर्जाचा बोजा वाढू लागला. हा खर्च भागवण्यासाठी राजा नवनवीन कर बसवू लागला.

ब. विषम कर पद्धती :

समाजातील दोन मुख्य वर्ग म्हणजेच उमराव व धर्मगुरू यांना करांपासून मुक्ती देण्यात आल्याने करांचा मोठा बोजा सामान्य वर्गावर पडला होता. प्राप्तिकराच्या बाबतीत सामान्य माणसाने जेथे १४ फ्रँक कर भरावयाचा तेथे त्याला१५२ फ्रँक कर द्यावा लागत होता. सामान्य जनतेवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर आकारण्यात आले होते. कर वसूलीचे काम उमराव वर्गाकडे सोपवण्यात आल्याने सामान्य जनतेचा छळ होत असे.

करांचे विविध प्रकार होते. 'गॅबेल' हा मीठावरील कर अन्यायकारी होता. प्रत्येक व्यक्तिने सात पौंड मीठ विकत घेतलेच पाहिजे, असा नियम होता. सामान्य जनता धर्मगुरूंना 'टीथ' (Tithes) हा कर देत असे. उमराव वर्ग आपल्या विभागातील लोकांकडून पूलपट्टी, पाणीपट्टी, वाहतूक कर, शेतसारा इ. कर वसूल करत. या सर्व करांमुळे सामान्य वर्गाची पिळवणूक सुरू होती.

क. आर्थिक सुधारणांचे अपयश :

दिवाळखोरीच्या मार्गावर असलेल्या फ्रान्सची आर्थिक स्थिती सूधारण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यासाठी नामवंत असे अर्थमंत्री नेमण्यात आले. सोळाव्या लुईने परिस्थिती सावरण्याचा आटोकाट प्रयत्न केला. राष्ट्रीय कर्जावरील व्याज वाढत चालले होते. राजाचा खर्च ६% कमी करूनही परिस्थिती सुधारली नाही.

सोळाव्या लुईने **त्यूर्गो (१७७४-१७७६)** या अर्थमंत्र्याची निवड केली. त्याने 'दिवाळखोरी नको - करवाढ नको - उधारकर्ज नको' या शब्दात आपले धोरण जाहीर केले. काटकसर करून आणि राष्ट्रीय संपत्तीत वाढ करून त्याने आर्थिक पेचप्रसंग सोडविण्याचा प्रयत्न केला. त्याने धान्याच्या खरेदी-विक्री संबंधित सर्व सरकारी कायदे रद्द करून आंतरप्रांतीय धान्य व्यापारात स्वातंत्र्य दिले. त्याने राज्यकारभारातील उधळपट्टी थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या धान्य सुधारणांना यश मिळाले नाही. धान्याच्या तुटवड्यामुळे त्याचा प्रयोग फसला. दुष्काळाच्या भीतीमुळे अव्यवस्था माजली आणि धान्याच्या किंमती वाढल्या. या सुधारणांमुळे दाटून आलेला असंतोष दडपून टाकण्यात आला. त्यूर्गोने आपल्या सुधारणा चालूच ठेवल्या. त्याने कोर्वी हा कर आणि व्यापाऱ्यांचे संघ बरखास्त करण्याची मागणी केली. त्याने कर पद्धतीत समानता आणण्याची सूचना केली. त्याच्या सूचनेमुळे सवलतदार वर्गांवर कर बसवले जाणार होते. व्यापारी संघांवर नियंत्रण मिळवून त्यूर्गोला मक्तेदारी संपवायची होती.

त्यूर्गोच्या सुधारणांना सवलतदार वर्गाकडून प्रचंड विरोध झाला. उमराव, धर्मगुरू त्याचप्रमाणे मेरी अन्त्वानेत यांचा तीव्र विरोध होता. अखेर राजाने सुधारणा मान्य न करता त्यूर्गोला पदावरून दूर केले.

त्यूर्गोच्या हाकलपट्टीनंतर सोळाव्या लुईने **नेकर (१७७६-१७८१)** या बँकिंग क्षेत्रातील व्यक्तिची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. नेकरने अनेक काटकसरीच्या योजना आखल्या, मात्र त्यात यश मिळणे कठीण होते. काटकसरीच्या योजनांना सवलतदार वर्गाचा विरोध होता. नेकरच्या कालखंडात अमेरिकन स्वातंत्र्ययुध्द झाले. या युध्दात फ्रान्सने अमेरिकन वसाहतींना मदत केल्याने फ्रान्सवर खर्चाचा बोजा वाढला. नेकरने पहिल्यांदाच राज्याचा खर्च आणि उत्पन्न दाखवणारा अहवाल प्रसिध्द केला. या अहवालामध्ये अनाठायी खर्च कसा होतो ते दाखविण्यात आले. नेकरच्या काळात पूर्वी काढलेल्या कर्जावरील व्याज वाढत गेले. त्यामुळे अर्थव्यवस्था कोलमडून पडली. त्यावर उपाय म्हणून सवलतदार वर्गांवर राजाने कर बसवावा अशी सूचना नेकरने केली. परिणामी दरबारी लोकांचा रोष नेकरला पत्करावा लागला. सोळाव्या लुईने नेकरची हाकलपट्टी केली.

नेकरच्या हाकलपट्टीनंतर सोळाव्या लुईने इ.स. १७८१ ते १७८३ या काळात विविध अर्थमंत्री नेमले. मात्र फ्रान्सच्या बिघडलेल्या आर्थिक परिस्थितीवर तोडगा निघू शकला नाही. आर्थिक स्थिती सावरण्यासाठी सोळाव्या लुईने **केलाँ (१७८३-१७८७)** याला अर्थमंत्री म्हणून नेमले.

केलाँने सुरुवातीला सर्व दरबारी लोकांना खूश ठेवण्याचे धोरण ठेवले. खर्चावर कोणतेही नियंत्रण न राहिल्याने मोठ्या प्रमाणावर कर्ज घेण्यात आले. या कर्जाचा परिणाम म्हणून फ्रान्सची तिजोरी रिकामी झाली आणि आंतरराष्ट्रीय कर्जबाजारात कर्ज मिळनासे झाले. आर्थिक अधोगती थांबवण्यासाठी सर्व वर्गांवर एक सर्वसाधारण कर बसवावा अशी सूचना केलाँने केली.

आर्थिक पेचप्रसंग सोडविण्यासाठी केलाँने फेब्रुवारी १७८७ मध्ये वरिष्ठ वर्गाची सभा बोलावली होती. या सभेपुढे केलाँ आपल्या सुधारणा मांडणार होता. केलाँने पुढील प्रस्ताव मांडला १) कोर्वी कराची बरखास्ती २) अंतर्गत कस्टम्स करांची बरखास्ती ३) फ्रान्समध्ये मुक्त धान्य व्यापारास परवानगी ४) टेली (मालमत्ता कर) व गॅबेल (मिठावरील कर) कमी करणे ५) उमराव, धर्मगुरू यांनी स्वत:वर संपत्तीच्या प्रमाणे कर बसवून घेण्यास तयार होणे.

केलाँच्या सूचना मान्य केल्यास आपले पारंपरिक हक्क, आर्थिक सवलती, तसेच सामाजिक श्रेष्ठत्व नष्ट होईल, असे वरिष्ठ वर्गांना वाटले. त्यांनी कोणताही कर देण्यास नकार दिला. अखेर लुई १६व्याने वरिष्ठ वर्गांच्या आग्रहापायी केलाँची हाकलपट्टी केली.

केलाँनंतर १६व्या लुईने **ब्रिआं** यास अर्थमंत्री म्हणून नेमले. त्याने नवीन कर्ज काढून देशाची आर्थिक परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र ते अशक्य होते. नवीन कर्ज काढण्याचा किंवा नवीन कर उभारण्यास 'पॅरिस पार्लमा' या खर्च मंजूर करणाऱ्या सभेने विरोध केला. राजाची विनंतीही मान्य करण्यात आली नाही. नवीन कर बसविण्यासाठी जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'स्टेटस् जनरलची' परवानगी आवश्यक असल्याचा आग्रह पार्लमेंटने धरला. सोळाव्या लुईने ठिकठिकाणच्या पार्लमेंट बरखास्त केल्या. त्यामुळे जनतेच्या असंतोषात आणखीन भर पडली. स्टेटस् जनरल बोलावण्याची मागणी पॅरिस व इतर शहरांमध्ये प्रखरपणे पुढे येऊ लागली. बंडाळीच्या भितीने सोळाव्या लुईने स्टेटस् जनरल बोलावण्याची परवानगी दिली.

१.३. अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दाचा परिणाम:

सप्तवार्षिक युध्दास (१७५६ - १७६३) पराभूत झाल्याने युरोपियन राजकारणात फ्रान्सचे स्थान कमकूवत झाले होते. ब्रिटनच्या उत्तर अमेरिकेतील तेरा वसाहतींनी स्वातंत्र्ययुध्द पुकारले त्यावेळी फ्रान्सने त्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला. फ्रेंच सैन्याची एक तुकडी लाफायेत यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकन स्वातत्र्ययुध्दात वसाहतीच्या बाजूने सामील झाली. या युध्दात ब्रिटन पराभूत होऊन वसाहतींना स्वातंत्र्य मिळाले. या वसाहतींनी एकत्र येऊन राजविरहीत प्रजासत्ताक निमार्ण केले. या स्वातंत्र्ययुध्दात भाग घेतलेल्या फ्रेंच सैनिकांनी लोकशाहीचे गोडवे गाण्यास सुरुवात केले. अमेरिकन राज्यक्रांतीपासून फ्रेंच सैनिकांनी वाईट गोष्टींना विरोध करणे हे कर्तव्य आहे हा बोध घेतला. तसेच फ्रेंच जनतेने अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दापासून सुख, समृध्दी किंवा सुरक्षितता यापेक्षा अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दामुळे क्रांतीकारी विचार फ्रेंच समाजमध्ये पसरण्यास मदत झाली. स्वातंत्र्य हे शासनाचे महत्वाचे उद्दिष्टअसले पाहिजे ही शिकवण घेतली.

१.४. आपली प्रगती तपासा :

१. फ्रेंच राज्यक्रांतीची राजकीय पार्श्वभूमी लिहा.

_____

_____

२. क्रांतीपूर्व फ्रान्समधील समाज रचना स्पष्ट करा.

_____

_____

३. सोळाव्या लुईच्या अर्थमंत्र्याचे कार्य लिहा.

_____

_____

१.५. फ्रेंच तत्त्वज्ञांची कामगिरी

अठराव्या शतकात फ्रेंच तत्त्वज्ञांनी जनतेमध्ये बौध्दिक जागृती घडवून आणली आणि क्रांतीस पूरक वैचारिक पार्श्वभूमी तयार केली. तत्त्वज्ञांनी प्रसुत केलेल्या नवविचारांमुळे फ्रेंच जनतेमध्ये चिकित्सक व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत झाली. समाजातील विषमता, पिळवणूक, धार्मिक असहिष्णूता, आर्थिक निर्बंध, भ्रष्टाचारी राजवट, न्यायपध्दतीतील दोष या तत्त्वज्ञांनी दाखवून दिले. फ्रेंच समाजाची बौध्दिक जागृती घडविण्यात माँतेस्क्यू, व्हॉल्तेअर, रूसो, दिदेरो, क्वेस्ने, त्युर्गो, द अलेंबर इ. विचारवंत अग्रेसर होते. त्यांच्यामध्ये प्रामाणिक मतभेद असले तरी एका उदारमतवादी, सुधारक व आदर्श समाजाची स्थापना करणे हे त्यांच्या विचारांचे समान वैशिष्ट्य होते. राजसत्तेवर नियंत्रण, व्यक्तिस्वातंत्र्य, धर्मसहिष्णूता, सामाजिक समता, अनिर्बंध अर्थव्यवस्था, प्रशासनातील स्वायत्तता, बुध्दिवाद, भौतिकवाद इत्यादी अनेक तत्त्वांचा पुरस्कार तत्त्वज्ञांनी केला.

फ्रेंच विचारवंतानी अनियंत्रित राजसत्ता, सरंजामशाही समाजव्यवस्था, धर्मसंघटना यावर टीका केल्याने त्यात ज्या वर्गांचे हितसंबंध गुंतलेले होते ते दुखावले गेले. त्यामुळे तत्वज्ञांना मारहाण, तुरूंगवास, अज्ञातवास व हद्दपारीला तोंड द्यावे लागले. विचारवंताच्या पुस्तकांवर फ्रान्समध्ये बंदी घालण्यात आली. तेव्हा या पुस्तकांची छपाई फ्रान्सबाहेर होऊ लागली व विचारांचा प्रसार होत राहिला. विचारांमधील निश्चित पध्दतीमुळे विचारवंताना पाठीराखे मिळत होते. उमराव घराण्यातील स्त्री-पुरूष, श्रीमंत, उच्च पदस्थ अधिकारी यांनी विचारवंताना आश्रय दिला. या तत्त्वज्ञांचे विचार केवळ फ्रान्सपुरते मर्यादित राहिले नाहीत. पुढील काळात या विचारांनी युरोपमधील उदारमतवादी चळवळींचा पाया घातला.

काही महत्त्वाच्या फ्रेंच तत्त्वज्ञांचे विचार व कार्य पुढीलप्रमाणे:

१.५.१ माँतेस्क्यू (१६८९-१७५५):

शार्लल्वी द सगाँदा माँतेस्क्यू या प्रसिध्द फ्रेंच तत्त्वज्ञाचा जन्म ला ब्रेद येथे एका सरदार घराण्यात झाला. बोर्दो येथे त्याने कायद्याची पदवी मिळवून वकीली व्यवसाय सुरू केला. इ.स. १७०८ नंतर पाच वर्ष तो पॅरिसमध्ये होता. इ.स.१७१६ ते १७२८ या काळात बोर्दो येथील स्थानिक न्यायालयात अध्यक्ष या नात्याने त्याने काम केले. इ.स. १७१६ मध्ये त्याला चुलत्याची सरदारकी वारसाहक्काने मिळाली. इ.स. १७२८ मध्ये फ्रेंच अकादमीवर त्याची नियुक्ती झाली तसेच ब्रिटिश रॉयल सोसायटीचे सदस्यत्व त्याला मिळाले.

अठराव्या शतकातील महत्त्वाच्या युरोपीय विचारवंतांमध्ये माँतेस्क्यूचा समावेश होतो. त्याच्या विचारसरणीमागे फ्रान्समधील चौदाव्या लुईच्या कारकिर्दीची चिकित्सक पार्श्वभूमी आहे. त्याचप्रमाणे ब्रिटिश शासनसंस्था व उदारमतवाद यांचाही प्रभाव आहे. बॉर्दो अकादमीचा प्रमुख असताना त्याने वैज्ञानिक संशोधनाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला. इ.स. १७०९ मधील एका निबंधात त्याने रोमन विधिज्ञ, लेखक व मुत्सद्दी सिसेरो याची स्तुती केली आहे. त्याने आपल्या एका निबंधात ख्रिस्ती धर्मावर गर्भित टीका केली असून रोमनांनी केलेल्या धर्माच्या राजकीय उपयोगासंबंधी विश्लेषण आहे.

इ.स. १७२३ मध्ये माँतेस्क्यूने 'द पर्शियन लेटर्स' (फ्रेंच शब्द 'लॅत्र पॅसीन') हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ म्हणजे पत्ररूपाने केलेले प्रवासवर्णन आहे. त्यात तीन काल्पनिक इराणी प्रवाशांचे युरोपातील विशेषतः फ्रान्समधील अनुभवांचे वर्णन आहे. या ग्रंथात फ्रेंच व इराणी समाजातील आचारविचार व संस्था यावर मर्मभेदक व उपरोधिक भाष्य आहे. फ्रान्समधील समाज, धर्म, नीती, तत्त्वज्ञान यांची उपहासात्मक मीमांसा आहे. व्यक्ती आणि समाजाचे दास्य व स्वातंत्र्य यासंबंधी माँतेस्क्यूची मूलगामी नवीन दृष्टी दिसते. न्याय्यता, सद्‌गुण संपन्नता, सहकार्य आणि सहिष्णूता यावर आधारित समाजाचा मानदंड माँतेस्क्यूने सूचित केला आहे.

इ.स. १७२८ नंतर माँतेस्क्यूने युरोपभर प्रवास केला. त्यानंतर इ.स. १७३४ मध्ये त्याने रोमन साम्राज्याच्या उदयास्ताची मीमांसा करणारा ग्रंथ लिहिला. इहवादी मूल्यांच्या आधारे केलेला इतिहासाचा अभ्यास, या दृष्टीने हा ग्रंथ महत्वाचा आहे.

'द स्पिरीट ऑफ लॉज' हा माँतेस्क्यूचा गाजलेला ग्रंथ इ.स. १७४८ मध्ये प्रसिध्द झाला. कायदा हा समाजाची भौतिक परिस्थिती आणि त्यांच्या गरजा व परंपरा यांच्यातील परस्परसंबंधांचा निदर्शक असतो. त्याची प्राथमिक अभिव्यक्ती शासनसंस्थेच्या रूपाने होते. जगातील विविध देशात विविध प्रकारे विकसित होणारा कायदा व रूढी यांच्या मूळाशी असलेल्या घटकांचे विवेचन माँतेस्क्यूने या ग्रंथात केले आहे. राजेशाही, प्रजासत्ताक व हुकूमशाही या शासनसंस्थांच्या प्रकारांची मीमांसाही माँतेस्क्यूने केली आहे. निरंकुश राजेशाहीवर अंकुश ठेवण्याच्या दृष्टीने स्वायत्त न्यायव्यवस्थेची गरज माँतेस्क्यूने प्रतिपादित केली आहे. या ग्रंथात आपला सत्ताविभाजनाचा सुप्रसिध्द सिध्दांत मांडला. संपूर्ण राजेशाहीवर नियंत्रण मिळविण्यासाठी कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ व न्यायमंडळ ही शासनाची तीन अंगे संपूर्णपणे स्वतंत्र ठेवणे आवश्यक आहे. माँतेस्क्यूने राजाच्या दैवी अधिकाराच्या सिध्दान्ताचा निषेध करून घटनेच्या सार्वभौमत्वाला पाठिंबा दिला.

१.५. २. व्हॉल्तेअर (१६९४-१७७८) :

१८ व्या शतकातील युरोपातील वैचारिक चळवळीत फ्रेंच तत्त्वज्ञ फ्रँकोइस व्हॉल्तेअरने महत्वाची भूमिका बजावली. बुध्दिप्रामाण्यवादाचा त्यांनी पुरस्कार केला. मध्ययुगीन विचारसरणी व परंपरा यांच्यावर व्हॉल्तेअरने आपल्या लिखाणातून जोरदार हल्ला चढवला. आपल्या सद्‌सद्‌विवेकबुध्दीचा वापर करून अन्याय, असहिष्णूता व धर्मवेडेपणा यांचा विरोध केला. या तत्त्वांसाठी त्याला तुरूंगवास सोसावा लागला तसेच स्वतःच्या देशातून हद्दपारी भोगावी लागली.

इ.स.१६९४ मध्ये जन्म झालेल्या व्हॉल्तेअर याचे मूळ नाव फ्रॅकोइस मारी आरवे होते. त्यांचे वडिल पॅरिस येथे नोटरी होते. लुई-ले-ग्रेन या सुप्रतिष्ठीत महाविद्यालयात व्हॉल्तेअरचे शिक्षण झाले.

इ.स. १७१५ मध्ये चौदाव्या लुईचा मृत्यू झाला त्यावेळी व्हॉल्तेअर २१ वर्षाचा होता. चौदाव्या लुईच्या काळात फ्रान्समध्ये भाषण, विचार व इतर व्यक्तिस्वातंत्र्यांवर घातलेली बंधने तसेच उच्च पदांची खरेदी-विक्री, उमराव व धर्मगुरूंना करांमधून मिळणारी सूट याविषयी व्हॉल्तेअरला चीड होती. तरूणपणी तो लेखन करू लागला. उपरोधात्मक कविता लिहून फ्रान्सच्या राजघराण्याशी संबंधित एका बड्या व्यक्तिस दुखावल्यामुळे अकरा महिने त्याला

बॅस्टिलच्या तुरूंगात काढावे लागले. या तुरूंगवासाच्या काळात त्याने लिहिलेले 'ईडिपस' हे नाटक रंगभूमीवर गाजले. त्यानंतर तो व्हॉल्तेअर या नावाने वावरू लागला.

इ.स. १७२६ मध्ये रोहन या सरदार घराण्यातील व्यक्तिशी त्याचे भांडण झाल्याने व्हॉल्तेअरला पुन्हा एकदा बॅस्टिलचा तुरूंगवास भोगावा लागला मात्र फ्रान्स सोडण्याच्या अटीवर त्याची सुटका करण्यात आली. पुढे व्हॉल्तेअर इंग्लंडला गेला. इ.स. १७२६-१७२९ या इंग्लंडमधील तीन वर्षाच्या काळात त्यांने इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविले. शेक्सपियरच्या नाटकांचा फ्रेंच भाषेत त्यांने पहिल्यांदा अनुवाद केला. इंग्लंडमधील वास्तव्याच्या काळात त्याने आपला पहिला ऐतिहासिक ग्रंथ म्हणजेच स्वीडनचा राजा बारावा चार्लस याचे चरित्र लिहिले. फ्रान्समध्ये परत आल्यानंतर इ.स. १७३३ मध्ये व्हॉल्तेअर याने 'लेटर्स कन्सर्निंग द इंग्लिश नेशन' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकात त्याने धार्मिक सहिष्णूता, राज्यकारभार, अर्थव्यवहार , विज्ञान, वैद्यक व साहित्य अशा सर्व क्षेत्रात इंग्लंड फ्रान्सपेक्षा वरचढ असल्याचे प्रतिपादन केले. ही गोष्ट फ्रेंच शासकांना न रूचल्याने हे पुस्तक जाळण्यात आले व व्हॉल्तेअरला फ्रान्समधून हद्दपार करण्यात आले.

हद्दपारीत असताना इ.स. १७३४-१७४९ या काळात व्हॉल्तेअरला मादाम द्यू शाटले या विद्वान स्त्रीकडे आश्रय मिळाला. या काळात व्हॉल्तेअरने जगाचा इतिहास लिहिला. न्यूटनने मांडलेल्या तत्त्वांवर त्याने पुस्तक लिहिले. पुढे प्रशियाचा राजा फ्रेडरीक द ग्रेट याच्या दरबारात त्याने उच्चपद भुषविले. मात्र फ्रेडरीकचा जुलमी व स्वैर कारभार न पटल्याने त्याने प्रशियाचा निरोप घेतला. फ्रान्समध्ये परतणे शक्य नसल्याने त्याने फ्रान्स- स्वित्झर्लंड सीमेजवळ फर्नी या गावात वास्तव्य केले. तेथे त्याने आदर्श गाव वसविले. आदर्श शेतीचा यशस्वी प्रयोग केला. रेशमांच्या किड्यांची आयात सुरू केली. धार्मिक असहिष्णूतेमुळे जिनेव्हातून निर्वासित झालेल्या कामगारांच्या सहाय्याने व्हॉल्तेअरने घड्याळांचा कारखाना सुरू केला. फर्नी येथे त्याने इंग्लिश विचारवंत जॉन लॉक व न्यूटन यांचे पुतळे उभारले. सतरा खंडाच्या विश्वकोशात व्हॉल्तेअरने मोलाची भर टाकली. 'कॅन्डिड' हे बोचरी टीका करणारे उपहासात्मक पुस्तक लिहिले.

वयाच्या ८४ व्या वर्षी व्हॉल्तेअर पॅरिसला परतला. 'आयरीन' या स्वतः लिहिलेल्या नाटकाच्या प्रयोगाला तो उपस्थित राहिला तेव्हा संपूर्ण प्रेक्षागृह त्याच्या जयजयकाराने दुमदुमले. इ.स.१७७८ मध्ये व्हॉल्तेअरचा मृत्यू झाला.

व्हॉल्तेअरने विविधांगी लेखन केले. आयुष्यभर त्याने स्वातंत्र्याची, बुध्दिप्रमाण्यवादाची कास धरली. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा व्हॉल्तेअरने पुरस्कार केला. ज्या विचारांच्या प्रस्थापनेसाठी व्हॉल्तेअर लढला, त्या विचारांनी युरोपियन संस्कृतीला एक नवीन दिशा दिली. व्हॉल्तेअर रूसोइतका लोकसत्तावादी नसला तरी व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य त्याला मोलाचे वाटत होते. ख्रिस्ती धर्मसंस्थेच्या कारभारातील भ्रष्टतेवर त्याने जे कठोर, उपरोधिक व बुध्दिवादी हल्ले चढविले. त्यामुळे जागृतीचे एक नवे पर्व सुरू झाले. फ्रेंच राज्यक्रांती घडविण्यात त्याचे विचार कारणीभूत ठरले.

१.५. ३. ज्याँ झाक रूसो (१७१२-१७७८):

अठराव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीने युरोपच्या राजकारणात व वैचारिक विश्वात आमूलाग्र बदल घडवले. या क्रांतीच्या विचार, प्रेरणा व मूल्य देणाऱ्या

विचारवंतामध्ये रूसोचे नाव अग्रभागी आहे. त्याने लिहिलेला 'सामाजिक करार' हा ग्रंथ युगप्रवर्तक ठरला. ''जर फ्रान्समध्ये रूसो झाला नसता तर फ्रेंच राज्यक्रांती झाली नसती'' हे नेपोलियनचे उद्‌गार रूसोच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट करतात.

रूसोचा जन्म जिनेव्हा येथे एका मध्यमवर्गीय घड्याळजीच्या घरात झाला. त्याला पध्दतशीर विद्यालयीन शिक्षण मिळाले नाही. पुढे घरातून पळून तो पॅरिसला आला. उदरनिर्वाहासाठी त्याने अनेक नोकऱ्या केल्या. त्याचे खाजगी आयुष्य स्वैर व स्वच्छंदी होते. इ.स. १७४९ मध्ये दिजाँ अकादमीने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत त्याच्या निबंधाला पहिले पारितोषिक मिळाले. इ.स. १७५० पासून फ्रान्समधील सर्व बौध्दिक आंदोलनात तो सहभागी झाला. इ.स. १७५४ पासून त्याने स्वतंत्र ग्रंथरचना सुरू केली. पॅरिसमध्ये दिदेरो या विश्वकोशकर्त्याबरोबर त्याची मैत्री झाली. रूसोने संगीतविषयक काही लेख लिहिले तसेच नवीन संगीत रचना तयार केल्या. रूसो व्यक्तिवादाचा कट्टर पुरस्कर्ता होता. मात्र रूसो हा बुध्दिवादाचा, विज्ञानाचा व आर्थिक प्रगतीचा कडवा विरोधक होता.

रूसोने विपुल ग्रंथरचना केली. तत्कालीन बुध्दिवादाच्या विचारसरणीला नाकारून निसर्गवादी विचारसरणी मांडणाऱ्या रूसोने सामाजिक व राजकीय क्षेत्रात नवीन कल्पना रुजविल्या. स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारित शासनयंत्रणा रूसोने सुचविली. पुढे फ्रेंच राज्यक्रांती याच तीन तत्त्वांची उद्‌गाती ठरली. रूसोला युरोपियन साहित्यातील 'रोमँटिसिझम'(स्वच्छंदतावाद) चा जनक मानले जाते.

रूसोच्या विचारांचे मुख्य सूत्र निसर्गवाद होते. रूसोच्या मते राज्यसंस्था निर्माण होण्यापूर्वी माणूस निसर्गावस्थेत रहात होता. त्याकाळातील माणसाचे जग नंदनवन होते. माणसाची बुध्दी विकसित झाली व तो विचार करू लागला. तेव्हापासून माणूस अधोगतीला लागला.वैयक्तिक मालमत्तेच्या कल्पनेमुळे मानवा मानवामधील संघर्षाला सुरूवात झाली. तणावांमुळे माणूस बदलला. नैसर्गिक जीवनाला रूसो आदर्श मानतो. नैसर्गिक अवस्थेत माणसे स्वाभाविक प्रवृत्तीनुसार एकमेकांना सहाय्य करत होती. त्यावेळी कोणत्याही कृत्रिम संस्थांची, संघटनांची, राज्यसंस्थांची आवश्यकता नव्हती. सर्व प्रश्न प्रगत, सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या अनैसर्गिक समाजामुळे निर्माण झाले आहेत. रूसोच्या मतानुसार मानव जन्मतः स्वतंत्र असतो. मात्र संस्कृतीच्या नावाखाली होणाऱ्या संस्कारांमुळे मानव आपली नैतिकता हरवून बसतो. मानव राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व्यवस्थेच्या कृत्रिम बंधनातून मुक्त झाल्यास खऱ्या अर्थाने सुखी होईल. पुन्हा निसर्गावस्थेत जाणे शक्य नाही हे रूसो जाणून होता. त्यामुळे समाजात राहून निसर्ग नियमांनी नियंत्रित जीवनक्रम स्वीकारण्याचा अर्थ रूसोला अभिप्रेत होता.

रूसोने आपल्या सामाजिक कराराच्या सिध्दांतात राज्याच्या उत्पत्तीबद्दलचे स्वतःचे अनुमान दिले आहे. त्याचबरोबर राज्य व व्यक्ती यांच्या संबंधांची चिकित्सा केली आहे. रूसोचा सामाजिक कराराचा सिध्दांत 'सर्वजन संकल्पशक्ती' (General Will) या त्याच्या संकल्पनेवर आधारीत आहे. मोठ्या समाजात सर्वाच्या हितासाठी सर्वांना समान अशी सार्वत्रिक इच्छा निर्माण होते. तिलाच 'सर्वजन संकल्पशक्ती' म्हणतात. व्यक्ती आपले अधिकार स्वतःहून सर्वजन संकल्पशक्तीला प्रदान करते. या सर्वजन संकल्पशक्तीमध्ये त्या व्यक्तीची इच्छा समाविष्ट असल्याने प्रत्येक व्यक्ती स्वतःलाच सर्वाधिकार सुपूर्द करत असते. सर्वजन संकल्पशक्तीचे प्रत्यक्ष व मूर्त स्वरूप राज्यसंस्थेत दिसते. प्रशासनाची मागणी पूर्ण करण्यासाठी

राजा हे पद निर्माण झाले. रूसोच्या मतानुसार राज्याची निर्मिती ही राज्य स्थापन करणाऱ्यांनी सत्ता भोगण्याच्या 'करारा' पोटी केली. अशा रीतीने राजा हा लोकांचा प्रतिनिधी असतो. रूसो पुढे जाऊन म्हणतो की, जे प्रतिनिधी लोकांचे स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यामध्ये ढवळाढवळ करतील त्यांना बदलण्याचा हक्क जनतेला असतो. लोकशाही हीच सर्वात आदर्श राज्यपध्दती आहे असे रूसोचे मत होते.

सर्वाचे हित हे काही लोकांच्या हातात सुरक्षित न राहता सर्वांच्या हातातच सुरक्षित राहू शकते असे रूसोचे मत होते. रूसोचा प्रातिनिधिक लोकशाहीवर विश्वास नव्हता. लोकांनी आपले कायदे स्वतः करावेत असे त्याचे मत होते. सरकारी कारभार बहुमतानुसार चालला पाहिजे असे त्याचे प्रतिपादन होते. विद्यमान समाज व राजवट यांच्यामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणावयास हवेत, त्यांची पुनर्रचना करावयास हवी, केवळ सुधारणा करून चालणार नाही. सद्य परिस्थितीत क्रांतिकारक बदल घडवून आणल्याखेरीज व्यक्तिस्वातंत्र्य अस्तित्वात येणार नाही, असे विचार रूसोने मांडले.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपात बुध्दिवादाचे युग असताना बुध्दिवादाच्या विरोधात भावनावादाचा पुरस्कार रूसोने केला. बुध्दिपेक्षा भावजीवन अनुभवणं यावर रूसोचे तत्त्वज्ञान आधारित आहे. मानवनिर्मित बंधनांवर, रूढीपरंपरांवर व समाजातील विषमतेवर रूसोने कडाडून हल्ला चढवला. लोकांचे सार्वभौमत्व आणि राजकीय समता ही रूसोने मांडलेली लोकशाहीला पोषक तत्त्वे अठराव्या शतकातील युरोपला अभिनव होती. त्याचप्रमाणे व्यक्तिस्वातंत्र्य व सर्व क्षेत्रातील मानवा मानवातील समानता या तत्त्वांचा रूसोने प्रसार केला.

१.५.४. दिदेरो (१७१३-१७८४):

१८ व्या शतकातील फ्रान्सच्या वैचारिक चळवळीत एक साहित्यिक व विश्वकोशाचा संपादक या नात्याने दिदेरोने महत्त्वाची कामगिरी केली. पॅरिस विद्यापीठातून एम.ए.ची पदवी मिळविल्यानंतर त्याने गणित तसेच ग्रीक व इंग्रजी भाषांचे अध्ययन केले. दिदेरोने सुरूवातीला काही इंग्रजी ग्रंथांचे अनुवाद केले तसेच स्वतंत्र ग्रंथ रचनाही केली.

'एसे ऑन ब्लाईंडनेस' या ग्रंथात दिदेरोने आपल्या कल्पनेचे मूळ आपल्या ज्ञानेंद्रियात असते, असा विचार मांडला. निसर्गाच्या व्यवस्थेमागे कोणताही उद्देश नसावा अशी त्याची भूमिका होती. निसर्गनियमानुसार विविध शरीररचनांचे प्राणी निर्माण होतात व ज्यांची रचना परिस्थितीला अनुरूप असते तेवढेच प्राणी टिकतात असे दिदेरोचे मत होते. या मतांमुळे दिदेरोला तीन महिन्यांचा कारावास भोगावा लागला.

दिदेरोची मुख्य ओळख विश्वकोशाचा संपादक म्हणून आहे. त्याकाळचे सर्व ज्ञान, सर्व नवीन संकल्पना तंत्रज्ञान एकत्र करावयाचे व पुढील पिढीला मानवतावादी, सुधारणावादी बनविणे या हेतूने दिदेरोने विश्वकोशाची रचना केली. विश्वकोशाचा पहिला खंड इ.स. १७५१ मध्ये प्रसिध्द झाला. पुढील वीस वर्ष अथक परिश्रम घेऊन इ.स.१७७२ मध्ये सतरावा व शेवटचा खंड प्रकाशित केला. सामाजिक प्रगतीसाठी धार्मिक सहिष्णूता व विचारस्वातंत्र्य आवश्यक आहे, लोककल्याणकारी राज्याची स्थापना करणे हे सरकारचे कर्तव्य आहे, विज्ञान व त्यावर आधारित तंत्रज्ञान आणि औद्योगिक उत्पादन ही सुखी समाज निर्मितीची साधने आहेत, अशा लोकशाहीवादी मूल्यांचा पुरस्कार विश्वकोशातील लेखांमधून करण्यात आला. त्यामुळे राज्यकर्ते

व ख्रिस्ती धर्मसंस्था यांचा रोष सहन करावा लागला आणि विश्वकोशावर दोनवेळा बंदी घालण्यात आली.

एक तत्त्ववेत्ता म्हणून दिदेरो हा जडवादी व वेदनवादी होता. जॉन लॉक या ब्रिटिश विचारवंताचा प्रभाव दिदेरोवर होता. निरीक्षण व प्रयोग यावर आधारलेली शास्त्रीय विचारपध्दती ही ज्ञान मिळविण्याची एकमेव पध्दत आहे, या मताचा दिदेरोने पुरस्कार केला.

१.५.५ निसर्गवादी आर्थिक विचारवंत:

अठराव्या शतकात फ्रान्समध्ये जी नवीन आर्थिक विचारसरणी उदयास आली तिला निसर्गवाद असे म्हणतात. फ्रान्समधील सामाजिक व आर्थिक विचारवंतांवर निसर्गवादाचा प्रभाव होता. निसर्गाने निर्माण केलेल्या व्यवस्थेत मानवाने हस्तक्षेप करू नये हा विचार महत्त्वाचा होता. निसर्गवादी आर्थिक विचारसरणी इ.स.१७५० ते इ.स. १७७० या काळात प्रभावी होती. निसर्गवादी आर्थिक विचारसरणीचा उद्‌गाता ड्यूपाँट निमोरस हा फ्रेंच विचारवंत असला तरी या विचारसरणीचा विकास डॉ. फ्रॅकॉईस क्वेस्ने या फ्रेंच विचारवंताने केला.

सतराव्या शतकात युरोपमध्ये व्यापारवादी आर्थिक विचारसरणीचा प्रभाव होता. उत्तम व्यापार, मध्यम सेवा, कनिष्ठ उद्योग अशी विचारसरणी असलेला व्यापारवाद फ्रान्सला उपयुक्त नाही असे मत काही फ्रेंच विचारवंतांचे होते. त्यांनी निसर्गवादी आर्थिक विचारांचा पुरस्कार केला. व्यापारवादाच्या विरूध्द निसर्गवादी विचारसरणी होती. या विचारवंतांमध्ये डॉ. क्वेस्ने, गुर्नो, मिराबो, त्युर्गो, कॅन्टीलॅन यांचा समावेश होतो. अठराव्या शतकातील फ्रान्समधील परिस्थितीमुळे फ्रान्समध्ये निसर्गवादी विचारसरणी निर्माण झाली. या शतकात फ्रान्समध्ये शेतीकडे झालेले दुर्लक्ष, १४ व्या व १५ व्या लुईचा बेजबाबदारपणा, जुलमी कर, सप्तवार्षिक युध्दातील फ्रान्सचा पराभव तसेच व्यक्तिस्वातंत्र्य व समता या तत्त्वांचा प्रभाव ही निसर्गवादी विचारसरणीमागील महत्त्वाची कारणे होती.

निसर्गवादी आर्थिक विचारवंतानी निसर्गनियमांवर आधारित अर्थव्यवस्थेला महत्त्व दिले. या विचारसरणीत नैसर्गिक व्यवस्था मान्य आहे. कमीत कमी मानवी श्रमामुळे जास्तीत जास्त मानवी कल्याण होते आणि ते साधणे हा नैसर्गिक व्यवस्थेचा उद्देश आहे. अर्थव्यवस्थेच्या नैसर्गिक नियमांत राज्यासारख्या मानवनिर्मित कृत्रिम संस्थेने हस्तक्षेप करू नये असे निसर्गवादी अर्थतज्ञांचे म्हणणे होते. या विचारवंतांनी शेतीला महत्त्व दिले. शेती व्यवसाय हा एकमेव उत्पादक स्वरूपाचा व्यवसाय असून राष्ट्राची संपत्ती वाढविण्यासाठी परराष्ट्र व्यापाराऐवजी शेतीचा विकास करण्याकडे लक्ष दिले पाहिजे असे या निसर्गवादी विचारवंतांचे मत होते. निसर्गवाद्यांनी खुला व्यापार किंवा मुक्त व्यापाराची कल्पना मांडली.

नैसर्गिक व्यवस्थेच्या श्रध्देतून निसर्गवाद्यांनी राज्यव्यवस्थेच्या जाचक नियंत्रणाविरूध्द आवाज उठविला व राज्यसंस्थेचा हस्तक्षेप काढून घेण्याची मागणी केली.

१.६. आपली प्रगती तपासा:

१. मॉंतेस्क्यूच्या सताविभाजनाच्या तत्त्वाची माहिती लिहा.

२. व्होल्तेअरच्या बुध्दिप्रामाण्यवादी विचारांचा आढावा घ्या.

३. रुसोच्या विचारांची चर्चा करा.

१.७ सारांश

१७८९ फ्रेंच राज्यक्रांती विविध कारणांमुळे घडून आली होती. भ्रष्ट राजवट, सामाजिक विषमता, आर्थिक दुरावस्था अशी विविध कारणे या क्रांतीच्या मूळाशी होती. अकार्यक्षम राज्यव्यवस्थेमुळे समाजातील काही गटांना फायदे मिळत होते मात्र सर्वसामान्य जनता हालअपेष्टांनी गांजलेली होती. स्टेट्स् जनरल हे कायदेमंडळ बरखास्तीमुळे सामान्यांचे प्रश्न मांडण्यास असमर्थ होते. या पार्श्वभूमीवर फ्रेंच विचारवंताचे कार्य महत्त्वाचे आहे. विचारवंतांनी आपल्या स्पष्ट, निर्किड विचारांनी फ्रेंच समाजातील विषमता, पिळवणूक, धार्मिक असहिष्णूता, आर्थिक निर्बंध, सामान्यांची दु:खे, प्रशासन व न्यायव्यवस्थेतील दोष समोर आणले. तत्त्ववेत्यांच्या क्रांतिकारी लिखाणामुळे फ्रेंच जनतेचे औदासिन्य नष्ट झाले. बौध्दिक चळवळ आणि प्रत्यक्ष जीवनातील हालअपेष्टा या दोन्ही गोष्टींच्या मिश्रणातून फ्रेंच राज्यक्रांती सुरु झाली. फ्रेंच तत्वज्ञांच्या कामगिरीबाबत प्रा. हेजन म्हणतात, ''या तत्वज्ञांच्या लिखाणामुळे फ्रेंच राज्यक्रांती घडून आली हे म्हणजे तितकेसे बरोबर नाही. परंतु त्यांच्या लिखाणामुळे फ्रेंच समाजाच्या हालांचे दारुण चित्र लोकांच्या डोळ्यांसमोर उभे राहून फ्रेंच जनता क्रांतीस प्रवृत्त झाली एवढे निश्चित. विविध कारणांच्या पार्श्वभूमीवर झालेली फ्रेंच राज्यक्रांती युरोपातील परंपरागत राजेशाहीस आणि समाजव्यवस्थेला समाजव्यवस्थेत धक्का देणारी ठरली .

१.८. दीर्घोत्तरी प्रश्न:

१. इ.स. १७८९ च्या क्रांतीसमयीच्या फ्रान्समधील परिस्थितीची चर्चा करा.
२. क्रांतीपूर्व काळातील फ्रान्समधील राजकीय सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण करा.
३. इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या वैचारिक पार्श्वभूमीचे परीक्षण करा.
४. इ.स. १७८९ च्या फ्रान्समधील राज्यक्रांतीस फ्रेंच तत्वज्ञ कितपत जबाबदार होते, ते लिहा.

❖❖❖

२

फ्रेंच राज्-क्रांती -२

फ्रेंच राज्यक्रांतीची वाटचाग

प्रकरण रुपरेषा

२.० उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ अहवाल
२.३ स्टेट्स जनरलची रचना
२.४ राष्ट्रीय सभेची स्थापना
२.५ विधिमंडळाचे कार्य (१७९१-१७९२)
२.६. आपली प्रगती तपासा
२.७. नॅशनल कन्व्हेन्शन (१७९२-१७९५)
२.८. संचालक मंडळाचा (डिरेक्टरी) अंमल (१७९५ ते १७९९)
२.९ आपली प्रगती तपासा
२.१० सारांश
२.११. दीर्घोत्तरी प्रश्न

२.० अभ्-ासाचे उद्देश :

१. राष्ट्रीय सभा (१७८९-१७९१) आणि विधिमंडळ (१७९१ -१७९२) यांच्या समोरील समस्या समजून घेणे.
२. राष्ट्रीय सभा व विधिमंडळ यांच्या उपलब्धींचा अभ्यास करणे .
३. नॅशनल कन्व्हेन्शन (१७९२-१७९५) व संचालक मंडळापुढील (डिरेक्टरी) (१७९५-१७९९) समस्यांचे विश्लेषण करणे.
४. नॅशनल कन्व्हेन्शन (१७९२-१७९५) व संचालक मंडळाच्या (डिरेक्टरी) (१७९५-१७९९) कार्याचा आढावा घेणे.

२.१. प्रस्तावना :

इ.स. १७८८ मध्ये खालावलेली आर्थिक स्थिती व जनतेच्या बंडाळीच्या भीतीमुळे सोळाव्या लुईने 'स्टेट्स जनरल' या फ्रेंच प्रतिनिधिसभेची बैठक बोलाविण्याची घोषणा केली. मे १७८९ मध्ये स्टेट्स जनरलचे भरलेले अधिवेशन व जून १७८८ मध्ये तिसऱ्या इस्टेट्ने स्वत:ला 'राष्ट्रीय सभा' घोषित करणे ही फ्रेंच राज्यक्रांतीची सुरुवात होती. सामाजिक विषमता व आर्थिक दुरावस्था यांनी त्रासलेल्या तिसऱ्या इस्टेट्ने ही क्रांती पुढे नेली. इ.स. १७८९ ते १७९९ या काळात फ्रेंच राज्यक्रांती विविध अवस्थांमधून गेली. या काळात घटनात्मक विकासाच्या दृष्टीने वाटचाल होऊन राज्यघटना बनविण्यात आल्या. या राज्यघटनांनुसार नवीन

कायदेमंडळ अस्तित्वात आले. याच काळात सुरुवातीला घटनात्मक राजेशाहीचा विचार पुढे होता. मात्र प्रजास्ताकाची कल्पना पुढे येऊन फ्रान्सला प्रजासत्ताक घोषित करण्यात आले.

सदर प्रकरणात १७८९ ते १७९९ या काळातील फ्रान्समधील राष्ट्रीय सभा (१७८९ ते १७९१), विधिमंडळ (१७९१ ते १७९२) नॅशनल कन्व्हेन्शन (१७९२ ते १७९५) व संचालक मंडळ किंवा डिरेक्टरी (१७९५ ते १७९९) यांचे कार्य व त्यांनी घडवून आणलेल्या सुधारणा यांचा आढावा घ्यायचा आहे.

२.२. अहवाल :

पावणे दोनशे वर्षे बरखास्त करण्-ात आलेल्-ा 'स्टेट्स जनरल' बद्दल जनतेमध्-े कमालीचे औत्सुक्-य होते. 'स्टेट्स जनरल' -ा लोकसभेत उमराव , धर्मगुरू व सामान्-ांचे प्रतिनिधी असत . आर्थिक संकटातून फ्रान्सला बाहेर काढण्-ासाठी स्टेट्स जनरल चे अधिवेशन बोलविण्-ाशिवा-य राजापुढे पर्-ा-य नव्हता. इ.स. १७८९ मध्-े भरलेली स्टेट्स जनरलची बैठक फ्रान्सच्-ा इतिहासात अविस्मरणी-य ठरली. इ.स. १६१४ नंतर प्रथमच स्टेट्स जनरल चे अधिवेशन भरणार होते . -ा सभेच्-ा कामकाजाविष-ी कोणाला फारशी माहिती नव्हती. वेगवेगळ्-ा मतदारसंघातील लोकांनी एकत्र -ेऊन स्थानिक परिस्थितीचे अहवाल त-ार केले व परिस्थिती सुधारण्-ाच्-ा दृष्टिने सूचना केल्-ा . राजाच्-ा अधिकारांवर नि-ंत्रण ,राज्-घटना व का-मस्वरूपी विधिमंडळ अशा विविध मागण्-ा होत्-ा . आर्थिक ,धार्मिक व राजकी-य सुधारणा ,शिवा-य तुरूंग व दवाखाने -ांच्-ा स्थितीत सुधारणा करण्-ाविष-ी सूचना होत्-ा.

२.३. स्टेट्स जनरलची रचना

५ मे १७८९ रोजी व्हर्सा-य-ा राजवाड्यात स्टेट्स जनरलची सभा भरली . जुन्-ा प्रथेनुसार स्टेट्स जनरलमध्-े तीन सभांचा अंतर्भाव होता . त्-ा म्हणजे उमराव सभा , धर्मगुरूंची सभा व सामन्-य वर्गाची सभा . व-ाची २५ वर्षे पूर्ण केलेले व कर भरणारे पुरूष मतदार आपले प्रतिनिधी निवडत . तीनही सभांच्-ा बैठकी वेगवेगळ्-ा भरत असत . पूर्वी प्रत्-ेक सभेत सभासदांची संख्-ा समान होती . मतमोजणी करताना वै-क्तिक मत मोजण्-ाऐवजी प्रत्-ेक इस्टेटचे एक मत धरले जात असे. साहजिकच उमराव व धर्मगुरूंच्-ा सभा एकत्र होत व सामान्-ांचा पराभव होत असे . इ.स. १७८९ मध्-े भरलेल्-ा ' स्टेट्स जनरल ' मध्-े २८५ उमरावांचे ,३०८ धर्मगुरूंचे तर ६२१ सामान्-य वर्गाचे प्रतिनिधी होते . जुन्-ा पध्दतीने मतमोजणी असल्-ाने प्रतिनिधींच्-ा संख्-ेत वाढ होऊनही सामन्-य वर्गाला फा-दा नव्हता .

२.४. राष्ट्री-य सभेची स्थापना :

जुन्-ा व्-यवस्थेतील तोटे सामान्-य वर्गाच्-ा प्रतिनिधीच्-ा लक्षात -ेत होते . दरडोई मतदान असावे व तीनही वर्गाच्-ा प्रतिनिधींची सं-ुक्त बैठक एकाच सभागृहात भरावी अशी जोरदार मागणी सामान्-ांच्-ा प्रतिनिधींनी केली . लोकसंख्-ेनुसार प्रतिनिधीत्व असल्-ाने सामान्-य वर्गाच्-ा प्रतिनिधींची संख्-ा उमराव व धर्मगुरू -ांच्-ा प्रतिनिधीच्-ा एकत्रित संख्-ेपेक्षा जास्त होती .सामान्-य वर्गाच्-ा मागण्-ा वरिष्ठ वर्गांना धोकादा-क वाटत होत्-ा . एकमेकांच्-ा विरोधामुळे

कामकाजाची पध्दत ठरत नव्हती . वरिष्ठ वर्गानी संयुक्त बैठकीसाठी आपल्यात सामील व्हावे यासाठी तिसऱ्या इस्टेटने प्रयत्न केले . मात्र अल्प प्रमाणात यश आले . अखेर १७ जून १७८९ रोजी तिसरी इस्टेट ही 'राष्ट्रीय सभा ' असल्याचे घोषित करण्यात आले . हीच पुढे घटना समिती बनली .

२.४.१. टेनिस कोर्टावरील शपथ :

तिसऱ्या इस्टेटच्या सूचना उमराव व धर्मगुरूंच्या वर्गांना मानवणाऱ्या नव्हत्या. त्यांना राजावर दडपण आणण्यास सुरूवात केली. २० जून १७८९ रोजी राष्ट्रीय सभेच्या सभासदांना सभागृहात शिरण्यास प्रतिबंध करण्यात आला. तेव्हा ते सभासद जवळच्या टेनिस कोर्टवर जमले. बेली या नेत्याच्या अध्यक्षतेखाली मिराबो, ॲबे सिएस व इतर नेत्यांची भाषणे झाली. 'फ्रान्ससाठी लिखित राज्यघटना तयार होईपर्यंत एकत्रित राहावयाचे' अशी शपथ सर्व सभासदांनी घेतली. या शपथेने अनियंत्रित राजसत्तेला आव्हान दिले. टेनिस कोर्टावरची ही शपथ क्रांतीची सुरूवात मानली जाते.

२.४.२. राष्ट्रीय सभेला मान्यता :

सोळाव्या लुईला टेनिस कोर्टावरील शपथेचे महत्व जाणवले नाही . २३ जून १७८९ रोजी स्टेट्स जनरल समोर त्याने उद्घाटनपर भाषण केले व तिसऱ्या इस्टेटची कृत्ये बेकायदेशीर ठरवली . पूर्वीच्या प्रथेप्रमाणे कामकाज चालेल अशी त्याने घोषणा केली . राजा सभागृहातून गेल्यानंतर उमराव व धर्मगुरू आपापल्या सभागृहात निघून गेले . मात्र तिसऱ्या इस्टेटचे प्रतिनिधी निर्धाराने आपल्या जागीच बसून राहिले . सभागृहाबाहेरील बंदुकधाऱ्या सैनिकांची त्यांना पर्वा नव्हती . त्यांचा निर्धार राजाला कळविण्यात आला . तेव्हा हताशपणे राजाने मान्यता दिली . दोन दिवसानंतर बहुसंख्य धर्मगुरू व काही उमराव राष्ट्रीय सभेला जाऊन मिळाले.२७ जून १७८९ रोजी राजाने खास हुकूम काढून तीनही सभांनी संयुक्त बैठकी घ्याव्यात असे जाहीर केले . राष्ट्रीय सभेने ताबडतोब घटना तयार करण्याचे काम हाती घेतले व स्वतःला घटना समिती म्हणून जाहीर केले.

२.४.३. बॅस्टिलचा पाडाव :

राजाने तिसऱ्या इस्टेटला 'राष्ट्रीय सभा' म्हणून आपल्या मनाविरुध्द मान्यता दिली होती. त्याने राष्ट्रीय सभेला दडपणाचे गुप्तपणे प्रयत्न सुरु केले. राष्ट्रीय सभेवर दडपण आणण्यासाठी राजा सैन्य जमवत असल्याच्या अफवा पसरु लागल्या. याचवेळी दुसऱ्यांदा नेमलेला अर्थमंत्री नेकर याने राज्यकारभारात सुधारणा सुचवल्या. तेव्हा राजाने त्याला पदावरुन दूर केले. नेकरच्या उचलबांगडीमुळे लोक चिडले. ही घटना ११ जुलै १७८९ रोजी घडली. चिडलेल्या लोकांच्या रस्तो-रस्ती सभा भरु लागल्या. पॅरिसमध्ये अराजक माजले.

राष्ट्रीय सभा चिरडण्याचा राजाचा विचार जनतेला कळला होता. पॅरिसच्या जनतेने राष्ट्रीय सभेच्या सदस्यांना संरक्षण दिले. बेभान झालेली पॅरिसची जनता बॅस्टिल या जुन्या किल्लेवजा तुरुंगावर १४ जुलै १७८९ रोजी चालून गेले. या तुरुंगाबद्दल जनतेच्या मनात चीड होती कारण तेथे राजबंद्यांना विनाचौकशी तुरुंगात ठेवले जात असे. चिडलेल्या जनतेने तुरुंगावर हल्ला चढवला व तेथील कैद्यांची मुक्तता केली. या तुरुंगाच्या किल्ल्या लोकशाहीचा कैवारी म्हणून जॉर्ज वॉशिंग्टन या अमेरिकेच्या पहिल्या राष्ट्राध्यक्षाकडे पाठविण्यात आले.

२.४.४. पॅरिसचे कम्यून:

बॅस्टिलच्या घटनेनंतर पॅरिसमध्ये सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी पॅरिसच्या नागरिकांनी 'पॅरिस कम्यून' हे नवे सरकार निर्माण केले. पॅरिसच्या संरक्षणासाठी 'नॅशनल गार्ड' या नावाची सैनिकी संघटना उभारली आणि लाफायेत या सेनानीकडे संघटनेचे नेतृत्व सोपविण्यात आले. बुरबाँ घराण्याच्या झेंड्याऐवजी लाल, पांढरा व निळा असा तिरंगी ध्वज राष्ट्रीय ध्वज म्हणून स्वीकारण्यात आला. लोकांच्या प्रक्षोभाला घाबरुन राजाने वरील सर्व गोष्टींना मान्यता दिली.

२.४.५. राष्ट्रीय सभेचे कार्य:

पॅरिसमधील हिंसक आंदोलन फ्रान्सच्या प्रांता-प्रांतात पसरले. अनेक भागात शेतकऱ्यांनी उठाव केले. सरंजामदारांपाशी असलेले देणी व वसुलीचे कागदपत्र जाळण्यात आले. ठिकठिकाणी स्थानिक सरकार व स्थानिक संरक्षक निर्माण होऊ लागल्या. साहजिकच या घटनांचा विचार करणे राष्ट्रीय सभेला आवश्यक वाटू लागले.

क्रांतिकारक विचारांना थोपवून ठेवणे व दैवी अधिकारांचा राजेशाहीचा सिध्दांत प्रस्थापित करणे हा परिषदेचा मुख्य हेतु होता. परिषदेने घेतलेले निर्णय यावर बड्या राष्ट्रांचा प्रभाव होता. त्यामुळे वेळप्रसंगी मूळ तत्त्वांना मुरड घालण्यात आली.

४.२.६.व्हिएन्ना परिषदेचे निर्णय:

या परिषदेत प्रदेशांच्या व्यवस्थेबाबत निर्णय घेण्यात आले. काही प्रदेश तोडून दुसऱ्या राज्यांना जोडण्यात आले. फ्रान्सभोवती मजबूत राष्ट्रांचे कडे निर्माण होईल हे पाहण्यात आले. बड्या राष्ट्रांचा फायदा करून देण्यात आला. प्रदेशांची पुनर्रचना करताना विशेषत: जर्मन व इटलीच्या प्रदेशातील एकीकरणाच्या चळवळी दडपून टाकण्याकडे परिषदेचा हेतू होता. परिषदेच्या निर्णयानुसार प्रदेशांचे फेरवाटप पुढीलप्रमाणे:

अ) ऑस्ट्रिया: व्हिएन्ना परिषदेत ऑस्ट्रियाचा सर्वात जास्त फायदा झाला. इटलीच्या प्रदेशातील लोम्बार्डी व व्हेनेशिया हे प्रदेश तसेच मिलान व व्हेनिसचे गणराज्य ऑस्ट्रियाला मिळाले. याशिवाय पार्मा, मोदेना व टस्कनी या इटालियन राज्यात ऑस्ट्रियाच्या हॅप्सबर्ग राजवंशाची सत्ता निर्माण करण्यात आली. पोलंडकडून ऑस्ट्रियाला गॅलेशियाचा प्रदेश मिळाला. बव्हेरीयाकडून टिरोल व सॉल्झबर्ग हे प्रदेश मिळाले. ॲड्रियाटीक किनाऱ्यावरील इलिरीयाचा भाग मिळाल्याने ऑस्ट्रियाची सागरी कक्षा वाढली. व्हिएन्ना परिषदेने निर्माण केलेल्या ३८ जर्मन राज्यांच्या संघाचे नेतृत्व ऑस्ट्रियाकडे आले. हे फायदे घेताना ऑस्ट्रियाने आपल्या ताब्यातील नेदर्लंड (बेल्जियम) वरील हक्क सोडून दिला. याव्यतिरीक्त इतर काही प्रदेशावरील हक्क सोडले तरी प्रादेशिक फेरवाटणीमुळे ऑस्ट्रियाचे स्थान बळकट झाले.

ब) रशिया: ग्रँड डची ऑफ वॉर्सा हे राज्य रशियाला मिळाले. त्यामुळे प्रशियाच्या ताब्यातील पोसेन व ऑस्ट्रियाला मिळालेला काही पोलिश प्रदेश वगळता संपूर्ण पोलंड रशियाला मिळाला. ह्याशिवाय स्वीडनकडून फिनलंड काढून रशियाला देण्यात आले. तसेच बेसारबिया, आग्नेयेकडील काही तुर्की प्रदेश रशियाला मिळाले.

क) प्रशिया: प्रशियाने सॅक्सनीचा प्रदेश मागितला होता मात्र त्याला ऑस्ट्रिया व इंग्लडने विरोध केला. अखेर तडजोड होऊन सॅक्सनीचा दोन पंचमांश भाग प्रशियाला मिळाला. याशिवाय पोलंडचे पोसेन व थॉर्न हे प्रदेश प्रशियाला मिळाले. तसेच वेस्टफालियाचा बहुतांश भाग, ऱ्हाईनलँडचा बहुतांश भाग व स्वीडनकडून पोमेरानियाचा प्रदेश प्रशियाला मिळाला.

ड) इंग्लंड: नेपोलियनच्या पराभवात इंग्लंडने महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे व्हिएन्ना परिषदेत इंग्लंडचा बराच फायदा झाला. हा फायदा घेताना आपले व्यापारी हितसंबंध जपले जातील हे इंग्लंडने पाहिले. या युध्दात इंग्लंडने फ्रान्सकडून माल्टा, सेंट लुसिया, टोबॅगो, मॉरीशस ही बेटे जिंकली होती. ती इंग्लंडकडेच कायम ठेवण्यात आली. त्रिनिदाद व होंडूरास ही बेट स्पेनकडून मिळाली. हॉलंडकडून केप ऑफ गुड होप व सिलोन मिळाले. उत्तर समुद्रातील हेलिगोलँड बेट मिळाले. भूमध्यसागरातील आयोनियन बेटांच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्लंडवर टाकण्यात आली. .

इ) जर्मनी: इ.स.१८०६ मध्ये नेपोलियनने जर्मन प्रदेशात ऱ्हाईनचा राज्यसंघ निर्माण केला होता. जर्मन भाषिकांचे एक राज्य व्हावे अशी या प्रदेशात मागणी होती. मात्र जर्मन एकीकरणाच्या भावना पायदळी तुडवत व्हिएन्ना परिषदेने ऑस्ट्रियाच्या नेतृत्वाखाली ३८ लहान मोठ्या जर्मन राज्यांचा संघ तयार केला. राज्यांच्या प्रतिनिधींची संसद निर्माण करून त्याचे अध्यक्षपद ऑस्ट्रियाला तर उपाध्यक्षपद प्राशियाला देण्यात आले.

ई) इटली: इटलीच्या प्रदेशातील एकीकरणाच्या चळवळी दडपण्याच्या दृष्टीने प्रतिगामी राजसत्तांची नेमणूक करण्यात आली. नेपल्स, सिसिलीवर फ्रान्सच्या बुरबाँ घराण्याची सत्ता निर्माण करण्यात आली. पोपची राज्य पोपला परत देण्यात आली. सार्डिनियाला पिडमाँट जोडण्यात येऊन सेव्हॉय घराण्याची सत्ता निर्माण करण्यात आली. सार्डिनियाला नीस, सेव्हॉय, जिनोआ जोडण्यात आले. लोम्बार्डी व व्हेनेशिया ऑस्ट्रियाला मिळाले. पार्मा, मोदेना, टस्कनी या मध्य इटलीतील प्रदेशांवर ऑस्ट्रियाच्या हॅप्सबर्ग घराण्याची सत्ता निर्माण करण्यात आली.

उ) हॉलंड: फ्रान्सने जिंकलेले बेल्जियम व लक्झेंबर्ग हॉलंडला देण्यात आले. हॉलंड,बेल्जियम व लक्झेंबर्ग याचे मिळून एक शासन निर्माण करून ऑरेंज राजवंशाकडे सत्ता सोपविण्यात आली.

ऊ) स्वीडन: स्वीडनकडून फिनलंड काढून घेऊन रशियाला देण्यात आला होता. त्याची भरपाई म्हणून डेन्मार्कच्या ताब्यातील नॉर्वे स्वीडनला देण्यात आला. नेपोलियनला मदत करण्याची शिक्षा डेन्मार्कला देण्यात आली.

ए) फ्रान्स: फ्रान्सबाबत इ.स. १७९२ ची स्थिती कायम ठेवण्यात आली. फ्रान्समध्ये पुन्हा बुरबाँ घराण्याची राजवट प्रस्थापित करण्यात आली. फ्रान्सचा सेव्हॉयचा प्रदेश सार्डिनियाला देण्यात आला. फ्रान्सला सार्डिनिया, प्रशिया व हॉलंड यांनी वेढून टाकले..

४.२.७.व्हिएन्ना परिषदेचे इतर निर्णय:

अ) आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावरील अल्जीअर्सच्या टापूतील सागरी लुटारूंचा बंदोबस्त करण्याचे काम ब्रिटनच्या नेतृत्वाखाली करण्याचा निर्णय या परिषदेत घेण्यात आला.

ब) शांतताकाळात व युध्दकाळात सागरी मार्ग वापरण्यासंबंधी नियम ठरविण्यात ब्रिटनने पुढाकार घेतला. या ठरावाला परिषदेने संमती दिल्याने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले.

क) गुलामांच्या व्यापाराला आळा घालण्याचे तत्त्व मान्य करण्यात आले. उपस्थित राज्यांनी त्यासंबंधात कायदे करावे असे आवाहन करण्यात आले.

ड) व्हिएन्ना परिषदेने केलेली पुनर्रचना व शांतता टिकविण्यासाठी युरोपातील बड्या सत्तांनी वारंवार एकत्र यावे असा ठराव करण्यात आला.

४.२.८.व्हिएन्ना परिषदेचे मूल्यमापन :

व्हिएन्ना परिषद म्हणजे युरोपातील राज्यकर्त्यांचा व मुत्सद्यांचा मेळावा होता. केवळ युरोपची राजकीय पनर्रचना करणे हा उद्देश नसून फ्रेंच राज्यक्रांतीने निर्माण केलेली तत्त्वे दडपून टाकणे हाही उद्देश होता. व्हिएन्ना परिषदेने केलेली उपाय योजना म्हणजे युरोपची पुनर्रचना करताना जुने राजवंश पुन्हा प्रस्थापित केले. प्रतिगामी राजवटी निर्माण केल्याने राष्ट्रवाद, उदारमतवाद, लोकशाही ही तत्त्वे सहज दडपता येतील असे वाटले होते. मात्र विचार दडपता येत नाहीत हे लवकरच सिध्द झाले.

व्हिएन्ना परिषदेने निर्णय घेताना मोठ्या राष्ट्रांचा स्वार्थ पाहिला. मोठ्या राष्ट्रांनी आपापसात गुप्त वाटाघाटी केल्या होत्या. त्यामुळे परिषदेने ठरविलेली तत्त्व व सिध्दान्त हा केवळ एक देखावा होता. लहान राष्ट्रांच्या हिताकडे दुर्लक्ष करण्यात आले. मोठ्या राष्ट्रांचा स्वार्थ पूर्ण करण्यासाठी सिध्दांताबाबत तडजोड करण्यात आली. रशियाचा स्वार्थ पूर्ण करताना पोलंडवर अन्याय झाला तर ऑस्ट्रियाचे वर्चस्व इटली व जर्मन प्रदेशांवर निर्माण करण्यात आले.

व्हिएन्ना परिषदेने घेतलेले निर्णय अन्यायकारक होते. कोणत्याही प्रदेशांची जबरीने केलेली तोडफोड स्थायी असू शकत नाही याची प्रचिती लवकरच आली. बेल्जियमच्या लोकांना

हॉलंडचे वर्चस्व मान्य होण्यासारखे नव्हते. परिणामी इ.स. १८३० मध्ये बेल्जियमने बंड पुकारून आपले स्वातंत्र्य घोषित केले. पुढील काळात रशिया व फिनलंड आणि स्वीडन व नॉर्वे एकमेकांपासून वेगळे झाले.

इटली व जर्मनीच्या प्रदेशात चाललेल्या एकीकरणाच्या चळवळीतील राष्ट्रवादी भावनांकडे व्हिएन्ना परिषदेने दुर्लक्ष केले. व्हिएन्ना परिषदेने स्थापन केलेल्या प्रतिगामी राजवटींनी मेटरनिकच्या प्रभावाखाली उदारमतवादी विचार दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळे जर्मनी व इटलीच्या प्रदेशातील राष्ट्रवादी विचारांची पीछेहाट झाली नाही.

या गोष्टी जरी सत्य असल्या तरी काही प्रमाणात व्हिएन्ना परिषदेने यश मिळविले. फ्रान्सबाबत समजूतदारपणाचे धोरण वापरण्यात आले. फ्रान्सची इ.स.१७९२ सीमारेषा मान्य करण्यात आली. नुकसानभरपाईचा आकडाही फार मोठा नव्हता. पुढील शंभर वर्षात युरोपात लहान लहान संघर्ष झाले मात्र मोठे युध्द झाले नाही. या परिषदेचे आणखीन एक यश म्हणजे ह्या परिषदेने आंतरराष्ट्रीय सहकार्याचे युग निर्माण केले. या दृष्टीने 'कॉन्सर्ट ऑफ युरोप'ची स्थापना महत्त्वपूर्ण ठरली.

४.३ आपली प्रगती तपासा

१. व्हिएन्ना परिषदेत सहभागी होणाऱ्या चार बड्या राष्ट्रांची नावे लिहा.

_____

_____

२. व्हिएन्ना परिषदेचे सिध्दान्त लिहा.

_____

_____

३. जर्मन राज्यांच्या संघाचे अध्यक्षपद कोणाकडे देण्यात आले ?

_____

_____

४. सागरी मार्गांच्या वापराबाबत नियम करण्यात कोणी पुढाकार घेतला ?

_____

_____

४.४. संयुक्त युरोप (कॉन्सर्ट ऑफ युरोप)

नेपोलियनच्या पाडावानंतर युरोपच्या राजकारणात घडलेल्या घटनांपैकी संयुक्त युरोपची (कॉन्सर्ट ऑफ युरोप) स्थापना महत्त्वपूर्ण होती. फ्रेंच राज्यक्रांती व त्यानंतरचा नेपोलियनचा कालखंड हा युरोपसाठी अशांततेचा होता. नेपोलियनच्या पाडावानंतर इ.स. १८१४ ते १८१५ या काळात व्हिएन्ना परिषद भरली. या परिषदेने युरोपातील बड्या राष्ट्रांचा

फायदा बघितला. फ्रेंच राज्यक्रांती व नेपोलियनचा कालखंड यामुळे युरोपामधील बडी राष्ट्र हादरली होती. व्हिएन्ना परिषदेने युरोपची पुनर्रचना करताना ठिकठिकाणी प्रतिक्रियावादी राजवटी निर्माण केल्या पण ही व्यवस्था कायम टिकेल याची खात्री वाटत नव्हती. युरोपमधील शांतता टिकवून ठेवणे या राष्ट्रांना महत्त्वाचे वाटत होते. त्यातूनच 'पवित्र संघ'(Holy Alliance) व चतु:संघ (Quadruple Alliance) या संघांचा उदय झाला. या संघांनी युरोपमध्ये जी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला ती 'संयुक्त युरोप' या नावाने ओळखली जाते. ही व्यवस्था साधारणपणे इ.स. १८३० पर्यंत टिकली.

४.४.१.पवित्र संघ:

या संघाची स्थापना रशियाचा झार पहिला अलेक्झांडर याच्या प्रेरणेने २६ सप्टेंबर १८१५ रोजी झाली. झार पहिला अलेक्झांडर हा गूढवादी व स्वप्नाळू होता. त्याच्यावर उदात्त भावनांचा त्वरीत परिणाम होत असे. त्याच्या स्वभावात विविध भावनांचे विचित्र संनिश्रण झाले होते. रूसो व इंग्लिश विचारवंत जेरेमी बेन्थम यांच्या विचारांचा प्रभाव त्याच्यावर होता. नेपोलियनच्या पाडावात त्याने महत्त्वाची भूमिका बजावल्यामुळे त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. युरोपमधील राज्यांचे संघराज्य बनविले जावे अशी त्याची इच्छा होती. झारने 'पवित्र संघाची' कल्पना मांडली. या संघात सामील होणाऱ्या राज्यांनी ख्रिस्ती धर्माच्या तत्त्वांनुसार एकमेकात व्यवहार करावा, सर्व राजांनी आपल्या प्रजेशी पित्याच्या नात्याने वागावे तसेच धर्म, शांतता व न्यायाचे रक्षण करावे इत्यादी तत्त्वांचे पालन करावे अशी पहिल्या अलेक्झांडरची भूमिका होती. धर्माचा आधार या संघाच्या स्थापनेसाठी घेण्यात आला होता. म्हणून हा संघ 'पवित्र संघ' म्हणून ओळखला जातो.

पवित्र संघाचे उद्देश आदर्शवादी असले तरी ते प्रत्यक्षात येणे कठीण होते. व्हिएन्ना परिषदेत सामील झालेल्या सर्व राष्ट्रांनी यावर सह्या केल्या. ऑस्ट्रिया व प्रशिया यांनी झार नाराज होऊ नये म्हणून सह्या केल्या तरी पवित्र संघाची तत्त्वे प्रत्यक्षात आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. ब्रिटन या करारापासून दूर राहिला. युरोपमध्ये स्वत:ची सत्ता वाढविण्याचा झारचा प्रयत्न आहे अशी अनेकांच्या मनात शंका होती. ब्रिटनचा परराष्ट्रमंत्री कॅसलरीघ याने पवित्र संघाबाबत ''गूढवाद आणि मुर्खपणा यांचे सुरेख मिश्रण'' असे वर्णन केले तर ''सदाचाराचे ढोंग'' या शब्दांत मेटरनिकने हेटाळणी केली. झार अलेक्झांडरने या संघाची यंत्रणा व्यवहारात निर्माण करण्याच्या अनेक योजना वारंवार युरोपीय सत्तांपुढे मांडण्याचा प्रयत्न केला, परंतु ते प्रयत्न सफल झाले नाहीत. इ.स. १८२५ मध्ये झार पहिला अलेक्झांडर मरण पावला व त्याबरोबर पवित्र संघाचे अस्तित्वही संपले.

४.४.२. चतु:संघ

युरोपातील राज्यांनी आपले प्रश्न चर्चा करून सोडवावेत व एकमेकांमध्ये सहकार्य प्रस्थापित करावे या दृष्टिने ऑस्ट्रियाचा चॅन्सेलर मेटरनिक याने एक योजना मांडली. त्यानुसार २० नोव्हेंबर १८१५ रोजी रशिया, प्रशिया, ऑस्ट्रिया व ब्रिटन यांच्या स्वाक्षऱ्या होऊन चतु:संघ अस्तित्वात आला. मेटरनिकच्या आधी अशा प्रकारची योजना इ.स.१७९१ मध्ये ऑस्ट्रियाचाच चॅन्सेलर कॉनित्झ याने मांडली होती. युरोपमधील राज्यांचा संघ बनविण्याची ती कल्पना होती. मात्र त्या योजनेला पाठिंबा मिळाला नाही. मेटरनिकने मांडलेली योजना जास्त व्यवहार्य ठरली. फ्रेच राज्यक्रांती ते नेपोलियनच्या पाडावापर्यंत फ्रान्सविरूध्द चार मित्रसंघ स्थापन करण्यात आले होते. फ्रान्समध्ये पुन्हा क्रांतीचा उद्रेक झाल्यास युरोपमधील इतर राज्यात अशांतता निर्माण

होण्याची शक्यता होती. नेपोलियनच्या पतनानंतर युरोपात शांतता टिकविण्याच्या दृष्टिने चार बडी राष्ट्र एकत्र राहणे आवश्यक होते. मेटरनिकने मांडलेल्या या योजनेत रशिया, प्रशिया, ऑस्ट्रिया व ब्रिटन ही चार राष्ट्र सहभागी झाल्याने त्यास चतु:संघ हे नाव पडले. युरोपमध्ये शांतता राखणे, व्हिएन्ना परिषदेतील निर्णयांची अंमलबजावणी करणे, युरोपियन देशांच्या सीमा मजबूत करणे व त्यांच्या आर्थिक –सामाजिक समस्या सोडवणे, एखाद्या राज्यातील शांतता धोक्यात आल्यास इतर राज्यांनी हस्तक्षेप करणे, युरोपमध्ये निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करण्यासाठी वेळोवेळी परिषदा घेणे इत्यादी उद्दीष्टे ठरविण्यात आली. या व्यवस्थेच्या आधारे युरोपिय सत्ता व्हिएन्ना परिषदेने निर्माण केलेल्या प्रतिगामी राजवटींचे रक्षण करू शकत होत्या व उदारमतवादाला दडपू शकत होत्या. ब्रिटन चतु:संघाची इतर तत्त्वे मानण्यास तयार होते मात्र कोणत्याही राज्यात अंतर्गत क्रांती झाल्यास ती दडपण्यासाठी हस्तक्षेप करण्याच्या विरोधात होते.

इ.स. १८१८ ते १८२२ या काळात चतु:संघातर्फे 'संयुक्त युरोप'च्या चार परिषदा झाल्या. हा काळ 'परिषदांचा काळ' म्हणूनही ओळखला जातो. या परिषदांवर मेटरनिकच्या व्यक्तिमत्वाचा व विचारांचा ठसा उमटला होता. मेटरनिकने अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार केला आणि लोकशाही व एकराष्ट्रीयत्वाच्या चळवळी दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. संयुक्त युरोपच्या अंतर्गत एक्स-ला-शापेलची परिषद (१८१८), ट्रोपौची परिषद (१८२०), लैबॅकची परिषद (१८२१) व व्हेरोनाची परिषद (१८२२) अशा चार परिषदा झाल्या.

अ) एक्स-ला-शापेलची परिषद (१८१८):

चतु:संघाचे पहिले अधिवेशन इ.स. १८१८ मध्ये एक्स-ला-शापेल येथे भरले. या परिषदेसमोर महत्त्वाचा प्रश्न फ्रान्सचा होता. फ्रान्समध्ये चतुर्थ मित्रसंघाच्या सेना होत्या. व्हिएन्ना परिषदेने ठरवलेली युध्द खंडणीची रक्कम फ्रान्सने तीन वर्षातच फेडल्याने तिच्या भूमीवरील मित्रसंघाचे सैन्य काढून घेण्याचा आदेश या परिषदेने दिला. फ्रान्सने चतु:संघाचे सदस्यत्व मागितले. फ्रान्सच्या समावेशाबाबत नाराजी होती. मात्र समावेश केल्यास केल्यास फ्रान्सच्या हालचालींचर आपोआप नियंत्रण राहील या उद्देशाने फ्रान्सचा चतु:संघात समावेश करण्यात आला. त्यामुळे चतु:संघाचे रूपांतर पंचसंघात झाले.

स्वीडनच्या राजाने नॉर्वे व डेन्मार्क बाबत व्हिएन्ना कराराच्या अटी अंमलात आणल्या नव्हत्या त्यामुळे त्याला स्पष्टीकरण विचारण्यात आले. मोनॅकोच्या राजाला राज्यकारभारात सुधारणा करण्याचे आदेश देण्यात आले. जर्मनीतील बादेन राज्याच्या वारसासंबंधीच्या तंट्यात न्याय देऊन बव्हेरियाला त्या भागात विस्तार करण्यास मनाई करण्यात आली. रशिया व ऑस्ट्रियातील ज्यू लोकांच्या परिस्थितीची चर्चा करण्यात आली.

दक्षिण अमेरिकेतील स्पेनच्या वसाहतींनी बंड पुकारले होते. त्यामध्ये चतु:संघाने हस्तक्षेप करावा असा प्रस्ताव परिषदेसमोर आला. मात्र तेथे ब्रिटनचे आर्थिक हितसंबंध असल्याने त्याने विरोध केला परिणामी प्रस्ताव मान्य झाला नाही. गुलामांचा व्यापार थांबविण्याची व गुलामांना घेऊन जाणाऱ्या जहाजांची तपासणी करण्याचा प्रस्ताव ब्रिटनने मांडला मात्र त्यामुळे प्रबळ सागरी सत्ता असलेल्या ब्रिटनचे वर्चस्व वाढेल या दृष्टिकोनातून इतर राष्ट्रांनी हा प्रस्ताव फेटाळला. भूमध्यसागरात चाचेगिरीला आळा घालण्यासाठी आंतरराष्ट्रीय नौदल ठेवावे ही रशियाची सूचना होती. ही योजना अंमलात आल्यास रशियाला भूमध्यसागरात प्रवेश मिळेल

म्हणून ब्रिटनने या सूचनेला विरोध केला. रशियाचा झार पहिला अलेक्झांडर याने 'युरोपातील निरनिराळ्या राज्यांच्या सीमा कायम ठेवण्यात येतील व प्रत्येक देशातील राजांच्या सार्वभौम अधिकारांचे रक्षण केले जाईल' अशा आशयाचा ठराव मांडला. या ठरावास ऑस्ट्रिया व प्रशिया यांचा पाठिंबा होता. ही सूचना मान्य झाल्यास युरोपच्या विविध भागातील राष्ट्रवादी चळवळी दडपून टाकण्यास साधन निर्माण झाले असते. मात्र ब्रिटनने या ठरावाला विरोध केला. एखाद्या सर्वसाधारण धोरणापेक्षा तसा प्रश्न निर्माण झाल्यास संयुक्त युरोपने कारवाई करावी व गरज पडल्यास अंतर्गत हस्तक्षेप करावा अशी ब्रिटनची भूमिका होती. परिणामी हा प्रस्ताव फेटाळला गेला.

एक्स-ला-शापेलच्या परिषदेने लहान समस्यांच्या जोडीने मोठे प्रश्न सोडवण्यावरही भर दिला. मात्र ज्याठिकाणी आपला स्वार्थ आड आला त्या ठिकाणी अडवणूकीचे धोरण वापरले. त्यामुळे पहिल्या परिषदेतच बड्या राष्ट्रांचे आपापसातील मतभेद समोर आले.

ब) ट्रोपौची परिषद (१८२०):

संयुक्त युरोपच्या इ.स. १८२० मध्ये झालेल्या ट्रोपौ परिषदेची पार्श्वभूमी जाणून घेणे आवश्यक आहे. व्हिएन्ना परिषदेच्या निर्णयानुसार स्पेनमध्ये बुरबाँ वंशीय सातवा फर्डिनंड या राजाची सत्ता निर्माण करण्यात आली होती. नेपोलियनविरूध्दच्या युध्दाच्या काळात इ.स. १८१२ मध्ये स्पॅनिश जनतेने उदारमतवादी राज्यघटना तयार केली होती. त्यामुळे स्पॅनिश जनतेला लोकशाहीचे अनेक अधिकार प्राप्त झाले होते. परंतु फर्डिनंडने सत्तेवर येताच प्रतिगामी धोरणाचा वापर करून इ.स. १८१२ ची राज्यघटना रद्द केली व लोकशाहीची मागणी करणाऱ्यांना दडपण्यास सुरूवात केली. याचवेळी स्पॅनिश सरकारचा आपल्या दक्षिण अमेरिकेतील वसाहतींवरील नियंत्रण सुटू लागले होते. सरकारविरूध्दच्या असंतोषात वाढ होऊन कँडीझ येथे कर्नल रीगो याच्या नेतृत्वाखाली लष्करी उठाव झाला. उत्तर स्पेनमध्येही उठाव झाला. परिणामी राजाला इ.स. १८१२ ची राज्यघटना मान्य करावी लागली. अशारीतीने व्हिएन्ना परिषदेनंतर पाच वर्षातच अनियंत्रित राजसत्तेला धक्का बसला.

स्पेनमधील क्रांतीचे वृत्त समजताच नेपल्स या इटालियन राज्यातही उठाव झाला. व्हिएन्ना परिषदेच्या निर्णयानुसार बुरबाँ घराण्यातील पहिला फर्डिनंड हा नेपल्सचा राजा बनला होता. त्याच्या कारकिर्दीत भ्रष्टाचाराचा कळस गाठला. नेपल्समध्ये बंड झाले व स्पेनमध्ये लागू करण्यात आलेल्या इ.स. १८१२ च्या राज्यघटनेच्या धर्तीवर नेपल्समध्येही राज्यघटना लागू करावी अशी बंडखोरांनी मागणी केली. उठाव यशस्वी होऊन नवीन राज्यघटना लागू करण्यात आली. स्पेन व नेपल्सप्रमाणे पोर्तुगालमध्येही राजेशाहीविरूध्द उठाव झाले.

या सर्व घटनांमुळे मेटरनिकसारख्या अनियंत्रित राजेशाहीच्या पाठीराख्याना काळजी वाटू लागली. स्पेनमधील क्रांती दडपण्यासाठी रशियाने आपले सैन्य पाठविण्याची तयारी दाखवली. मात्र त्यामुळे रशियाचे महत्त्व वाढणार होते. परिणामी रशियाच्या सूचनेला इतर सत्तांनी मान्यता दिली नाही. मेटरनिकच्या मते एका राष्ट्राने कारवाई करण्यापेक्षा संयुक्त युरोपने करावी. इतर समस्यांपेक्षा नेपल्समधील बंडाचा विचार करणे निकडीचे होते. परिणामी ट्रोपौ येथे संयुक्त युरोपची परिषद बोलावण्यात आली.

इटलीमध्ये ऑस्ट्रियाचे हितसंबंध गुंतलेले असल्याने ऑस्ट्रियानेच नेपल्समधील क्रांती दडपावी असा प्रस्ताव परिषदेत मांडण्यात आला. नेपल्समधील बंडामुळे ऑस्ट्रियाच्या ताब्यातील

लोम्बार्डी व व्हेनेशिया तसेच ऑस्ट्रियन राजवंशाच्या ताब्यात असलेल्या पार्मा, मोदेना, टस्कनी या राज्यांमध्ये अशांतता निर्माण होण्याची शक्यता होती. ऑस्ट्रियने स्वतःच्या जबाबदारीवर कारवाई करावी यास ब्रिटनने संमती दिली. अशी कारवाई संयुक्तपणे करण्यास ब्रिटनचा विरोध होता. मेटरनिकच्या मते व्हिएन्ना परिषदेने निर्माण केलेली व्यवस्था बदलण्याचा कोणत्याही देशात प्रयत्न झाल्यास संयुक्त युरोपने शांततेच्या मार्गाने किंवा लष्करी मार्गाने कारवाई करावी. मेटरनिकच्या या धोरणाला रशिया व प्रशियाचा पाठिंबा मिळाला. संयुक्त युरोपचे सर्वसाधारण धोरण म्हणून मेटरनिकने एक ठराव म्हणजेच ''प्रोटोकॉल ऑफ ट्रोपौ'' संमत करून घेतला. हा ठराव असा होताः 'युरोपमधील कोणत्याही देशात क्रांती होऊन युरोपला धोका निर्माण झाल्यास ''संयुक्त युरोपच्या'' सभासद देशांनी सैन्य पाठवून क्रांती नष्ट करावी.' या ठरावामुळे अंतर्गत हस्तक्षेपाचा हक्क मान्य करण्यात आला. ब्रिटनने ठरावाच्या विरूध्द मत दिले.

क) लैबॅकची परिषद (१८२१):

नेपल्सपाठोपाठ उत्तर इटलीतील पिडमाँटच्या राज्यात क्रांती होऊन उदारमतवादी राज्यघटनेची मागणी करण्यात आली. पिडमाँटचा राजा पहिला इमॅन्युअल याने राज्यत्याग केला व आपला भाऊ चार्लस फेलिक्स यास गादीवर बसविले. मात्र चार्लस फेलिक्स राज्यात हजर नसल्याने त्याची जबाबदारी चार्लस आल्बर्ट याने सांभाळली व त्याने लोकांची उदारमतवादी घटनेची मागणी मान्य केली.

या पार्श्वभूमीवर लैबॅकची परिषद भरली. नेपल्सचा राजा पहिला फर्डिनंड याने या परिषदेला हजर राहून क्रांती मोडून काढण्याची विनंती परिषदेला केली. लैबॅकच्या परिषदेने नेपल्समधील क्रांती दडपण्याची ऑस्ट्रियाला परवानगी दिली. या परवानगीचा फायदा घेऊन ऑस्ट्रियाने नेपल्समधील उठाव मोडून काढला. तसेच ऑस्ट्रियाने पिडमाँटमधील क्रांतीसुध्दा दडपून टाकली. नेपल्समध्ये पुन्हा पहिला फर्डिनंड व पिडमाँटमध्ये चार्लस फेलिक्स यांची अनियंत्रित राजवट प्रस्थापित झाली.

ड) व्हेरोनाची परिषद (१८२२):

या परिषदेसमोर ग्रीकांनी तुर्की राजवटीविरूध्द पुकारलेल्या बंडाळीचा व स्पेनमधील बंडाळीचा प्रश्न होता. मार्च १८२१ मध्ये ग्रीकांनी तुर्कस्थानच्या राजवटीविरूध्द बंड पुकरले. ग्रीक लोक हे युरोपीय लोकांचे धर्मबांधव असल्याने पवित्र संघाचे सभासद म्हणून त्यांना मदत करणे आवश्यक आहे अशी रशियाची भूमिका होती. ऑस्ट्रियाने ज्याप्रकारे नेपल्स व पिडमाँटमध्ये कारवाई केली त्याप्रमाणे आपल्याला ग्रीसच्या बाबतीत कारवाई करता यावी अशी रशियाची मागणी होती. मात्र त्यामुळे रशियाचे बाल्कन भागात वाढणारे वर्चस्व ऑस्ट्रिया व ब्रिटनच्या हितसंबंधाना धोका पोहोचविणारे होते.

दरम्यान स्पेनच्या बुरबाँ वंशीय राजाने फ्रान्सचा बुरबाँ वंशीय राजा अठरावा लुई याच्याकडे स्पेनमधील बंडाळी मोडून काढण्यासाठी मदतीची मागणी केली. फ्रान्सच्या राजाने 'संयुक्त युरोप'कडे अशी कारवाई करण्याची परवानगी मागितली.

इ.स. १८२२ मध्ये या प्रश्नांचा विचार करण्यासाठी व्हेरोना येथे परिषद भरवण्यात आली. दरम्यान कॅसलरीघच्या मृत्यूनंतर ब्रिटनचा परराष्ट्रमंत्री म्हणून कॅनिंगची नेमणूक झाली होती. तो एकंदरीत संयुक्त युरोपच्या परिषदांच्या विरोधात होता. तसेच सुरूवातीपासून ब्रिटन कोणत्याही राज्याच्या अंतर्गत प्रश्नांत हस्तक्षेप करण्याच्या धोरणाच्या विरूध्द होता. व्हेरोनाच्या परिषदेत ग्रीक स्वातंत्र्यलढ्याचा मुद्दा विचारात घेण्यात आला नाही. तसेच ब्रिटनचा विरोध

असतानाही फ्रान्सला स्पेनमध्ये सैन्य पाठविण्यास परवानगी देण्यात आली. परिषदेच्या निर्णयानुसार पुढे फ्रान्सने आपले सैन्य स्पेनमध्ये घुसवून अनियंत्रित राजेशाहीविरूध्दचे बंड मोडून काढले. उदारमतवादी राज्यघटना रद्द केली. परिषदेने स्पेनच्या संदर्भात आपले मत विचारात घेतले नाही म्हणून ब्रिटनने 'संयुक्त युरोप'मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. परिणामी 'संयुक्त युरोप'चे संघटन कोसळले.

४.४.३.संयुक्त युरोपची अखेर:

ब्रिटन संयुक्त युरोपमधून बाहेर पडला तरी हे संघटन पूर्णपणे संपुष्टात आले नाही. इ.स. १८२३ मध्ये 'संयुक्त युरोप'ने आपले लक्ष स्पेनच्या दक्षिण अमेरिकेतील वसाहतींच्या बंडाकडे वळविले. परंतु अशा कोणत्याही कारवाईस ब्रिटनने आपल्या आर्थिक हितसंबंधापायी तसेच अमेरिकेनेही विरोध केला. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष मन्रो याने ''युरोपमधील कोणत्याही सत्तेने अमेरिका खंडातील राजकारणात हस्तक्षेप केल्यास ते कृत्य शत्रुत्वाचे मानले जाईल'' अशी घोषणा केली. या तत्त्वाला 'मन्रो सिध्दान्त' असे म्हणतात. अमेरिकेच्या या रोकठोक भूमिकेमुळे व ब्रिटनच्या सागरी सामर्थ्यामुळे 'संयुक्त युरोप'ला स्पेनच्या वसाहतींतील बंडाबाबत कोणतीही कारवाई करता आली नाही.

ग्रीस-तुर्कस्थान प्रश्नावर विचार करण्यासाठी रशियाच्या झारने जानेवारी १८२५ मध्ये सेंट पीटर्सबर्ग येथे 'संयुक्त युरोप'ची परिषद बोलावली. या परिषदेत सहभागी होण्यास ब्रिटनने नकार दिला. या परिषदेत कोणताही महत्त्वाचा निर्णय झाला नाही. ग्रीस-तुर्कस्थान प्रश्न आपल्या मनाप्रमाणे सोडवू असे रशियाच्या झारने जाहीर केले.

अशारीतीने चर्चा, विचारविनिमय करून युरोपचे प्रश्न सोडवण्यास तसेच आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करणारी 'संयुक्त युरोप' ही संघटना येथे संपली.

४.४.४. संयुक्त युरोपच्या अपयशाची मीमांसा:

युरोपचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या दृष्टिने संयुक्त युरोपची स्थापना हा स्तुत्य उपक्रम होता. मात्र यात सहभागी झालेली राष्ट्रे आपल्या स्वार्थापासून दूर राहू शकली नाही. राज्यांच्या अंतर्गत धोरणात हस्तक्षेप न करण्याच्या ब्रिटनच्या भूमिकेमुळे लहान लहान राज्यात सामूहिक हस्तक्षे टाळण्यास काही प्रमाणात मदत झाली. राष्ट्रवाद, उदारमतवाद, लोकशाही यांच्या विरोधात संयुक्त युरोपने भूमिका घेतल्याने युरोपीय जनतेची निराशा झाली. संयुक्त युरोपचे अपयश पुढील मुद्यांमधून स्पष्ट होते.

अ) **बड्या राष्ट्रांचे स्वार्थी हेतू:** संयुक्त युरोपमध्ये सहभागी झालेल्या ऑस्ट्रिया, रशिया, ब्रिटन या राष्ट्रांनी आपले हेतू साध्य करण्याचा प्रयत्न केला. ऑस्ट्रियाला आपले साम्राज्य टिकवायचे असल्याने त्याने राष्ट्रवादी व लोकशाहीवादी चळवळी दडपून टाकण्यासाठी संयुक्त युरोपच्या परिषदांचा उपयोग केला. रशियाला समुद्रावरचे सामर्थ्य वाढवून व्यापार वाढवायचा होता. मात्र ब्रिटनला आपल्या व्यापारात तर समुद्रावरील वर्चस्वात कोणीही प्रतिस्पर्धी नको होता. प्रमुख युरोपीय राष्ट्रांनी आपल्या साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षा सोडल्या नव्हत्या. त्यामुळे संयुक्त युरोपच्या निर्णयांवर या गोष्टींचा परिणाम झाला.

ब) **तात्त्विक मतभेद:** व्हिएन्ना परिषदेने निर्माण केलेली व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी राज्यांच्या अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप करण्याची ऑस्ट्रिया, प्रशिया, रशिया यांचा विरोध

नव्हता. ब्रिटनचा या तत्त्वाला तीव्र विरोध होता. अनियंत्रित राजेशाही टिकवण्याच्या अट्टाहासापायी नेपल्स, स्पेन, पिडमाँटमधील लोकशाहीवादी उठाव दडपण्यात आले. परिणामी ब्रिटन व इतर राष्ट्र यांच्यातील मतभेद वाढत गेले. युरोपीय राष्ट्रातील मतभेदांमुळे गुलामगिरीस प्रतिबंध, चाचेगिरीस आळा यासारख्या समान प्रश्नांवरही संयुक्त युरोपला निर्णय घेता आले नाहीत. ग्रीकांच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नात हे मतभेद स्पष्ट दिसून आले.

क) **अनियंत्रित राजेशाही व संसदीय पध्दतीतील सहकार्य अशक्य:** मेटरनिकचा लोकशाही पध्दतीला असलेला विरोध व ब्रिटनची संसदीय पध्दती या परस्परविरोधी गोष्टींचा मेळ फार काळ टिकणार नव्हता. युरोपमधील राष्ट्रवादी व लोकशाही प्रवृत्तींकडे ब्रिटनला जास्त काळ दुर्लक्ष करता येणार नव्हते. पुढे संयुक्त युरोपला अनियंत्रित सम्राटांचा संघ असे स्वरूप प्राप्त होऊ लागले. त्यामुळे लोकशाहीला प्राधान्य देणाऱ्या ब्रिटनला संयुक्त युरोपमध्ये जास्त काळ राहणे शक्य झाले नाही.

ड) **सर्वसाधारण ध्येयाचा अभाव:** नेपोलियनचा पाडाव करण्यासाठी एकत्र आलेल्या मित्रराष्ट्रांमध्ये मतभेद होते ते संयक्त युरोपच्या स्थापनेनंतर मिटले नाहीत. काही काळ सहकार्याचे वातावरण निर्माण झाले तरी ते सहकार्य आपापल्या स्वार्थानुसार होते. सहभागी राष्ट्रांचा संयुक्त युरोपकडे बघण्याचा दृष्टिकोन भिन्न होता. फ्रान्सपासून धोका नाही याची खात्री पटल्यानंतर पूर्वीच्या चतु:संघातील राष्ट्रांचे आपापसातील मतभेद पुढे येऊ लागले. परिणामी संयुक्त युरोपची संघटना कोसळली.

४.५. आपली प्रगती तपासा

१. पवित्र संघाची संकल्पना कोणी मांडली ?

_____

_____

२. एक्स-ला-शापेल परिषदेद्वारे कोणाचा चतु:संघात समावेश करण्यात आला ?

_____

_____

३. व्हेरोना परिषदेच्या निर्णयानुसार फ्रान्सने आपले सैन्य कोणत्या देशात घुसवले ?

_____

_____

४. 'मन्रो सिध्दान्त' स्पष्ट करा.

_____

_____

४.६. सारांश

नेपोलियन बोनापार्ट विरुध्द वर्षानुर्षे लढा देऊन यशस्वी ठरलेल्या युरोपियन राज्यकर्त्यांनी व्हिएन्ना परिषदेमार्फत युरोपची पुर्नव्यवस्था लावण्याचा व प्रतिगामी राजवटींची निर्मिती करुन फ्रेंच राज्यक्रांतीने निर्माण केलेली तत्त्वे चिरडण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे संयुक्त युरोपच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय सहकार्याचा प्रयोग राबविण्याचा प्रयत्न झाला. व्हिएन्ना परिषद व संयुक्त युरोपच्या निमित्ताने एकत्र आलेली बडी राष्ट्रे स्वतःचे स्वार्थ राखून होते. त्यामुळे स्वार्थांना धक्का लागताच त्यांच्यात एकजूटता उरली नाही. राज्यकर्त्यांनी जरी प्रतिगामी धोरण स्वीकारले तरी जनमानसामध्ये रुजलेली क्रांतीची तत्त्वे ते चिरडू शकले नाहीत. युरोपमध्ये निर्माण झालेल्या राष्ट्रवादी भावनांची दखह व्हिएन्ना परिषदेने घेतली नाही. व्हिएन्ना परिषदेच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय सहकार्याची जाणीव युरोपियन राष्ट्रांना झाली हे मान्य करावे लागते. व्हिएन्ना परिषदेनंतर झालेला संयुक्त युरोपचा प्रयोग अल्पकाळ टिकला. मात्र एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील या परिषदांमुळे विसाव्या शतकातील राष्ट्रसंघ (लीग ऑफ नेशन्स) व संयुक्त राष्ट्रसंघ या आंतरराष्ट्रीय संघटनांची पार्श्वभूमी तयार झाली.

४.७. दीर्घोत्तरी प्रश्न

१. युरोपीय मुत्सद्यांनी व्हिएन्ना परिषदेत केलेल्या फ्रान्स व युरोपच्या व्यवस्थेची सविस्तर माहिती लिहा.
२. व्हिएन्ना परिषदेच्या उपलब्धींचे टीकात्मक मूल्यांकन करा.
३. संयुक्त युरोपच्या (कॉन्सर्ट ऑफ युरोप) यश आणि अपयशाचे टीकात्मक परीक्षण करा.
४. संयुक्त युरोपने (कॉन्सर्ट ऑफ युरोप) केलेल्या कार्याचा आढावा घ्या.

❖❖❖

५

इ.स. १८३० व इ. स. १८४८ ची क्रांती

प्रकरण रूपरेषा:

५.० अभ्यासाचे उद्देश.
५.१. प्रस्तावना
५.२. इ.स.१८३० ची क्रांती
५.३ आपली प्रगती तपासा
५.४ इ.स.१८४८ ची क्रांती
५.५ आपली प्रगती तपासा
५.६ सारांश
५.७ दीर्घोत्तरी प्रश्न

५.० अभ्यासाचे उद्देश

१. इ.स. १८३० च्या क्रांतीस कारणीभूत फ्रान्समधील परिस्थितीचा आढावा घेणे.
२. इ.स. १८३० च्या क्रांतीमुळे युरोपवर झालेल्या परिणामांची चर्चा करणे.
३. इ.स. १८४८ च्या क्रांतीची कारणे पाहताना लुई फिलीपीच्या कारकिर्दीचे परीक्षण करणे.
४. इ.स. १८४८ च्या क्रांतीने मेटरनिकच्या नीतीचा अंत कसा केला ते अभ्यासणे

५.१. प्रस्तावना

नेपोलियनच्या पाडावानंतर भरलेल्या व्हिएन्ना परिषदेने जुन्या राजवंशाच्या पुन:स्थापनेचे धोरण वापरत फ्रान्समध्ये पुन्हा एकदा बुरबाँ घराण्याची राजवट निर्माण केली. मधल्या काळात लोकांच्या दृष्टिकोनात बराच फरक पडल्याने बुरबाँ राजे फ्रान्समध्ये लगेचच अनियंत्रित राजवट प्रस्थापित करू शकणार नव्हते. मात्र इ.स. १८१५ नंतर युरोपात प्रतिगामी शक्तिंना राजकीय पाठिंबा मिळाल्याने राजनिष्ठ लोकांना प्रोत्साहन मिळाले व त्यांनी क्रांतीची तत्त्वे चिरडण्याचा प्रयत्न केला. इ.स. १८१५ ते १८४८ या काळात फ्रान्समध्ये बुरबाँ व ऑर्लेआं घराण्याची राजेशाही अस्तित्वात होती. ही राजवट घटनात्मक असावी अशी अपेक्षा होती. मात्र फ्रान्समधील राजेपद जेव्हा अनियंत्रित बनू लागले तेव्हा फ्रेंच जनतेने क्रांती करून इ.स. १८३० मध्ये बुरबाँ घराण्याची तर इ.स. १८४८ मध्ये ऑर्लेआं घराण्याची राजवट संपुष्टात आणली. इ.स. १८४८ मध्ये फ्रान्समध्ये दुसरे प्रजासत्ताक निर्माण करण्यात आले. फ्रान्सला सर्दी झाली की सर्व युरोपला शिंका येतात या म्हणीचा प्रत्यय या दोन्ही क्रांत्यांच्या वेळी दिसून आला. इ.स. १८३० व इ.स. १८४८ मध्ये फ्रान्समध्ये अनियंत्रित राजेशाहीविरूध्द झालेल्या क्रांत्यांचे पडसाद संपूर्ण युरोपवर उमटले. युरोपच्या विविध भागात लोकशाहीवाद्यांनी प्रतिगामी शाक्तिंविरूध्द उठाव केले.

५.२. इ.स.१८३० ची क्रांती:

या क्रांतीला जुलै क्रांती असेही संबोधले जाते. इ.स. १८१४ ते १८३० या काळात फ्रान्समध्ये अठरावा लुई व दहावा चार्लस् या बुरबाँ राजांची सत्ता होती. दहाव्या चार्लस्च्या काळात राजेशाही जेव्हा व्यक्तिस्वातंत्र्य दडपून अनियंत्रित बनण्याचा प्रयत्न करू लागली त्यावेळी जनतेने उठाव केला. जुलै १८३० ची फ्रान्समधील क्रांती युरोपच्या विविध भागातील उदारमतवादी व राष्ट्रवादी चळवळींना प्रेरणा देणारी ठरली. त्यामुळे फ्रान्समध्ये १८३० ची क्रांती का घडून आली याची मीमांसा करणे आवश्यक ठरते.

५.२.१ इ.स. १८३० च्या क्रांतीची कारणे

अ) फ्रान्समध्ये बुरबाँ घराण्याची स्थापना:

इ.स. १८१३ च्या लिपझिगच्या लढाईतील निर्णायक पराभवानंतर मार्च १८१४ मध्ये नेपोलियनने सत्तात्याग केला. मित्रराष्ट्रांनी बुरबाँ घराण्याकडे फ्रान्सची गादी सोपवली. सोळाव्या लुईचा भाऊ काऊंट द प्रोव्हान्स हा अठरावा लुई या नावाने गादीवर बसला. तो स्थलांतरीत असताना त्याने काही काळ ब्रिटनमध्ये वास्तव्य केले होते. तेथील संसदीय लोकशाही त्याने पाहिली होती. फ्रान्सच्या गादीवर बसलो तरी जनतेच्या कलाने जावे लागणार हे तो ओळखून होता. फ्रेंच जनतेला नाखूश करायचे नाही व बड्या सत्तांचा राग ओढवून घ्यायचा नाही असे धोरण सांभाळताना त्याला तारेवरची कसरत करावी लागत होती.

ब) इ.स.१८१४ ची सनद (राज्यघटना):

४ जून १८१४ रोजी अठराव्या लुईने एक सनद काढून फ्रान्सला नवी राज्यघटना दिली. या घटनेनुसार नियंत्रित राजसत्तेचा प्रयोग फ्रान्समध्ये सुरू झाला. या सनदेनुसार राजा हा राज्याचा प्रमुख होता. त्याला नेमणूका करण्याचे, वटहुकूम काढण्याचे, युध्द घोषित करण्याचे, तह करण्याचे, कायदे मंजूर करण्याचे अधिकार देण्यात आले होते. विधिमंडळ द्विसभागृही होते. त्यापैकी चेंबर ऑफ पीअर्समध्ये पारंपरिक उमराव वर्गाचा तसेच राजाने आजन्म सदस्यत्व बहाल केलेल्या सभासदांच समावेश होता. चेंबर ऑफ डेप्युटीज या दुसऱ्या सभागृहातील सदस्यांची निवडणूकीद्वारे पाच वर्षांसाठी निवड होणार होती. तीस वर्ष पूर्ण केलेल्या तसेच ३०० फ्रँक वार्षिक कर भरणाऱ्या व्यक्तिला चेंबर ऑफ डेप्युटीजच्या निवडणूकीत मतदान करता येणार होते.

इ.स. १८१४ च्या राज्यघटनेमध्ये क्रांतिकाळातील सरकार व नेपोलियनचे साम्राज्यसरकार यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न झाला होता. मध्यवर्ती शासनसंस्था, धार्मिक सहिष्णुता, कायद्यापुढील समानता इत्यादी तत्त्वे मान्य करण्यात आली होती. राजा कार्यकारी मंडळाचा प्रमुख होता. राजाने नेमलेले मंत्री त्याच्या हाताखाली काम करत. कायदे व कर याबाबतची विधेयके कार्यकारी मंडळामार्फत विधिमंडळात मांडली जात. परंतु त्यांना नकार देण्याचा अधिकार विधिमंडळाला होता. वृत्तपत्रांना स्वातंत्र्य देण्यात आले, खाजगी मालमत्तेचा हक्क मान्य करण्यात आला. न्यायदानाच्या कामात पंचांचे साहाय्य घेण्याची पध्दती अंमलात आणण्यात आली. इ.स.१८१४ ची ही राज्यघटना इ.स. १८४८ पर्यंत चालू होती.

क) फ्रान्समधील राजकीय गट:

या काळात फ्रान्समध्ये अनेक राजकीय गट निर्माण झाले होते. त्यात कट्टर राजसत्तावादी गट प्रमुख होता. हे लोक बुरबाँ राजसत्तेचा अभिमान बाळगत होते व अनियंत्रित राजसत्तेचे पाठिराखे होते. त्यांचे वर्णन 'राजापेक्षाही राजनिष्ठ' असे केले जात असे. उमरावांचे गेलेले वैभव पुन्हा मिळवून देण्याचा त्यांच्या प्रयत्नांमुळे सामान्य लोक त्यांच्याविषयी साशंक होते. दुसरा गट मवाळमतवादी राजसत्तावादी लोकांचा होता व हे लोक नवीन परिस्थितीशी जुळवून घेणारे होते. तिसरा उदारमतवाद्यांचा गट होता. त्यांचा नियंत्रित राजसत्तेला पाठिंबा असला तरी जनतेला जास्त अधिकार असावेत अशी त्यांची मागणी होती. तर प्रजासत्ताकवादी गटाला राजेपद नको होते. त्याचप्रमाणे बोनापार्टिस्ट गटाला नेपोलियनच्या घराण्याला पुन्हा सत्तेवर आणायचे होते व फ्रान्सने युध्दाच्या मार्गाने प्रतिष्ठा मिळवावी असे वाटत होते. या सर्व गटांना सांभाळताना १८ व्या लुईला कठीण जात होते. मात्र त्याचे धोरण मवाळ होते.

ड) श्वेत दहशत:

अठराव्या लुईने जारी केलेल्या इ.स. १८१४ च्या मवाळ राज्यघटनेला कट्टर राजसत्तावाद्यांचा तीव्र विरोध होता. त्यांना 'जुनी व्यवस्था' पुन्हा प्रस्थापित करायची होती. लोकक्षोभाला बळी पडून राजाला आपली गादी गमवायची नसल्याने त्याने राजसत्तावाद्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. दरम्यान नेपोलियन एल्बाहून सुटून परत आल्याने अठराव्या लुईला बेल्जियमला पळून जावे लागले. नेपोलियनने शंभर दिवस राज्य केले. मात्र मित्रसंघाने नेपोलियनचा वॉटर्लूच्या लढाईत पराभव केला आणि अठराव्या लुईला पुन्हा सत्तेवर बसवले. नेपोलियनच्या पराभवाची बातमी कळताच कट्टर राजसत्तावाद्यांनी बोनापार्टिस्ट तसेच प्रजासत्ताकवाद्यांवर सशत्र हल्ले चढवले. कॅथॉलिकांनी प्रोटेस्टंट पंथीयांवर हल्ले केले. या रक्तरंजित पर्वाला 'श्वेत दहशत' म्हणतात.

इ.स. १८१५ मध्ये श्वेत दहशतीच्या वातावरणात निवडणूका झाल्या व कट्टर राजसत्तावाद्यांच्या पक्षाला चेंबर ऑफ डेप्युटीज मध्ये बहुमत मिळाले. चेंबर ऑफ पीअर्स मध्ये मवाळांचे वर्चस्व होते. रिचेल्युच्या नेतृत्वाखाली मंत्रीमंडळ बनविण्यात आले. राजाचा भाऊ काऊंट द आर्तो हा कट्टर राजसत्तावाद्यांचे नेतृत्व करत होता. नेपोलियनला शंभर दिवसात मदत करणाऱ्यांवर त्यांना सूड उगवायचा होता. हजारो बोनापार्टिस्टांना तुरूंगात धाडण्यात आले तर काहींना मृत्युदंड देण्यात आला. मृत्युदंडाची शिक्षा झालेल्यांमध्ये मार्शल ने या नेपोलियनकालीन पराक्रमी सेनानीचा समावेश होता. अठराव्या लुईने या परिस्थितीत चेंबर ऑफ डेप्यटीज विसर्जित केले.

इ) मवाळांची सत्ता व पतन:

इ.स. १८१६ मध्ये निवडणूका होऊन मवाळ राजसत्तावादी सत्तेवर आले. ते इ.स.१८२० पर्यंत सत्तेवर होते. इ.स. १८१७ मध्ये मवाळांच्या फायद्याचे निवडणूक कायदे संमत करून घेण्यात आले. दरम्यान फ्रान्सने व्हिएन्ना परिषदेने लादलेली खंडणी भरल्याने इ.स. १८१८ मध्ये 'संयुक्त युरोप'च्या एक्स-ला-शापेल परिषदेच्या निर्णयानुसार फ्रान्समधील मित्रराष्ट्रांचे सैन्य काढून घेण्यात आले. इ.स. १८१९ मध्ये वृत्तपत्रांवरील निर्बंध काढून घेण्यात आले.

फेब्रुवारी १८२० मध्ये काऊंट द आर्तोचा मुलगा ड्युक ऑफ बेरी याचा खून झाला. या खूनाचे खापर कट्टर राजसत्तावाद्यांनी सरकारच्या मवाळ व उदारमतवादी धोरणावर फोडले. या परिस्थितीत कट्टर राजसत्तावादी पुन्हा सत्तेवर आले. रिचेल्यु पुन्हा मुख्यमंत्री झाला. त्याच्याच काळात वृत्तपत्रांवर पुन्हा निर्बंध लादण्यात आले, निवडणूकांचे कायदे बदलण्यात आले. गुप्तमतदानाची पध्दत बाद करण्यात आली तसेच मतदानाचा हक्क मर्यादित करण्यात आला. इ.स. १८२१ मध्ये रिचेल्युच्या जागी प्रतिगामी वृत्तीचा राजनिष्ठ व्हिलेल फ्रान्सचा मुख्यमंत्री बनला. तो इ.स. १८२७ पर्यंत या पदावर होता. इ.स. १८२२ मध्ये वृत्तपत्रांवर अधिक नियंत्रण लादण्यात आले, ख्रिस्ती धर्मसंस्थेला शिक्षणावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार देण्यात आले, परदेशातील आयात वस्तूंवर जबरदस्त कर बसवण्यात आले. इ.स. १८२३ मध्ये स्पेनमधील क्रांती चिरडण्यासाठी फ्रेंच सैन्य पाठविण्यात आले.

ई) दहाव्या चार्लस्चे राज्यारोहण:

इ.स. १८२४ मध्ये अठराव्या लुईचा मृत्यु होऊन त्याच भाऊ काऊंट द आर्तो हा दहावा चार्लस् या नावाने फ्रान्सच्या गादीवर बसला. अत्यंत प्रतिगामी वृत्तीच्या या राजाचा ईश्वरदत्त सत्तातत्त्वावर विश्वास होता. तो धर्मवेडा व पूर्वग्रहदुषित वृत्तीचा होता. इ.स.१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतर त्याने निर्वासित उमरावांचे नेतृत्व केले. सोळाव्या लुईने जनतेला सवलती दिल्या म्हणून क्रांतीने त्याचा बळी घेतला असे चार्लस्चे मत होते. 'जुनी व्यवस्था' प्रस्थापित करण्याचा तो समर्थक होता. काळाची पाऊले ओळखून क्रांतीच्या तत्त्वांना मान्यता देण्याऐवजी त्याने ती तत्त्वे दडपण्याचा व धर्मसंस्थेला क्रांतीपूर्व काळातील स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. परिणामी चार्लस् व विधिमंडळ यांच्यातील दुरावा वाढत गेला.

ई) प्रतिगामी राजवट:

चार्लस्च्या कारकिर्दीत व्हिलेल (१८२७ अखेर पर्यंत), मार्तिन्यॅक (१८२८-१८२९) व पॉलिन्यॅक (१८२९-१८३०) हे फ्रान्सचे मुख्यमंत्री होते. त्यापैकी मार्तिन्यॅक हा उदारमतवादी होता. व्हिलेल, पॉलिन्यॅक सारखे राजाचे समर्थक प्रतिगामी मंत्री विधिमंडळाला तर मार्तिन्यॅकसारखा उदारमतवादी मंत्री राजाला पसंत पडला नाही. चार्लस्ने आपल्या प्रतिगामी धोरणाची अंमलबजावणी आपल्या मंत्र्यांमार्फत केली. त्यामुळे या मंत्र्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

१) व्हिलेल: चार्लस्च्या राजवटीत इ.स. १८२७ पर्यंत व्हिलेल हा फ्रान्सचा मुख्यमंत्री होता. त्याने व्यक्तिस्वातंत्र्य दडपण्याचा प्रयत्न केला. वृत्तपत्रांवर कडक निर्बंध येऊन प्रसिध्दीपूर्व तपासणी लादण्यात आली. वृत्तपत्रातील एखाद्या लेखामुळे किंवा चित्रामुळे धार्मिक भावना दुखावल्यास किंवा एखादा वर्ग दुखावल्यास त्याबद्दल मोठ्या दंडाची किंवा सात वर्षांपर्यंत कैदेची तरतूद करण्यात आली. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात ज्या निर्वासित उमरावांच्या जमिनी जप्त झाल्या होत्या त्यांना नुकसानभरपाई देणारा कायदा इ.स. १८२५ मध्ये संमत करण्यात आला. या कायद्यानुसार सार्वजनिक राष्ट्रीय कर्जाच्या व्याजाचा दर ५ टक्क्यांवरून ४ टक्क्यांवर आणण्यात आला. त्यामुळे सरकारी रोख्यांमध्ये पैसे गुंतवलेला भांडवलदार व मध्यमवर्ग नाराज झाला. धर्मसंस्थेचे अधिकार मजबूत करण्यात आले व जेसुईटांना फ्रान्समध्ये परतण्यास परवानगी देण्यात आली. धर्मसंस्थेचे शिक्षणक्षेत्र व विवाहसंस्थेवर नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले. जन्म व मृत्युची नोंदणी धर्मसंस्थेकडे सोपविण्यात आली. इ.स. १८२७ मध्ये नॅशनल गार्ड ही संघटना बरखास्त करण्यात आली. कारण नॅशनल गार्डस्नी व्हिलेलच्या मंत्रिमंडळाविरूध्द घोषणा दिल्या होत्या. पॅरिसची जनता कोपित झाल्याने व्हिलेलला राजीनामा द्यावा लागला.

२) मार्तिन्यॅक: व्हिलेलनंतर मुख्यमंत्री झालेला मार्तिन्यॅक हा समर्थ, अनुभवी व मवाळ होता. त्याने तडजोडीचे धोरण स्वीकारले. त्याने वर्तमानपत्रांवरील निर्बंध दूर केले. जेसुईट पंथीयाना शिक्षणक्षेत्रात काम करण्यासंबंधी बंधने घालण्यात आली. प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणूकीसाठी मतदानाचा अधिकार व्यापक करण्यात आले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात सुधारणा सुचविल्या. कट्टर राजसत्तावाद्यांना या सुधारणा पटल्या नाहीत तर उदारमतवाद्यांना त्या असमाधानकारक वाटल्या. परिणामी मार्तिन्यॅकला राजीनामा द्यावा लागला.

३) पॉलिन्यॅक: कधीकाळचा निर्वासित उमराव व कट्टर राजसत्तावादी असलेला पॉलिन्यॅक हा मार्तिन्यॅकनंतर मुख्यमंत्री झाला. ''या लोकांबरोबर वागायचा दुसरा कोणताही मार्ग नाही. या ठिकाणी थांबलेच पाहिजे'' असे त्याचे उद्‌गार होते. याचाच अर्थ यापुढे तो कोणत्याच सुधारणा देणार नव्हता व लोकांचे स्वातंत्र्य देखील काढून घेण्याचा त्याचा विचार स्पष्ट झाला. धर्मगुरूंना राज्यकारभारात महत्त्व प्राप्त करून देण्याचा व उमरावांना विशेषाधिकार देण्याचा इरादा त्याने व्यक्त केला. पॉलिन्यॅकच्या मंत्रीमंडळाला चेंबर ऑफ डेप्युटीजमध्ये बहुमत नव्हते. मार्च १८३० मध्ये दहाव्या चार्लस्‌ने विधिमंडळापुढे भाषण करताना म्हटले की त्याच्या सरकारला अडथळा निर्माण करण्यासाठी कट झाले तर ते अडथळे नाहीसे करण्याकरीता मार्ग शोधावे लागतील. राजाचे हे भाषण म्हणजे विधिमंडळाला आव्हान आहे असे मानण्यात आले. पॉलिन्यॅकच्या मंत्रीमंडळावर अविश्वासाचा ठराव मांडून तो २२१ विरूध्द १ मतांनी संमत झाला. पॉलिन्यॅकला दूर करण्याऐवजी राजाने विधिमंडळ विसर्जित केले व नव्या निवडणूका जाहीर केल्या.

ऊ) जुलै १८३० चे वटहुकूम:

जुलै १८३० मध्ये निवडणूका होऊन पॉलिन्यॅकच्या विरोधी गटांना पूर्वीपेक्षा साठ जागा जास्त मिळाल्या. राजाने पॉलिन्यॅकचे मंत्रीमंडळ बरखास्त केले नाही. त्याबद्दल उदारमतवादी गटाने निषेध व्यक्त केला. पॉलिन्यॅकच्या प्रभावाखाली राजाने विधिमंडळ व राज्यघटना उलथवून टाकण्याचा निर्धार केला. २५ जुलै १८३० रोजी राजाने चार वटहुकूम जारी केले. त्यानुसार (अ) सरकारच्या परवानगीशिवाय वृत्तपत्रांच्या प्रकाशनावर बंदी घालण्यात आली. (ब) नुकत्याच झालेल्या निवडणूका रद्द करून विधिमंडळ बरखास्त करण्यात आले. (क) निवडणूक कायद्यात बदल करण्यात येऊन मतदारांची संख्या एक लाखाहून पंचवीस हजारांवर आणण्यात आली. (ड) नवीन निवडणूकांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या.

५.२.२. जुलै १८३० ची क्रांती:

२५ जुलैच्या वटहुकूमांमुळे जनतेची स्वातंत्र्य रद्द करून अनियंत्रित राजेशाही प्रस्थापित करण्याचा राजाचा विचार स्पष्ट झाला. राजाला व पॉलिन्यॅकला वटहुकूमांच्या परिणामांची कल्पना नव्हती. दुसऱ्या दिवशी पत्रकारांच्या प्रचाराने पॅरिसमधील जनतेने उठाव केला. रस्त्यात ठिकठिकाणी अडथळे निर्माण करण्यात आले. क्रांतिकारक समित्यांची स्थापना करण्यात आली. फ्रेंच जनतेने स्वयंस्फूर्तीने केलेल्या या उठावाचा फायदा प्रजासत्ताकवाद्यांनी घेतला. सैन्याने लोकांवर गोळ्या झाडण्यास नकार दिला. २९ जुलैला नॅशनल गार्ड उठाववाल्यांना येऊन मिळाले. क्रांतीचा जोर वाढत गेला. अखेर ३१ जुलैला आपल्या नातवाला गादीवर बसवावे ही मागणी करून दहाव्या चार्लस्‌ने राज्यत्याग केला व तो इंग्लंडला पळून गेला.

चार्लस्‌च्या सत्तात्यागानंतर जुलैच्या क्रांतीचा शेवट झाला. राजाने नेमलेला वारस फेटाळण्यात आला. प्रजासत्ताकाची स्थापना करावी अशी काही क्रांतिकारकांची मागणी होती.

मात्र राजेशाहीची समाप्ती केल्यास प्रमुख युरोपीय सत्तांचा रोष ओढवण्याची शक्यता होती. इंग्लंडसारखी घटनात्मक राजेशाही निर्माण करण्याचे ठरविण्यात आले व ऑर्लेआं घराण्यातील लुई फिलीपी यास फ्रान्सच्या राजेपदावर बसविण्यात आले.

५.२.३. जुलै १८३० च्या क्रांतीचे परिणाम:

फ्रान्समध्ये झालेल्या जुलै १८३० च्या क्रांतीचे पडसाद संपूर्ण युरोपवर उमटले व अनियंत्रित राजसत्तांना हादरा बसला. फ्रान्समध्ये घटनात्मक राजेशाही स्थापन झाली. या क्रांतीमुळे उदारमतवादी व राष्ट्रवादी चळवळींना प्रोत्साहन मिळून निरनिराळ्या प्रदेशातील जनतेने उठाव करून उदारमतवादी व्यवस्था व लोकशाहीची मागणी केली. व्हिएन्ना परिषदेतील निर्णय राबवून मेटरनिकने उदारमतवाद, राष्ट्रवाद ही तत्त्वे दडपण्याचा प्रयत्न केला होता. इ.स. १८३० ची क्रांती म्हणजे व्हिएन्ना परिषदेच्या व्यवस्थेवर मोठा आघात होता. बेल्जियम, जर्मनी, इटली, पोलंड या प्रदेशात जनतेने आपल्या हक्कांसाठी लढा उभारला.

अ. फ्रान्सवरील परिणाम: इ.स. १८३० च्या क्रांतीने फ्रान्समध्ये सत्ताबदल घडवून आणला. बुरबाँ घराण्याची सत्ता संपुष्टात आल्याने अप्रत्यक्षपणे व्हिएन्ना परिषदेने स्वीकारलेले न्याययुक्ततेचे तत्त्व बाजूला सारले गेले. फ्रान्समध्ये राजेशाही नष्ट न करता घटनात्मक स्वरूपात ऑर्लेआं घराण्यातील लुई फिलीपी यास सत्ता सोपविण्यात आली. फ्रान्समध्ये राजसत्तेच्या कट्टर पाठिराख्यांचे राजकारणातील महत्त्व कमी झाले व मध्यमवर्गीयांचे वर्चस्व वाढले. पुढील काळात उदार धार्मिक धोरण राबविण्यात आले.

ब. बेल्जियमचे स्वातंत्र्य: इ.स. १८१५ च्या व्हिएन्ना परिषदेने हॉलंड व बेल्जियम यांचे एकत्रीकरण केले होते. मात्र डच व बेल्जियन हे दोनही लोकसमूह भाषा, धर्मपंथ, आर्थिक जीवन, परंपरा याबाबत एकमेकांपासून भिन्न होते. हॉलंडचा राजा पहिला विल्यम याने बेल्जियन जनतेवर नियंत्रण लादण्यास सुरूवात केली. बेल्जियन जनतेची स्वायत्ततेची मागणी हॉलंडच्या राजाने फेटाळली. याच सुमारास फ्रान्समधील जुलै क्रांतीपासून प्रेरणा घेऊन बेल्जियन लोकांनी ब्रुसेल्समध्ये ४ ऑक्टोबर १८३० रोजी बंड पुकारले व बेल्जियमचे स्वातंत्र्य जाहीर केले. बेल्जियमच्या जनतेला राजा हवा होता. ब्रिटनचा पाठिंबा असलेला सॅक्सकोबर्गचा जर्मन राजपुत्र लिओपोल्ड याचा बेल्जियमचा घटनात्मक राजा म्हणून जुलै १८३१ मध्ये राज्याभिषेक करण्यात आला. पुढे ब्रिटन, फ्रान्स, रशिया, प्रशिया, ऑस्ट्रिया या सत्तांनी बेल्जियमचे स्वातंत्र्य मान्य केले. बेल्जियमच्या स्वातंत्र्यामुळे व्हिएन्ना परिषदेने निर्माण केलेल्या व्यवस्थेला धक्का बसला.

क. जर्मनी व इटलीतील चळवळी: इ.स. १८३० च्या क्रांतीचे पडसाद जर्मन प्रदेशात उमटले. ब्रन्सवीक, हॅनोव्हर, हेस्स कॅसल, सॅक्सनी, बव्हेरीया, वुर्टेम्बर्ग इत्यादी राज्यांमध्ये जनतेने चळवळी सुरू करून राज्यकर्त्यांकडे उदारमतवादी राज्यघटनांची मागणी केली. सुरूवातीला मेटरनिकने जर्मन राज्यांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे काही जर्मन राज्यात उदारमतवादी राज्यघटना मान्य करण्यात आल्या. पुढे मेटरनिकच्या दबावाखाली या जर्मन राज्यांनी जनतेला दिलेल्या सुधारणा काढून घेतल्या.

इ.स. १८३० च्या क्रांतीचे पडसाद इटलीमध्ये उमटले. कार्बोनारी या गुप्त संघटनेच्या पुढाकाराने मध्य इटलीतील पार्मा, मोदेना व पोपची राज्ये येथील प्रजेने चळवळ सुरू केली. पण ऑस्ट्रियन सेनेने हे उठाव मोडून काढले व जुनी व्यवस्था पुन्हा प्रस्थापित केली.

ड. पोलंडमधील उठाव: व्हिएन्ना परिषदेच्या निर्णयानुसार पोलंडचा बराचसा भाग रशियाला देण्यात आला होता. ऑस्ट्रिया व प्रशियाला काही भाग मिळाला होता. रशियाच्या ताब्यातील पोलंडच्या प्रदेशात झार पहिला अलेक्झांडरच्या काळात काही प्रमाणात स्वायत्तता देण्यात आली होती. मात्र पहिल्या अलेक्झांडरच्या मृत्युनंतर रशियाचा झार बनलेल्या पहिला निकोलस याने पोलंडच्या प्रदेशात पुन्हा अनियंत्रित सत्ता गाजवण्यास सुरूवात केली. फ्रान्समधील जुलै १८३० च्या उठावाच्या यशाची बातमी कळताच पोलिश जनतेने वॉर्सा येथे रशियाविरूध्द उठाव केला.हा उठाव अल्पावधीत पोलंडच्या इतर भागात पसरला. पोलंडने स्वातंत्र्य जाहीर केले. रशियाने उठाव दडपण्यासाठी सैन्य पाठवले. पोलिश जनतेला फ्रान्स व ब्रिटनकडून मदत मिळाली नाही. रशियन सैन्याने पोलिश जनतेचा उठाव मोडून काढला व पोलंडचे स्वातंत्र्य पूर्णपणे नष्ट केले. पोलंडला रशियन सरहद्दीवरचा एक प्रांत घोषित करण्यात आले. उदारमतवादी राज्यघटना बरखास्त करण्यात आली व उठावात सहभागी असणाऱ्यांना कडक शिक्षा करण्यात आल्या.

५.३ आपली प्रगती तपासा

१. फ्रेंच विधिमंडळाच्या दोन सभागृहांची नांवे सांगा.

_____

_____

२. कोणत्या मुख्यमंत्र्याच्या प्रभावाखाली दहाव्या चार्लस्ने चार वटहुकूम काढले ?

_____

_____

३. जुलै क्रांतीमुळे हॉलंडच्या ताब्यातील कोणत्या प्रदेशाने स्वातंत्र्य पुकारले ?

_____

_____

४. इ.स. १८३० च्या क्रांतीमुळे फ्रान्समध्ये कोणते घराणे सत्तेवर आले ?

_____

_____

५.४ इ.स.१८४८ ची क्रांती

इ.स. १८३० च्या फ्रान्समधील क्रांतीने बुरबाँ घराण्याची सत्ता संपुष्टात आणली आणि घटनात्मक राजेशाहीच्या रूपाने लुई फिलीपी या ऑर्लेआं घराण्यातील राजाकडे सत्ता सोपविण्यात आली. इ.स. १८३० ची क्रांती मध्यमवर्गाने (बुर्ज्वा) घडविली असल्याने पुढील काळात या वर्गाचा राजकारणावर प्रभाव वाढला. राजकीय वातावरणात उदारमतवादी विचार पुढे येऊ लागले. घटनात्मक राजेशाहीच्या स्थापनेने प्रजासत्ताकवाद्यांची निराशा झाली. इ.स. १८३० ते इ.स. १८४८ या काळात लुई फिलीपीची राजवट फ्रान्सवर होती. मात्र ज्या अपेक्षेने त्याच्याकडे सत्ता सोपविण्यात आली होती त्या अपेक्षा तो पूर्ण करू न शकल्याने जनतेची निराशा

झाली. अतंर्गत व परराष्ट्रीय धोरणातील अपयशाने राजाने विविध गटांचा पाठिंबा गमावला. लुई फिलीपी अनियंत्रित राजेशाहीकडे झुकू लागल्याने इ.स. १८४८ ची क्रांती घडून आली.

५.४.१. लुई फिलीपी:

इ.स. १८३० च्या क्रांतीनंतर फ्रान्सच्या सत्तेवर आलेला लुई फिलीपी हा क्रांतीच्या तत्त्वांचा आदर करणारा होता. तो फिलीपी इगलीट या नावाने ओळखला जात असे. इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीला आणि त्यानंतर स्थापन झालेल्या प्रजासत्ताकाला त्याचा विरोध नव्हता. तो जॅकोबीन क्लबचा सभासद होता. प्रजासत्ताकाच्या वतीने त्याने वाल्मी व जेमापच्या लढायांमध्ये त्याने भाग घेतला होता. मात्र त्याच्याबद्दल संशय आल्याने त्याला फ्रान्समधून पळून जावून पुढील २१ वर्षे त्याला निर्वासिताचे आयुष्य जगावे लागले. या काळात स्वित्झर्लंडमध्ये त्याने गणित व भूगोल शिकविण्याचे काम केले. पुढे तो दक्षिण युरोप, अमेरिका तसेच इंग्लंडला गेला. नेपोलियनच्या पाडावानंतर तो फ्रान्सला परतला व त्याची जप्त केलेली पण विकली न गेलेली मालमत्ता व जमिन त्याने परत मिळवली. तो चेंबर ऑफ पीअर्सचा सभासद बनला. तो मध्यमवर्गात व कामगारवर्गात सहजपणे मिसळत असे.

राजा बनल्यानंतर त्याच्या वृत्तीत फरक पडला नाही. आपण घटनात्मक राजे आहोत हे त्याने मान्य केले होते. त्यामुळे राजेशाहीचा बडेजाव त्याने मिरवला नाही. तो रस्त्याने पायी चालत असे, आपल्या मुलांना त्याने सार्वजनिक शाळेत पाठवले. लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी त्याने राजसत्तेची प्राचीन चिन्ह तसेच राजदंड व राजमुकूट यांचा त्याग करून 'फ्रेंच जनतेचा राजा' म्हणवून घेण्यास सुरूवात केली.

५.४.२. अंतर्गत धोरण:

लुई फिलीपीने सुरूवातीला उदारमतवादी धोरण वापरले. क्रांतीच्या तिरंगी ध्वजाला फ्रान्सचा राष्ट्रीय ध्वज म्हणून मान्यता देण्यात आली. महत्त्वाच्या पदांवरून उच्चवर्गीयांना काढून तेथे सामान्यांच्या नेमणूका केल्या. संसदीय व प्रातिनिधीक सरकारची घोषणा करण्यात आली. मतदानाचा हक्क व्यापक करण्यात आला त्यामुळे मतदारांची संख्या दुप्पट झाली. मात्र त्यापेक्षा जास्त मताधिकार देता येणार नाही हेही स्पष्ट करण्यात आले. लुई फिलीपीच्या काळात मध्यमवर्ग आपले वर्चस्व राखुन होता. अंतर्गत धोरणाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

अ. मंत्रिमंडळे: लुईच्या कारकिर्दीच्या सुरूवातीला आर्थिक उदारमतवादी व कारखानदारांचे प्रतिनिधी लॅफिते व कॅसियर पेरी यांचे सरकार होते. या मंत्रिमंडळांनी सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केला. पेरीने इतर राज्यांशी मैत्रीपूर्ण धोरण ठेवून परकीय व्यापार वाढवण्याच प्रयत्न केला. त्यानंतर थीयर्स व गिझाँ यांनी मंत्रिमंडळे बनवली. दोघेही मध्यमवर्गीय असून महत्त्वाकांक्षी व धाडसी होते. थीयर्स हा विचारवंत व लेखक होता. तो उदारमतवादी होता व प्रभावी परराष्ट्रीय धोरणाचा तो पुरस्कर्ता होता. इ.स. १८३२ ते १८३६ या काळात तो फ्रान्सचा प्रमुख मंत्री व इ.स. १८४० मध्ये मुख्यमंत्री होता. मेहमत अली प्रकरणात फ्रान्सने इंग्लंडशी युध्द करावे असा त्याचा आग्रह होता. गिझाँ हा इ.स. १८३२ ते १८३९ या काळात सार्वजनिक सूचनामंत्री तर इ.स. १८४० ते १८४८ या काळात मुख्यमंत्री होता. परराष्ट्रीय धोरणात तो शांततेसाठी आग्रही होता. तो भ्रष्टाचारी होता व त्याने वाममार्गाने विधिमंडळावर वर्चस्व ठेवले होते.

ब. उद्योगधंद्यांची वाढ: या काळात नवीन उद्योग व कारखाने काढण्यास सरकारतर्फे उत्तेजन देण्यात आले. इंग्लंडमधून यंत्रसामग्री मागविण्यात आली. याचवेळी खुल्या व्यापाराची चळवळ फ्रान्समध्ये चालू होती. बाल्यावस्थेतील फ्रेंच उद्योग इंग्लंडच्या उद्योगधंद्यांशी स्पर्धा करू शकत नव्हते. त्यामुळे फ्रेंच उद्योगांना संरक्षण देण्याचे धोरण सरकारने चालू केले.

क. शिक्षणविषयक धोरण: इ.स. १८३३ मध्ये गिझाँच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणविषयक एक कायदा संमत करण्यात आला. चर्चकडे प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली. मात्र माध्यमिक व उच्च शिक्षणावर सरकारी नियंत्रण वाढविण्यात आले. सर्व शिक्षणसंस्थांनी सामाजिक व इतर कर्तव्यांसंबंधी शिकवण देणे आवश्यक ठरले.

ड. धार्मिक धोरण: सरकारने धर्माबाबत तटस्थ धोरण स्वीकारून धार्मिक स्वातंत्र्य दिले. नेपोलियनच्या काळातील धार्मिक करार पुढे चालू ठेवण्यात आला. बिशपांची नेमणूक व पगार सरकार करत असे. सर्व धर्मांच्या बाबतीत समान धोरण स्वीकारून इ.स. १८३१ मध्ये ज्यू धर्माला ख्रिस्ती धर्माच्या बरोबरीचे स्थान देण्यात आले व ज्यू धर्मगुरूंचा पगार सरकारी तिजोरीतून दिला जाऊ लागला.

५.४.३. इ.स.१८४८ च्या क्रांतीची कारणे:

लुई फिलीपीच्या अठरा वर्षांच्या कारकिर्दीतील अंतर्गत धोरणावर मध्यमवर्गीय प्रभाव होता. ते धोरण काहीसे उदारमतवादी असले तरी फ्रान्समधील विविध गटांच्या अपेक्षा पूर्ण करणारे नव्हते. विशिष्ट कालखंडानंतर या धोरणाला जनता कंटाळली असे म्हणावे लागेल. अनियंत्रिततेकडे झुकणारी लुई फिलीपीची राजवट, गिझाँचा मनमानी कारभार तसेच कमकूवत परराष्ट्र धोरण यामुळे इ.स. १८४८ ची क्रांती घडून आली.

अ. दुर्बळ परराष्ट्रीय धोरण:

लुई फिलीपीचे परराष्ट्रीय धोरण शांततेच्या मार्गाने जाणारे होते. तो बड्या राष्ट्रांना दुखवू इच्छित नव्हता. त्यामुळे नेपोलियनच्या काळात युरोपमध्ये दरारा निर्माण करणारे परराष्ट्रीय धोरण अनुभवलेले फ्रेंच नागरिक असंतुष्ट होते. लुई फिलीपीने परराष्ट्रीय धोरणावर स्वत:ची घट्ट पकड ठेवली होती. त्याने इंग्लंड तसेच इतर बड्या राष्ट्रांबरोबर सहकार्याचे धोरण ठेवले. फक्त इ.स. १८४६ मध्ये स्पेनच्या राणीच्या विवाहाच्या प्रकरणात त्याने फ्रेंच राजपुत्राची निवड करवून इंग्लंडचा रोष ओढवून घेतला. मात्र इतर प्रसंगात लुईने इंग्लंडशी संघर्ष टाळला. परिणामी फ्रेंच जनता नाराज झाली.

१) युरोपातील राष्ट्रवाद्यांची निराशा: फ्रान्समधील इ.स. १८३० च्या क्रांतीनंतर युरोपात उदारमतवादी चळवळी सुरू झाल्या. बेल्जियम, पोलंड, जर्मनी व इटलीच्या प्रदेशातील उदारमतवादी चळवळींना लुईने सक्रिय सहानुभूती दाखवावी व युरोपमध्ये फ्रान्सची प्रतिष्ठा वाढावावी असे फ्रेंच जनतेला वाटत होते. पण लुईने कोणतीही हालचाल केली नाही. बेल्जियमच्या जनतेने हॉलंडविरूध्द स्वातंत्र्य पुकारले व लुईच्या मुलाला बेल्जियमची गादी देऊ केली. मात्र इंग्लंडच्या दबावापुढे फिलीपी नमला. फ्रान्सचे युरोपात वजन वाढवण्याची संधी त्याने गमावली. इटलीतील स्वातंत्र्ययुध्दाला लुई फिलीपीने मदत करावी असा फ्रेंच जनतेचा आग्रह होता. याबाबत राजाचा मंत्री थीयर्स याने दोनदा राजीनामा दिला. मात्र बड्या सत्तांना दुखवायचे नाही असे राजाने ठरवले होते.

२) मेहमत अली प्रकरण: तुर्कस्तानच्या साम्राज्यातील इजिप्तच्या प्रदेशाचा प्रमुख शासक मेहमत अली पाशा याने तुर्की सुलतानाविरूध्द बंड पुकारले. इंग्लंडचा परराष्ट्रमंत्री पामर्स्टन याने तुर्की सुलतानाला पाठिंबा दिला होता. या प्रकरणात लुई फिलीपीने मेहमत अलीला मदत करावी असे फ्रेंच जनतेला वाटत होते. पण त्यामुळे इंग्लंड व फ्रान्स यांच्यात युध्द होण्याची शक्यता होती. याप्रसंगी फ्रान्सचा मुख्यमंत्री थीयर्स याची इंग्लंडशी युध्द करण्याची तयारी होती. लुईने थीयर्सला पदावरून दूर केले व मेहमत अलीला मदत केली नाही. आपला राजा इंग्लंडला दबकून राहात आहे ही गोष्ट फ्रेंच जनतेला सहन होत नव्हती.

ब. अंतर्गत धोरणाविषयी असंतोष:

१) फ्रान्समधील विविध गटांमधील असंतोष: इ.स. १८४६ पर्यंत लुई फिलीपीची मध्यमवर्गीय राजेशाही फ्रान्समधील विविध गटांमध्ये अप्रिय ठरू लागली. सुरूवातीपासून केवळ मध्यमवर्गीयांच्या पाठिंब्यावर सरकार टिकून होते. वारसाहक्काचे समर्थन करणाऱ्या पक्षाचा लुई फिलीपीला पाठिंबा नव्हता. दहाव्या चार्लस्‌चा नातू काऊंट द शांबॉर याला फ्रान्सची गादी मिळावी असा त्यांचा आग्रह होता. प्रजासत्ताकवादी हे राजेशाहीचे कट्टर विरोधक होते. सर्वांना प्रौढ मतदानाचा अधिकार मिळावा अशी त्यांची मागणी होती. फ्रान्समधील कॅथॉलिकांना लुईचे उदार धार्मिक धोरण पसंत नसल्याने ते नाराज होते.

लुई फिलीपीच्या सरकारने भांडवलदार व व्यापारी वर्गाची सोय पाहिल्याने कामगार वर्गाला न्याय मिळाला नाही असे समाजवाद्यांचे म्हणणे होते. त्यामुळे तो गट नाराज होता. फ्रान्समधे देशभक्तिचा पुरस्कार करणाऱ्यांना लुईचे मिळमिळीत परराष्ट्र धोरण मान्य नव्हते. इंग्लंडपुढे सतत नमते घेणे या गटाला पटत नव्हते. नेपोलियनचा अभिमान बाळगणाऱ्यांना या काळात प्रोत्साहन मिळाले. लुईने नेपोलियनच्या अस्थि सेंट हेलेनामधून फ्रान्समध्ये आणल्या व पॅरिसमधील रस्त्यांना नेपोलियनच्या लढायांची नावे देण्यात आली. नेपोलियनचे वैभव लोकांसमोर येऊ लागले. परिणामी हा पक्ष लुई फिलीपीच्या धोरणावर टीका करू लागला. फ्रान्समधील सुधारणावादी मंडळी लोककल्याणाचा हेतु डोळ्यासमोर ठेवून राजकीय व सामाजिक सुधारणांचा आग्रह धरत होती. मात्र लुईच्या सरकारने सभाबंदी, वृत्तपत्रांवर निर्बंध तसेच पोलिस दलाचा वापर करून सुधारणावादी पक्षाला दुखावले.

२) कामगारांचे दैन्य: फ्रान्समधील उद्योगांच्या वाढीमुळे नव्याने उदयास आलेला कामगारवर्ग नाराज होता. मजुर व भांडवलदार वर्गात कटूता होती. मजुरांचे राहणीमान, कामाचे तास, आरोग्य इ. अनेक प्रश्न निर्माण झाले होते. मात्र कामगारांच्या या अवस्थेकडे सरकारचे लक्ष नव्हते. इ.स. १८४१ मध्ये फॅक्टरी ॲक्ट संमंत करण्यात आला. त्यानुसार आठ वर्षांखालील मुलांना कामावर घेण्यास बंदी करण्यात आली. सोळा वर्षांखालील मुलांसाठी जास्तीतजास्त बारा तास कामाचे ठरविण्यात आले. मात्र या कायद्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले नाहीत.

३) समाजवाद्यांचा उदय: कामगारांची स्थिती वाईट होती व सरकार कोणतेही उपाय करत नव्हते. उलट कामगारांच्या सभा व संघटना दडपून टाकण्याचा प्रयत्न सरकार करत होते. कामगार वर्गाची स्थिती व सामान्य लोकांच्या आर्थिक स्थितीवर लिखाण होऊ लागले. फ्रान्समध्ये समाजवादी विचारांचा उदय झाला. सेंट सीमाँ, चार्लस् फूरिए, लुई ब्लँक व प्रूदाँ हे

महत्त्वाचे फ्रेंच समाजवादी विचारवंत होते. मजुरांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना मताधिकार मिळाला पाहिजे, विधिमंडळात प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे ही मागणी पुढे येऊ लागली. सेंट सीमाँने सहकारी राज्याची कल्पना मांडली. त्याच्या मते सरकारने उत्पादनाची सर्व साधने आपल्या हाती घेऊन प्रत्येकाला गरजेप्रमाणे कामाचे वाटप करून सेवेप्रमाणे योग्य मोबदला द्यावा . लुई ब्लँक या महत्त्वाच्या समाजवादी नेत्याने राज्याने कामगारांच्या उदरनिर्वाहाची खात्री द्यावी अशी मागणी केली. लुई फिलीपीचे मध्यमवर्गीय सरकार श्रीमंतांचे व श्रीमंतांसाठी आहे असे लुई ब्लँकने ठामपणे सांगितले. सरकारी भांडवलाच्या साहाय्याने राष्ट्रीय कारखाने स्थापन करावेत, कामगारांनी या कारखान्यांची व्यवस्था बघावी व फायद्याचा काही भाग कामगारांना मिळावा असे विचार लुई ब्लॅंकने मांडले. हे उद्देश साध्य करण्यासाठी समाजवादी पक्षाची स्थापना करण्यात आली. हा पक्ष प्रजासत्ताकाचा पुरस्कर्ता होता.

४) लुई फिलीपीचा अनियंत्रित कारभार: लुईने गादीवर बसल्यानंतर संसदीय शासनपध्दती आणणार असल्याचे भासवले. मात्र प्रत्यक्षात त्याला स्वतःची सत्ता निर्माण करायची होती. इ.स. १८३० ते १८४० या काळात फ्रान्समध्ये दहा मंत्रिमंडळे झाली. इ.स. १८३२ मध्ये वारसाहक्काच्या समर्थकांनी बंड केले. राजाने ते चिरडून टाकले. कामगार वारंवार संप करत होते. इ.स. १८३५ मध्ये प्रजासत्ताकवाद्यांनी चळवळ सुरू केली. इ.स. १८३६ व १८४० मध्ये नेपोलियनचा पुतण्या लुई नेपोलियन याने फिलीपीविरूध्द कट केले. अस्थिर परिस्थिती व वारंवार होणारे उठाव पाहून लुई फिलीपीने दडपशाहीचे धोरण अवलंबिले. सप्टेंबर १८३५ च्या कायद्याने व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने आली. वृत्तपत्रांवर निर्बंध घालण्यात आले व फौजदारी गुन्ह्यासंबंधातील कायद्यात बदल करण्यात आले. संशयित विरोधकांना त्रास देण्यासाठी राजकीय खटले मोठ्या प्रमाणावर भरले गेले. सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणतीही संस्था व संघटना स्थापन होऊ शकत नव्हती. या कायद्यांमुळे लुई फिलीपीची सत्ता निरंकुश बनली. इ.स. १८४० मध्ये लुई फिलीपीने गिझाँची मुख्यमंत्री म्हणून नेमणूक केली. इ.स. १८३० मध्ये सुधारण्यात आलेल्या घटनेतील तरतुदी पुरेशा आहेत व अधिक सुधारणा अंमलात आणणे धोक्याचे आहे असे गिझाँचे मत होते. मतदानाची पात्रता वाढविण्यास, कामगारांची स्थिती सुधारण्याचे कायदे करण्यास तसेच कोणतेही पुरोगामी धोरण अंमलात आणण्यास गिझाँचा विरोध होता. गिझाँला हाताशी धरून लुई फिलीपीने अनियंत्रित सत्ता उपभोगण्यास सुरूवात केली. त्यामुळे फ्रेंच जनतेचा अपेक्षाभंग झाला.

५.४.४. क्रांतीची वाटचाल:

अनियंत्रित सत्तेला व भेकड परराष्ट्रीय धोरणाला विटलेल्या जनतेने गिझाँविरूध्द निदर्शने करण्यास सुरूवात केली. जनतेचा असंतोष वाढत होता. मात्र चेंबर ऑफ डेप्युटीजचा पाठिंबा असलेल्या मंत्रिमंडळाने निष्क्रियतेचे धोरण स्वीकारले. मतदानाची पात्रता वाढविणे व संसदीय पध्दती अंमलात आणणे यासाठी चळवळ सुरू झाली. त्यात समाजवादी व प्रजासत्ताकवाद्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. इ.स. १८४७ मध्ये सुधारणांची मागणी करण्यासाठी विरोधकांनी विशेष समारंभ भरविण्यास सुरूवात केली. राजनिष्ठांनीही राजाच्या धोरणाला विरोध सुरू केला. सुधारणावाद्यांचा एक मेळावा २२ फेब्रुवारी १८४८ रोजी पॅरिस येथे भरणार होता. पण सरकारने त्यावर बंदी घातली. तरीदेखील विद्यार्थी, कामगार व इतर लोकांचा जमाव मेळाव्याला जमला व सुधारणांसाठी घोषणा देण्यात आल्या. २३ फेब्रुवारीला नॅशनल गार्डना सुव्यवस्थेसाठी बोलावण्यात आले मात्र नॅशनल गार्ड आंदोलकांना जाऊन मिळाले. सुधारणा चिरायु होवोत, गिझाँ मुर्दाबाद अशा घोषणा देण्यात आल्या. गिझाँने राजीनामा दिला.

प्रजासत्ताकवाद्यांनी गिझाँच्या निवासस्थानापुढे निदर्शने केली. गिझाँच्या सुरक्षारक्षकांनी निदर्शकांवर गोळीबार केला. २३ निदर्शक मारले गेले. प्रजासत्ताकवाद्यांनी प्रेतांची मिरवणूक काढली व लुई फिलीपीबद्दल जनतेमध्ये प्रतिकूल मत तयार केले. पॅरिसच्या रस्त्यांमध्ये मोर्चे बांधण्यात आले व निदर्शनाचे रूपांतर क्रांतीमध्ये झाले. शेवटी २४ फेब्रुवारी १८४८ रोजी लुई फिलीपीने आपल्या नातवास वारस नेमून राज्यत्याग केला व तो इंग्लंडला पळून गेला.

अशारीतीने पॅरिसच्या जनतेने पुन्हा एकदा राजेशाही उधळली. प्रजासत्ताकवाद्यांनी व समाजवाद्यांनी फ्रान्समध्ये प्रजासत्ताक राज्याची घोषणा केली. यालाच दुसरे प्रजासत्ताक म्हणतात. लामार्तिन या प्रजासत्ताकवादी नेत्याच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार स्थापन करण्यात आले.

५.४.५. इ.स. १८४८ च्या क्रांतीचे परिणाम:

इ.स. १८४८ च्या फ्रान्समधील क्रांतीचा प्रभाव युरोपमधील अनेक देशांवर पडला. मध्य युरोपमध्ये व्हिएन्ना परिषदेने निर्माण केलेल्या व्यवस्थेला या क्रांतीमुळे हादरा बसला. इ.स. १८३० च्या क्रांतीपेक्षा इ.स. १८४८ च्या क्रांतीची लाट जास्त प्रभावी होती. राष्ट्रवाद, लोकशाही या तत्त्वांना चिरडून टाकण्याचा मेटरनिकने चालविलेल्या प्रयत्नांमुळे युरोपमध्ये प्रचंड असंतोष होता. इ.स. १८४८ च्या फ्रान्समधील क्रांतीने या असंतोषाला वाट करून दिली. ही क्रांती काही काळ टिकली व पुन्हा एकदा प्रतिगामी शक्ति कार्यरत झाल्या. मात्र त्यांची ताकद कमी झाली होती. या क्रांतीचे परिणाम पुढीलप्रमाणे:

अ. फ्रान्समध्ये प्रजासत्ताकाची स्थापना: लुई फिलीपीच्या राज्यत्यागानंतर २६ फेब्रुवारी १८४८ रोजी फ्रान्समध्ये प्रजासत्ताकाची घोषणा करण्यात आली. यालाच फ्रान्सचे दुसरे प्रजासत्ताक म्हणतात. अशा रीतीने फ्रान्समधील राजेशाहीची समाप्ती झाली. इ.स. १८४८ ची क्रांती प्रजासत्ताकवाद्यांनी कामगारवर्गाच्या मदतीने घडवून आणली होती. त्यामुळे इ.स. १८३० च्या क्रांतीने मध्यमवर्गीयांचे निर्माण केलेले वर्चस्व इ.स. १८४८ च्या क्रांतीने संपुष्टात आणले. सर्व प्रौढ पुरूषवर्गाला मतदानाचा अधिकार देण्यात आला.

ब.ऑस्ट्रियातील उठाव: फ्रान्समधील क्रांतीनंतर मार्च १८४८ मध्ये प्रतिगाम्यांचा बालेकिल्ला असलेल्या ऑस्ट्रियात उठाव झाला. विद्यार्थी व कामगार यांनी मेटरनिकच्या पदच्यूतीची मागणी करत व्हिएन्नाच्या रस्त्यांवर मोर्चे काढले. हे निदर्शक विधिमंडळातही घुसले. अखेर मेटरनिकने पदत्याग केला व तो इंग्लंडला पळून गेला. मेटरनिकचे पलायन म्हणजे त्याची पध्दती कोसळण्याची निशाणी होती. निदर्शन वाढू लागली तेव्हा ऑस्ट्रियन राजा फर्डिनंड याने एप्रिल १८४८ मध्ये नवीन राज्यघटना जाहीर केली. पण त्यामुळे जनतेचे समाधान झाले नाही. राजाला पळून जावे लागले. नवीन घटनासमितीने घटनात्मक राजसत्तेला पाठिंबा दिल्याने राजाला पुन्हा बोलावण्यात आले. फर्डिनंडने त्याला एकनिष्ठ असलेल्या सैन्याच्या साह्याने क्रांती दडपून टाकली.

क. हंगेरीतील उठाव: ऑस्ट्रियन साम्राज्यात हंगेरीचा समावेश होता. फ्रान्समधील क्रांतीची बातमी हंगेरीत पोहोचली. हंगेरीतील माग्यार या बहुसंख्य जमातीचा नेता कोसुथ याने ३ मार्च १८४८ रोजी भाषण करून मेटरनिकच्या प्रतिगामी राजवटीवर टीका केली. या भाषणाचे पडसाद ऑस्ट्रियात उमटून मेटरनिकला पळून जावे लागले. व्हिएन्नातील उठावाच्या बातमीने हंगेरीत

उठाव झाले. १५ मार्चला कोसुथच्या प्रभावाखाली हंगेरीच्या विधिमंडळाने कायदे संमत करून लोकशाही घटना व सरकार स्थापन करण्यात आले. मात्र ही क्रांती काही काळ टिकली. ऑस्ट्रियात प्रतिगामी सत्तेची पुनःस्थापना झाली. ऑस्ट्रियाने हंगेरीतील बहुसंख्य माग्यारांविरूध्द क्रोट व स्लाव या अल्पसंख्यांकांना चिथावणी देण्यात आली. त्यांच्या संघर्षाचा फायदा घेऊन ऑस्ट्रियाने हंगेरीवर हल्ला चढवला व क्रांती चिरडली.

ड. बोहेमियातील उठाव: ऑस्ट्रियाच्या ताब्यातील बोहेमियात उठाव होऊन १९ मार्च १८४८ रोजी उदारमतवादी घटनेची मागणी करण्यात आली. बोहेमियाला स्वातंत्र्य मिळाले. पण बोहेमियातील बहुसंख्य झेक लोक व अल्पसंख्य जर्मन लोक यांच्यात फूट पडली. त्याचा फायदा घेऊन ऑस्ट्रियाने बोहेमियातील उदारमतवादी चळवळ दडपली.

इ. इटली व जर्मनीतील उठाव: ऑस्ट्रियाच्या ताब्यातील व्हेनेशिया व लोम्बार्डी या इटालियन प्रदेशात उदारमतवादी राज्यघटनेची मागणी करण्यात आली. व्हेनिसमध्ये प्रजासत्ताक स्थापन झाले. पार्मा, मोदेना, टस्कनी या इटालियन राज्यातही उठाव झाले. मात्र ऑस्ट्रियन सैन्याने हे उठाव दडपले.

फ्रान्समधील क्रांतीपासून प्रेरणा घेऊन बर्लिनच्या जनतेने मार्च १८४८ मध्ये प्रशियाच्या राजाविरूध्द उठाव केला व उदारमतवादी घटना मागितली. प्रशियन राजाला जनतेच्या मागण्या मान्या कराव्या लागल्या. जर्मन प्रदेशातील इतर राज्यातही उठाव झाले. जर्मन राष्ट्रीय सभेची फ्रँकफुर्ट येथे बैठक भरून जर्मन राष्ट्राचे राजेपद प्रशियन राजाला देऊ केले. मात्र ऑस्ट्रियाच्या भितीने प्रशियन राजाने नकार दिला.

ई. ब्रिटनवरील परिणाम: ब्रिटनमधील कामगारवर्ग राजकीय हक्कांपासून वंचित होते. इ.स. १८३८-३९ मध्ये या हक्कांसाठी चार्टिस्ट चळवळ सुरू झाली. इ.स. १८३९ व १८४२ मध्ये संसदेने चार्टिस्टांच्या मागण्या नाकारल्या. इ.स. १८४८ च्या फ्रान्समधील क्रांतीमुळे चार्टिस्ट चळवळीला प्रोत्साहन मिळाले. ५० लाख सह्या असलेले निवेदन संसदेला देण्यात आले. मात्र बहुसंख्य सह्या खोट्या निघाल्याने चार्टिस्टांची नाचक्की झाली. त्यामुळे चार्टिस्ट चळवळ थंडावली.

५.५. आपली प्रगती तपासा

५. लुई फिलीपीच्या काळात फ्रान्समध्ये कोणत्या वर्गाचे वर्चस्व वाढले ?

_____

_____

६. मेहमत अली कोण होता ?

_____

_____

७. इ.स. १८४८ ची क्रांती घडविण्यात कोणत्या गटांचा पुढाकार होता ?

_____

_____

८. इ.स. १८४८च्या क्रांतीमुळे ब्रिटनमधील कोणत्या चळवळीला प्रोत्साहन मिळाले ?

_____

_____

५.६. सारांश

इ.स. १८३० व इ.स १८४८ या वर्षामध्ये फ्रान्समध्ये क्रांती घडून आली. मात्र या दोन्ही क्रांत्यांचे दूरगामी परिणाम युरोपवर घडून आले. या क्रांत्याद्वारे युरोपियन लोकांनी प्रतिगामी शक्तिंविरुध्द आपला रोष व्यक्त केला. मध्य युरोपात व्हिएन्ना कॉंग्रेसने जी व्यवस्था निर्माण केली होती तिला मुळापासून हादरा बसला. इ.स. १९३० व इ.स. १८४८ मध्ये झालेल्या क्रांत्यांचा जक काही काळ टिकला व दोन्हीं क्रांत्यांनंतर पुन्हा एकदा प्रतिगामी शक्ती सक्रीय झाल्या ही गोष्ट जरी सत्य असली तरी या क्रांत्यांचे महत्त्व कमी होत नाही. इ.स. १८३० ची फ्रान्समधील क्रांती मध्यमवर्गाने घडवून आणली. यावेळी प्रजासत्ताक न स्वीकारता घटनात्मक राजेशाही फ्रान्सने स्वीकारली मात्र इ.स. १८४८ च्या क्रांतीने फ्रान्समध्ये दुसरे प्रजासत्ताक निर्माण झाले. या दोन्ही क्रांत्याच्यावेळी युरोपातील विविध भागात विशेषतः इटली, जर्मनीच्या भागात जनतेने उठाव करुन उदारमतवादी राज्यघटनांची मागणी केली. इ.स. १८४८ च्या क्रांतीची लाट एवढी जबरदस्त होती की प्रतिगाम्यांचा पुढारी मेटरनिक याला ऑस्ट्रेलियातून पळ काढावा लागला. या दोन्हीं क्रांत्यांचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे युरोपियन देशांमध्ये लोकांच्या राजकीय हक्कांमध्ये वाढ झाली. इ.स. १८३० त्या क्रांतीनंतर ब्रिटनमध्ये इ.स. १८३२ चा संसदीय कायदा होऊन मध्यमर्गीयांच्या मताधिकारात वाढ झाली तर इ.स. १८४८ च्या क्रांतीनंतर फ्रान्समध्ये जनतेच्या हाती राज्याची सुत्रे आली व ब्रिटनमध्ये चार्टिस्ट चळवळीला प्रोत्साहन मिळाले. या गोष्टी लोकशाहीच्या विकासाला पूरक ठरल्या

५.७ दीर्घोत्तरी प्रश्न

१. इ.स. १८३० च्या फ्रान्समधील क्रांतीस कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीचा मागोवा घ्या.
२. इ.स. १८३० च्या क्रांतीच्या कारणे व परिणामांची चर्चा करा.
३. फ्रान्समध्ये इ.स. १८४८ ची क्रांती घडून येण्यास लुई फिलीपी याची धोरणे कशी कारणीभूत ठरली ते लिहा. या क्रांतीचे परिणाम काय झाले ?
४. इ.स. १८४८ च्या फ्रान्समधील कारणे व परिणामांचे परीक्षण करा.

❖❖❖

६

औद्योगिक क्रांती

प्रकरण रचना

६.० उद्‌दिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२. औद्योगिक क्रांती म्हणजे काा ?
६.३ औद्योगिक क्रांतीची कारणे
६. ४. इंग्लंडमधेच औद्योगिक क्रांती का घडून आली ?
६.५. औद्योगिक क्रांतीमधील महत्वाचे शोध
६.६ दळणवळण साधनातील क्रांती
६.७ औद्योगिक क्रांतीचे परिणाम
६.८ सारांश
६.९ दीर्घोतरी प्रश्न

६.० उद्‌दिष्ट्ये

१ प्रस्तावना
२. औद्योगिक क्रांती संकल्पनेचा अभ्यास करणे
३. औद्योगिक क्रांतीच्या कारणाचे आकलन करणे
४. औद्योगिक क्रांती दरम्यान लागलेल्या नविन शोधांचा अभ्यास करणे, कापड, कोळसा, लोखंड इ. उत्पादनात व व्यापार व दळणळवणात झालेला विकास तपासणे.
५. जीवनाच्या विविध क्षेत्रात औद्योगिक क्रांतीचे झालेले परिणाम अभ्यासणे.

६.१ प्रस्तावना

इ.स. १७५० ते इ.स.१८५० ह-ा शतकामध्-े विविध वैज्ञानिक शोधामुळे -ंत्र-ुगाला सुरुवात झाली. उत्पादन पध्दतीमध्-े जी क्रांती घडुन आली तिला औद्योगिक क्रांती असे म्हणतात. प्रसिध्द इतिहासकार जी. डब्लु साउथगेट लिहीतात ''औद्योगिक क्रांती हा औद्योगिक प्रक्रि-ेमधील असा बदल होता की, त्-ामध्-े मानवी श्रमांची जागा शक्तीवर चालणा-ा -ंत्रानी घेतली व त्-ामुळे संघटनातही बदल झाले. गृहोद्योग चालवण्-ाऐवजी लोक कारखाने चालवू लागले. ह-ा औद्योगिक क्रांतीची सुरुवात इंग्लंडमध्-े झाली व लवकरच ती -ुरोपभर पसरली. ह-ा औद्योगिक क्रांतीचा राजकी-ा परिणाम म्हणजे तिच्-ामुळेच इंग्लंडला सधनता प्राप्त झाली व इंग्लंड शेवटप-ंत नेपोलि-ान बोनापार्टला टक्कर देऊ शकले.

६.२. औद्योगिक क्रांती म्हणजे का-ा?

अरनॉल्ड टॉइनबी म्हणतो की, औद्योगिक क्रांती ही एकच अचानक घडलेली घटना नसुन ती विकासाची सतत चालु असलेली प्रक्रि-ा आहे. ती आजतागा-त अखंड सुरु आहे. तिची प्रारंभिक अवस्था म्हणजे इ.स.१७५० ते १८५० व दुसरी इ.स. १८५० ते सध्-ापर्-ंत. ह-ा क्रांतीमुळे उत्पादनाचा वेग वाढला. कमी उत्पादनाचा वेग असलेली कुंठीत अर्थव्-वस्था संपुष्टात आली व नविन संस्था, नविन जीवनपध्दती उद-ाला आली. हरित क्रांतीचा दुसरा -शस्वी टप्पा म्हणूनही औद्योगिक क्रांतीकडे पाहता -ेईल. हरीत क्रांतीमुळे वाढत्-ा लोकसंख्-ेला अन्नधान्-ा पुरवठा होऊ शकतो, शिवा-ा शेतीची कामे -ंत्राने होऊ लागल्-ामुळे शेतकरी कामगार बनला व कारखान्-ात जाऊ लागला. त्-ामुळे पुरेपूर श्रम उपलब्ध होऊ लागला.

६.३ औद्योगिक क्रांतीची कारणे

१) **वैज्ञानिक क्रांती व तत्वज्ञान विषयक शोध -** ह्या क्रांतीचे प्रमुख कारण विज्ञानाची प्रगती हे आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात तंत्रज्ञानमुळे अनेक नवे शोध लागले. युरोपात प्रबोधन चळवळीमुळे वैज्ञानिक प्रगतीला खऱ्या रुपाने चालना मिळाली. प्रबोधन काळात व्यक्ती स्वातंत्र्याचे व विचारस्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. ज्ञान व विज्ञान त्याचा प्रसार होण्यास अनुकूल वातावरण तयार झाले. विज्ञान क्षेत्रात प्रयोगशिलतेला वाव मिळून विज्ञानाची झपाट्याने प्रगती होऊ लागली. अनेक वैज्ञानिकांनी नवे नवे सिध्दांत मांडले. विज्ञानाच्या प्रगतीमुळे तंत्रज्ञानाचा विकास घडून आला. उदा. पदार्थ विज्ञानाचा विकास होऊन त्यात उष्णता, वायु इ. माहीती मानवाला उपलब्ध झाली आणि त्यावरच बाष्पशक्तीवर चालणाऱ्या इंजिनाचा शोध लागला. त्यामुळे औद्योगिक क्रांतीचे मुळ वैज्ञानिक प्रगतीतच आहे. या शोधामुळे उत्पादन पध्दतीत बदल होऊन मोठ्या प्रमाणावर उत्पादन काढणे शक्य झाले. त्यातून औद्योगिक क्रांतीचा पाया रचला गेला.

२) **व्यापारातील वाढ :-** १६व्या शतकापासून युरोपीय देशात व्यापारात सातत्याने वाढ होत गेली. युरोपातील साहसी रवळाशांनी नवे जलमार्ग शोधून काढले. त्यामुळे युरोपाचे बाह्य जगाशी व्यापारी संबंध प्रस्थापीत झाले. व्यापारवादी वृत्ती वाढीस लागली. परकीय देशांशी मोठ्या प्रमाणावर व्यापार करणे, त्यातून नफा मिळविणे व त्यायोगे आपल्या राष्ट्राला आर्थिक समृध्दी बनवने हे व्यापारवादाचे मूलभूत तत्व होते. व्यापारवादी विचारसरणीमुळे इंग्लंडसारख्या वसाहतवादी राष्ट्रीकडे संपत्तीचा ओघ वाढू लागला. व्यापारात वाढ झाल्याने वस्तूंच्या मागणीतही वाढ झाली. वाढत्या मागणीमुळे उत्पादनात वाढ करण्याची गरज भासू लागली. इंग्लंडच्या व्यापारात कशी कशी वाढ होत गेली हे आकडेवारी नसून स्पष्ट होते. इ.स. १७६० मध्ये इंग्लंडने ४० लक्ष पौंड किमतीचे कापुस आयात केला. इ.स. १७८१ मध्ये दि आयात १० कोटी पौंडाची होती तर इ.स. १८४० मध्ये कापसाची आयात ५० कोटी पौडाची होती. शिवाय १६ व्या शतकात इंग्लंडला परदेशी व्यापारासाठी ७,६०० टन क्षमतेची जहाज लागत होती तर १७ व्या शतकात ५ लक्ष टन क्षमतेची जहाजे लागू लागली तर १९ व्या शतकाच्या सुरुवातीला १२ लक्ष टनापेक्षा अधिक क्षमतेची जहाजे इंग्लंड वापरू लागले.

३) **भांडवलाची निर्मिती :-** औद्योगिक क्रांती म्हणजे व्यवसायाची जागा यंत्रव्यवसायाने घेतली. उत्पादनासाठी यंत्राचा उपयोग होऊ लागला. त्यामुळे उत्पादनात पुर्वीपेक्षा कितीतरी पटींनी वाढ झाली. अर्थात मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यासाठी भांडवलाची मोठी गरज होती. प्रचंड कच्चामाल खरेदी करणे, यांत्रिकीकरण करणे, मजुरी दळणवळण ह्यासाठी भांडवलाची गरज असते. १६ व्या शतकातील व्यापारी क्रांतीमुळे इंग्लंडकडे प्रचंड संपत्ती होती. व्यापारी क्रांतीमुळे इंग्लंडमध्ये नवा व्यापाराचा वर्ग उदयाला आलेला होता. त्याचे हे भांडवल औद्योगिक क्रांतीस साह्यकारी ठरते.

४) **बाजार पेठांची उपलब्धता :-** हे औद्योगिक क्रांतीचे अजुन एक महत्त्वाचे कारण होते. क्रांती काळात मोठ्या प्रमाणावर वस्तुचे उत्पादन सुरु झाले. ह्या उत्पादीतद गोष्टींना मोठ्या प्रमाणावर जगभरात ह्या बाजारपेठांत मागणी होती. मागणी तसा पुरवठा होत असल्याने अव्याहत उत्पादन सुरु ठेवणे आवश्यक होते. म्हणजेच उद्योगधंद्यांची वाढ उत्पादीत वस्तुच्या विक्रिसाठी हुकमी बाजारपेठ उपलब्ध होण्यावर अवलंबून होती. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडने जगाच्या विविध भागात आपल्या वसाहती स्थापन केल्या इंग्लंडच्या ह्या वसाहतवादी धोरणामुळे वसाहतीतील बाजारपेठा इंग्लंडला सह उपलब्ध झाल्या. युरोपातील औद्योगिकरणाचा वेग वाढल्यावर निरनिराळ्या देशांत वसाहतीसाठी जे संघर्ष झाले त्या संघर्षांना गीळ प्रमुख कारण बाजारपेठा काबीज करणे हेच होते.

५) **कच्चा मालाची उपलब्धता :-** औद्योगिक क्रांती घडून येण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कच्चा मालाची गरज होती. इंग्लंड मध्ये कृषी क्रांती घडून आल्यामुळे बरासचा कच्चा माल इंग्लंडमध्ये उपलब्ध होता. शिवाय इतर युरोपिय राष्ट्रांना त्यांच्या वसाहतीतुन कच्चा माल मिळत होता. युरोपिय राष्ट्रांनी आपल्या व्यापार विषयक धोरणांत कच्चा मालाची आयात व पक्या मालाची निर्यात ह्या तत्वाला प्राध्यान्य दिले. या शिवाय उद्योगासाठी आवश्यक असलेल्या लोखंड, कोळसा इ. खनिजांचे साठे हि विपूल प्रमाणात उपलब्ध होते. वरिल सर्व प्रकारच्या कच्चा मालाच्या उपलब्धतेमुळे औद्योगिक क्रांतीचा अनुकूलता गती प्राप्त झाली.

६) **गृह उत्पादन पध्दतीची पार्श्वभूमी :-** औद्योगिक क्रांतीमुळे कारखाने अस्तीत्वात आले असले तरी त्यांची पार्श्वभूमी तयार करण्याचे काम गृहउद्योगांनी केले होते. युरोपात संय पध्दतीच्या अस्तानंतर गृहउद्योग उत्पादन पध्दत विकसीत झाली. गृह उद्योगांच्या अखेरच्या काळात व्यवस्थापनांचा एक नवा वर्ग तयार झाला होता. ह्या उत्पादन पध्दतीत कामगार आपले उत्पादनाचे कार्य करित असून पण कामगारांना कच्चा मालाचा पुरवठा करणे व त्यांनी तयार केलेल्या पक्या मालाची विक्री करणे हि कामे व्यवस्थापक वर्ग करीत असे. यातुन पुढे कारखाना उत्पादन पध्दतीचा विकास झाला. हस्त व्यवसायाची जागा यंत्रोद्योगाने घेतली त्यामुळे व्यवस्था पक वर्ग अधिकच महत्त्वाचा बनला. कारण आता उत्पादन कामगाराच्या अटी न घेता कारखान्यात व्यवस्थापकाच्या देखरेखीखाली होऊ लागले त्यामुळे कामगाराचे स्वातंत्र्य नष्ट होऊन व्यवस्थापकाचे महत्त्व वाढले त्यातुन कारखाना पध्दतीचा विकास झाला. जो औद्योगिक क्रांतीस साह्यकारी ठरला.

आपली प्रगती तपासा :

१. ओद्योगिक क्रांतीची कारणे सांगा ?

_____

_____

६. ४. इंग्लंडमध्येच औद्योगिक क्रांती का घडून आली?

१) राजकीय स्थैर्य : इंग्लंडचे राजकीय स्थैर्य व प्रशासकीय कार्यक्षमता औद्योगिक क्रांतीस कारणीभूत ठरली. इंग्लंड एक स्वतंत्र लोकशाही राष्ट्र होते. फ्रान्स किंवा इतर युरोपीय राष्ट्राप्रमाणे त्यांना राजकीय अस्थिरतेला तोंड द्यावे लागत नव्हते. तेथील शांतताम्य राजकीय जीवनामुळे भांडवलदार कारखानदारीमध्ये भांडवल गुंतवू शकले.

२) भौगोलिक महत्व - इंग्लंड आपल्या वैशिष्टपूर्ण भौगोलिक स्थानामुळे, समुद्रवेष्टित असल्यामुळे एकाच वेळी स्वत:ला जगापासून वेगळे ठेवू शकले व गरजेनुसार जगाशी जवळचे संबंधही ठेवू शकले. बेटामुळे जी इतर युध्दे झाली, त्याचा उपसर्ग इंग्लंडला पोहोचला नाही, येथील हवामान कापड उद्योगासाठी अतिशय अनुकूल होते. बेट असल्यामुळेच त्यांनी आपले उत्कृष्ट आरमार बाळगले होते व समुद्रमार्गे आशिया, आफ्रिका खंडाशी ते व्यापारही करु शकत होते. किंबुहना त्यांच्या हया वसाहत देशांकडून त्यांना मुबलक असा मालसुध्दा मिळत होता.

३) विज्ञानातील प्रगती : इंग्लंडमध्ये सातत्याने वैज्ञानिक प्रगती झालेली दिसते. जेम्स हारग्रीव्हज, रिचर्ड आर्कराईट, सॅम्युअल क्रॉम्टन, एडमंठ कार्टराईट आणि इ. वैज्ञानिकांची जन्मभूमी व कर्मभूमी इंग्लंडच होती. त्यांनी लावलेल्या वेगवेगळ्या शास्त्रीय शोधांचा फायदा इंग्लंडला झाला. हया शास्त्रज्ञांवर कोणतीही राजकीय अथवा धार्मिक बंधने नव्हती, शिवाय इंग्लिश रॉयल सोसायटी ने (इ.स.१६६२) नवीन संशोधकांना पुरस्कार देऊन उत्तेजन दिले.

४) इंग्लंडचे व्यापारी धोरण - वसाहतवादाला व व्यापाराला उत्तेजन देणारे इंग्लंडचे धोरण होते. हया काळात ब्रिटीश संसदेने वेगवेगळे नॅव्हिगेशन ॲक्टस पास करुन व्यापाऱ्यांना उत्तेजन दिले. काही खाजगी व्यापारी कंपन्या उदा. ईस्ट इंडिया कंपनी आणि इतर कंपन्यांनी व्यापाराला उत्तेजन दिले. ब्रिटिश सरकारने व्यापार उद्योगांना संरक्षण देण्याचे धोरण स्विकारले, त्यामुळे व्यापार चांगला बहरला.

५) कारागीरांचे व तंत्रज्ञांचे इंग्लंडमध्ये स्थलांतरण - समकाळात युरोपातील अनेक देशातून धार्मिक अत्याचार टाळण्यासाठी कारागीर व तंत्रज्ञ इंग्लंडमध्ये स्थायीक होऊ लागले. फ्रान्स, स्पेन सारख्या देशातून अल्पसंख्यांक प्रोटेस्टंट वंशिय त्यांच्या संपत्ती व कुशलतेसह इंग्लंडमध्ये नांदु लागले. त्यांच्या कुशलतेचा ह्या क्रांतीस हातभार लागला.

६) नैसर्गिक साधनसंपत्ती - इंग्लंडमध्ये खनिज संपत्ती विपुल प्रमाणात होती. कोळसा व लोखंडाच्या खाणी एकमेकांपासून जवळच असल्यामुळे विविध यंत्रे बनविण्यासाठी लागणारे

पोलाद निर्माण करणे सोपे गेले. ह्या पोलाद निर्मितीने लाकडी -ंत्रे बाजूस केली. शिवा-न ह्या कोळश-ाचा इंधन म्हणूनही मोठ्या प्रमाणात फा-नदा झाला.

७) मुबलक मजूरांचा पुरवठा - हरित क्रांतीमुळे मुबलक मजूरांना स्वस्त दरात पुरवठा औद्योगिक क्रांतीला झाला. कृषी क्षेत्राला कुंपनपध्दतीमुळे अनेक माणसांचे श्रम वाचले. ही बेरोजगार शेतकरी माणसे शहरात कारखान्-ांत रुजू होऊ लागली.

८) ब्रिटीश समाजाची मानसिकता - इतर कोणत्-ाही -ुरोपि-न देशापेक्षा इंग्लंडचा जीवनस्तर उच्च होता. ब्रिटीश बाजारपेठेत अनेक वस्तूंची मागणी सतत वाढत होती. आणि ती पुरवण्-ासाठी औद्योगिकरणाची कास धरणे आवश्-क होते. इंग्रज जमीनदार हे अतिश-न दूरदृष्टीचे होते. हरितक्रांतीमधील नफा त्-ांनी औद्योगिकरणात गुंतविणे पसंत केले. त्-ामुळे भांडवलाचा प्रश्न मिटला व औद्योगिक क्रांतीने वेग घेतला.

आपली प्रगती तपासा :

१. औद्योगिक क्रांतीचे माहेर घर कोणते ?

_____

_____

६.५. औद्योगिक क्रांतीमधील महत्वाचे शोध

१) वस्त्रोद्योग - औद्योगिक क्रांतीची सुरुवात कापड उद्योगापासून झाली. -ुरोपात कापसाचा धागा बनविण्-ाच्-ा दोन पध्दती होत्-ा. सूत कातण्-ाचे -ंत्र आणि पेळू. इंग्लंड सुती कापड भारतातून आ-ात करीत होते. मागे क्रांती काळात सुतकताईत बदल झाले. इ.स.१७३३ मध्-े जॉन के. -ा विणकराने ''फ्लाईग शटल'' चा शोध लावला. त्-ामुळे कापड विणण्-ाच्-ा प्रक्रि-ेला वेग आला. इ.स.१७६४ मध्-े जेम्स हारग्रीव्हजने ''स्पिनींग जेनी'' चा शोध लावला, त्-ामुळे एका वेळेस आठ धागे कातता -ेऊ लागले इ.स. १७६९ मध्-े रिचर्ड आर्कराईटने स्पिनिंग जेनीमध्-े सुधारणा करुन 'वॉटर फ्रेम' नावाचे -ंत्र बनवले. हे जलशक्तीवर चालत असे. पुढे इ.स. १७७९ मध्-े सॅम्-ुअल क्रॉम्प्टनने स्पिनिंग जेनी व वॉटर फ्रेम ही -ंत्रे एकत्र करुन 'म्-ुल' नावाचे नवे -ंत्र त-ार केले. ह-ा सर्व शोधांमुळे उच्च प्रतीचा बारीक धागा मोठ्या प्रमाणावर बनवणे शक्-न झाले. इ.स.१७८५ मध्-े एडमंड कार्टराईटने -ंत्रमागाचा शोध लावला. ते जलशक्ती व बाष्पशक्तीवरही चालत असे.

इ.स.१७९६ मध्-े एली व्हिटली -ांने ''कॉटन जीन'' हे कापूस साफ करण्-ाचे -ंत्र त-ार केले. इ.स.१८४६ नंतर ॲलाएस हॉस -ा अमेरिकन नागरिकाने शिवण-ंत्राचा शोध लावल्-ामुळे बाजारात त-ार कपडे मोठ्या प्रमाणात पुरवता -ेऊ लागले.

२) पोलाद उद्योग - नवीन -ंत्रे बनविण्-ासाठी प्रचंड प्रमाणात लोखंड व पोलादाची गरज होती. मात्र खनिजामधून लोखंड काढण्-ाची प्रक्रि-ा अतिश-न मागासलेली होती. इंधन म्हणून वापरला जाणारा लाकडी कोळसा वाढत्-ा गरजेला अपुरा पडत होता. लाकडी कोळशाला प-र्ा-न म्हणून दगडी कोळशाचा वापर इ.स.१७६० च्-ा सुमारास सुरु झाला. दगडी कोळशाच्-ा प्रचंड उष्णतेमुळे लोखंड चटकन व सहज वितळते हे लक्षात आल्-ामुळे दगडी कोळशाची मागणी वाढली. हळूहळू नवीन प्रकारच्-ा भट्ट-ा वाढल्-ा. इ.स.१७८४ मध्-े हेन्री कोर्ट -ाने 'पुडलिंग' हे

नवे तंत्र शोधले. ज्-ामुळे अत्-ंत शुध्द व एकसमान दर्जाचे पोलाद निर्माण होऊ लागले. हळूहळू लोखंडाची जागा पोलादाने घेतली. निरनिराळी अवजड -ंत्रे, रेल्वेचे रुळ, पूल बांधण्-ात पोलादाचा मोठ-ा प्रमाणावर उप-ोग होऊ लागला. दगडी कोळसा खाणीतून बाहेर काढताना अनेक अडचणी होत-ा. अंधा–ा खाणीत प्रकाशासाठी दिवा घेऊन गेल्-ास खाणीतील कार्बन वा-ुचा दिव्-ाच्-ा ज्-ोतीमुळे पेट घेण्-ाची शक्-ता असे. अशा प्रकारचे अपघात वारंवार घडतही. इ.स. १८५४ मध्-े हंप्रे डेव्ही नावाच्-ा संशोधकाने खनिज वापरण्-ासाठी आधुनिक कंदिल त-ार केला. ज्-ाचा प्रकाश पडत असे मात्र उष्णता बाहेर -ेत असे. ह्या कंदिलास 'डेव्हीज सेफ्टी लॅम्प' असे नाव मिळाले. ह्यामुळे खाणकाम संरक्षित झाले व त्-ाला वेग आला.

बाष्प-ुग- एक नवी शक्ती- सतत नव्-ा -ंत्राचे शोध लागत होते. मात्र ही -ंत्रे चालवण्-ासाठी शक्तीच्-ा नवीन स्रोतांची गरज होती. बाष्पशक्ती हा प-र्ा-न उत्तम ठरला. इ.स.१७२२ मध्-े थॉमस न्-ुओमन ह्या इंग्लिश नागरिकाने खंदकातील पाणी काढण्-ासाठी वाफेवर चालणारे -ंत्र शोधून काढले. इ.स.१७६९ मध्-े जेम्स वॅट -ाने त्-ा -ंत्रात सुधारणा करुन स्वस्त व छोटे इंजिन त-ार केले. वॅटचे हे इंजिन कापड कारखान्-ात अत्-ंत उप-ोगाचे ठरले. त्-ामुळे जेम्स वॅटला रास्तपणे बाष्प-ुगाचा जनक समजण्-ात -ेते. त्-ाच्-ा -ा शोधाबरोबर बाष्प-ुगाला सुरुवात झाली. बाष्पशक्तीचा उप-ोग प्रथम खाणीमध्-े करण्-ात आला. कोळशाच्-ा खाणीतील पाणी ह्या पंपाने काढले जाई. त्-ानंतर कापूस कारखान्-ांत बाष्पशक्तीचा वापर सुरु झाला.

आपली प्रगती तपासा :

१. जेम्स हारग्रीव्हजने कशाचा शोध लावला.

_____

_____

६.७ दळणवळण साधनातील क्रांती

वाफेवर चालणारे जहाज- औद्योगिक क्रांतीने मोठ-ा प्रमाणावर निर्माण केलेल्-ा वस्तूंची ने-आण करण्-ासाठी जलद दळणवळणाची आवश्-कता होती. मात्र ह्या काळात दळणवळणाची साधने असमाधानकारक होती. इ.स.१८०७ मध्-े रॉबर्ट फुलटॉन ह्या अमेरिकन माणसाने बाष्पशक्तीवर चालणारी पहिली बोट त-ार केली व तिने एडसन नदीतून १५० मैलाचे अंतर केवळ ३२ तासात पार केले. इ.स.१८४० मध्-े सॅम्-ुअल कुर्नाड नावाच्-ा इंग्रज माणसाने ॲटलांटिक महासागरातून नि-मित जहाजाची वाहतूक सुरु केली.

रेल्वे : जॉर्ज स्टिफनरुनने वाफेच्-ा शक्तीचा रेल्वे इंजिनकरिता उप-ोग केला. इंग्लंडात लोखंडी रूळावरून घोडे गाड-ा ओढीत चालवत असत. मात्र घोड्याऐवजी बाष्पशक्तीचा वापर करणे क्रांतीकारी स्वरुपाचे होते. इ.स. १८१३ मध्-े विली-म हेडने नावाच्-ा खाण इंजिनि-रने 'पफिंग बिली' नावाचे वाफेवर चालणारे इंजिन त-ार केले. पुढे संशोधकांनी स्टिफनरुनच्-ा 'रॉकेट' इंजिनचा वेग ताशी ३० मैलाप-र्त पोहोचविला.

इ.स.१८११ मध्-े जॉर्ज मॅकॲडम नावाच्-ा माणसाने रस्त्-ावर खडी रुळाने दाबून एक रस्ते त-ार करण्-ाची पद्धत सुरु केली. त्-ामुळे इंग्लंडतील रस्त्-ांची परिस्थिती सुधारली. खडी दाबून रस्ते त-ार करण्-ाच्-ा पद्धतीला 'मॅकडमाइझ' हा शब्दप्र-ोग रुढ झाला. इ.स.१८५२ मध्-े जेम्स ब्रिंडले ह्या माणसाने इंग्लंडमध्-े कालवे बांधून काढण्-ाचे तंत्र शोधले. ड-ूक ऑफ ब्रिजवॉटरच्-ा वूहर्से -ेथे कोळशाच्-ा खाणी होत-ा. तेथून मॅचेंस्टरला कोळसा वाहून नेण्-ास फार

खर्च पडे. तेव्हा तेथे कालवा बांधून ही वाहतूक जलद करण्-नात आली. जलमार्ग बांधण्-नाचा एखादा पर्-त आड बोगदा खणून वाट काढण्-नाचे कार्-र सुध्दा ब्रिंडलेला जमले. त्-नामुळे वाहतूक क्षेत्रात प्रचंड बदल घडून आले.

दूरसंचार :- ह्या क्षेत्रात रोलंड हिल ह्या अंध इंग्लिश गृहस्थाने एक अशी व्-नवस्था सुरु केली की पत्रावर पेन्सचे तिकीट लावून इंग्लंडमध्-ये कोठेही पत्र पाठवू शकत असे. इ.स.१८४४ मध्-ये सॅम्-युअल मोर्सने टेलिग्राफ -ंत्राचा शोध लावला. उत्तर अमेरिका व -युरोप ह्या दोन खंडांना जोडणाऱ्-ा तारा पाण्-नाखालून घालण्-नात आल्-ा. तिलाच 'अटलांटिक केबल' म्हणतात. इ.स.१८७६ मध्-ये ग्रॅहम बेलने टेलिफोनचा शोध लावला. ह्या शोधामुळे मोठीच क्रांती घडून आली.

६.७ औद्योगिक क्रांतीचे परिणाम

इंग्लंडमध्-ये सुरु झालेल्-ा औद्योगिक क्रांतीमुळे व्-नापार उद्योगात प्रचंड वाढ झाली. इंग्लंड आर्थिक दृष्ट-ा सामर्थ्-नशाली झाला. असे म्हटले जाते कि, '' नेपोलि-ननची साम्राज्-नौका लँकेशा-नर व -ॉर्कशा-नर मधील कारखान्-ांच्-ा धुरांड-ावरच आदळून फुटली.'' ह्या आर्थिक बळावरच इंग्लंड -शस्वीपणे नेपोलि-ननचा पाडाव करू शकले.

१) आर्थिक परिणाम :- औद्योगिक क्रांतीने शहरीकरणास सुरवात केली. लोक खेडी सोडून कामाच्-ा शोधात शहरांकडे स्थलांतर करु लागले. त्-नामुळे शहरे गर्दीची होऊ लागली. वस्त्-ा बकाल लागल्-ा. झोपड-ाचे प्रमाण वाढले. अस्वच्छ घरे व कोंदट कारखान्-ातील कष्टाची कामे ह्यामुळे मजूरांच्-ा शरीरावर त्-ाचा अनिष्ट परिणाम दिसू लागला. मजुरीचे दर उतरले. स्वस्त दरात मजूर उपलब्ध होऊ लागले. औद्योगिक क्रांतीनंतर श्रीमंत अधिकाधिक बनू लागले तर गरीब अधिकाधिक गरीब बनू लागले. स्त्रि-ा व लहान मुले कारखान्-ात जाऊ लागल्-ाने त्-ाचे शोषण वाढले.

औद्योगिक क्रांतीमुळे उत्पन्नांची पध्दत बदलली. घरगुती उद्योग नष्ट झाले व नवीन कारखाने वाढले. भांडवलदारांचा एक नवा प्रबळ गट त-ार झाला. शोषणाची पध्दत बदलली. पूर्वी जमीनदार भूदासांचे शोषण करीत असत. आता भांडवलदार कामगारांचे शोषण करु लागले.

औद्योगिक क्रांतीनंतर बड-ा देशांना देशांतर्गत बाजारपेठा मिळवणे आवश्-क वाटू लागले. त्-नामुळे ते वसाहती मिळविण्-ाच्-ा मागे लागले. प्रत्-ेक कामाचे Specialization झाल्-ामुळे मजूरांना ठराविक साचेबध्द काम करावे लागले. काम विभागणीचे तत्त्व अमलात आले. त्-नामुळे कारागीरांना नवनिर्मितीचा आनंद मिळेनासा झाला. फॅशन्स लोकांच्-ा आवडीनिवडी कधी बदलतील व स्पर्धेत टिकत न राहिल्-ास कारखाना बंद पडेल ह्या चिंतेने मजूरांचे जीवन असुरक्षित बनले.

२) राजकी-ा परिणाम :- समाजात भांडवलदार व मजूर असे मोठे दोन गट त-ार झाले ह्या दोन्ही वर्गानी राजकी-ा सत्ता आपल्-ा ताब्-ात घेण्-ाचा प्र-ात्न सुरु केला. मजूरांचे स्थिती सुधारण्-ासाठी समाजवादी पक्षाचा उद-ा झाला. कार्लमार्क्सने वर्गविरहित समाजरचनेचे स्वप्न पाहत श्रमजीवींच्-ा हुकूमशाहीची कल्पना दिली. कामगारांच्-ा हातात हत्-ार आले. राजकी-ा जीवनात औद्योगिक क्रांतीने काही महत्वाची स्थित्-ंतरे आणली. साम्राज्-वाद वाढीस लागला. त्-ातून पुढे अनेक -युध्दे उद्भवली.

३) घटनात्मक परिणाम :- दाट लोकवस्तीच्या शहरांनी अनेक समस्यांना जन्म दिला. मजूरांचे काम, वेतन नुकसानभरपाई अशा अनेक नव्या समस्या त्यात उभ्या राहिल्या. संघटित मजूर आपल्या हक्कांतही चळवळी उभारू लागले. त्यातून इ.स.१८४८ च्या दरम्यान 'चार्टिस्टांची चळवळ' सुरु झाली. मजूरांच्या अनेक मागण्यांना शासनाने मंजूरी दिली.

४) सामाजिक परिणाम:- मध्यमवर्गीयांच्या शक्तीप्रदर्शनाचे काम औद्योगिक क्रांतीने केले. मजूरांची एकजूट व ताकद वाढली. ह्या क्रांतीने कुटुंब पध्दतीला तडे दिले. कामगार कामाच्या शोधात शहरात स्थिरावला. व्यक्तीस्वातंत्र्यांच्या कल्पनेचा विकास झाला. बालकामगार व स्त्रियांच्या नव्या प्रश्नांनी समाजाचे लक्ष वेधले. निवाऱ्याचे प्रश्न बिकट झाले. बेकरीत वाढ झाली. सामाजिक स्वास्थ्याचे प्रश्न निर्माण झाले. पर्यावरणीय प्रदूषण, बेफाम वाढणाऱ्या झोपडपट्ट्या, गलिच्छ वस्त्या, पिण्याच्या पाण्याचे प्रश्न वाढले. बेकारीमुळे मद्यपान व जुगार वाढू लागले.

अनेक समाजसुधारकांनी व विचारवंतांनी स्त्रियांच्या बदलत्या परिस्थितीचा विचार करत त्यांच्या राजकीय हक्कांची मागणी केली. पुरुषांबरोबर वेतन मिळविण्यासाठी चळवळ सुरु झाली. कामगारांच्या सुरक्षिततेसाठी कायदे करण्यात आले.

५) बौध्दिक परिणाम:- औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणून आर्थिक क्षेत्रात 'व्यक्तिचे स्वातंत्र्य' मान्य करण्यात आले. आर्थिक क्षेत्रात स्पर्धा अटळ असणार असे ठरूनच गेले. मागणी तसा पुरवठा ह्या तत्वानुसार आर्थिक क्षेत्रात गोष्टी घडत असल्याने मजूरांची जी परिस्थिती असेल तिचा स्वीकार करावा व सरकारने त्यात हस्तक्षेप करु नये हे तत्व ॲडम स्मिथने पुकारले (Principle of laissez fair) त्याला शासनाने मान्यता दिली. त्यामुळे कामगारांचे हाल झाले. त्यांचे श्रम व वेतन ह्याच्यात ताळमेळ बसत नव्हता. म्हणूनच साम्यवादास पोषक वातावरण मिळाले.

आपली प्रगती तपासा :

१. औद्योगिक क्रांतीचे परिणाम सांगा ?

_____

_____

६.८ सारांश

औद्योगिक क्रांतीमुळे समाजाचे राहणीमान व गरजा बदलल्या. पूर्वीच्या चैनीच्या वस्तू गरजेच्या वस्तू बनू लागल्या. वर्तमानपत्रे, गाड्या, रेडिओ, चलत चित्रपट ह्यामुळे जीवनाचा स्तर उंचावला. औद्योगिक क्रांतीमुळे धर्मनिरपेक्षता वाढीस लागली.

६.९ दीर्घोत्तरी प्रश्न

१) इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती का झाली त्याच्या कारणांची चर्चा करा.

२) औद्योगिक क्रांतीच्या दरम्यान कापड, लोखंड, कोळसा ऊर्जा यांच्या उत्पादनात झालेल्या वाढिचा आढावा घ्या. व्यापार व दळणवळणांच्या सोयींचा झालेला विकास लिहा.

३) औद्योगिक क्रांती चे विविध परिणाम स्पष्ट करा.

४) टीपा लिहा

१) औद्योगिक क्रांतीची कारणे

२) कापड उद्योगातील क्रांती

३) औद्योगिक क्रांतीचे आर्थिक व सामाजिक परिणाम.

❖❖❖

७

युरोपातील कृषी व औद्योगिक क्रांती

प्रकरण रचना

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रास्तविक :
७.२ युरोपातील कृषीक्रांती
७.३ जमिनीचा मालकी हक्कांचे केंद्रीकरण
७.४ कृषी क्रांतीची प्रमुख वैशिष्ट्ये
७.५ शेतीक्रांतीचे परिणाम
७.६ इंग्लंडमधील शेतीची एकोणिसावा शतकातील अवस्था :-
७.७ फ्रान्स व जर्मनीमधील शेतीचा विकास :
७.८ सारांश
७.९ दीर्घोत्तरी प्रश्न

७.० उद्दिष्ट्ये

१. इंग्लंडमध्ये कृषी क्रांती का झाली त्यांची कारण परंपरा अभ्यासणे.
२. कृषी उत्पादन वाढण्यासाठी इंग्लंड मध्ये केलेल्या पध्दतशीर प्रयत्नांचा आढावा घेणे.
३. कृषी क्रांती दरम्यान लागलेल्या नव्या शोधांचा अभ्यास करणे.
४. कृषी क्रांतीचे परिणाम अभ्यासणे.
५. फ्रांस व जर्मनीतील कृषी विकासाचा आढावा घेणे.

७.१ प्रास्तविक :

मध्-ा-ुगात -ुरोपातील सर्व देश कृषिप्रधान होते. ही कृषिव्-ावस्था देखील काहीशी साचेबध्द व परंपरागत होती. सर्वसाधारण तह हा कालखंड सरंजामशाहीचा कालखंड म्हणून अभ्-ासला जातो. प्रबोधनानंतर व भौगोलिक शोधानंतर व्-ापारवाद वाढला व आधुनिक भांडवलशाहीचा उद-ा झाला. सरंजामशाही व्-ावस्थेत सरंजामदार व भूदास हे दोन प्रमुख वर्ग होते. सरंजामदार हे जमिनीचे मालक असत तर भूदास त्-ांची कुळे, -ा नात्-ाने शेती कसत व आपली गुजराण करत.

मध्-ा-ुरोपात मॅनॉरिअल प्ध्दत अस्तित्वात होती. हे मॅनॉर किंवा वतन स्वतंत्र आर्थिक घटक असत. मॅनॉर म्हणजे सरंजामदारच्-ा नि-ंत्रणाखालील स्व-ंपूर्ण खेडी असत. आपल्-ा मॅनॉरचे

सरंजामदार प्रतिराजे असत. तेथे त्यांची हुकमत चाले. मॅनॉर स्वयंपूर्ण असल्याने त्यांनी बाह्य जगाशी फारसा संबंध येत नसे.

मात्र हळूहळू अनेक कारणांमुळे मॅनॉरिअल पध्दतीला तडे जाऊ लागले. मॅनॉरिअल पध्दतीतही शेती मागासलेलीच होती. आता सरंजामशाही बदलू लागल्याने शेतीच्या उद्दिष्टांत परिवर्तन होऊ लागले. शेती उत्पादनाची पध्दत, तंत्र व एकूणच शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलू लागला. ह्या परिवर्तनालाच शेतीव्यवसायातील क्रांती असे संबोधले जाते.

७.३ युरोपातील कृषीक्रांती

कृषी क्रांतीला, क्रांती म्हणण्यापेक्षा उत्क्रांती म्हणजे जास्त संयुक्तिक ठरेल. कारण हे परिवर्तन एकाएकी घडून आले नव्हते व त्यात सातत्यही नव्हते. साधारणतः १६ व्या शतकापासून पश्चिम युरोपात ह्या बदलाला सुरुवात झाली. बदलांची सुरुवात इंग्लंडमध्ये झाली. त्यामुळे औद्योगिक क्रांतीप्रमाणेच हरित क्रांतीचीही सुरुवात इंग्लंडमध्ये आहे. किंबहूना हरित क्रांतीच्या यशामुळेच इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. सुमारे १६ शतक ते १९ वे शतक शेतकी परिवर्तन सुरुच होते. मात्र आपण जेव्हा कृषीचा विचार करतो तेव्हा आपोआपच त्या बरोबरच्या पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन ह्याचा देखील आढावा घ्यावा लागतो. इंग्लंडातील शेती तंत्रात झालेल्या बदलाचे काही महत्वाचे टप्पे खालीलप्रमाणे:

१. शेतीकडे बघण्याचा बदललेला दृष्टिकोन - सरंजामशाहीत शेतीच्या गरजा अल्प होत्या. केवळ मॅनॉरला पुरेल इतकेच पिकवणे गरजेचे मानले जाई. त्यामुळे शेतीत गतीरोध होता. जमिन करण्याची पध्दत व उपकरणे मागासलेली होती. मॅनॉरियल पद्धतीच्या ऱ्हासानंतर शेती व्यापक व परिवर्तनशील बनली. मध्यमवर्गाचे समाजात महत्व वाढू लागले. स्थानिक लोकांच्या गरजा बदलू व वाढू लागल्या. त्या पूर्ण करण्यासाठी शेतीत बदल करणे आवश्यक होते.

२. कुंपण चळवळ - शेती बदलाचा एक भाग म्हणजे इंग्लंडमध्ये कुंपण चळवळ सुरु झाली. आपल्या मालकीच्या जमिनीला सरंजामदारांनी कुंपणे घालण्यास सुरवात केली. कारण १६ व्या शतकात इंग्लंडात शेतीपेक्षा मेंढपाळ व्यवसाय अधिक किफायतशीर होता. मान्सूनमुळे शेती अनियमित होती तर मेंढपाळाच्या लोकरांना बाजारात चांगली व स्थिर मागणी होती. शेतीत भरपूर पिक आल्यास भाव पडत होते त्यामुळे आपल्या शेतजमिनींचे कुरणात रुपांतर करुन मेंढ्या पाळणे शेतकरी पसंत करीत असे. शिवाय शेतीपेक्षा मेंढीपालन कमी कष्टाचे व निश्चित लाभ देणारे होते.

आपली प्रगती तपासा :

१) कुंपण चळवळ कधी व कुठे सुरु झाली ?

_____

_____

_____

३. लागवड क्षेत्र रूंदावले - कुंपण चळवळी पाठोपाठ इंग्लंडात सलग लहान लागवडीच्या जमिनीचे तुकडे एकाला एक जोडून कृषिक्षेत्र विस्तारले जाऊ लागले .त्यामुळे वेगवेगळ्या कुंपणांचा खर्च वाचत होता व एकच मोठे बंदिस्त आवार उपलब्ध होत होते .

७.३ जमिनीच्या मालकी हक्कांचे केंद्रीकरण

कुंपण चळवळ व जर्मनीच्या लहान लहान तुकड्यांचे एकत्रिकरण झाल्याने जमिनीचे मालकी हक्क बदलू लागले . पूर्वी लहान शेतकऱ्यांच्या लहान जमिनी मध्येच असत. मात्र सलग क्षेत्रात रूपांतर झाल्यानंतर शेती मोठ्या प्रमाणावर होऊ लागली . लहान शेतकऱ्यांना शेती करणे परवडेनासे झाले . साहजिकच ते आपल्या जमिनी मोठ्या शेतकऱ्यांना विकून टाकू लागले . त्यमुळे जमीनदारांचा एक गट उदयाला येऊ लागला.त्यांच्या हातात जमिनीचे केंद्रीकरण होऊ लागले .कुळे एकूण पध्दतीतूनच बाजूला फेकली गेली .श्रीमंत शेतकरी आता रोख वेतनावर मजूर कामाला लावू लागले . शेतीचे तंत्र व मालकी हक्क यात महत्वाचे बदल झाले . शेतीमध्ये नवे नवे प्रयोग होऊ लागले . शेतीचे उत्पादन वाढण्यावर भर दिला जाऊ लागला . सरकारनेही काही नवे कायदे करून शेती व्यवसायातील बदलांना गती दिली . शेती क्रांतीची कारणे खालीलप्रमाणे :

१. अन्नधान्याची वाढती मागणी :- १८ व्या शतकात अनेक कारणांमुळे इंग्लंडची लोकसंख्या झपाट्याने वाढू लागली .या वाढत्या लोकसंख्येला अन्न पुरवण्याचे काम कृषी व्यवस्थेवर आले व गरजेनुसार तसे प्रयत्न सुरू झाले .

२. उत्पादन तंत्रातील सुधारणा :- या काळात कृषीक्रांती मागासलेल्या कृषी पध्दती बदलत्या जुन्या तंत्रामुळे उत्पादनात वाढ होणार नाही हे जाणून शेतकरी नवीन उपकरणे ,प्रयोग करू लागले .

३. भांडवली गुंतवणूक :- सोळाव्या शतकापासून इंग्लंडमध्ये व्यापार वाढला व एक नवा श्रीमंत वर्ग उदयाला आला .जेव्हा अन्नधान्याच्या किंमती वाढू लागल्या तेव्हा त्या नवीन व्यापारी वर्गाने शेतात भांडवल गुंतवणे श्रेयस्कर मानले . त्याच्या गुंतवणूकीमुळे कृषी अजून भरभराटीला लागली .

४. कच्च्या मालाची गरज :- याच काळात इंग्लंडमध्ये व्यापारवादाबरोबर औद्योगिकरणास सुरूवात झालेली होती . विविध उद्योगांना कच्च्या मालाची गरज होती . हा कच्चा माल पुरवण्यासाठी कृषी विस्तारली .

५. जमिन पडीक राहू न देण्याकडे कल :- शेतकऱ्यांनी जमिन पडीक राहू देण्यास नकार दिला . शिवाय एकाच क्षेत्रात वार्षिक दोन किंवा तीन फिरवून पिके घेत . त्यामुळे जमिनीचा कस वाढण्यास सुध्दा मदत होत असे .

६. नवीन पिकांची ओळख :- याच काळात शेतकऱ्यांनी नवीन उत्पादने घेण्यास सुरूवात केली . बटाट्याचा शोध लागल्याने व समाजात त्याची गरज असल्याने कृषी क्षेत्रात फायदा झाला

आपली प्रगती तपासा :

१. शेतीक्रांतीची कारणे सांगा ?

_____

_____

७.४ कृषी क्रांतीची प्रमुख वैशिष्ट्ये

१. शेतीच्या उत्पादन तंत्रात सुधारणा :- इंग्लंडमध्ये मध्ययुगात पारंपरिक शेती पध्दती होती . या काळात द्विपट्टा किंवा त्रिपट्टा पध्दतीने शेती केली जात असे . या प्रकारात दरवर्षी बरीच जमिन पडीक ठेवण्यात येत असे . त्यामुळे शेतीचे उत्पन्न कमी होते .परंतु १८ व्या शतकात काही प्रमुख सुधारणा झाल्या .

जेथ्रो टल - (इ.स. १६७४ - १७४०) हा एक नामांकित कृषी तज्ञ होता . आपल्या अनेक प्रयोगाद्वारे त्याने जमिनीचा कस वाढवला .जमिन खोलवर नांगरण्याचे फायदे त्याने दर्शविले .शिवाय बियाणांची काळजीपूर्वक निवड करणे , पेरणी करताना बी हाताने फेकण्याऐवजी ड्रिलच्या मदतीने पेरणी करण्याचे फायदे स्पष्ट केले .

लॉर्ड टाउनशेंड - इ.स. (१६७४-१७३८) हा एक नामांकित इंग्रज राजकारणी व जमीनदार होता . याने एकाच जमिनीत आलटून पालटून पिके घेण्याच्या पध्दतीचा फायदा दाखवून दिला . त्यामुळे जमिनीचा कस वाढविण्यासाठी जमिन पडीक ठेवण्याची आवश्यकता उरली नाही . टाउनशेंडची पध्दत लवकरच लोकप्रिय ठरली .शिवाय खताचा योग्य वापर कसा करावा यावरही त्याने संशोधन केले.

रॉबर्ट बेकवेल - (इ.स. १७२५-१७९५) याने पशूपालन क्षेत्रात मूलभूत संशोधन केले . जनावरांची पैदास व निगा या बाबतीत त्याचे संशोधन सामान्यांना उपयोगी ठरले . विशिष्ट जातीची गाय जास्त दूध देते , तर दुसऱ्या जातीची गाय मांसासाठी उपयुक्त ठरते हे त्याने निदर्शनास आणले . तसेच मेंढ्यापासून अधिक उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टीनेही त्याने काही प्रयोग केले . थॉमस विल्यम कोक यानेही पशुसंवर्धनाच्या बाबतीत अनेक प्रयोग केले . कोकने खतांचे प्रमाण व उपयोगितेवरही माहिती दिली .

आर्थर यंग - (इ.स. १७४१-१८२०) याने अनेक देशाना भेटी दिल्या व शेतीचा तुलनात्मक अभ्यास केला . आपल्या लेखाद्वारे त्याने नवीन प्रयोगांना प्रसिध्दि दिली . त्या काळातही त्याने केवळ कृषीसंबंधी ‘‘ Annals of agriculture" नांवाचे मासिक लिहिले.
इंग्लंडच्या सरकारनेही प्रयोगात्मक शेतीला व संशोधनाला प्रोत्साहन दिले . इ.स. १७९३ मध्ये सरकारने शास्त्रीय पध्दतीच्या शेतीला उत्तेजन देण्यासाठी शेती मंडळाची (Board of Agriculture) ची स्थापना केली . वरील सर्व प्रयत्नातून शेतीच्या उत्पादनात , तंत्रात क्रांतीकारी बदल झाले .

२. शेती व्यवसायात भांडवलशाहीचा उदय :- सोळाव्या शतकापासून इंग्लंडमध्ये व्यापार व उद्योगात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली व भांडवलशाहीचा उदय होऊ लागला . शेतीत पैसा गुंतवणे किफायतशीर ठरल्याने गुंतवणूक वाढू लागली . शेतजमिनीचा वाढता आकार , प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब , खतांचा वापर यामुळे भांडवलाची गरज भासू लागली . श्रीमंत जमीनदार जमिनीवर आपला मालकी हक्क प्रस्थापित करून नव्या पध्दतीने शेती करू
लागले .त्यामुळे शेतीत अनेक सुधारणा झाल्या .

आपली प्रगती तपासा :

१. कृषी क्रांतीची कारणे सांगा ?

_____

_____

७.५ शेतीक्रांतीचे परिणाम

१ . जुन्या शेतीपध्दतीचा अस्त : अठराव्या शतकातील शेतीक्रांतीमुळे जुन्या खुल्या शेतीपध्दतीचा अस्त झाला . कुंपण-चळवळीमुळे शेतीचे परंपरागत स्वरूपच बदलून गेले . खुल्या शेतीपध्दतीचे तोटे शेतकऱ्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी तिचा त्याग केला . तसेच शेतजमिनीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण झाल्यामुळेही जुनी शेतीपध्दती कालबाह्य ठरली . जुन्या शेतीपध्दतीचा अस्त होण्यास उत्पादन तंत्रातील बदलही कारणीभूत ठरले . शेतीक्रांतीमुळे शेतकरी सुधारित उत्पादन तंत्राचा अवलंब करून शेती करू लागले .त्यामुळे परंपरागत शेतीपध्दती पाठीमागे पडली . शेतीव्यवसायात शास्त्रीय पध्दतीचा वापर करण्यावर अधिक भर देण्यात येऊ लागला .

२. भांडवली शेतीला प्रारंभ : शेतीक्रांतीचा एक महत्वाचा परिणाम म्हणजे शेतीव्यवसायात मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गुंतवणूक केली जाऊन भांडवली शेतीचा कालखंड सुरू झाला . इंग्लंडमध्ये नव्याने उदयास आलेला श्रीमंत वर्ग आपल्याकडील पैसा शेतीमध्ये गुंतवू लागला . या वर्गाने भरमसाट दराने जमिनी खरेदी करण्यास प्रारंभ केला . परिणामी जमिनीवर श्रीमंत शेतकरी वर्गाची मालकी प्रस्थापित झाली . या शेतकऱ्यांनी शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी नव्या तंत्राचा अवलंब केला . शेती यंत्रांच्या सहाय्याने केली जाऊलागली . खतांचा अधिक प्रमाणात वापर केला जाऊ लगला . अशा प्रकारे किफायतशीर पध्दतीने शेतीव्यवसाय करण्यासाठीही अधिक भांडवलाची आवश्यकता भासू लागली. त्यातून शेतीतील भांडवल गुंतवणूकीचे प्रमाण वाढत जाऊन भांडवली शेतीचा कालखंड सुरू झाला .

३. उपादनात वाढ : शेतीक्रांतीमुळे शेतीच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली . शेतजमिनीच्या धारणाक्षेत्राचे एकत्रीकरण , शेतीव्यवसायातील भांडवल गुंतवणूक, सुधारित उत्पादन तंत्राचा अवलंब , शेतीचे यांत्रिकीकरण , खतांचा वापर इत्यादी कारणांमुळे उत्पादन वाढीला जोराची चालना मिळाली . परंपरागत द्विपट्टा व त्रिपट्टा शेती पध्दतीमुळे जमिनीचा फार मोठा भाग दरवर्षी पडीक राहत होता . परंतु नव्या उत्पादन तंत्रामुळे आता जमीन पडीक ठेवण्याची आवश्यकता उरली नाही . तसेच या काळात निरनिराळे प्रयोग करून नापीक जमिनीवरही यशस्वीरित्या लागवड करण्यात शेतकऱ्यांनी यश मिळविले.त्यामुळेही शेतीच्या उत्पादनात वाढ झाली.

४. लहान शेतकरी व शेत मजूर -ांच्-ावर आलेली आपत्ती : शेतीक्रांतीचा एक महत्वपूर्ण परिणाम किंबहूना दुष्परिणाम म्हणून ल्हान शेतकरी व शेतमजूर -ांच्-ावर कोसळलेल्-ा आपत्तीचा उल्लेख करावा लागेल . -ा क्रांतीमुळे मोठ्या शेतक–ांचा चांगलाच लाभ झाला . त्-ांनी जमिनीवर आपला मालकी हक्क प्रस्थापित करून जमिनीतून अधिक उत्पादन मिळविण्-ाच्-ा दृष्टीने कसोशीने प्र-त्न केले . -ा प्र-त्नांत त्-ांना -श -ेऊन त्-ांनी बराच आर्थिक लाभ मिळविला . परंतु त्-ाच वेळी लहान शेतक–ांवर मात्र त्-ांच्-ा जमिनी मोठ्या शेतक–ांना विकण्-ाची पाळी आली . कारण लहान धारणा क्षेत्रात किफा-तशीर पध्दतीने शेती करणे तसेच शेतीत मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतविणे त्-ांना शक्-य नव्हते .साहजिकच लहान शेतक–ांना आपली जमीन विकून उपजीविकेचे अन्-य मार्ग शोधावे लागले. त्-ांची शेतीव्-यवसा-यातून का-यमची हकालपट्टी झाली . शेतमजूरांवरही असाच दुर्धर प्रसंग ओढवला . मोठ्या शेतक–ांच्-ा उत्पन्नात वाढ झाली तरी शेतमजूरांची मजुरी मात्र वाढली नाही . जमीनमालकांनी शेतमजूरांना अल्प वेतनात राबवून घेण्-ाचे धोरण अंगीकारले . त्-यमुळे शेतमजूरांच्-ा हालापेष्टात वाढ होऊन त्-ांना जीवन जगणेही अशक्-य बनले .

५. तीव्र वर्गभेद : शेतीक्रांतीमुळे समाजातील वर्गभेद अधिक तीव्र बनले . एका बाजूला शेतीक्रांतीचा मोठ्या प्रमाणावर लाभ मिळालेला श्रीमंत व मोठ्या शेतक–ांचा वर्ग , तर दुस–ा बाजूला -ा क्रांतीमुळे संकटात सापडलेला लहान शेतक–ांचा आणि शेतमजूरांचा वर्ग असे दोन परस्पर विरोधी वर्ग समाजात निर्माण झाले . -ा वर्गाचे आर्थिक हितसंबंध परस्परविरोधी बनले . मोठ्या शेतक–ांनी लहान शेतक–ांच्-ा जमिनी हडप करण्-ास व शेतमजूरांचे आर्थिक शोषण करण्-ास सुरूवात केली . अशा प्रकारे शेतीक्रांतीमुळे समाजातील वर्गभेद अधिकच तीव्र बनले .

आपली प्रगती तपासा :

१. शेती क्रांतीची परिणाम सांगा ?

_____

_____

७.६ इंग्लंडमधील शेतीची एकोणिसाव्-ा शतकातील अवस्था :-

एकोणिसाव्-ा शतकाच्-ा प्ररंभीच्-ा काळात इंग्लंडमध्-ये शेतीक्रांतीची फळे दृश्-य स्वरूपात पाहाव-ास मिळू लागली . अन्नधान्-य व इतर शेतीमालाच्-ा उत्पन्नात वाढ झाली . शेतीक्रांतीच्-ा काळात झालेल्-ा विविध बदलांमुळे शेतीव्-यवसा-य किफा-तशीर ठरू लागला .तथापि , एकोणिसाव्-ा शतकाच्-ा प्रारंभी इंग्लंडमध्-ये अन्नधान्-याच्-ा किंमती वाढतच होत्-ा .-ाला दोन गोष्टी कारणीभूत ठरल्-ा होत्-ा . एक म्हणजे , शेती उत्पन्नात वाढ झाली असले तरी देशाची लोकसंख्-याही वेगाने वाढत होती .त्-यामुळे वाढते उत्पादनही अपुरेच पडू लागले . दुसरी म्हणजे , -ा काळात इंग्लंड व फ्रान्स -ांच्-यात -ुध्द सुरू झाले होते . फ्रान्सच्-ा नेपोलि-यनने इंग्लंडची आर्थिक नाकेबंदी करण्-याचे धोरण अवलंबिले होते . -ा -ुध्दजन्-य परिस्थितीमुळेही अन्नधान्-यांच्-ा किंमतीत वाढ झाली होती . -ाचा फा-यदा तेथील जमीनदार वर्गाला मिळाला.

इ.स. १८१५ चा अन्नधान्य कायदा : इ.स. १८१५ मध्ये इंग्लंडचे फ्रान्सबरोबरचे युध्द संपले . युध्दसमाप्तीमुळे अन्नधान्याच्या किंमती घसरतील अशी भीती जमीनदारांना वाटली . त्यामुळे त्यांनी आपल्या राजकीय प्रभावाचा वापर करून इ.स. १८१५ मध्ये संसदेत अन्नधान्य कायदा संमत करवून घेतला . या अन्नधान्य कायद्यान्वये (Corn Law) इंग्लंडच्या बाजारात अन्नधान्यांच्या किंमती विशिष्ट मर्यादेपर्यंत वाढल्याशिवाय अन्नधान्याच्या आयातीला बंदी घालण्यात आली . पण या कायद्याचा अपेक्षित परिणाम झाला नाही .या कायद्याने अन्नधान्यांच्या किंमतीत अस्थिरता निर्माण झाल्याने त्याचा जमीनदार वर्गाला फारसा लाभ मिळाला नाही . सामान्य लोकांना तर तो खूपच त्रासदायक ठरला . अन्नधान्य कायद्याला सर्व स्तरांतून विरोध होऊ लागल्याने सरकारला इ.स. १८४६ मध्ये तो रद्द करावा लागला .

इंग्लंडच्या शेतीचा सुवर्णकाळ : इ.स. १८५० ते १८७५ हा कालखंड इंग्लंडमधील शेतीव्यवसायाच्या दृष्टीने अतिशय भरभराटीचा ठरला . या कालखंडाला 'इंग्लंडच्या शेतीचा सुवर्णकाळ' असे संबोधले जाते. या काळात इंग्लंडच्या शेतीव्यवसायाला परराष्ट्रांतील शेतीमालाची स्पर्धा फारशी जाणवली नाही. देशात शेतीमालाची मागणी वाढत होती. त्यामुळे अन्नधान्य व इतर मालाच्या किंमती सतत वाढत होत्या. शेतीचे यांत्रिकीकरण घडून आले होते. उत्पादन तंत्रातील बदलांमुळे सुधारित पध्दतीने शेती केली जात होती. या काळात वाहतुकीच्या साधनांत सुधारणा होऊन शेतीमाल दूरवरच्या बाजारपेठांत नेणे शक्य झाल्याने शेतीमालाच्या दरातील अनिश्चितता संपुष्टात आली. सर्व कारणांमुळे शेतीमालाच्या उत्पादनात वाढ होऊन त्यास किफायतशीर भावही मिळू लागला. त्यामुळे शेतीला ऊर्जितावस्था प्राप्त होऊन शेतकऱ्यांनी आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली.

पुढे इ.स.१८७६ ते १९०० या काळात मात्र शेतीव्यवसायात आर्थिक मंदीची लाट आली. इंग्लंडच्या सरकारने स्वीकारलेले खुल्या व्यापाराने धोरण, परकीय देशांच्या स्पर्धेला तोंड देण्याचा आलेला प्रसंग, नैसर्गिक आपत्ती, ग्रामीण भागातील मंजुराचे शहरांकडे होऊ लागलेले स्थलांतर इत्यादी गोष्टी या मंदीला कारणीभूत झाल्या.

७.७ फ्रान्स व जर्मनीमधील शेतीचा विकास :

फ्रान्स हा एकोणिसाव्या शतकापर्यंत कृषिप्रधान देश होता. मध्ययुगीन काळात फ्रान्समध्येही सरंजामशाही व्यवस्था प्रचलित होती. सरंजामदार व भूदास हे त्या काळातील दोन प्रमुख वर्ग होते. युरोपातील अन्य काही राष्ट्रांप्रमाणेच फ्रान्समध्येदेखील सरंजामदारांचे भूदासांवरील अनियंत्रित नियंत्रण हे सरंजामशाहीचे वैशिष्ट्य बनले होते. तथापि, मध्ययुगीन काळाच्या अखेरीपासून फ्रान्समध्ये भूदासांच्या मुक्ततेची प्रक्रिया सुरु झाली आणि स्वतंत्र शेतकऱ्यांचा वर्ग अस्तित्वात येऊ लागला.

शेतजमिनीवरील स्वतंत्र शेतकऱ्यांचा मालकी हक्क व अल्पधारणा क्षेत्र ही फ्रान्सच्या शेतीची दोन वैशिष्ट्ये सांगितली जातात. सामान्यतः असे मानले जाते की, इ.स.१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीमुळे स्वतंत्र शेतकरी वर्गाची जमिनीवर मालकी प्रस्थापित झाली. परंतु, फ्रान्समध्ये या राज्यक्रांतीच्या अगोदरपासूनच स्वतंत्र शेतकऱ्यांचा वर्ग अस्तित्वात होता व तो आपल्या जमिनीचा मालकही होता. त्याची आर्थिक स्थिती मात्र फारशी चांगली नव्हती. अनेक

प्रकारच्‍या करांच्‍या ओझ्‍याखाली तो दबून गेला होता. तसेच त्‍यांपैकी बहुसंख्‍य शेतकऱ्‍यांकडे असलेले जमिनीचे क्षेत्र फारच थोडे होते आणि अनेक मार्गांनी त्‍यांचे शोषण केले जात होते.

फ्रेंच राज्‍यक्रांतीने सरंजामशाही व्‍यवस्थेचे सर्व निर्बंध काय्‍मचे दूर केले. त्‍यामुळे शेतकऱ्‍यांवरील जुन्‍या काळातील विविध प्रकारची बंधने आपोआप संपुष्टात येऊन शेतीव्‍यवसायाच्‍या प्रगतीला चालना मिळाली. इ. स.१८१५ ते १८४७ या काळात फ्रान्‍सच्‍या शेतीव्‍यवसायाची वेगाने प्रगती झाली. या काळात शेतीमध्‍ये सुधारित तंत्राचा अवलंब करण्‍यात आला. शेती यांत्रिक पध्‍दतीने केली जाऊ लागली. त्‍यामुळे शेतीउत्‍पादनात बरीच वाढ झाली. राज्‍यानेही शेतीव्‍यवसायाला प्रोत्‍साहन देण्‍याचे धोरण अवलंबिले. शेतीच्‍या हितसंबंधांचे रक्षण करण्‍याकरिता स्‍वतंत्र शेती खाते निर्माण करण्‍यात आले. आयात-निर्यात व्‍यापारातील जकातीसंबंधीचे धोरण ठरवितानाही शेतीव्‍यवसायाला संरक्षण देण्‍यास अग्रक्रम देण्‍यात आला.

७.९ सारांश

अठराव्‍या शतकापर्यंत जर्मनीच्‍या शेतीची अवस्थाही युरोपातील इतर देशांपेक्षा फारशी वेगळी नव्‍हती. जर्मनीमध्‍ये सरंजामशाही व्‍यवस्था प्रचलित होती. भूदासांची स्थिती सरंजामदारांच्‍या गुलामांप्रमाणेच होती. तथापि, अठराव्‍या शतकापासून जर्मनीत भूदासांच्‍या मुक्‍ततेची प्रक्रिया सुरु झाली. अर्थात, या काळात जर्मनी राजकीयदृष्‍ट्या एकसंघ नसल्‍याने देशाच्‍या निरनिराळ्‍या प्रदेशांतील भूदासांच्‍या स्थितीत खूपच फरक होता. परंतु एकोणिसाव्‍या शतकाच्‍या मध्‍यापर्यंत बहुसंख्‍य भूदास जमीनदारांची कुळे किंवा शेतमजूर म्‍हणून काम करीत होते. त्‍यांच्‍याकडे स्‍वतःच्‍या मालकीची जमीन नव्‍हती.

इ.स.१८७९ मध्‍ये राजकीयदृष्‍ट्या एकीकरण झाले आणि त्‍या वेळेपासून तेथील शेतीव्‍यवसायाच्‍या प्रगतीला खरी चालना मिळाली. या बाबतीत तेथील तत्‍कालीन प्रशासनाने विशेष पुढाकार घेतला. भूदासांना व शेतमजूरांना स्‍वतंत्र शेतकऱ्‍यांचा दर्जा मिळवून देण्‍याचे प्रयत्‍न केले गेले. शेतकऱ्‍यांना शेतीच्‍या सुधारित तंत्राचे शिक्षण देणे, जमिनीच्‍या तुकडयांचे एकत्रीकरण करणे, शेतकऱ्‍यांना भांडवल उपलब्‍ध करुन देण्‍यासाठी कृषी पतपुरवठा संस्‍थांची स्‍थापना करणे इत्‍यादी उपाय योजण्‍यात आले. त्‍यामुळे इ.स.१८७१ नंतर जर्मनीतील शेतीव्‍यवसायाची वेगाने प्रगती झाली.

७.९ दीर्घोत्‍तरी प्रश्‍न

१. इंग्‍लंडमध्‍ये कृषी क्रांती का झाली त्‍याची कारणे लिहा.
२. इंग्‍लंडमधील कृषी क्रांतीचे विविध टप्‍पे लिहा.
३. इंग्‍लंडमधील कृषी क्रांतीचे परिणाम अभ्‍यासा.
४. टीपा लिहा.
   १) इंग्‍लंडमधील कुंपण चळवळ
   २) कृषी उत्‍पादनातील वाढ

❖❖❖

८

समाजवादाचा विकास

(स्वप्नाळू समाजवाद व मार्क्सवाद)

प्रकरण रचना

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ समाजवाद अर्थ व व्याख्या
८.३ स्वप्नाळू समाजवाद
८.४ मार्क्सचा तीन घटकातील तत्वांचा आपण विस्तृतपणे परामर्श घेऊ.
८.५ इतिहासाचा भौतिक मीमांसेचे परीक्षण
८.६ वर्गसंघर्षाचा सिध्दांत (थेअरी ऑफ क्लास स्ट्रगल)
८.७ वर्गसंघर्षाचा सिध्दांताचे परीक्षण
८.८ अतिरिक्त मूल सिध्दांत
८.९ सारांश
८.१० दीर्घोतरी प्रश्न

८.० उद्दिष्ट्ये

१ समाजवाद विकसीत होण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीचा आढावा घेणे
२ स्वपनाळू समाजवादाच्या तत्वज्ञांच्या कार्याचे मुल्यमापन करणे
३ शास्त्रिय समाजवाद किंवा मार्क्सवादाचा अभ्यास करणे

८.१ प्रस्तावना

रॉबर्ट ओवेतने १८३० च्या सुमारास समाजवाद हा शब्दप्रयोग सर्वप्रथम उपयोगात आणला असावा असे मानले जाते. त्याने त्याची तत्वे दि न्यु व्ह्यु ऑफ सोसायटी आणि दि बुक ऑफ न्यु मॉरल वर्ल्ड या पुस्तकात विशद केली आहेत. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात उद्योगधंद्यांचा विस्तार झाला त्याही आधी म्हणजे औद्योगिक क्रांतीच्या दरम्यान इंग्लंडमध्ये बरेच कारखाने उभे राहिले. आणि त्यामुळे समाजात औद्योगिक कामगारांचा एक मोठा गर निर्माण झाला. कारखान्यात कामगारांना ज्या परिस्थितीत काम करावे लागत होते ती परिस्थिती फार भयानक होती. कामगार भयंकर हालात दिवस काढत होते. कामगारांची परिस्थीती सुधारावी ह्यासाठी भांडवलदार कोणत्याही प्रकारचे कार्य करीत नव्हते. समाजात दोन नवे वर्ग तयार झाले. भांडवलदार व कामगार भांडवलदाराकडून कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत होते. अशा परिस्थितीत कामगार वर्गाच्या हाल अपेष्टांकडे समाजवादी विचारवंताचे लक्ष गेले. त्यानी

कामगारांच्या या हालाखीच्या परिस्थितीस भांडवलदारांनाच जबाबदार धरले. आणि नफेखोरी साठी कामगारांची पिळवणूक करण्याच्या प्रवृत्तीस विरोध केला. समाजातील बहुसंख्य लोकांचा फायदा व्हावा यासाठी त्यानी अतिरिक्त उत्पादनांच्या समान वाटपाचा आग्रह धरला. ह्या काळात विचारवंतानी ज्या समाजिक चळवळीचा पुरस्कार केला त्यात समाजवादाची बिने स्पष्ट दिसतात.

सर्वप्रथम इंग्लंडमध्ये नवीन आर्थिक व्यवस्था व त्यामध्ये होणारे आर्थिक शोषण ह्यांवर टिका सुरु झाली. थॉमस पेनने आपल्या राइटस ऑफ मॅन ह्या प्रसीध्द ग्रंथात जमीनीचे सामाजीकरण करणे प्रचंड मालमतावर जाचक कर आकारणे, कामगारांना व त्याच्या कुदूं बियाना निवृत्ती वेतन देणे, बाळंतपणाची रजा इ. हक्कांची मागणी केली. विह्यम गॉडविनने खाजगी मालमत्तेस विरोध केला. प्रसिध्द कवी शेले याने सरकारचा कृरपणा व गरिबांचे शोषण ह्यांवर टिका केली. इ.स. १८१८ मध्ये स्विस इतिहासकार जीन चार्लस लिओनार्द सिमोंद दी सिस्मोंद याने इंग्लंडमधील गरिब लोकांच्या दयनिय अवस्थेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले. सामाजिक क्रांत्यांचे दुष्परिणाम टाळण्यासाठी शासनाने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप केला पाहिजे अशी जोरदार मागणी त्याने केली.

८.२ समाजवाद अर्थ व व्याख्या

लोकशाहीतील अतिरेकी व्यक्तीवादाला झालेली प्रतिक्रिया म्हणजे समाजवाद आधुनिक काळात समाजवाद बराच लोकप्रिय झाला. समाजवादा व शब्द मराठीत इंग्रजी चा इतुरवाद म्हणून वापरतात.त्याचा मूळ शब्द म्हणजे समाज असा आहे. यावरुन क्षमता असलेला समाज निर्माण करण्या संबंधीचा विचारप्रवाह व त्यानुसार केलेली कृती म्हणजे समाजवाद होय.

फ्रेंच विचारवंत फैबूब यांनी प्रयत्न हा शब्द आठव्या शतकात वापरला काही विचारवंत हे श्रम रॉवर्ट ओवेने ना देतात. समाजवादाच्या काटी महत्त्वाच्या व्याख्या खालील प्रमाणे.

१) **वेबस्टर :-** समाजवाद हा सामाजिक संघटनेचा आर्थिक व राजकिय सिध्दांत आहे. स्पर्धेच्या एवजी सहकार्य आणि आर्थिक कार्यावर शासकिय नियंत्रण निर्माण करणे हे समाजवादाचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे. समाजवादामध्ये संधी व फलाची समान विभागणी आहे.

२) **एलिएट :-** ज्या सिध्दांतानुसार उत्पादन, विभाजन आणि वितीमयाची साधने जनतेच्या अथवा समाजाच्या मालकांची व्हावीत त्या साधनांवर समाजाचे नियंत्रण प्रस्थापित व्हावे. प्रत्येक व्यक्तीस आपल्या गुणांची जोपासणा करण्याची समान संधी दिली जावी आणि समाजाची संपती न्याय पध्दतीने वाटली जावी असे सुचवले जाते. तो राजकीय व सामाजिक सिध्दांत म्हणजे समाजवाद होय.

वरिल व्याख्यावरुन असे स्पष्ट होते की समाजवाद हि एक विचारसरणी, चळवळ व समता धिष्टीत जीवनपध्दती आहे. भांडवलशाहीतील आर्थिक शोषण, विषमता अन्यायकारक आहे.त्यास समाजवाद विरोध करणे. समाजवाद संपत्ती निर्मितीच्या साधनांची मालकी खाजगी न ठेवता ती सामाजिक सामुदायिक करावी तसेच त्यावर सामाजिक नियंत्रण ठेवावे ज्यामुळे संपत्तीचे केंद्रीयकरण होणार नाही. सामाजिक विषमता, शोषण, अन्याय गळेकापू स्पर्धा

फसवणूक, अडवणूक राहणार नाही. व्यापक समाजहित पाहिले जाईल. असा समाजवादाचा अर्थ आहे.

८.३ स्वप्नाळू समाजवाद

१९ व्या शतकाच्या पुर्वार्यात रॉवर्ट ओवेन यांनी सहकारी किंवा स्वप्नाळू समाजवादी विचार मांडले. तेच विचार लोकशाही समाजवादाचे आधार ठरले म्हणून रॉवर्ट ओवेन ह्यांना लोकशाही समाजवादचा निर्माता असे म्हटले जाते.

रॉवेट ओवेन ह्यांचा समाजवाद उत्क्रांतीवादी समजला जातो. तत्कालीन युरोपिय समाज असे मानत असे कि कामगारच आपल्या दरिद्री व दयनीय अवस्थेत जबाबदार आहेत. या विचारांचा प्रतिवाद रॉवर्ट ओवेन यांनी केला आहे. त्यांच्या मते व्यक्ती कोणतीही चांगली किंवा वाईट नसते.योग्य परिस्थितीचा लाभ समाजाने व्यक्तीस करुन दिला तरच ती आपले कर्तृव्य दाखवू शकते. सर्व व्यक्ती ना सारखीच संधी मिळाली तर सर्व व्यक्तींचा सारखाच विकास होऊ शकेल. वर्ग संघर्षापेक्षा वर्ग सहकार्यावर रॉवर्ट ओवेन यांचा अधिक दिखावा होता. म्हणूनच त्यांचा समाजवाद सहकारी समाजवाद म्हणून ओळखला जातो. ओवेन यांचे समाजवादी विचार अनुमाणसिध्द होते. इंग्लंडमध्ये न्यू लानार्क तर अनेरिकेत न्यू हार्मनी कॉलनी या आदर्श औद्योगिक वसाहती स्थापन करुन त्यातील कामगारांना सुखी जीवन प्राप्त करुन देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कामगारांचे कामाचे तास कमी केले, कामगारा वसाहती स्थापन केल्या, त्यांच्या मुलांसाठी शाळा काढल्या त्यांना नियमीत व अधिक वेतन दिले. असे लाभ मिळालेले कामगार कर्तव्यबुध्दीने काम करु लागले. रॉबर्ट ओवेन यांचा हा प्रयोग यशस्वी झाला मात्र अन्य कारखानदारांनी या प्रयोगाला स्वारस्य दाववले नाही.

शेवटी ओवेन कामगार संघटना व सहकारी संस्था स्थापन करण्याकडे वळले. सर्व कामगार संघटना एकत्रीत करुन त्यांनी ग्रॅड नॅशनल कॅन्सॉलिडेटेड ट्रेड युनियन ही कामगार संघटना स्थापली. व आपला सहकारी समाजवादाचा प्रयोग सुरु ठेवला. दुदेवते ओवेन यांचे प्रयत्न एकाकी पडले. स्वप्नाळू समाजवाद शेवटी व्यवहारात येण्या एवजी केवळ एक विचारप्रवाह ठरला.

विह्यम गॉडवीन :- (१७५६ - १८३६) हे इंग्लीश लेखक व विचारवंत होते. त्यांचा ग्रंथ ॲन एनक्वायरी कनसरनींग पोलिटाकल जस्टीक ॲन इट्स इनफूएनस ऑन जनरल वरच्यु ॲड टॅपिनेम हे १७९३ मध्ये प्रसीध्द झाले. नागरिकांचा समाजाशी व सरकारशी असणारा संबंध कसा असावा ह्यावर त्यांनी चर्चा केली. गॉडवीन की जवळजवळ सर्वच राजे भ्रष्ट्राचारी असत. गॉडवीन ने समकालीन राजकीय समाजी जीवनातील कुप्रथांवर भाष्य केले. संपत्तीचे असमान वाटप त्यामुळे येणारी सामाजीक विषमता त्यांना अस्वस्थ करत असे. संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर झालेली केंद्रिकरण त्यांना मान्य नव्हते. आपल्या लेखनातून त्यांनी सामाजीक समानता प्रस्थापित करण्याऱ्या समाजवादाचा पुरस्कार केला.

सेंट सायमन :- ख्रिष्चन धर्मगुरु सेंट सायमन व त्यांच्या अनुयायांनी भांडवलशाही व्यवस्थेला विरोध करुन नवी समाजरचना स्विकारली याला ख्रिष्चन समादवाद असे म्हणतात.

ह्या समाजवादी विचारप्रवाहात समूहवादी नवसमाजरचना सुचवली आहे. राज्यसंस्थेने सर्व संपत्ती व तीच्या निर्मीतीची साधने ताब्यात यावी व तिचे सर्वोत्कृष्ट वितरण करावे हे कार्य देशातील उत्तम नागरिकांकडे सोपवावे.त्या कार्यबद्दल त्यांना मोबदला द्यावा. सर्व नागररिकांना संपत्ती उत्पादनाची उपलब्ध करुन द्यावी. प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे काम करावे.

राज्यसंस्थेने गरिब वर्गाची स्थीती सुधारण्याचा प्रयत्न करावा. सर्वांना कार्यानुसार मोबदला दिला जावा. व्यक्तीच्या उत्पादक कार्यानुसार तिचा सामाजिक दर्जा ठरावा. जन्म अथावा संपत्तीच्या आधारे नाही.

खाजगी मालमत्ता असावी मात्र ती अशी असावी की ज्याच्या आधारे एकास दुसऱ्याची पिळवणूक करता येणार नाही. धनिकांनी आपली संपत्ती सामाजिक हित संवर्धनासाठी वापरावी. जनसमान्याना हे विचार आकर्षित करु शकले नाहीत. परंतु त्याचे स्वागत उच्चवर्णियांनी केले. सेंट सायमन यांच्या विचारात वर्ग संघर्षा ऐवजी वर्गसहकार्याची व उत्तदायित्वाची प्रेरणा आहे. यांचा समाजवादी चळवळी वर मोठा प्रभाव पडला. फ्रांसच्या इतिहासात त्याचे मोठे योगदान आहे. त्याना फ्रांसमधील समाजवादाचा जनक मानतात.

चार्ल्स फेरिअर - (१७७२ -१८३७) हा सुध्दा फ्रेंच समाजवादी होता. शिवाय हा रॉबर्ट ओवेन व सेंट सायमनना समकालीन होय. यांनी अनेक ग्रंथाचे लेखन केले त्यातील सर्वात प्रसीध्द ग्रथ म्हणजे न्यू इंडस्ट्रीयल वर्ल्ड) New Industrial World ह्या ग्रंथात त्यांनी औद्योगिक जगतात होणाऱ्या कामगारावरील आत्याचारास वाचा फोडली. त्यांच्या मते प्रत्येक व्यक्ती स्वहीत साधण्यासाठी दुसऱ्याचे अहित चिंतन असते. उदा. डॉक्टर आपल्या धंद्याची भरभराट व्हावी म्हणून समाजात रोग वाढावेत असे अपेक्षितात. भांडवलराहीत संपत्तीधारक व त्याचे पाठिराखे यांचा एक पुरान्नपुष्ट, एतखाऊ व आळशी लोकांचा वर्ग निर्माण होता. तो कामगारांच्या शोषणातुन पोसला जातो. भांडवलशाही समाजात शारीरीक कष्ट केवळ श्रमिक करतात. त्यामुळे समाजात यांत्रिकपणा, स्पर्धा, संघर्ष, कृत्रिमता आढळते.

फेरिअर समाजवादी समाजनिर्मीती साठी आदर्श समूहजीवन संघटना - फलॉग्ज (Phalanxes) पध्दतीचा अवलंब करावा असे सुचवतो. ही एक सामूहीक सहकारी संघटना आहे. ह्याची रचना एका आदर्श वसतीगृहासारखी होती. समाजात स्वतंत्र असे गट असावेत, प्रत्येकी गट सोळाशेवीस (१६२०) व्यक्तीचा असावा. प्रत्येकाने आपल्या आवडीचे काम करावे. हे काम नफ्यासाठी नसून तो एक आनंद स्त्रोत असावा. वेतनापेक्षा नवनिर्मितीचा आनंद मोठा असतो. फलॉग्जचा सभासद एकाचवेळी मजूर, भांडवलदार, व व्यवस्थापक अशा तिहेरी भूमीका वठवत असल्याने तेथे वर्गसंघर्ष नाही. आपल्या ह्या प्रयोगाला लागणारा नीधी फोरीअर जमा करु शकला नाही. त्याच्या सनकाळात त्याचा विचार व प्रयोग फारसा रुजु शकला नाही.

लुई ब्लॅकचा समाजवाद :- (१८११ -१८८२) हा फ्रेंच समाजवादी पत्रकार होता. त्याने नवसमाज निर्मीती साठी लोकशाही व सहकारी समाजवाद यांचा पुरस्कार केला होता. म्हणूनच त्यास लोकशाही समाजवादाचे प्रवर्तक असे म्हटले जाते. १८४० मध्ये त्याने आपले द ऑरगेनॅझेशन ऑफ लेबर" हे पुस्तक प्रकाशीत केले. शिवाय तो इतिहासकार असुन त्याने पाच खंडात 'हिस्ट्री ऑफ टेन इयरस" प्रसिध्द केले.हया ग्रंथात त्याने लुई फिलीप्स च्या राज्यव्यवस्थेवर प्रखर टिका केली.

१८४८ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने लुई ब्लॅकला आपले समाजवादी विचार पसरवण्याची मोठी संधी दिली. १७४८ च्या क्रांतीनंतर जे हंगामी सरकार सत्तेदर आले त्याचा लुई सभासद होता. त्यावेळी अनेक कार्यशाळा भरवून बेकरि निर्मुलनासाठी त्याने प्रयत्न केले. सामाजिक सुधारणा व कामगार कल्याण साधण्याचे प्रशासन हे महत्त्वाचे साधन आहे असे तो मानत असे.

ब्लॅकच्या मते आर्थिक स्पर्धा हे अनर्धाचे कारण आहे. सहकाराच्या तत्वावर समाज निर्मीती करणे त्याला अपेक्षित होते. सहकारी समाजवाद हाच भांडवलशाहीला पर्याय आहे असे तो मानत असे. त्याचा हा समाजवाद कामगार वर्गास आवडला मात्र भांडवलदारांला पटला नाही त्याचे सर्व समाजवादी प्रयोग फसल्यामुळे त्याला फ्रांसयुध्द हद्दपार करण्यात आले पुढे १८७१ पर्यंत इंग्लंडमध्ये विजनवासात होता.

आपली प्रगती तपासा

१. रॉबर्ट ओवेनच्या समाजवादस काय म्हणतात ?

_____

_____

_____

मार्क्सवादाची मांडणी

मार्क्सवादाची मांडणी प्रामुख्याने कार्लमार्क्स आणि त्याचा परममित्र फ्रेडरिक एंगल्स यांनी केलेली असली तरी त्यात मोलाची भर अनेक विचारवंतांनी घातलेली आहे. त्यात प्रामुख्याने लेनीन, स्टॅलिन, बाकुलीन, रोझा, लक्झेंम्बर्ग, ग्रामची, लुकास, माओ त्से तुंग, दिब्रे आणि ची गुव्हेरा यांचा उल्लेख करावा लागेल.

मार्क्सवाद ही समाजवादी तत्वप्रणाली असली तरी त्याचे आगळे-वेगळे क्रांतिकारक स्वरुप स्पष्ट व्हावे म्हणून त्यास 'साम्यवाद', 'शास्त्रीय समाजवाद, 'प्रागतिक समाजवाद' अशाही संज्ञा वापरल्या जातात. या मार्क्सवादाच्या उदयाच्या तपशील पुढीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

कार्लमार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांनी प्रसिध्द केलेल्या 'साम्यवादी जाहीरनामा' (कम्युनिस्ट मॅनीफेस्टो-१८४८), मार्क्स लिखित 'राजकीय अर्थशास्त्रावरील टीकेस योगदान' (कॉन्ट्रीब्युशन टू द क्रिटीक ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी-१८५९) आणि 'भांडवल' (द कॅपीटल- १८६७) या ग्रंथातून मार्क्सवादाची प्रथमतः मांडणी झालेली आहे. यापैकी भांडवल हा ग्रंथ तीन खंडात प्रसिध्द झालेला आहे. पहिला खंड १८६७ साली मार्क्सच्या हयातीतच प्रसिध्द झालेला होता. नंतरचे दोन खंड १८८५ व १८९४ मध्ये मार्क्सच्या मृत्युनंतर एंगल्सने प्रसिध्द केले होते.

या ग्रंथातून मार्क्सने स्पष्ट केले आहे की, आपणास नवी न्याय समाजरचना निर्माण करावयाची असेल तर सामाजिक उत्क्रांतीच्या ऐतिहासिक भौतिक प्रेरणा समजावून घेतल्या पाहिजेत. मार्क्सच्या मते प्रथम समाजातील उत्पादन वितरण तंत्र बदलते व नंतर इतर व्यवस्थात बदल होतो. पर्यायाने प्रथम अर्थव्यवस्थेत परिवर्तन होते; ते परिवर्तन सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिवर्तन घडवून एकूण नवी समाजव्यवस्था घडविते. या मुलभूत विचारावर मार्क्सवादाची संपूर्ण मांडणी झालेली दिसून येते.

मार्क्सवादाची मांडणी आपण तीन घटकात समजावून घेऊ शकतो. प्रथमतः मार्क्सने परस्परविरोधी विकासक्रमावर आधारलेला भौतिकवाद (डा-लेक्टिकल मटेरि-नालिझम) आणि ऐतिहासिक भौतिकवाद (हिस्टॉरिकल मटेरि-नालिझम) -ना दोन तत्वाच्-ना आधारे गतकालतील व वर्तमानकालीन समाजाचे टीकात्मक परीक्षण केलेले आहे. दुसरे म्हणजे वर्तमान भांडवलशाही समाजात शोषण व वर्गसंघर्ष कसा आहे त्-ाचे विवेचन करुन त्-ामुळे निर्माण होणा-ना दुष्परिणामांना टाळून नवसमाज निर्मिती कशी करता -ेईल -ांची मीमांसा केलेली आहे. ती मीमांसा करतांना 'अतिरिक्त मूल्-न सिध्दान्ताच्-ना' (थिअरी ऑफ सरप्लस व्हॅल्-ू) आधारे भांडवलदार वर्ग हा श्रमिक वर्गाचे शोषण कसे करतो हे स्पष्ट केले आहे. तर 'वर्ग संघर्षाच्-ना सिध्दान्ताच्-ना' (थिअरी ऑफ क्लास स्ट्रगल) आधारे -ना शोषणाची परिणीती समजात अन्-ा-न, असंतोष, संघर्ष व क्रांती -ात कशी होते हे स्पष्ट करण्-ाचा प्र-त्न मार्क्सने ऐतिहासिक पुरावे देऊन केलेला आहे.

नवसमाजरचना ही 'संपत्तीचे सामाजिकरण' -ना तत्वावर आधारलेली असेल. म्हणजेच संपत्तीच्-ना उत्पादनाची साधने (शेती, व्-ापार, उद्योग, वाहतूक-दळणवळण सेवा इ.) व्-यक्तिगत खाजगी मालकीच्-ना न राहता सर्व समाजाच्-ना मालकीच्-ना असतील. ही नवी समाजरचना 'वर्ग विरहीत आणि राज्-न विरहीत' असेल. भांडवलशाहीतून व्-यवस्थेत समाजाचे रुपांतर करतांना प्रथम संक्रमणकालात समाजवाद स्वीकारला जाईल. त्-ात संपत्तीचे समाजात वितरण प्रत्-येकास त्-ाने संपत्ती निर्मितीत जे श्रम खर्ची केलेले आहेत. त्-ा आधारे होईल. आणि प्रगत साम्-यवादी व्-यवस्थेत संपत्तीचे वितरण 'प्रत्-येकाच्-ना कार्-क्षमतेनुसार आणि प्रत्-येकाच्-ना गरजेनुसार होईल.'

मार्क्सने तिस-ना घटकात नवसमाज निर्मिती कशी करता -ेईल? -ाचा विचार मांडला आहे. श्रमिक वर्गाचे शोषण करुन त्-ास दुरावस्थेत नेणारी भांडवलशाही व्-यवस्था क्रांतीच्-ना मार्गानेच नष्ट करावी लागेल. त्-ासाठी श्रमिकांनी संघटीत व्हावे व 'सशस्त्र क्रांती' करावी. राज्-न-ंत्रणा ताब्-ात घ्-ावी. भांडवलशाही व्-यवस्थेतून समाजास साम्-यवादी व्-यवस्थेत रुपांतरित करतांना मधल्-ा संक्रमण काळात 'श्रमिकांची हुकूमशाही' निर्माण करावी. त्-ाद्वारे 'संपत्तीचे सामाजिकरण' करावे. वर्गविरहीत व राज्-नविरहीत समाज निर्माण करावा.

आपली प्रगती तपासा :

१. वर्गविरहित समाजरचना म्हणजे काय?

_____

_____

८.४-ा मार्क्सच्-ना तीन घटकातील तत्वांचा आपण विस्तृतपणे परामर्श घेऊ.

१. द्वंद्वात्मक वस्तुवाद (डा-लेक्टिकल मटेरि-नालिझम) : मार्क्सच्-ना विचाराचा पा-ा प्रथमतः ' द्वंद्वात्मक वस्तुवाद' हे तत्व आहे. -ा तत्वावरच मार्क्सने 'ऐतिहासिक भौतिवादाचा सिध्दान्त' मांडून मानवी समाजाच्-ना ऐतिहासिक उत्क्रांतीचे स्पष्टीकरण दिलेले आहे. मार्क्सने हे तत्व प्रथम आपल्-ा 'कॅपिटल' -ा ग्रंथात मांडले व एंगल्सने त्-ाचा विस्तार आपल्-ा 'अँटी दुहरिंग' ग्रंथात केलेला आहे. द्वंद्वात्मक वस्तुवाद हे तत्व दोन घटकांनी निर्माण झालेले आहे. एक द्वंद्वात्मक विकास किंवा विरोध विकासवाद आणि दुसरे वस्तुवाद (किंवा भौतिकवाद) द्वंद्ववादाचे

तत्व मार्क्सने हेगेलच्-ा आदर्शवादी विचारसरणीतून स्वीकारलेले आहे. मात्र ते स्वीकारतांना आदर्श वादाऐवजी भौतिकवादाचा आधार मार्क्सने घेतलेला आहे. द्वंद्ववादाची बीजे प्राचीन ग्रीक संस्कृतीत आढळतात. ग्रीक चर्चा किंवा वाद -ा संदर्भात ग्रीक 'डा-लेक्टिकल' हा शब्द प्र-ोग वापरीत असत. चर्चा किंवा वादात विरोध किंवा प्रतिसाद करणारा दुसरा पक्ष म्हणजे प्रतिवाद. वाद आणि प्रतिवाद -ातील सत्-ा स्वीकारुन दोन्हींचा समन्व-ा साधला जातो, तो नवा समन्व-ा म्हणजे सुसंवाद होय. द्वंद्ववाद म्हणजे एक परिवर्तन प्रक्रि-ा आहे. हे परिवर्तन दोन तत्वशील विरोध, संघर्ष व समन्व-ा -ा पध्दतीने व विकासाच्-ा दिशेने होते. ही परिवर्तन प्रक्रि-ा गुंतागुंतीची असते. सामाजिक परिवर्तने देखील -ाच पध्दतीच्-ा प्रक्रि-ेने होत असतात. एंगल्सच्-ा मते द्वंद्ववाद म्हणजे निसर्ग, समाज आणि विचार -ातील विकास प्रक्रि-ा समजावून घेण्-ाचे शास्त्र आहे.न्द्वंद्ववाद वस्तुवाद किंवा द्वंद्वात्मक भौतिकवाद -ा तत्वात दुसरा घटक आहे. 'वस्तुवाद किंवा भौतिकवाद' (मटेरि-ालिझम) भौतिकवाद म्हणजे -ा विश्वात जे जे अस्तित्वात आहे ते ते वास्तव आहे जे जे वास्तव आहे ते ते भौतिक आहे असे समजले जाते. एंगल्सने द्वंद्वात्मक भौतिकवादाचे विश्लेषण करतांना काही त्-ाचे मूलभूत नि-म प्रतिपादलेले आहेत. ते म्हणजे.

१. रुपांतर नि-म : -ा नि-मानुसार मात्रात्मकाचे हळूहळू परिवर्तन क्रांतिकारक गुणात्मक बदलात होते.

२. ऐक्-ाचा नि-म : -ा नि-मानुसार प्रत्-क्ष वास्तवाचे ऐक्-ा म्हणजे परस्पर विरोध किंवा विसंगतीचे ऐक्-ा होय.

३. नकाराचा नि-म : -ा नि-मानुसार दोन्ही परस्पर विरोधी तत्वे परस्परांना नाकारतात व त्-ातून विकास होतो. -ा विकासात दोन्ही परस्पर विरोधी तत्वातील चांगला भाग स्वीकारला जातो.

मार्क्सचा विरोध विकास वाद : मार्क्सने प्रथम उल्लेख केल्-ाप्रमाणे द्वंद्ववाद अथवा विरोधविकासवाद हेगेलपासून स्वीकारलेला आहे. हेगेलचे तत्वज्ञान 'विरोध विकासवादावर आधारलेला आदर्शवाद' म्हणून संबोधले जाते. हेगेलच्-ा मते जगाचा इतिहास हा मानवाची आदर्शाप्रत वाटचाल आहे. आणि इतिहासातील विविध अवस्था म्हणजे -ा संकल्पित आदर्शाची व्-ाक्तरुपे आहेत.

हेगेल -ांच्-ा मते विश्वविकास वाद आणि प्रतिवाद -ांच्-ा संघर्षातूनच होत आहे. हा विकास स्व-ंचलित निरपेक्ष तत्वाचा क्रमशः होत असतो. त्-ाच्-ा मते सर्व विश्वच गतिमान आहे. -ा गतिमान विश्वातील मानवी समाजही गतिमान आहे. गतिमान मानवी जीवनातील प्रगती विरोध विकास क्रमानेच होत आहे. विरोध हे मानवी प्रगतीचे बीज आहे. विश्वातील आणि मानवी समाजातील विकास सरळ होत नाही तर नागमोडी पध्दतीने होतो. वाद-प्रतिवाद-सुसंवाद -ा पध्दतीने होतो. सुसंवादी समन्व-ी तत्व पुन्हा वाद म्हणून प्रस्थापित होते नवतंत्राच्-ा शोधाने ते प्रस्थापित तत्व नकोसे होते. त्-ाला प्रतिवाद केला जातो. प्रस्थापित तत्व आणि विरोधी तत्व -ात पुन्हा समन्व-ा साधून नवे तत्व, नवी व्-ावस्था उद-ास -ेते. ही प्रक्रि-ा सातत्-ाने सुरु असते.

मार्क्सने हेगेलच्-ा -ा द्वंद्वात्मक विकासक्रम किंवा विरोधविकास वादाचा स्वीकार केला. परंतु त्-ाचा आदर्शवाद स्वीकारला नाही. त्-ाऐवजी भौतिकवाद स्वीकारला. हेगेलच्-ा मते मानवी मनात प्रथम आदर्श तत्व जन्मास -ेते व त्-ाचा व्-ावहार्-ा आविष्कार भौतिक वास्तववादी जगात नंतर होतो. मार्क्सने -ाउलट प्रतिपादले की, आपल्-ा भोवतीच्-ा भौतिक जगात प्रथम बदल

घडतो व त्याच्या अवलोकनाने नव्या संकल्पना, विचार आपणास सूचतात. मार्क्सने आत्मतत्वाऐवजी भौतिक व सत्य घटनांची योजना करुन हेगेलच्या विरुध्द सिध्दान्त मांडला आहे. नवी पध्दती सुचविलेली आहे.

मार्क्सने ही जी नवी पध्दती मांडली त्याबद्दल मार्क्स व एंगल्स यांचा दावा आहे की, हेगेलचा द्वंद्ववाद किंवा विरोधविकासवाद 'खाली डोके वर पाय' अशा उलटया अवस्थेत होता. तो आपण नीट पायावर सुलटा उभा केला आहे. तसेच द्वंद्ववादाच्या मुळाशी आदर्श- आत्म्मतत्व नसून भौतिक विश्व हेच कारण आहे. या भौतिकवादाच्या आधारावरच मार्क्सने ऐतिहासिक उत्क्रांतीचे स्पष्टीकरण केलेले आहे.

द्वंद्वात्मक विरोधी विकास कसा होतो हे समजावून घेण्यासाठी आपण इंग्लंडचे उदाहरण घेऊ. सोळाव्या शतकात इंग्लंडमध्ये स्टुअर्ट घराण्याची अनियंत्रित राजसत्ता होती. राजाच्या जुलुमशाहीमुळे राजा प्रजा संघर्ष निर्माण झाला. त्यात प्रज्ञेचा विजय होऊन राजा पहिला चार्ल्स यास फाशी दिले गेले. राजेशाहीला विरोध झाला व प्रजेच्या सैन्याचा प्रमुख ऑलिव्हर क्रॉम्बेल याने आपली 'प्युरीटन पंक्षीय' राजवट सुरु केली. प्रजासत्ताक स्थापन झाले. हे विरोधी तत्व उदयास आले. क्रॉम्बेलचा प्युरिटन पंक्षीय दृष्टिकोन साधे जीवन जगणाऱ्या जनतेला मान्य झाला नाही. पुन्हा इंग्लंडमध्ये दुसऱ्या चार्ल्सची राजसत्ता प्रस्थापित झाली. त्याच्या अन्यायकारक वर्तणुकीला कंटाळून प्रजेने त्याचा जावई हॉलंडचा राजा विल्यम तिसरा व मेरी (राणीची मुलगी) यांना इंग्लंडमध्ये पाचारण केले. चार्ल्स दुसरा परागंदा झाला. विल्यम- मेरी यांची सत्ता मर्यादित झाली. या घटनेस वैभवशाली रक्तशून्य राज्यक्रांती म्हणतात. या क्रांतीने मर्यादित राजसत्ता व लोकशाही ही व्यवस्था निर्माण केली. म्हणजेच नवी व्यवस्था निर्माण केली होती. या उदाहरणात, 'राजेशाही' हा वाद (थेसीस) तर 'प्रजासत्ताक गणराज्य' हा प्रतिवाद (अँटी थेसीस) या दोन व्यवस्थातील संघर्षाने 'नव्या लोकशाही' व्यवस्थेस जन्माला घातले. हा समन्वय होय; किंवा सुसंवाद (सेंथेसीस) होय. नव्या लोकशाही व्यवस्थेत इंग्लंडमध्ये राजसत्ता मर्यादित केली गेली. राजेशाही विरुध्द प्रजासत्ताक या संघर्षात लोकशाही अथवा मर्यादित राजसत्ता हा नवा प्रकार उदयास आला. राजसत्ता * प्रजासत्ता यातील संघर्ष- नवे समन्वयी तत्व- मर्यादित राजसत्ता असा राजकीय विकास संघर्षातून झाला. हीच मर्यादित राजसत्ता प्रत्यक्षात संसदीय लोकशाही होय. राजा नामधारी झाला व जनप्रतिनिधी खरे सत्ताधारी झाले. पंतप्रधान व मंत्रिमंडळ.

द्वंद्ववाद किंवा विरोधी विकासक्रमात मार्क्सच्या मते विरोधी घटक हा प्रस्थापित घटकाचा अस्तित्वात असतो. आणि विरोधी घटकच उत्क्रांती घडवितो. त्याच्याच दुसऱ्या शब्दात प्रत्येक संस्था आपल्या जन्माबरोबरच आत्मनाशाची बीजे घेऊन येत असते. फक्त त्यांचे अस्तित्व असंतुलित असते. एकावेळी एक घटक प्रभावित असतो. तर दुसऱ्यावेळी दुसरा घटक प्रभावी ठरतो व त्यात संघर्ष होतो. म्हणजेच प्रगतीचे घटक आणि विनाशकारी घटक यात सतत संघर्ष होतो. त्यातून पुढचा प्रगतीचा टप्पा गाठला जातो. या पध्दतीने मानवाची ऐतिहासिक उत्क्रांती झालेली आहे व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात याचा प्रत्यय येतो.

मार्क्सच्या द्वंद्ववाद किंवा परस्पर विरोधी विकासक्रम या संकल्पनेचे स्पष्टीकरण एंगल्स, स्टॅलिन आणि माओ त्से तुंग यांनी केलेले आहे. एंगल्सचा विचार आपण प्रथम केलाच आहे. स्टॅलिनच्या मते मार्क्सचा दृष्टिकोन द्वंद्वात्मक म्हटला पाहिजे. कारण मार्क्स नैसर्गिक घटनांचा अभ्यास व आकलन करण्यासाठी द्वंद्वात्मक पध्दत वापरतो. तसेच मार्क्सचा द्वंद्वावाद भौतिकवादी आहे. कारण मार्क्सचा नैसर्गिक घटनांचा विचार आणि अन्वयार्थ भौतिकवादावर आधारलेला

आहे. माओच्या मतेही मार्क्सचे विवेचन बरोबर आहे. ते म्हणजे, समाजातील अंतर्गत विसंगती किंवा विसंवादामुळेच समाजपरिवर्तने प्रामुख्याने होतात. उत्पादनतंत्र किंवा प्रेरक घटकात आणि त्या घटकातील संबंधात तसेच जुन्या-नव्या वर्गातील विसंगती देखील समाज परिवर्तनास कारणीभूत होतात.

मार्क्सचा हा द्वंद्ववाद व्यवहारात रशियामध्ये विशेषतः स्टॅलिनच्या कारकीर्दीत कोलमडून पडला व त्याऐवजी मार्क्सच्या मानवतावादाला महत्व आहे. प्रचलित काळातील मार्क्सवादी हेगेलचा द्वंद्ववाद आणि नैसर्गिक शास्त्रातील भौतिकवाद दोन्हीही नाकारतात. मार्क्सचे द्वंद्ववादी तत्वज्ञान या दशकातील साम्यवादी रशियाच्या विघटनाने आणखी टीकेचा विषय झालेला आहे. संघर्षाऐअव्जी समन्वयाचा आणि शांतताम्य सहजीवनात्मक सहकार्याचा आज पुरस्कार केला जातो.

२. इतिहासाची भौतिकवादी मीमांसा : (मटेरियालिस्टीक इंटरप्रिटेशन ऑफ हिस्टरी) : मानवी इतिहासाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. काही विचारवंतांच्या मते इतिहास केवळ मानवी जीवनात गतकाळात घडलेल्या घटना, झालेल्या चळवळी, निर्माण झालेले विचारप्रवाह, उदयास आलेल्या मानवी संस्था व सत्ता, झालेली चळवळी, निर्माण झालेले विचारप्रवाह, उदयास आलेल्या मानवी संस्था व सत्ता, झालेली युध्दे व सत्तांतरे याची कालमानानुसार सुसंगतपणे केलेली नोंद आहे. तर काहींच्या मते थोर व्यक्तींच्या (हिरो) चरित्र, चारित्र्य, विचार आणि कृतींचा समाज मानसावर पडलेल्या प्रभावाचे वर्णन आहे. परंतु कार्लमार्क्सने मांडलेला इतिहासविषयक दृष्टिकोन आणि मीमांसा ही भौतिक आहे.

कार्लमार्क्सने इतिहासाचे विश्लेषण अथवा मीमांसा करतांना द्वंद्वात्मक भौतिकवादाचे वत्त अंमलात आणलेले आहे. मार्क्सच्यामते मानवी ऐतिहासिक उत्क्रांतीचा प्रेरक घटक आर्थिक अथवा भौतिक परिस्थिती आहे. मार्क्सने आपल्या, ''राजकीय अर्थशास्त्रावरील टीकेस योगदान'' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, ''कोणते तत्व मानवी संबंध नियंत्रित करीत असेल तर ते म्हणजे वस्तूचे उत्पादन व वितरण तंत्र होय म्हणून समाजपरिवर्तनाचे अंतिम प्रेरक घटक हे उत्पादन व वितरण तंत्रातील बदल हेच आहेत; शाश्वत सत्य किंवा सामाजिक न्याय नव्हे.'' तसेच मार्क्सचे मत आहे की, भौतिक-आर्थिक घटकच परिवर्तनाची प्रमुख प्रेरणा आहे. मार्क्स म्हणतो, ''इतिहासात सर्व प्रकारच्या सामाजिक, राजकीय, बौध्दिक संबंध आणि धार्मिक, वैधानिक पध्दती या ज्या निर्माण होतात, त्या जीवनाच्या भौतिक परिस्थितीतूनच निर्माण होत असतात.''

मार्क्सच्या मते उत्पादन व वितरण तंत्रातील अंतिम न्याय अवस्था किंवा परिपूर्ण अवस्था गाठेपर्यंत उत्पादन व वितरण तंत्रात सतत बदल होत राहील. हा बदल मानवी संबंध बदलवील. त्यातून सामाजिक क्रांती अथवा परिवर्तन होत राहील.

मार्क्सचे ऐतिहासिक भौतिकवादी मीमांसेचे तत्व चार गृहितांवर आधारलेले आहे ती गृहिते म्हणजे.

१. मानवी समाजाच्या प्रत्येक बदलत्या अवस्थेवर त्या काळातील विशिष्ट उत्पादन व वितरण व्यवस्थेचा प्रभाव पडलेला असतो. ही उत्पादन व्यवस्था आपली स्वतःची अशी खास गृणवैशिष्ट्ये आणि अनुकूल अशी तत्वप्रणाली निर्माण करीत असते. त्यानुसार कायदे,

राजकारण, धर्म, नीतिमूल्ये, कला आणि तत्वज्ञान निर्माण होत असते. जे सर्व काही प्रस्थापित व्यवस्थेस पोषक असते.

२. व्यवस्था परिवर्तन प्रक्रिया द्वंद्वात्मक विरोध विकासात्मक असते. त्याची प्रेरणा व्यवस्था अंतर्गत तणाव ही असते हे तणाव जुनी प्रस्थापित तत्वप्रणाली व नव्याने उदयास आलेली उत्पादन व्यवस्था यातील विसंगतीतून निर्माण झालेले असतात.

३. व्यवस्था परिवर्तनात तत्वप्रणालीच्या प्रेरणेपेक्षा उत्पादन बदलाची प्रेरणा प्रभावी ठरते कारण भौतिक अथवा आर्थिक प्रवाह हे वास्तव आणि शक्तिमान असतात आणि तत्वप्रणालीवर आधारलेले संबंध हे वरवरचे किंवा प्रासंगिक असतात.

४. व्यवस्था परिवर्तनातील द्वंद्वात्मक विरोधविकास हा एक प्रकारे व्यवस्था अंतर्गत अस्तित्वात असलेल्या सुप्त प्रक्रियेचा उघडपणे व्यक्त झालेला आविष्कार असतो.

मार्क्सने उत्पादनतंत्राच्या पध्दतीच्या आधारे मानवी जागतिक इतिहासाच्या पाच अवस्था मानल्या आहेत. या प्रत्येक अवस्थेची स्वतंत्र सामाजिक आणि आर्थिक रचना आहे आणि त्या एका पाठोपाठ निर्माण झाल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. अतिप्राचीन काळातील साम्यवादी अवस्था : या अवस्थेत मानव भटक्या शिकार अवस्थेत होता. निसर्गनिर्मित वस्तूंवर तो उपजीविका करीत असे. मालकी हक्क, संपत्ती, कुटूंब यांची निर्मिती झाली नव्हती. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष नव्हता. सर्व सर्वांच्या मालकीचे व सर्वांना त्याच समान उपभोग होत असे. उदा. शिकार केल्यानंतर त्याची वाटणी सर्वात समान रितीने होत असे. नंतर शेतीचा शोध लागला. भटकी व्यवस्था मानवाची संपली. शेतजमीन मालकीची संकल्पना आली. प्राचीन साम्यवादी व्यवस्था नष्ट झाली.

२. प्राचीन संस्कृती काळातील गुलामगिरीची अवस्था : शेती-पशुपालन अवस्थेत मानवी जीवन स्थिर झाले. मालमत्तेवर आधारलेली समाजरचना आकार घेऊ लागली. कुटूंब व्यवस्था निर्माण झाली. मालमत्ता मालकीवरुन टोळी-टोळीत संघर्ष होऊ लागले. सर्वांत बलवान असलेला टोळी नायक वर्चस्व गाजवू लागला. तोच राजा बनला. राजा-राज्य-राजसत्ता उदयास आली. जेते स्वतंत्र नागरिक व जेते गुलाम अशी व्यवस्था निर्माण झाली. मालक-गुलाम वर्ग निर्माण झाले. गुलामांच्या श्रमावर शेती, वाहतूक, बांधकामे इ. होऊ लागली. गुलामांच्या शोषणाने असंतोष निर्माण होऊन व्यवस्था अंतर्गत विरोध-तणाव निर्माण झाले. त्यामुळे ही व्यवस्था नष्ट झाली.

३. मध्ययुगातील सरंजामशाही अवस्था : या अवस्थेत जमीनदार आणि भूदास असे दोन वर्ग निर्माण झाले. जमीनदार ज्यांच्या मालकीची शेतजमीन आहे ते व भूदास जे जमीनदाराच्या शेतजमिनीवर राबतात ते. मार्क्सच्या मते जमीनदारवर्ग भूदासंच्या कष्टावर जगणारा 'परान्नपुष्ट' होता. भूदासांच्या शोषणाने पुन्हा व्यवस्था अंतर्गत विरोध व विसंगती निर्माण झाल्याने संघर्ष निर्माण होऊन ही व्यवस्था देखील नष्ट झाली.

४. अठराव्या शतकातील औद्योगिक क्रांतीने नवे उत्पादन तंत्र, यंत्राच्या साहयाने वस्तूंचे प्रचंड उत्पादन, कारखानदारी, यामुळे भांडवलशाही व्यवस्था निर्माण झाली. तशी मानवी इतिहासातील ही प्रगत अवस्था यात मालक व मजूर किंवा भांडवलदार व श्रमिक हे दोन वर्ग निर्माण झाले. भांडवलदार वर्ग हा श्रमिकांच्या श्रमावर जगणारा परान्नपुष्ट होता. संपत्तीच्या समाजातील विषम वितरणामुळे संपत्ती असलेला 'आहे रे' चा वर्ग व संपत्ती नसलेला 'नाही रे' चा वर्ग निर्माण झाला. श्रमिकांच्या शोषणामुळे पुन्हा व्यवस्थेत अंतर्विरोध निर्माण होतो. त्यातच भांडवलशाही नष्ट होते. त्यातून नवी व्यवस्था निर्माण होईल. ती व्यवस्था म्हणजेच समाजवादी अवस्था होय.

५. भांडवलशाही व्यवस्था नष्ट झाल्यावर समाजवादी व्यवस्था निर्माण होईल. यात संपत्ती निर्माण करण्याची साधने समाजाच्या मालकीची असतील. खाजगी मालकी नष्ट केली जाईल. त्यामुळे संपत्तीचे समान वितरण व समान उपभोग राहील. सर्व संपत्तीनिर्मिती कृतीत उत्स्फूर्तपणे सहभागी होतील. वर्ग विरहित- राज्यविरहित समाज निर्माण होईल. ज्यात संघर्ष, स्पर्धा, व अशांतता असणार नाही. उलट सहकार्य, सहजीवन, सामंजस्य व शांतताम्य भावी जीवन असेल. कोणी कुणाची पिळवणूक करणार नाही. त्यामुळे वर्ग संघर्षही राहणार नाही. या व्यवस्थेत अंतर्गत विरोध विसंगती राहणार नसल्याने ही व्यवस्था स्थिर राहील.

आपली प्रगती तपासा :

१. मार्क्सप्रणित मानवी जागतिक इतिहासाच्या अवस्था सांगा ?

_____

_____

८.५ इतिहासाच्या भौतिक मीमांसेचे परीक्षण

१. एकांगी मीमांसा : मार्क्सने इतिहासाचे विवेचन करताना केवळ आर्थिक-भौतिक घटनांचा महत्व दिलेले आहे. ऐतिहासिक घटनांच्या प्रेरणा विविध असतात. याकडे मार्क्सने सोयीस्कर दुर्लक्ष केलेले आहे. उदाहरणार्थ, भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीची घटना जर आपण लक्षात घेतली तर त्यास भारतीयांच्या आर्थिक, नैतिक व धार्मिक शोषणामुळे उफाळलेल्या असंतोषाबरोबरच अहिंसक लढे, क्रांतिकारकाचे कार्य, आझाद हिंद सेनेची धडक, दुसऱ्या महायुध्दाने जर्जर झालेले इंग्लंड, अमेरिकेची सहानुभूती, भारतीय नौदलातील बंड, इत्यादी अनेक घटक कारणीभूत झालेले दिसून येतात. येथे सबाईन यांचे विधान महत्वाचे आहे. ते म्हणतात. ''मानवी इतिहासात आर्थिक घटक हा एक घटक आहे. पण एकमेव नाही.''

२. स्थलकाल परिस्थितीकडे दुर्लक्ष : मार्क्सची इतिहासाची भौतिक मीमांसा एक सर्वव्यापी तत्व ठरु शकत नाही. कारण ऐतिहासिक घटनांना स्थल, काल व परिस्थितीचा संदर्भ प्राप्त झालेला असतो. हा संदर्भ अनेक वेळा आर्थिक नसतो तर मानसिक- भावनिक देखील असतो. रसेल यांनी म्हटले आहे की, ''राष्ट्रवाद हा मानवी इतिहासातील महत्वाचा प्रभावी घटक आहे.'' आणि राष्ट्रवाद ही एक भावना आहे; एक मानसिक अवस्था आहे. बाल्कन राष्ट्रांचा राष्ट्रवाद हे त्याचे ठळक उदाहरण आहे.

३. धार्मिक घटकाकडे दुर्लक्ष : मानवी इतिहासात धर्म -ा घटकाने देखील प्रभावी भूमिका वठविलेली आहे. त-ाकडे मार्क्सचे दुर्लक्ष झालेले आहे. मध्-ुगात तीन शतके सातत-ाने झालेली ख्रिश्चन व इस्लाम धर्मि-ातील धर्म-ुध्दे, धर्मसुधारणा चळवळ, किंवा भारतात आधुनिक काळात झालेले पहिले स्वातंत्र्-ा समर -ात धर्म हा घटकच प्रभावी आहे. आजही जागतिक राजकारणात मुस्लिमधर्म, पुनरुज्जीवनवाद प्रभावी घटक झालेला आहे.

४. व्-क्तिगत प्रभाव : मार्क्सने ऐतिहासिक घडामोडीत प्रभावी व्-क्तीमत्व असलेल-ा विचारवंत आणि राज्-कर्त-ी व्-क्ती -ांच-ा प्रभावकडेही दुर्लक्ष केलेले आहे. उदाहरणार्थ प्राचीन काळात ॲडॉल्फ हिटलर -ांचा तसेच फ्रेंच क्रांतीकाळात विचारवंत तुर्गो, रुसो आणि व्हॉल्टेअर, अमेरिकन क्रांतीकाळात थॉमस जेफरसन, थॉमस पेन आणि जॉर्ज वॉशिंग्टन -ांचा पडलेला प्रभावही महत्वाचा आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

५. तत्वप्रणालींचा प्रभाव : आधुनिक जगाच-ा इतिहासात राष्ट्रवाद, समाजवाद, मानवतावाद आणि उदारमतवाद -ा विचारसंपत्तीचा प्रभाव ऐतिहासिक घडामोडी घडतांना झालेला आहे. हे देखील लक्षात घेतले पाहिजे. खुद्द मार्क्सवादाचा प्रभाव रशि-ातील साम्-ावादी किंवा बोल्शेविक क्रांतीवर पडलेला आहेच.

६. शास्त्री-ा शोध व तंत्रज्ञानाचा प्रभाव : आधुनिक काळात मानवाने लावलेले शास्त्री-ा शोध आणि शोधलेले नवे तंत्रज्ञान -ाचाही प्रभाव मानवाच-ा ऐतिहासिक विकासावर झालेला आहे. -ाचीही नोंद घेतली पाहिजे. औद्योगिक क्रांती, संसूचन क्रांती इ. अनेक उदाहरणे -ासाठी देता -ेतील.

वरील मुद्यांबरोबरच मानवाची सांस्कृतिक भूक, तात्कालिक घटकांचा प्रभाव, साहित-ाचा प्रभाव असे घटकही इतिहास घडवितांना दिसून -ेतात.

-ा टीकेचा परामर्श घेऊन एंगल्स -ांनी मत मांडले आहे की, इतिहासावर अनेक घटक प्रभाव टाकतात त-ापैकी आर्थिक घटकाचा प्रभाव जास्त असतो. एवढेच मार्क्सला आपणावर बिंबवा-ाचे होते हे लक्षात घेतले पाहिजे. हीच भूमिका शुम्पीटर -ांनी मांडून म्हटले आहे की, अलिकडच-ा काळात नव्-ाने निर्माण झालेल-ा घटकांच-ाकडे मार्क्सने दुर्लक्ष केले असे म्हणणे हे मार्क्सवर अन्-ा-ा करण-ासारखे आहे.

८.६ वर्गसंघर्षाचा सिध्दांत (थेअरी ऑफ क्लास स्ट्रगल)

मार्क्सच-ा ऐतिहासिक भौतिक वादाच-ा तत्वाची तार्किक परिणिती म्हणजे त-ाने मांडलेला वर्गसंघर्षाचा सिध्दांत हो-ा. -ासच वर्गकलहाचे किंवा वर्गविग्रहाचे तत्व असेही म्हटले जाते. मार्क्सच-ा मते मानवजातीचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. आणि हा संघर्ष संपत्तीची उत्पादनाच-ा साधनावर मालकी असणारा वर्ग आणि नसणारा वर्ग -ात संघर्ष वेगवेगळ-ा कालखंडात दिसून -ेतो. तसेच हा संघर्ष जोप-र्ंत समाजव्-वस्था आणि अर्थव्-वस्था -ावर कामगारांचे नि-ंत्रण प्रस्थापित होऊन त-ांना सर्वप्रकारच-ा शोषण, जुलूम, वर्गभेद व वर्ग संघर्षापासून मुक्तता मिळत नाही तोप-र्ंत सुरु राहील. आणि ही मुक्तता मिळण-ासाठी वर्गविरहित व राज्-विरहित समाज निर्माण केला पाहिजे.

मार्क्सच्या मते ऐतिहासिक द्वंद्वात्मक विकास होण्यामागील प्रेरणा राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष नसून वर्गसंघर्ष आहे. या वर्गसंघर्षातूनच मानवजातीचा उत्कर्ष साधला गेलेला आहे. म्हणूनच मार्क्स मानवजातीचा संपूर्ण इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास मानतो. मार्क्स 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' साम्यवादी जाहीरनाम्यात लिहितो, ''सध्या अस्तित्वात असलेल्या संपूर्ण मानवजातीचा इतिहास हा वर्गसंघर्षाचाच इतिहास आहे. स्वतंत्र पुरुष आणि गुलाम, उच्चकुलीन आणि सामान्य, जमीनदार आणि भूदास, कारखानदार व कामगार, म्हणजेच जुलूम करणारा आणि जुलूमाने गांजलेला हे दोन्ही वर्ग आपापसात सतत संघर्ष करीत आलेले आहेत. ह्या दोन्ही वर्गांनी परस्परांशी कधी गुप्तपणे तर कधी उघडपणे सतत लढा चालू ठेवला आहे. त्यात कधी क्रांती होऊन समाजाची पुनर्घटना झाली आहे तर कधी परस्परांशी झगडणाऱ्या दोन्ही वर्गांचा सारखाच नाश झाला आहे.

मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिक मीमांसेनुसार मानवी इतिहासाच्या महत्वाच्या युगात अथवा समाज जीवनाच्या अवस्थेत आपणास वर्गसंघर्ष झालेला दिसून येतो आणि ते होण्याचे कारण म्हणजे वस्तू उत्पादनतंत्रात बदल झाल्याने समाजातील आर्थिक वर्ग बदलतात. प्रस्थापित वर्गाऐवजी नवे आर्थिक वर्ग उदयास येतात. समाजाची विभागणी नेहमी प्रामुख्याने दोन विरोधी वर्गात होते. संपत्तीच्या निर्मितीची साधने मालकीची असलेला मूठभर लोकांचा वर्ग आणि संपत्ती नसलेला बहुजनवर्ग, संपत्तीधारक 'आहे रे' चा वर्ग 'नाही रे' च्या वर्गाची आर्थिक पिळवणूक करतो, अन्याय करतो. त्याचा प्रतिकार होणे स्वाभाविक आहे.

मार्क्सने या वर्गसंघर्षाचा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. त्याच्या मते प्राचीन रोमन साम्राज्यात उच्चकुलीन, स्वतंत्र आणि मालमत्ता धारकांचा वर्ग आणि दुसरा सामान्यांचा, गुलामाचा आणि गरीबांचा वर्ग होता. उच्चकुलीन मालक हे गरीब गुलामांची पिळवणूक करीत असत. त्यामुळे समाजात असंतोष होताच. त्यात संघर्ष होण्यास भौतिक बदल प्रेरणादायी ठरला. मालकांना शेती व्यवसाय गुलामांच्या व्यापाराऐवजी जास्त फलदायी वाटू लागला. आणि गुलामांना स्वतंत्र व्हावेसे वाटू लागले. त्यामुळे मालक-गुलाम वर्गात संघर्ष होऊन मालकांनी शेती व्यवसाय पत्करला. मालकवर्गाचे रुपांतर प्रामुख्याने जमीनदार-शेतकरी वर्गात झाले. तर गुलामवर्गाचे रुपांतर शेतमजूर भूदास वर्गात झाले. मध्ययुगात सरंजामी व्यवस्थेत जमीनदारांचा संपत्तीधारक वर्ग आणि संपत्ती नसलेला भूदासांचा वर्ग अशी समाजरचना सर्वत्र निर्माण झाली. या समाजरचनेत भूदासांचे शोषण होऊ लागले. त्यांच्यावर होणारे अन्याय व जुलूमजबरदस्तीमुळे वर्गीय संबंध बिघडून संघर्ष निर्माण झाला. औद्योगिक क्रांतीमुळे जमीनदार- भूदास संघर्ष तीव्र होऊन जमीनदार वर्गाने शेतीऐवजी कारखानदारी पत्करली. नवा भांडवलदार वर्ग निर्माण झाला. भूदासवर्गाचे रुपांतर कामगार अथवा श्रमिकवर्गात झाले. भांडवलदार व श्रमिक असे नवे वर्ग निर्माण झाल्याने मानव सरंजामी अवस्थेतून भांडवलशाही अवस्थेत आला.

या भांडवलशाही व्यवस्थेत उत्पादन, विनिमय, वितरण आणि मालमत्तेचे स्वरुप बदलामुळे भांडवलदारांच्या अंगी राक्षसी सामर्थ्य निर्माण झाले. श्रमिकवर्गांच्या शोषणाचे नवमार्ग आणि तंत्र शोधले जाऊ लागले. श्रमिकांचे शोषण करुन भांडवलदार वर्ग स्वतः श्रम न करता सुखासीन चैनी जीवन जगू लागला. श्रमिकांचे न्याय हक्क डावलून त्यांच्यावर अन्याय- जुलूम जबरदस्ती करु लागला. परिणामतः श्रमिकांमध्ये त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची चीड निर्माण होऊन वर्ग संघर्ष सुरु झाला. त्यामुळे भांडवलशाहीतही आरिष्टे कोसळत आहेत.

भांडवलशाहीतील वर्गसंघर्ष जोपर्यंत श्रमिकांवर अन्याय होत आहे. तोपर्यंत सातत्याने सुरुच राहील. वर्गसंघर्ष काय्मस्वरुपी दूर करावयाचा असेल तर मार्क्सच्या मते कामगारांची सत्ता प्रस्थापित करुन वर्गविरहित, राज्यविरहित समाजवादी अथवा साम्यवादी समाज निर्माण करणे आवश्यक व अपरिहार्य आहे. म्हणून मार्क्सच्या मते मानवी जीवनाची पुढील ऐतिहासिक अवस्था 'समाजवादी अथवा साम्यवादी असेल' असे भाकित केलेले आहे.

८.७ वर्गसंघर्षाच्या सिध्दांताचे परीक्षण

मार्क्सच्या वर्गसंघर्षाच्या सिध्दांतावर अनेक अंगांनी टीका झालेली आहे. त्याचा परामर्श पुढीलप्रमाणे घेता येईल.

१. वर्ग समन्वय : मार्क्सने युरोपीय देशातील कामगारांमध्ये ते संघटित होऊन क्रांतीस सिध्द व्हावेत यासाठी, म्हणजेच कामगारात सतत असंतोष खदखदत राहावा आणि त्यांच्यात भांडवलशाही विरुध्द लढाऊ प्रेरणा निर्माण व्हाव्यात या भूमिकेतून वर्ग संघर्षाचा सिध्दांत मांडलेला आहे. परंतु प्रत्यक्षात समाजात वर्ग संघर्षाऐवजी वर्ग समन्वय साधलेला दिसून येतो.

मार्क्सने इंग्लंडचे औद्योगिक व सामाजिक जीवन आपल्या विश्लेषणासारखी आधार म्हणून घेतलेले होते. त्या इंग्लंडमध्येच वर्गसंघर्ष किंवा कामगारक्रांतीचे वातावरण निर्माण झाले नाही. कारण भांडवलदारांनी उदारपणे श्रमिकांबरोबर तडजोड केली. त्यांना वाढीव वेतन व सामाजिक सुरक्षा प्राप्त करुन दिली. त्यामुळे कामगार वर्ग संतुष्ट झाला. तो उलट उद्योग- व्यवसायाचे हितसंवर्धन करु लागला. त्यामुळे समाजात वर्गसमन्वय आणि सहचर्याचे वातावरण निर्माण झाले. हेच चित्र अमेरिका आणि जपान यासारख्या समृध्द देशात आज दिसत आहे.

२. वर्ग या संकल्पनेचा अपूर्ण विचार : मार्क्सने वर्ग या संकल्पनेचे परिपूर्ण विवेचन केलेले नाही. मार्क्सने केवळ आर्थिक दृष्टिकोनातून भांडवलदारवर्ग आणि श्रमिकवर्ग कल्पिलेले आहेत. मध्यवर्गास तो दुर्लक्षितो. वस्तुतः समाजात अनेक वर्ग असतात व त्यांचे आधार वेगवेगळे असतात.

मॅक्स वेबर यांनी वर्ग संकल्पना मांडतांना आर्थिक घटकांच्या समान सांस्कृतिक आणि सामाजिक प्रतिष्ठा-दर्जा यास महत्व दिले आहे. तसेच वर्ग संकल्पनेचा आधार सत्तादेखील असतो हे स्पष्ट केले आहे.

भारतीय तत्वज्ञानानुसार व्यक्तीची गुण संपदा आणि कार्य यानुसार सामाजिक वर्गरचना निर्माण झालेली आहे. श्रीमद् भगवद् गीतेत स्पष्ट म्हटलेले आहे, ''चातुर्वर्ण्यं मयासृष्टं गुण कर्म विभागश : I '' (मी, (श्रीकृष्ण) समाजाची विभागणी गुण-कर्म या आधारे चारवर्णात = ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्गात केलेली आहे.)

व्यावसायिक दृष्टिकोनातूनही आपणास वेगवेगळे वर्ग दिसतात. उदा. शेतकरी वर्ग, व्यापारी वर्ग, उद्योजकांचा वर्ग, शिक्षक वर्ग, कामगार वर्ग, शासकीय नोकरवर्ग, व्यवस्थापकीय वर्ग, पुरोहित वर्ग, इत्यादी, एक वर्गही एकसंघ नसतो. त्यातही उपवर्ग असतात आणि त्यांच्या अस्मिता व हितसंबंध पुन्हा वेगळे असतात. उदा. शिक्षकवर्गात आपणास प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक, महाविद्यालयीन शिक्षक, तंत्रज्ञान अभियांत्रिकी आणि वैद्यक

अध्यापन क्षेत्रातील शिक्षक, विद्यापीठ शिक्षक असे वेगळे स्तर व त्यानुसार उपवर्ग निर्माण झालेले दिसून येतात. त्यांच्या संघटनाही वेगवेगळ्या निर्माण झालेल्या दिसून येतात.

३. मध्यमवर्गाकडे दुर्लक्ष : मार्क्सने आपल्या वर्गसंघर्षाच्या विश्लेषणात मध्यमवर्गाकडे दुर्लक्ष केलेले आहे. मार्क्सच्या मते दोनच सामाजिक वर्ग महत्वाचे आहेत. ते दोन वर्ग म्हणजे एक भांडवलदार आणि दुसरा श्रमिक. मध्यमवर्गाचे अस्तित्व मार्क्स नाकारत नाही. फक्त त्याचे मते मध्यमवर्ग वर्गयुध्दाच्या अंतिम टप्पात भांडवलदार वर्गाविरुध्द श्रमिकवर्गाशीच हात मिळवणी करील. वस्तुतः फ्रेंच राज्यक्रांती किंवा अमेरिकन राज्यक्रांती यात मध्यमवर्गीय विचारवंतांची प्रेरणा व कार्यच क्रांतीला चालना देणारे ठरले होते. वैचारिक अथवा बौध्दिक नेतृत्व देणाऱ्या या वर्गाला मार्क्सने आपल्या विश्लेषणात गौण स्थान दिलेले आहे. सबाईन यांनी म्हटले आहे की, मध्यमवर्ग हा श्रमिक वर्गांशी हातमिळवणी करील व वर्गयुध्दात भांडवलदाराच्या विरोधात उभा ठाकेल हे मार्क्सचे भाकित आधुनिक इतिहासाने खोटे ठरविलेले आहे. फॅसिझमने दाखवून दिले आहे की, इटलीत कनिष्ठ मध्यमवर्गाने श्रमिकवर्गाशी संलग्न होण्याचे हर प्रयत्न ठामपणे हाणून पाडले होते.

४. समाजव्यवस्था परिवर्तनशील व गुंतागुंतींची : मार्क्सने समाजव्यवस्था परिवर्तनशील आहे हे मान्य केलेले आहे. मात्र मार्क्सने समाजात संपत्ती असलेला श्रीमंतवर्ग व संपत्ती नसलेला गरीबवर्ग असे दोनच वर्ग प्रामुख्याने असतात व त्यांच्यात संघर्ष असतो असे म्हटलेले आहे. प्रत्यक्षात समाजात अनेक वर्ग असतात. तसेच 'श्रीमंत व गरीब' या दोन वर्गात समाज विभागला जात नाही. कारण समाजजीवन परस्परावलंबी असते. तसेच या दोन समाजघटकात संघर्षाऐवजी सहकार्यच निर्माण झालेले दिसून येते.

५. भांडवलदार-श्रमिक भेद अव्यवहार्य : प्रचलित आधुनिक औद्योगिक समाजात भांडवलदार व श्रमिक भेद हळूहळू संपुष्टात येत आहे. कारण श्रमिक देखील उद्योग घटकाचे भाग भांडवल (शेअर्स) खरेदी करतात. तेव्हा श्रमिक देखील भांडवल पुरवठा करणारे भांडवलदार ठरतात. अशा परिस्थितीत श्रमिक-भांडवलदार असा संघर्ष संपुष्टात येतो. याच दृष्टिने सबाईन यांनी म्हटले आहे की, '' मार्क्सची वर्ग ही कल्पना संदिग्ध असल्यामुळे त्याच्या भविष्यकाळच्या अंदाजात गंभीर चुका झालेल्या आहेत.''

६. श्रमिकांचे संघटन हे एक स्वप्न : मार्क्सने साम्यवादी जाहीरनाम्यात भांडवलशाही नष्ट करण्यासाठी जगातील सर्व श्रमिकांनी संघटित व्हावे असे आवाहन केलेले असले तरी प्रत्यक्षात जागतिक स्तरावरच का्य पण स्थानिक स्तरावरदेखील श्रमिक संघटित होऊ शकत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. स्थानिक स्तरावर एकजूट न होण्याचे कारण म्हणजे श्रमिकवर्गात असलेले अंतर्गत भेद होय. श्रमिकवर्गात तंत्रज्ञान, लिंग, अनुभव, सेवाज्येष्ठता, कुशलता, तज्ज्ञता इत्यादी अनेक घटकाच्या आधारे भेद निर्माण झालेले असतात. भेदाधिष्ठित प्रत्येक उपगट आपले वेगळे अस्तित्व राखण्याचा सतत प्रयत्न करतो. राष्ट्रीय स्तरावर श्रमिक राष्ट्रवादाने भारलेले व राष्ट्रीय स्वतंत्र अस्तित्व जपणारे असल्याने त्यांची जागतिक स्तरावर एकजूट होऊ शकत नाही.

फ्रँकेल यांनी म्हटले आहे की, फ्रेंच-जर्मन सैनिक एकमेकाविरुध्द लढतात तेव्हा त्यांच्या पाठीशी एतद्देशिय श्रमिक असतात. कारण ते युध्द साहित्य पुरवितात. म्हणजेच युध्द सैनिका-सैनिकात

नसून ते -ुध्द ख-ा अर्थाने श्रमिकांतीलच आहे. म्हणजेच श्रमिक देखील राष्ट्रवादाने भारलेले असतात हा महत्वाचा मुद्दा मार्क्सने दुर्लक्षलेला आहे. अगदी साम्-वादी व्-वस्थातील श्रमिकांचे एक संघटन न होता ते एकमेकाविरुध्द संघर्ष करताना दिसून -ेतात. उदा. रशि-ातील तसेच चीन, व्हिएटनाम -ातील सीमा संघर्ष.

७. मानवजातीचा इतिहास हा केवळ वर्गसंघर्षाचाच नाही : मार्क्सने आपल्-ा विश्लेषणात निष्कर्ष काढलेला आहे की, मानवजातीचा सर्व इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. परंतु हा निष्कर्ष एकांगी आहे. इतिहासात संघर्षाला धर्मप्रेरणा, वैचारिक प्रेरणा, सांस्कृतिक प्रेरणा देखील कारणीभूत झालेल्-ा आहेत. आधुनिक काळातील दोन महा-ुध्दास वर्गसंघर्ष म्हणता -ेणार नाही कारण त्-ाच्-ा प्रेरणा राष्ट्रवाद, साम्राज्-वाद आणि लोकशाही संरक्षण -ा असलेल्-ा दिसून -ेतात.

८. वर्ग विरहित समाज एक भ्रामक संकल्पना : मार्क्सच्-ा मते श्रमिक व भांडवलदार वर्गांच्-ा संघर्षात अंतिम विज-ा श्रमिकांचा होईल, भांडवलशाहीची जागा समाजवादी व्-वस्था घेईल. -ा नव्-ा व्-वस्थेत संपत्तीचे सामाजिकरण केल्-ाने वर्ग व वर्गसंघर्ष समाजात राहणार नाही. परंतु प्रत्-क्ष हे भाकित चुकीचे ठरले आहे. साम्-वादी क्रांती झालेल्-ा रशि-ा आणि अन्-ा पूर्व -ुरोपी-ा देशांत वर्ग नष्ट झाले नाहीत. मिलीव्होन जिलास -ांनी आपल्-ा 'न्-ू क्लास' -ा ग्रंथात स्पष्ट केले आहे की, रशि-ा व अन्-ा साम्-वादी देशात आर्थिक वर्ग नष्ट झाले असतील परंतु सत्तेच्-ा आधारे नवे वर्ग निर्माण झालेले आहेत.

९. नैतिक दृष्ट-ा अ-ोग्-ा संकल्पना : वर्गसंघर्षाची संकल्पना नैतिकदृष्ट-ा अ-ोग्-ा आहे. कारण समाजात जर सतत संघर्ष राहिला तर समाजाला शांतता, स्वास्थ आणि स्थैर्-ा लाभणार नाही. अशा समाजात सतत द्वेष, हिंसाचार आणि असुरक्षिततेचे वातावरण राहिल्-ाने विकास प्रक्रि-ा ठप्प होईल. उत्पादन घडून आर्थिक गर्तेत समाज सापडेल. म्हणजे वर्गसंघर्षाची संकल्पना नैतिकदृष्ट-ा चुकीची व मानवतावादाच्-ा विरोधी आहे.

८.८ अतिरिक्त मूल्-ा सिध्दांत

मार्क्सने भांडवलशाही व्-वस्थेच्-ा विश्लेषणासाठी समाजशास्त्री-ा, ऐतिहासिक आणि अर्थशास्त्री-ा संकल्पनाचा आधार घेतलेला आहे. -ापैकीच्-ा अर्थशास्त्री-ा आधारात त्-ाची महत्वाची संकल्पना 'अतिरिक्त मूल्-ा सिध्दांत' ची आहे. भांडवलशाही व्-वस्थेत श्रमिकांचे शोषण होऊन त्-ा आधारे भांडवलदारांच्-ा हाती भांडवल कसे केंद्रीत होते. त्-ातून बड-ा भांडवलदारांची मक्तेदारी कशी निर्माण होते. प्रचंड औद्योगीकरणातून जादा झालेले उत्पादन राष्ट्राबाहेर खपविण्-ासाठी हुकमी बाजारपेठा मिळविण्-ासाठी होणारी स्पर्धा व त्-ातून निर्माण होणारा साम्राज्-वाद व -ुध्दे -ा सर्वांचे विश्लेषण करण्-ासाठीचा आधार म्हणून मार्क्सने 'अतिरिक्त मूल्-ा सिध्दांत' मांडलेला आहे. थोडक्-ात मार्क्सचा सर्व भांडवलशाही विरोधी विचारांचा डोलारा -ा अतिरिक्त मूल्-ा सिध्दांताच्-ा पा-ावरच उभा राहिलेला आहे.

मार्क्सचे वस्तूमूल्-ाबाबतचे विचार : मार्क्स प्रथम वस्तूचे उप-ुक्तता मूल्-ा आणि विनि-ाम मूल्-ा असा भेद करतो. वस्तूचे उप-ुक्तता मूल्-ा मानवी गरजापूर्ती व त्-ातून मिळणारे समाधान

-नावर आधारलेले आहे. आणि विनि-मय मूल्य एक वस्तू दुस-या वस्तूंची प्राप्ती करण्-यासाठी दिली जाते त्-यावेळी प्रस्थापित होते. मार्क्सने -या विनि-मय मूल्-याचा खास विचार आपल्-या 'अतिरिक्त मूल्य' संकल्पना मांडणीसाठी केलेला आहे.

मार्क्सने वस्तूमूल्य विचार इंग्रज विचारवंत लॉक, ॲडॅमस्मिथ आणि रिकार्डो -यांच्-या पासून घेतलेले आहेत. त्-यांच्-यामते वस्तूचे विनि-मय मूल्य ती वस्तू निर्माण करण्-यासाठी जे मानवी श्रम खर्ची पडले आहेत. त्-यावरुन निश्चित होत असते. मार्क्सने ही वस्तूमूल्य निर्मिती संकल्पना अथवा वस्तूचा श्रममूल्य सिध्दांत स्वीकारलेला आहे; व प्रश्न उपस्थित केला आहे की, जर वस्तूचे मूल्य ती वस्तू निर्माण करण्-यासाठी खर्ची पडलेल्-या मानवी श्रमावर आधारलेले असेल तर श्रमिकास त्-याच्-या श्रमाचा -योग्य मोबदला का दिला जात नाही ? श्रमिकास त्-या मोबदल्-यापासून वंचित का केले जाते ?

आपली प्रगती तपासा :

१. मार्क्सचा अतिरिक्त मूल्य सिध्दांत सांगा ?

_____

_____

८.९ सारांश

मार्क्सच्-या मते श्रमिकाजवळ फक्त उत्पादनशिल 'श्रम' एवढीच संपत्ती आहे. त्-याच्-या साह-याने श्रमिक कारखान्-यात संपत्तीची निर्मिती करतो. श्रमिक आपल्-याला उपभोगास लागणा-या प्रमाणापेक्षा जास्त वस्तू निर्माण करतो. त्-या उत्पादन निर्मितीबद्दल त्-याला जे मोबदला म्हणून वेतन मिळते जे अगदी तुटपुंजे असते. त्-या वेतनात श्रमिक केवळ आपले व कुटूंबि-यांचे केवळ जीवित शाबूत ठेवू शकतो. श्रमिकांचे वेतन आणि कच्च्-यामालाची किंमत वजा जाता वस्तूची जी बाजारातील विक्री किंमत आहे. त्-यातील शिल्लक राहिलेली रक्कम किंवा तफावत जी आहे ती नफा रुपाने भांडवलदारांच्-या खिशात जाते. -या तफावतीस मार्क्स 'अतिरिक्त मूल्य अथवा नफा' असे म्हणतो. अतिरिक्त मूल्य म्हणजे एकप्रकारे भांडवलदारानी श्रमिकांच्-या श्रमावर टाकलेला दरोडा किंवा चोरी आहे. असे मार्क्सचे मत आहे. त्-याच्-या मते भांडवलदार श्रमिकास त्-याच्-या श्रमाचा -योग्य व पूर्ण मोबदला देत नाही. म्हणजेच श्रमिकांच्-या कष्टाची हक्काची संपत्ती जी श्रमिकांच्-या श्रमातून निर्माण झालेली आहे ती भांडवलदार हडप करतो. -या संपत्तीचा विनि-योग भांडवलदार आणखी श्रमिक कामाला लावून उत्पादन वाढवून प्रचंड नफा मिळविण्-यासाठी करतो. मिळविलेल्-या नफ्-याचा वाटा श्रमिकांना देत नाही. तर उलट ती श्रमिकांपासून लपवून ठेवतो. अशा पध्दतीने भांडवलदार श्रमिकांचे सतत शोषण करीत असतात.

८.१० दीर्घोतरी प्रश्न

१) स्वप्नाळू समाजवादाचे प्रवक्ते कोण होते ? समाजवादाच्या क्षेत्रात त्याचे योगदान लिहा.
२) समाजवादाचा उदय का झाला ? सहकारी समाजवादाची चर्चा करा ?
३) कार्ल मार्क्सचा साम्यवाद स्पष्ट करा.
४) साम्यवादाच्या प्रमुख तत्वांची चर्चा करा ?
५) टिपा लिहा.
   १) रॉबर्ट आवेत.
   २) सेंट सायमन
   ३) कार्ल मार्क्स

❖❖❖

९

राष्ट्रवादाचा प्रवाह- इटलीचे एकत्रीकरण

प्रकरण रचना

९.० उद्दिष्टे -
९.१ प्रस्तावना
९.२ राष्ट्रवादाचा प्रवाह - इटलीचे एकत्रीकरण
९.३. इटलीचे विघटीत स्वरुप
९.४. इटलीचा एकीकरणातील अडचणी -
९.५. इटलीचा एकीकरणाला पोषक बाबी -
९.६ जोसेफ मॅझिनी आणि ंग इटली
९.७ कांउट काव्हूर - (१८१०- १८६१)
९.८ जुसेप गॅरीबाल्डी - (१८०७-८२)
९.९ सारांश
९.१० दीर्घोत्तरी प्रश्न

९.० उद्दिष्टे -

१. राष्ट्रवादाचा अर्थ व स्वरुप समजून घेणे
२. इटलीच्ना एकत्रिकरणातील टप्पे अभ्यासणे.
३. मॅझिनी, काव्हूर आणि गॅरिबाहडीचे -ोगदान समजून घेणे

९.१ प्रस्तावना

राष्ट्र ह्या संकल्पनेचा या काळात विकास झाला. प्रादेशिक सलग्नता असणाऱ्या राज्यांची राष्ट्रीय संस्कृती, साहित्य, जीवनशैली इ. चा अभ्यास होऊ लागला. ह्यातुनच पुढे राष्ट्र राज्य कल्पनेचा विकास झाला. ह्या कल्पनेमुळेच इटलीतील नागरिकांना आपला केवळ भौगोलीक तुकड्यात राहत नसून आपल्याला गतकाळातील वैभवशाली इतिहास होता ह्याचा अभिमान वाटू लागला. त्यांना राष्ट्रवादाच्या भावनेने प्रेरित होऊन एकिकरणाचा ध्यास लागला.

१७८९ ची फ्रेंच राज्नक्रांती व नेपोलि-नन बोनापार्टच्ना आक्रमणांमुळे अप्रत्नक्षरित्ना -ुरोपात राष्ट्रवादाचे वारे वाहू लागले. पुढे ह-नाच राष्ट्रवादाने नव्ना राष्ट्रराज्नाची निर्मिती केली. फ्रेंच राज्नक्रांतीत निर्माण झालेल्ना स्वातंत्र्न, समता आणि बंधुत्व ह-ना तत्वत्रयींचा इटलीवर खोल ठसा उमटला. परंतु अनेक राष्ट्रांचे इटलीमध्ने हितसंबंध गुंतलेले असल्नामुळे इटलीच्ना एकीकरणामध्ने अडथळे निर्माण झाले. राष्ट्रवादाच्ना भावनेने प्रेरित झालेल्ना इटालि-नन लोकांना

आपले राष्ट्र-राज्य असावे अशी तीव्र इच्छा असूनही घटनात्मक चळवळीला काहीसा अवकाश लागला. पुढे नेपोलियनच्या पाडावानंतर युरोपात मेटरनिकची प्रतिगामी राजवट सुरु झाली. व्हिएन्ना परिषदेवरही त्याचेच प्रभुत्व होते. येथील प्रजा मेटरनिकच्या दडपशाहीमुळे त्रस्त झाली व त्याचाच परिणाम म्हणून येथे राष्ट्रवाद विकसित झाला. युरोपातील इटली व जर्मनीचा राष्ट्रवादी लढा अत्यंत रोमहर्षक व प्रेरणादायी मानला जातो. जगातील अनेक परतंत्र देशांना ह्या लढ्यापासून प्रेरणा मिळाली. हया दोन प्रदेशांवर विविध परकीय सत्तांचे वर्चस्व होते आणि विविध प्रकारची लहान-मोठी राज्ये निर्माण झाली होती. त्यामुळे त्या प्रदेशांना स्वतंत्र करणे व त्याचे एकीकरण घडवून आणणे अशी दुहेरी कामगिरी येथील राष्ट्रवाद्यांना पार पाडावी लागली.

९.२ राष्ट्रवादाचा प्रवाह - इटलीचे एकत्रीकरण

राष्ट्रवादाचा अर्थ व स्वरुप :- १९ व्या शतकाचा उदय व विकास झपाट्याने झाला त्यालाही विशिष्ट कारण परंपरा हेती. फ्रेंच राज्यक्रांती व नेपोलियन बोतापार्ट चा उदय अस्त ह्यामुळे राष्ट्रवादाचे नवे प्रवाह वाहू लागले. स्वातंत्र्य, क्षमता व बंधुता ह्या तत्वलयीची फ्रेंच राज्यक्रांती ने जगाला भेट दिलेली होती. व्यक्तीने आपल्या राष्ट्राला वाहिलेली आपली तिप्त म्हणजे राष्ट्र प्रेमाची भावना. संतुलित राष्ट्रवादामुळे राष्ट्राची प्रगती होते, तर हिंसक, अतिरेकी राष्ट्रवादामुळे युध्द होऊन राष्ट्राचे नुकसान होते. अमेरिकन स्वातंत्र्ययुध्द हे राष्ट्रप्रेमाच्या भावनेचे सर्वोत्तम उदाहरण आहे.

फ्रेंच राज्यक्रांती नंतर राष्ट्रप्रेमाचा हा अग्नी अनेक देशातील जनते मध्ये घुमसत हता. उदा. जर्मनी पोलांड हंगेरी, इटली इ. देशातील नागरिकांना व्यक्ती स्वातंत्र्य व स्वयंशासनाची अभिलाषा तिव्र होती. राष्ट्रवाद व उदारमतवाद ह्यांची लाट सगळीकडे पसरत होती, मात्र मेटरतिक सारखे काही नेते ही राष्ट्रवादाची लाट रोखू पाहत होते. व्हिएत्रा कॉंग्रेसने राष्ट्रवाद व उदारतमवादाचा फारसा विचार न करता जुती व्यवस्था पुनरुज्जीवीत करण्याचे ध्येय ठेवले.

स्वातंत्र्य व लोकशाहीमुळे राष्ट्रवादाला प्रोत्साहन मिळाले. जीवनाची जास्तीत जास्त क्षेत्रे नियंत्रणमुक्त करण्याचे उदारमतवादाचे उद्दिष्ट होते. व्यक्तिगत भाषण स्वातंत्र्य, लोखन स्वातंत्र्य, व्यक्तिगत मालमत्तेची सुरक्षितता ह्या गोष्टी अपेक्षित होत्या. त्या राष्ट्रवादाला घटनायिष्टीत सरकारची स्थापना करावयाची होती.

तात्विक दुष्टीने अठराव्या शतकातील विषमता आणि हुकुमशाहीचा निषेध करण्याऱ्या बौध्दिक चळवळीतून राष्ट्रवादाचा जन्म झाला. युरोपमधील प्रबोधनाचा प्रसार, इंग्लंडमधील वैभवशाली क्रांती व फ्रेंच राज्यक्रांती ह्या मधुन राष्ट्रवादाचा विकसित होत गेला.

१९ व्या शतकात परीस्थीती बदलली होती. राजकीय एकाधिकारशाही व जुनी सामाजिक बैठक टिकवून ठेवणे अवघड होते. फ्रेंच राज्यक्रांती युरोपने अनुभवली होती. दिवसेंदिवस राष्ट्रीय जागृती वाढत होती. याच वेळी प्रतिक्रीया वादी शक्तीही कार्यरत होत्या. परंतु औद्योगिक क्रांती व मध्यम वर्गाच्या वाढत्या प्रभावामुळे मध्येयुगीन शेती व्यवस्था व सरजामी समाज यांना पाठिंबा देणे शक्य नव्हते.

९.३. इटलीचे विघटीत स्वरुप

दक्षिण-मध्-युरोपात इटली हा एक बलाढ-य देश आहे. १८७० पर्यंत तो एक केवळ विघटीत भौगोलिक प्रदेश होता. मेटरनिकच्-या मते ''इटलीचे अस्तित्व केवळ भौगोलिक आहे.'' भूमध्-य समुद्रात चिंचोळ-या पट्टीच्-या आकाराचा इटली हा दक्षिणोत्तर विस्तारलेला आहे. तिन्ही बाजूनी समुद्राने वेढलेला हा द्वीपकल्प असून उत्तर इटलीत आल्पस पर्वतराजी आहेत. इटलीला अतिश-य गौरवशाली प्राचीन इतिहास आहे. वैभवशाली रोमन साम्राज्-याची स्थापना इटलीतच झाली होती. टा-यबर नदीच्-या तिरावर लॅटीन आर्य टोळ-यांनी आपला जम बसवला. प्राचीन इटलीने युरोप, आशि-या, आफ्रिका खंडाशी व्-यापार केला. त्-यांनी कला, शास्त्र, साहित्-य क्षेत्रात देदीप्-यमान प्रगती केली. मात्र मध्-ययुगात इटलीला अवकळा प्राप्त झाली. फ्रान्स, ऑस्ट्रि-या, प्रशि-या, पोलंड ह-या सारख्-या बलवान राष्ट्रांच्-या स्पर्धेमध्-ये इटलीसारख्-या लहान देशाचे अस्तित्वच संपुष्टात आले, प्रगतीत तो इतर युरोपी-य देशांच्-या फार मागे पडत गेला. इटलीतील निरनिराळ-या राज्-यावर स्पेन, फ्रान्स, ऑस्ट्रि-या, इ. बलिष्ठ राज्-यानी वर्चस्व स्थापन केले. इटलीच्-या वा-यव्-य भागात सार्डिनि-या पीडमाँट हे राज्-य होते. त्-यावर सॅव्हॉ-य घराण्-याची सत्ता होती. ईशान्-य भागात लोंबार्डी आणि व्हेनेशि-या होते. त्-यावर ऑस्ट्रि-याचा ताबा होता. पार्मा, मॉडेना आणि टस्कनी ही छोटी स्वतंत्र राज्-ये होती. त्-यांच्-यावरही ऑस्ट्रि-याचेच वर्चस्व होते. मध्-य भागात पोपचे एक स्वतंत्र राज्-य होते. तर दक्षिणकडे नेपल्स सिसीलीवर बुरबॉ घराण्-याची सत्ता होती.

(१८५३) सिनोप येथे झालेल्या नविक युध्दात रशियाने तुर्की आरमाराचा पराभव केला. सिनोपच्या लढाईत रशियाचा विजय झाला.

तुर्कस्थान - रशियाच्या ह्या लढाईला अजून युरोपीय लढाईचे स्वरुप आले नव्हते उलट युरोपीय राष्ट्रांनी शेवटपर्यंत ही लढाई टाळण्याचाच प्रयत्न केला. व्हिएत्रा ह्या ठिकाणी जमुन युरोपीय राष्ट्रानी व्हिएत्रा नोट तयार केली होती. त्यात हा संघर्ष टाळण्याच्या साठी कोणत्या उपाययोजना करण्यात याची सुचना होती. परंतु तुर्कस्था ने व्हिएत्रा प्रस्तावाची दखल घेण्याचे नाकारले. त्यामुळे तुर्कस्थान - रशिया यांच्यातली लढाई अटळ ठरली.

नोव्हे १८५३ - सिनोपच्या लढाईत रशिया विजयी झाल्यामुळे युरोपीय राष्ट्राना रशियाची भीती वाटू लागली. कारण ह्या विजयामुळे रशियाचा बाहकन प्रदेशात प्रभाव वाढणार होता. त्यामुळे इंग्लंड, फ्रांस ने आपली तटस्थतेची भुमीका सोडून दिली व या दोन्ही राष्ट्रांनी तुर्कस्थानच्या बाजुने व रशियाच्या विरुध्द युध्दात उडी घेतली. (१८५४) ह्या युतीत पुढे सार्डिनिया सामील झाला अशा रीतीने रशिया - तुर्कस्थान युध्दाला युरोपीय युध्दाचे स्वरुप प्राप्त झाले.

हे युध्द प्रामुख्याने रशियाच्या दक्षिणेकडे म्हणजे क्रिमीयान लढले गेले. इंग्लंड व फ्रांस ह्यांनी युध्दाची घोषणा केल्यानंतर आपल्या पऔजा समुद्रातुन रशियाच्या ताब्यात असलेल्या क्रिमीयान पाठवल्या. क्रिमीयात सेबेस्टोपेल ह्या ठिकाणी रशियन नाविक दलाचे प्रमुख केंद्र होते. त्याच प्रमाने रशियाने आपले लष्करी पुरवठा केंद्र सुध्दा सेबेस्टोपल ह्याच ठिकाणी ठेवले. त्यामुळे सेबेस्टोपलच्या सर्व विध्वंस केल्यास रशियाची शक्ती पुर्ण खर्ची होईल असे इंग्लंड फ्रांसला वाटत होते. हे संपूर्ण युध्द क्रिमीयातच लढले गेल्याने ह्याला क्रिमीयन युध्द हे नाव मिळाले.

सेबेस्टोपलचा वेढा हे क्रिमीयन युध्दाचे प्रमुख वैशिष्टे ठरले. हा वेढा सतत ११ महिने टिकला. ह्या काळात टॉडलबेन नावाच्या रशियन इंजिनियरने सेबेस्टोपलचा वेढा शूरपने लढवला. शेवटी जेव्हा अशक्य झाले तेव्हा ८ सप्टें १८५५ रोजी दोस्तांचा सैन्याने सेबेस्टोपल जिंकून घेतलो. ह्या लढ्या दरम्यान अनेक निकराच्या लढाया झाल्या त्यामुळे अहमा, बाहकेव्हा व इकरमत ह्या लढाया विशेष गाजलया. बालाक्लेव्हाच्या लढाईत ६०० इंग्रज सैन्याने प्रचंड रशियन सैन्यावर जो हल्ला चढवलाती लढाई अविस्मरनीय ठरली.

ह्या लढाईत इग्लंडने आपली कामगीरी चोख बजावली नाही. त्यांच्या सैन्यात गैरशिस्त व गोंधळ होता. क्रिमीयात त्यावेळी कडाक्याची थंडी होती. त्यामुळे हजारो सैनिक थंडिने गोठून मरण पावले. दाणावेदणाच्या आभावाने व थांडीने हजारो घोडे मेले. थंडी इतकी भयंकर होती की लढाईत मेलेल्या सैनिकांपेक्षा अधिक सैनिक थंडीने गोढून मेले, अशा स्थीतीत १८५५ मध्ये सेबेस्टोपलचा पाडाव झाल्याने व रशियन झार निकोलस पहिला ह्याचा मृत्यू ह्याच वर्षी झाल्याने क्रिमीयन युध्द संपुष्टात आले.

सेबेस्टोपलचा वेढा सुरु असतानाच इंग्लंड, फ्रांस व ऑस्ट्रीया यांनी व्हिएत्रा ह्या ठिकाणी परिषद भरवून रशियाशी शांततेच्या वाटाधारी चाळवल्या. रशियाने मोहडेव्हिया, वॅलेशिया, सार्बीया येथुन आपले नियंत्रण उठवावे, तुर्की साम्राज्यातील ख्रिश्चन लोकांचे संरक्षण करण्याचा

आपला हट्ट सोडून द्यावा, काळ्या समुद्रावरील वर्चस्व काढून घ्यावे, डॅन्यूल नदी आंतरराष्ट्रीय दळणवळणा करीता मोकळी करावी इ. मागण्या समोर मांडल्या.त्याच वेळी सोर्डेतिया युध्दात उतरले. (२६ जाने १८५६) त्यामुळे दोस्तांचे बळ अजुन वाढले. रशिया नाउभेद झाला तरी सुध्दा युध्द सुरुच राहिले. ह्याच वेळी रशियाचा झार निकोलस हयांचा मृत्यू झाला. त्यामुळे रशियाची परिस्थीती चिंताजनक बनली. नवीन झार अलेक्झांडर यानेही युध्दाची व्यावहारीकता जाणली. ह्याच वेळी ३३६ दिवसांच्या चिवट वेढ्यानंतर सेबेस्टोपल दोस्तांच्या हाती पडले. त्यामुळे रशियाने तहाची मागणी केली. परिणामी दोस्त राष्ट्र व रशिया ह्यांच्यातील पैरिसच्या तहाने क्रिमीयन युध्द संपले.

४) पैरिसचा तह (३० मार्च १८५६) हया तहान्वये :-

१) डॅन्यूबच्या प्रदेशावरील रशियाचे वर्चस्व नष्ट झाले. सार्विया बरोबरच मोहडेव्हिया व वॅलेशिया यांचा अंतर्गत स्वायत्तता देण्यात आली. व त्यांच्यावर तुर्कस्थानचे वर्चस्व राहील. हे रशियाने मान्य केले.

२) काळ्या समुद्रावर तुर्कस्थान व रशियाचे वर्चस्व राहणार नाही. आंतरराष्ट्रीय वास्तुकांसाठी व समुद्र मोकळा करण्यात आला.

३) तुर्कस्थानच्या सार्वभौमत्याला रशियाने मान्यता दिली. तुर्की सपलताना आपल्या ख्रिश्चन देश प्रत्येक भरपूर सुधारणा देण्याचे आश्वासन दिले. संयुक्त युरोप मध्ये तुर्कस्थानला प्रवेश देण्यात आला.

४) डॅन्यूल नदी दळणवळणासाठी करण्यात आली.

५) वॅसबेरीचा काहो प्रदेश रशियाने सोडला.

६) हा तहानो समुद्रावरील चायेगीरीला पायबंद घातला.

७) तुर्कस्थानातील ख्रिश्चन प्रजेचे संरक्षण करण्याचा रशियाचा हक्क ह्या तहात अमान्य करण्यात आला.

ह्या तहामुळे तुर्कस्थानची सतत रानटी देश म्हणून होणारी संभावता यावेळी त्याला युरोपात प्रतिष्टेचे स्थान मिळाले. क्रिमीयन युध्दाचे परिणाम पुढिल प्रमाणे

५) युरोपाचे परिणाम :- हे युध्द ह्या शतकातील सर्वात मोठे अनावश्यक युध्द मानले जाते. ह्या युध्दाचे परिणाम असे,

१) दिलेल्या राष्ट्रांत फार थोडा फायदा झाला. बाहकन प्रदेशात रशियाला पायबंद बसला. पण तो अल्पकाळ टिकला. रशियाना आपला हस्त क्षेप कायमचा थांबला नाही.

२) ह्या युध्दामुळे पुर्वीयस्त्रतात नवीन पेचप्रसंग निर्माण झाले. यातुनच पुढे बाहकनचे युध्द व पहिले महायुध्द झाले.

३) बोस्मिया व हर्जेगोव्हिनात बंड साह्याने पॅरिसच्या तहातील अटी बाजुला पडल्या.

४) ह्या तहामुळे इटलीला संयुक्त युरोपात प्रवेश मिळाला हा काव्हूरचा कुजीतीचा विजय ठरला.

५) ह्या युध्दात रशियाचा पराभव झाल्याने रशियन झारची अप्रतीष्ठा झाली. त्याच्या हुकुमशाहीला धक्का बसला.

६) हया युध्दा मुळे बुर्सी साम्राज्याचा प्रश्न केवळ रशियन नसुन तो युरोपीय आहे हे स्पष्ट झाले.

७) ख्रिश्चन नागरिकांच्या हिताचे आपण रक्षण करु असे दिलेले आश्वासन तुर्की सुलतानानी पाळले नाही.

८) ह्या युध्दांत रशियाच्या मित्राने म्हणजे ऑस्ट्रीयाने रशियाला साथ तर दिली नाहीच मात्र तटस्थता स्विकारली त्यामुळे उभय देशातील संबध पुढे दुरावले.

क्रिमीयन युध्द आवश्यक होते का? अनेक इतिहासकारांच्या मते हे युध्द अनावश्यक होते. इंग्लंडची राणी व्हिक्टोरीया हिच्या मते हे युध्द केवळ एका माणसाच्या स्वार्थी महत्याकाक्षेंतुन झाले तो माणूस म्हणजे रशियन झार निकोलस पहिला तर किंग्जलेक नावाच्या इतिहासकाराने नेपोलियन तिसरा हा युध्दात जबाबदार होता असे मत मांडले. क्रिमीयन युध्दाने केवळ बाहकन प्रश्न सुटणार नव्हता तर पुर्व युरोपीय सत्तेचे संतुलन तेथे ठरणार होते. युरोपीय राष्ट्रांची प्रतिष्ठा त्यात गुंतलेली होती. मात्र हे युध्द टाळता आले असते.

११.८ रशि-ा - तुर्कस्थान -ुध्द- (१८७७ ७८)

१) रशियन साम्राज्याचे स्वरुप -

फार पूर्वीपासूनच रशियाचे साम्राज्य विशाल असुन राज्यकर्ते महत्वाकांशी व विस्तारवादी वृतीचे होते. १९ व्या शतकात इंग्रजानंतर रशियाचेच साम्राज्य अति बलाढ्य होते. रशियन झार वृत्तीने हुकुमशाही असुन निरंकुश सत्ताधारी होते. इतर युरोपिय देशांच्या तुलनेत औद्योगिकरण, व्यापार, जळणवळण ह्यात रशिया मागासलेला होता. त्याला जबाबदार रशियात झार ची कर्तव्यशुल्य राजवट होती. १८६० च्या दशकात अगदी थोड्या काळासाठी रशियन झार अलेझांडर दुसरा याने आधुनिकीकरणाचे धोरण काही सुधारणा सुरु केल्या. कृषी क्षेत्रात भुमिहीन शेतकऱ्यांना दिलासा देणारे काही कायदे त्यात तयार केले. त्यचदानात पारदर्शकता आणली. मात्र त्याचा हा सुधारणावादी बुरखा फार काळ टिकू शकला नाही तो पुनः मुळ पदावर गेला. पॅरिस च्या तहाने झार वर अनेक निर्बंध घातलेले होते मात्र लवकरच त्याने ते सर्व झुगारुन सामर्थ्य वाढवण्यास सुरुवात केली.

२) बाल्कन राष्ट्रवादाचा उदय व विकास

बाहकन द्विपकहपात राहणाऱ्या ख्रिस्ती जनते मध्ये कमालीची विद्रोह भावना तळपत होती. अर्थात त्यला अनेक कारणे सुध्दा होती. त्याची दडपली गेलेली धार्मिक स्वतंत्रता हे त्यांच्या रागाचे प्रमुख कारण होते. वास्तविक १८५६ च्या पॅरिस तहाने तुर्कस्थानच्या सुलतनाला आपले धोरण बदलण्याची संधी दिली होती. त्याने धार्मिक सुधारणा दिल्या असल्या तर रशिया प्रनित

ख्रिस्ती - चळवळ एवढी तीव्र झाली नसती पर्यायाने विघटन थांबवता आले असते. मात्र तुर्की सुलतानांनी तसा एकमात्र प्रयत्न केला नाही. धर्म, वंश, पंथ ह्या भेदभावांना थारा न देता सर्व प्रतेकाला समान वागणूक व्यक्ती स्वातंत्र्य, लष्करी सैनेस समान संधी देण्याचे आवाहन केवळ कागदावरच राहिले.

१८६१ मध्ये सत्तेवर आलेला सुलतान अलदुल अझोझ हा कर्तृत्वशुल्य होता. तुर्कस्थानला धर्म निरपेक्ष बनवण्याची क्षमताच त्याच्या पाशी नव्हती. जरी युरोपीय देश सुधारनांसाठी सतत तगादा लावत होते तरी त्याने त्याकडे पार दुर्लक्ष केले. शिक्षणात व दळणवळणाच्या साधनात थोडी सुधारणा झाली असली तरीही धार्मिक धोरण असहिष्णू व जुलमीच राहिले. मालमत्तेची व जीवीताची सुरक्षीतता नव्हती. सरकारी अधिकारी लाचलुचपत हवरे आणि भ्रष्ट होते. प्रजेवरील करांचा बोजा दिवसेंदिवस वाढतच होता.

१८७० च्या सुमारास प्रजेच्या सहनशक्तीचा अंत होउ लागला. रशियाचा ह्या विद्रोहाना आतुन पाठिंबा होता. मॉंटेनेग्रो, सार्बिया, ग्रीस येथील जनतेला स्वातंत्र्य चळवळीत यश आल्यामुळे बाहकन जनते समोर त्यांचा आदर्श होता. राष्ट्रवादाची भावना तर स्लाव जनतेने विशेष तिव्र होती. अर्थात त्यांच्या लढ्याला रशियाकडून खतपानी ही मिळत होते. १८६७ च्या विज्ञान परिषदेच्या बुरख्याआड मास्को येथे विशाल छाव परिषद बोदवण्यात आली होती. बुखारे येथे स्लाव समितीची स्थापनाही करम्यात आली होती. ह्या स्लाव चळवळीचे नेतृत्व सार्बिया कडे होते.

ह्या धुमसणाऱ्या असंतोषाचा भडका १८५५ मध्ये उडू लागला. तुर्कस्थानच्या युरेपिय साम्राज्याला हादरे बसु लागले. त्याचा पहिला उद्रेक लॉस्नीचा हर्जेगो वितात दिसुन आला.

३) बॉस्निया - हर्जेगोविनात बंडाची सुरुवात :-

स्थानिक जमिनदार व तुर्की अंमलदार जनतेची पिळवणूक करीत होते. सर्वसाधारण शेतकऱ्यांचे जीवन अत्यंत कष्टप्रद व दु:सह होते. जुलै १८७५ मध्ये हर्जेगोविनातील शेतकऱ्यांनी कर देण्याचे नाकारले. शेजारच्या सार्बिया, मॉटेनेग्रो राज्यातुन त्यांना मदत मिळू लागली. ंड मोडण्यासाठी आनेह्या तुर्की फौजांचाही त्यांना पराभव केला. याच वेळी सुलतानांची आर्थिक परिस्थीती अतिशय दिवाळखोर होती. दिवसेंदिवस समस्या गंभिर रुप घेऊ लागली.

४) अन्द्रासी नोट :-

तुर्की राजवटीस कंटाळून अनेक शेतकरी शेजारच्या ऑष्ट्रीयन प्रदेशात स्थलांतरीत झाले. स्लाव निर्वासीतांची संख्या वाढल्याने ऑस्ट्रीया अत्यंत अस्वस्थ झाले. शिवाय बाहकन राजकारणात ढवळाढवळ करण्या करीता रशिया ह्या बंडाचा फायदा घेऊल अशी चिंता ऑस्ट्रीयाला होती त्यामुळे रशिया जर्मनी यांच्या संमतीने ऑस्ट्रीयाचा चॅन्सेलर कांउट अन्द्रासी याने बुडापेस्ट येथुन एक खलिना जुलै १८७५ मध्ये सुलतानकडे रवाना केला. बाहकन प्रदेशातील चिघळती परिस्थीती व युरोपिय शांतता याबदल चिंता व्यक्त करुन तुर्की साम्राज्यात ख्रिस्ती व मुसलमान नागरिकांना समान वागणूक देण्यात यावी. दोघांनाही धार्मिक स्वातंत्र्य असावे, शेतकी सुधारणा आमंलात आणाव्यात इ. गोष्टी सुचवल्या. सुलतानाने अन्द्रासी नोट मधील बहूतेक सुधारणा स्विकारल्या. मात्र त्या सुधारणांच्या अंमलबजावनीची हमी देण्यात आखासनावर विसंबून शस्त्र खाली ठेवण्यास नागरिक तयार नव्हते. त्या तिढ्यातून मार्ग निघत नव्हता. वातावरण तंग होऊ लागले.

५) बंडाचा प्रसार व युरोपिय राष्ट्रांची मध्यस्ती :-

अन्द्रासी नोट स्वीकरुन सुधारणा अमलात आणण्यासाठी अनेक युरेपिय राष्ट्रांनी सुलतानांवर दबाव आणण्याचे ठरवले. फ्रांस, इटली ह्या प्रस्तांत उतरणी मात्र अन्द्रासी नोट अत्यंत कडक असल्याच्या सबणी खाली ग्रेरु ब्रिटन ह्या मध्ये उतरले नाही. ब्रिटनच्या असहकारामुळे सगळीच योजना बारळगली. ह्या समस्येबाबत निष्फळ विचारविनीमय चालू असता परिस्थीती चिघळू लागली. १८००० तुर्की सैनिक बल्गेरियात उतरले. निःशस्त्र शेतकऱ्यांवर अत्याचार झाले. १२००० ते ३०,००० बल्गार लोक मारले गेले. ह्या बातम्या जेव्हा युरोपात गेल्या तेव्हा वातावरण तापु लागले. इंग्लंडवरही प्रखर टिका होउ लागली.

रशिया तुर्कस्थान युध्द :- १८७७ -७८ राजनैतिक मार्गाने ह्या प्रश्नांची उकळ होण्यासाठी डिसें. १८७६ मध्ये कॉन्टॅटिनेपल येथे युरोपिय राष्ट्रप्रतिनीधीची सभा चर्चेतुन मार्ग निघत नव्हता. संभाव्य युध्द झालेच तर ऑस्ट्रीया तटस्थ राहिल असे वचन रशियाने ऑस्ट्रीया कडून मिळवले. नंतर रशियाने समानियाकडून सहकार्य मिळवले. कारण प्रत्यक्ष युध्दात भुमीमार्गाने आक्रमण करण्यासाठी रशियाना समाजियातुनच जावे लागणार होते. २४ एप्रील १८७० रोजी रशियाने तुर्कस्थान विरुध्द युध्द पुकारले. डॅन्यूव नदी ओलांडून रशियन फौजांची कॉन्टॅटिनोपल च्या दिशेने दौड सुरु झाली. सार्बिया - मॉटेनेग्रो यानाही तुर्कस्थान विरुध्द पुनः शस्त्र उगारले. रशियन प्रखर प्रतिकारापुढे तुर्की प्रतिकार शिघीण पाडला. ५ जाने १७७८ रोजी रशियन फौजा सोफियाला पोहोचल्या व २० जाने. त्यानी ऑट्रिनोपलच्या मजबूत किल्याला वेढा दिला. कॉर्न्टेटिनोपल पासून हा किल्ला १६० मैलावर होता. १८७७ मध्ये कॉकेशन मधील कार्स हा भरभक्कम किल्लाही रशियन फौजांनी काबीन केला. रशियापुढे निभाव लागत नाही हे पाहाताच तुर्कस्थाने तहाची बोलणी सुरु केली. इतर सत्तांच्या हस्तक्षेपाने युध्द रंग बदलेल अशी धास्ती रशियाला होती. त्यामुळे इतर राष्ट्रांनी आणि माधमच्या आत रशिया देखील तहासाठी तयार झाला. शेवटी ३ मार्च १८७८ रोजी उभय राष्ट्रात सामस्टेफॅनो येथे तह घडून आला.

६) सान स्टॅफेनोचा तह :- मार्च १८७८ या तहानुसार

१) सार्बिया व मॉटेनेग्रो चा दोन्ही बाहकन राज्यांना थोडा जास्तीचा प्रदेश देण्यात आला.
२) समानियाच्या पूर्व स्वातंत्र्याला सुलतानाने मान्यता दिली.
३) सुलतानाने सुधारणा मान्य करुन त्याची आंमलबजावणी
४) डॅन्यूबनदीवरील किल्ले पूर्णपणे पाडून टाकण्यात यावे कॉकेशन मधील बाटूम, कार्स, आरधन हे प्रदेश रशियाला मिळाले.
५) विशाल बल्गोरियाची निर्मीती व्हाव्ही हे मान्य करण्यात आले.

हा तह म्हणजे रशियाचा फार मोठा विजय होता. पॅरिसचा आपमानास्पद तह पुसला जाऊन बाहकन प्रदेशात रशियाचे प्रभुत्व ह्या तहामुळे निर्माण झाले.

सान स्टेफनो करारावरील युरोपिय राष्ट्रांच्या प्रतिक्रीया ह्या करारामुळे बाहकन प्रदेशावर रशियाचा प्रभाव होणार हे दिसताच ग्रेट ब्रिटन अस्वस्थ झाले. अर्थात ह्या तहाबद्दल तिव्र नाराजी असणारी इतर अनेक युरोपिय राष्ट्रे होती. विशाल बल्गोरियाच्या निर्मीतीसाठी तुर्कस्थानच्या अधिपत्याखालील जवळजवळ सर्वच बाहकन प्रदेश बल्गेरियाला मिळणार होता. ग्रीसही नाराज होते. ऑस्ट्रीया देखिल नाराज होते. ह्या तहामुळे जर्मनीचा बिस्मार्कही असंतुष्ट होता. त्यामुळे ह्या तहाच्या फेरविचारासाठी पुनः युरेपिय राष्ट्रे एकत्र येऊ लागली. मात्र त्यासाठी रशिया फार उत्सुक नव्हता. मात्र युरोपिय राष्ट्रांच्या वाढत्या दबावामुळे रशिया नाइलाजाने तयार झाला.

७) बर्लिनचा तह (जुलै १८७८)

ह्या तहावर डिझरायकचा प्रभाव स्पष्ट होता. सर्व महत्वाच्या निर्णयावर फेरविचार करम्यात आला. समानियन स्वातंत्र्याला सुलतानाने मान्यता दिली. मात्र ह्या विशाल बल्गेरियाचे तीन भाग करण्यात आले. सान स्टॅफेनो तहाने योजीलेल्या मुळच्या प्रांताचा केवळ १/३ प्रदेश बल्गेरियाकडे आला.

८) बर्लिन तहाचे महत्त्व :-

सान स्टॅफेनोच्या तहाने रशियाला जो फायदा मिळणार होता तो बर्लिनच्या तहामुळे रद्द झाला. त्यामुळे रशियाच्या विस्तारवादाला आळा बसला. मात्र बाहाकनच्या गुंतागुतीचा अंत झाला असे म्हणता येणार नाही. वितहानी व प्राणहानी सोडून पदरात पडलेले फळ हातोहात गोल्याने रशिया चिडणे स्वाभाविक होते. त्यामुळे भविष्यातही त्याचा विस्तारवाद सुरुच राहीला. तुर्कस्थानच्या विघचनाच्या वाहत्या गंगेत प्रत्येक युरोपिय राष्ट्राने हात धुवुन घेतला.

११.९ सारांश

१८७७ - ७८ चे रशिया तुर्कस्थान युध्द युरेपिय इतिहासात महत्त्वाचे ठरले. त्यामुळे पुर्विय प्रेरनांचा गुंता न सुटता अधिकच वाढला. पुढे युरोपात नवे युध्धगर निर्माण झाले. इंग्लंड - तुर्कस्थान आणि रशिया - जर्मनी यांच्या संबंधातील मैत्री नष्ट होऊन त्या एवजी त्यात शत्रुत्वाची बिजे रोवली गेली. रशियाच्या विस्तारवादाला जरी आळा बसला असला तरी त्या ठिकाणी ऑस्ट्रीयाचा प्रमाण निर्माण झाला. त्यामुळे ऑस्ट्रीया - रशियातील शत्रुत्व वाढीस लागले. गटबाजीची हिच बिजे पुढे पहिल्या महायुध्दास कारणीभूत ठरली.

११.१० दीर्घोत्तरी प्रश्न

१) पूर्वीय प्रश्नांचा पार्श्वभुमी स्पष्ट करा.
२) ग्रीसचे स्वातंत्र्ययुध्द का झाले त्याचे मुल्यमापन करा.
३) ग्रीसच्या स्वातंत्र्य युध्दातील युरोपीयन सत्ताची भुमीका स्पष्ट करा.
४) १८५४ - ५६ च्या क्रिमीयन युध्दाची कारणे लिहा.
५) १८५४ - ५६ च्या क्रिमीयन युध्दाचे महत्व स्पष्ट कार.
६) क्रिमीयन युध्दातील घटना स्पष्ट करुन परिणाम लिहा.

❖❖❖

१२

युरोपची संघरचना व गटबाजीचे राजकारण

प्रा. शिंदे बी. डी.

प्रकरण रचना :

१२.० उद्दिष्टचे

१२.१ प्रस्तावना

१२.२ त्रिराष्ट्र करार (जर्मनी - ऑस्ट्रिया - इटाली) - १८८२

१) तीन सम्राटांचा संघ (जर्मनी, ऑस्ट्रिया, रशिया) - १८७२
२) द्विराष्ट्र करार (जर्मनी - ऑस्ट्रिया) - १८७९
३) द्विराष्ट्र करार (जर्मनी - रशिया) - १८७९
४) त्रिराष्ट्र करार (जर्मनी - ऑस्ट्रिया - इटाली) -१८८२
५) भूमध्य सामुहिक करार / पूनसंरक्षणात्मक करार - १८८७
६) त्रिराष्ट्र संघ पद्धतीतील दोष

१३.३ त्रिमित्र संघ (फ्रान्स - इंग्लंड - रशिया) - १९०७

१) द्विराष्ट्र लष्करी करार (फ्रान्स - रशिया) - १८९४
२) द्विराष्ट्र मैत्री करार (इंग्लंड - जपान) - १९०२
३) द्विराष्ट्र मैत्री करार (इंग्लंड - फ्रान्स) - १९०४
४) त्रिमित्र संघ (इंग्लंड - फ्रान्स - रशिया) - १९०७

१२.४ सारांश

१२.५ दीर्घोत्तरी पश्न

१२.० उद्दिष्टचे

१) बिस्कार्मच्या परराष्ट्रीय धोरणाची माहिती मिळवणे.
२) त्रिराष्ट्र कराराची माहिती सांगणे.
३) त्रिमित्र संघाची वाटचाल पहाणे.

१२.१ प्रस्तावना :-

बिस्मार्कच्या नेतृत्वाखाली जर्मनीचे एकीकरण पूर्ण झाले. हे एकीकरण करत असताना बिस्मार्कने अनेक युरोपियन राष्ट्रांचा अपमान केलेला होता. ही अपमानीत झालेली राष्ट्र एकत्र घेऊन जर्मनीचा सुड घेतील, असे बिस्मार्कना नेहमीच वाटत होते. या भितीपोटी जे आपले शत्रु आहेत त्यांना कोणीही आंतरराष्ट्रीय राजकारणात मित्र मिळू नये व आपणाला जास्तीजास्त मित्र

असावेत. या धोरणातून बिस्मार्कने युरोपच्या राजकारणात **संघपद्धती / गटबाजीचे राजकारण** सुरू केले. त्यातून जर्मनीच्या नेतृत्वाखाली **त्रिराष्ट्र संघ** तयार करण्यात आला.

यावेळी फ्रान्सला युरोपच्या राजकारण कोणीही मित्र नव्हता. त्यामुळे तो एकटा होता. बिस्मार्कचा राजकीय अंत झाल्यानंतर फ्रान्सने आंतरराष्ट्रीय राजकारणात मित्र मिळवण्याचा प्रयत्न केला. त्याच प्रमाणे इंग्लंडचीही अवस्था असल्याने त्यालाही मित्राची गरज होती. त्यामुळे फ्रान्सच्या नेतृत्वाखाली युरोपच्या राजकारणात दुसरा गट तयार झाला. त्यास **त्रिमित्र** असे म्हणतात. त्रिराष्ट्र व त्रिमित्र यांच्यात युरोपच्या राजकारणाची विभागणी होऊन त्यांच्यात सर्वप्रकारची सत्ता स्पर्धा सुरू झाली. त्यातून पहिले महायुद्ध सुरू झाले. या युरोपीय गटबाजीचे स्वरूप त्यांच्यातील करार याची माहिती या प्रकरणामध्ये घेण्यात आलेली आहे.

१२.२ त्रिराष्ट्र करार (जर्मनी - ऑस्ट्रिया - इटाली) - १८८२ :Triple Alliance

युरोपच्या गटबाजीच्या राजकारणाचा जनक प्रिन्स बिस्मार्क मानला जातो. अनेक राष्ट्रांचा पराभव करून जर्मनीचे एकीकरण १८७१ मध्ये पूर्ण केले. त्यामुळे अनेक राष्ट्रांची बिस्मार्कला भिती वाटत होती. विशेषत: फ्रान्सचा अपमान केला होता. शिवाय त्याचा अल्सेस - लॉरेन्सचा प्रदेश आणि प्रचंड युद्ध खंडणी त्याने घेतली होती. त्यामुळे जर्मनीचा सूड घेतला पाहिजे अशी भावना फ्रेंच जनतेच्या मनात होती. परिणामी फ्रान्स हा जर्मनीचा कट्टर शत्रू बनला. फ्रान्सची ही सुडाची भावना कमी करण्याचा प्रयत्न बिस्मार्कने केला नाही. युरोपच्या राजकारणात फ्रान्सला कोणीही मित्र मिळू नये या दृष्टिनेच प्रयत्नही केले. यासाठी बिस्मार्कने अनेक युरोपीय राष्ट्रांशी मैत्री करार केले. त्यातूनच १८८२ मध्ये त्रिराष्ट्र कराराचा जन्म झाला. यासाठी बिस्मार्कने आपल्या परराष्ट्रीय धोरणाची तत्त्वे अमंलात आणून पुढीलप्रमाणे करार केले. १) तीन सम्राटांचा संघ २) जर्मनी - ऑस्ट्रिया द्विराष्ट्र करार ३) जर्मनी - रशिया द्विराष्ट्र करार ४) त्रिराष्ट्र करार ५) भूमध्य सामुहिक करार इ. करार होते.

१) तीन सम्राटांचा संघ १८७२ (Three Emperors League) :

फ्रान्सी युद्ध करून जर्मनीचे एकीकरण पूर्ण केले. याच वेळी फ्रान्सला एकाकी पाडण्याचा प्रयत्न केला. यावेळी जर्मनीचा अंतर्गत प्रश्न म्हणजे कॅथॉलिक व समाजवाद लोकांनी बिस्मार्कला त्रास देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे परराष्ट्रीय धोरणात ऑस्ट्रिया रशिया यांच्याशी संबंध जोडण्याचा प्रयत्न केला.

ऑस्ट्रियाशी सहकार्याची भावना :

इ.स. १८६६ मध्ये ऑस्ट्रियाचा पराभव करून होलस्टिन प्रांत मिळवला होता. ही शत्रुत्वाची भावना राहू नये म्हणून, बिस्मार्कने ऑस्ट्रियाकडून एक पैसासुद्धा खंडणी घेतली नाही. ऑस्ट्रिया - फ्रान्सयांच्यात एकी होऊ नये म्हणून ऑस्ट्रियाशी घनिष्ठ संबंध जोडणे. इ.स. १८७० नंतर इटाली बलशाली होऊ लागला होता. तो ऑस्ट्रियाच्या सरहद्दीवर होता. त्याच्या आक्रमणाची भीती ऑस्ट्रियाला होती. याच वेळी रशियाशी बाल्कन प्रदेशावरून वाद निर्माण झाल्याने ऑस्ट्रियाला मित्राची गरज होती. या संधीतूनच बिस्मार्कने मैत्री जोडली.

रशियाशी हात मिळवणी :

जर्मनीने ऑस्ट्रिया - हंगेरीशी मैत्री जोडल्यानंतर रशिया - फ्रान्स यांची युती होऊ नये यासाठी प्रयत्न केला. इ.स.१८५९ मध्ये प्रशियाचा वकील म्हणून रशियात बिस्मार्कने कार्य केले. याचा फायदा घेऊन मैत्री जोडण्याचा प्रयत्न केला. इ.स.१८६२ मध्ये रशियातील पोल नागरिकांनी पोलंडच्या स्वातंत्र्यासाठी स्वतंत्रयुद्ध पुकारले. या वेळी बिस्मार्कने प्रशियन जनतेच्या विरोधात रशियाच्या झार राजाला मदत केली.

तीन सम्राटांचा संघ :

बिस्मार्कने जर्मनीचा सम्राट **विल्यम पहिला**, ऑस्ट्रियाचा सम्राट **फ्रान्सिस जोसेफ**, रशियन सम्राट **झार अलेक्झांडर दुसरा** यांची बर्लिन येथे सप्टेंबर १८७२ परिषद भरवली. कुटनीतीच्या दृष्टीने बिस्मार्कने घडवून आणलेली भेट म्हणजे त्याच्या मुत्सद्देगिरीचा कळस होता. या तीन बलाढ्य सम्राटांमध्ये एकमेकांविषयी प्रेम, सहकार्याची भावना वाढीस लागली. यातून एक करार झाला. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे-

१) युरोपच्या राजकारणातील महत्त्वाचे प्रश्न परस्परांच्या सहकार्याने सोडणे.
२) युरोपमध्ये शांतता टिकविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे.
३) तिन्ही राष्ट्रांनी परस्परांना पूरक असे परराष्ट्रीय धोरण आखणे.
४) दर तीन वर्षांनी या तहाचे नुतनीकरण करावे.

कराराचा शेवट - इ.स. १८८७ :

तीन सम्राटांचा संघ जास्त दिवस टिकू शकला नाही. कारण इ.स. १८७७ मध्ये रशिया-तुर्कस्थान यांच्यात युद्ध उद्‌भवले. यात तुर्कस्थानचा पराभव होऊन सॅनस्टिफॅनोचा तह झाला. या तहानुसार रशियाने बाल्कन प्रदेशात प्रभाव वाढला. रशियाला थोपवण्यासाठी इंग्लंडने परिषदेची मागणी केली. त्यास ऑस्ट्रियाने पाठिंबा दिला. त्यामुळे ऑस्ट्रिया-रशिया यांच्यात शत्रुत्व निर्माण झाले. बिस्मार्कच्या नेतृत्वाखाली इ.स.१८७८ बर्लिन परिषद भरली. या वेळी ऑस्ट्रियाच्या बाजूनेच बिस्मार्कने पाठिंबा दिल्याने रशिया बाहेर पडला. संघ मोडला. रशियाशी संबंध सुधारण्यासाठी इ.स.१८८१,

इ.स.१८८४ असे नुतन करार घडवले; परंतु **बाल्कन प्रश्नावरून** ऑस्ट्रिया - रशिया यांच्यात वाद निर्माण झाल्याने इ.स.१८८७ मध्ये कराराचा शेवट झाला.

२) द्विराष्ट्र करार (ऑस्ट्रिया-जर्मनी) - ७ ऑक्टो.१८७९ :

इ.स. १८७७-७८ रशिया - तुर्कस्थान यांच्यात बाल्कन प्रदेशावरून युद्ध झाले. यात तुर्कस्थानचा पराभव होऊन सॅनस्टिफॅनोच्या तहावर सही करून बाल्कन प्रदेशात रशियाला सवलती दिल्या. परंतु बिस्मार्कला ऑस्ट्रियाशी घनिष्ठ मैत्री निर्माण करण्यासाठी जून इ.स.१८७८ मध्ये युरोपीय राष्ट्रांची परिषद बोलावली. अध्यक्ष बिस्मार्क झाला. या परिषदेत बिस्मार्कने ऑस्ट्रियाची बाजू उचलून धरली तर जर्मन वर्तमानपत्राने रशियन धोरणावर कडाडून हल्ले चढवले. परिणाम जर्मन-रशिया संबंध दुरावले. **डॉ. गूचच्या मतानुसार**- बर्लिन काँग्रेसचा उच्च राजकारणाच्या दृष्टीने परिणाम पाहता रशिया-जर्मनी यांच्यातील दुरावा निर्माण झाला.

बिस्मार्कच्या उपकारातून उतराई होण्यासाठी ऑस्ट्रियाने मैत्रीचे संबंध जोडले. पण ऑस्ट्रियन चॅन्सलर ऑद्रेन्सी हा बिस्मार्कसारखाच मुत्सद्दी धूर्त होता. त्याने बिस्मार्कची गरज ओळखून मैत्रीच्या मोबदल्यात काही अटी लादल्या. रशियाविरूद्ध जर्मनीला मदत पण फ्रान्साविरूद्ध जर्मनीस मदत नाही या अटीवर ऑस्ट्रिया - जर्मनी यांच्यात ७ ऑक्टो. इ.स. १८७९ रोजी द्विराष्ट्र मैत्री करार घडून आला. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे

१) रशियाने जर्मनी किंवा ऑस्ट्रिया यांच्यावर आक्रमण केल्यास या दोन राष्ट्रांनी परस्परांना लष्करी मदत करावी.
२) फ्रान्सने जर्मनी किंवा ऑस्ट्रियावर आक्रमण केल्यास राहिलेल्या राष्ट्राने तटस्थ राहून युद्धसमाप्ती करण्याचा प्रयत्न करावा.
३) फ्रान्सला रशिया मिळाल्यास जर्मनी व ऑस्ट्रिया यांनी संयुक्तपणे फ्रान्स - रशियाचा प्रतिकार करावा.
४) हा करार प्रथम पाच वर्षांसाठी राहील व जरूर वाटल्यास दर तीन वर्षांनी त्याचे नूतनीकरण करण्यात येईल.
५) हा करार पूर्णपणे गुप्त राखण्यात येईल.

हा करार म्हणजे रशियाचा विश्वासघात होता. म्हणून सम्राट विल्यम पहिला याने या कराराला सुरूवातीस विरोध केला. बिस्मार्कने पटवून सांगितल्याने त्यास मान्यता दिली. हा करार म्हणजे फ्रान्सच्या आक्रमणा वेळी ऑस्ट्रियाची तटस्थता तर फ्रान्स रशिया संयुक्त आक्रमणाच्या वेळी जर्मनीला ऑस्ट्रियाने मदत करावी. परंतु इ.स.१८८७ मध्ये बल्गेरियाच्या राजपदाकरिता वाद निर्माण झाला. रशियाच्या लष्करी आक्रमणाच्या भीतीमुळे बिस्मार्कने प्रसिद्ध केला तेव्हा रशियाला करार समजला. पुढे पहिल्या महायुद्धाच्या काळातही याचे नूतनीकरण झाले. पण इ.स.१९१९ मध्ये या कराराचा शेवट झाला.

३) जर्मनी - रशिया द्विराष्ट्र करार - १८७९ :-

बिस्मार्कने तीन सम्राटांचा संघ तयार करून त्यात ऑस्ट्रिया - रशियाला समाविष्ट केले होते. परंतु दोघांचेही हितसंबंध बाल्कन प्रदेशात गुंतलेले होते, त्यामुळे ते दीर्घकाळ एकत्र रहाणे अशक्य होते. रशियाने तुर्कस्थानचा पराभव करून १८७७ मध्ये सॅनस्टिफॅनोचा तह लादला. यावेळी ऑस्ट्रियाने रशिया विरोधी भूमिका घेतली. जर्मनीने ऑस्ट्रियाची बाजू रशिया विरोधी उचलून धरली. त्यामुळे रशिया जर्मनी यांच्यात शत्रुत्व निर्माण झाले. तरीपण बिस्मार्कने रशियाला आपला मित्र बनवण्याचा प्रयत्न केला. कारण रशिया फ्रान्सला जाऊन मिळू नये. बर्लिन परिषदेत रशिया विरोधी भूमिका घेऊन व ऑस्ट्रियाला रशिया विरूद्ध लष्करी मदत देऊनही रशियाबरोबर मैत्री टिकवण्याचा प्रयत्न बिस्मार्कने केला. १८७९ मध्ये जर्मनी - रशिया द्विराष्ट्रकरार केला.

४) त्रिराष्ट्र करार / त्रिपुटी संघ / त्रिपक्षीय संघ / शत्रू राष्ट्र (जर्मनी - ऑस्ट्रिया - इटाली) २० मे इ.स.१८८२ :

बिस्मार्कने ऑस्ट्रियाबरोबर घनिष्ठ मैत्री जोडण्यासाठी बर्लिन परिषदेमध्ये ऑस्ट्रियाच्या बाजूने झुकते माप पदरात टाकले. त्यामुळे जर्मनी - ऑस्ट्रिया अधिक जवळ आली. त्यातूनच व्हिएन्ना येथे ५ ऑक्टोबर इ.स.१८७९ रोजी करार झाला.

इटालीच्या एकीकरणा वेळी पोपचे राज्य नष्ट झाल्याने फ्रान्सचे कॅथॉलिक दुखावले होते. याच वेळी बिस्मार्कने फ्रान्सला जागतिक राजकरणात एकटे पाडण्याचा प्रयत्न करीत होता. यासाठी बिस्मार्क इटाली - फ्रान्स यांच्यात भांडणे लावण्यासाठी आफ्रिकेतील **ट्युनिस वसाहत** जिंकून घेण्यास फ्रान्सला सांगितले. कारण फ्रान्स आल्सेस व लॉरेनचे दु:ख विसरले; परंतु इटालीचा ट्युनिस वसाहतीवर पूर्वीपासून ताबा होता. ट्युनिस वसाहत फ्रान्सने इ.स.१८८२ मध्ये जिंकून घेतली. इटालीच्या महत्त्वाकांक्षेवर फ्रान्सने पाणी फिरवले. परिणाम इटालीत फ्रान्सबद्दल वैराची भावना निर्माण झाली. या संधीचा फायदा बिस्मार्कने घेतला आणि द्विराष्ट्र करारात इटालीला सामील करून २० मे इ.स.१८८२ करार इटाली - जर्मनी - ऑस्ट्रिया या त्रिराष्ट्रांत झाला. या करारातील तरतुदी पुढील प्रमाणे -

१) फ्रान्सने इटालीवर आक्रमण केल्यास, जर्मनी, ऑस्ट्रिया यांनी इटाली लष्करी मदत करावी.
२) फ्रान्स व रशिया यांनी संयुक्तपणे करारातील एखाद्या राष्ट्रावर आक्रमण केल्यास तिन्ही राष्ट्रांनी संयुक्तपणे आक्रमणाचा प्रतिकार करावा.
३) फ्रान्सने जर्मनीवर किंवा रशियाने ऑस्ट्रियावर आक्रमण केल्यास इटालीने तटस्थता स्वीकारावी.
४) इंग्लंडविरूद्ध लढाई झाल्यास इटालीने भाग घेऊ नये.
५) हा करार पाच वर्षांसाठी अस्तित्वात राहील. नंतर करारातील राष्ट्रांना जरूर वाटल्यास त्याचे नूतनीकरण केले जाईल.

या करारान्वये इटाली फ्रान्सला मिळणार नाही. त्याबरोबर इटालीची मदतही मिळणार असल्याने बिस्मार्कला फ्रान्सची भीती उरली नव्हती. या करारानेच इटालीची प्रतिष्ठा वाढली. हा करार इ.स. १९१४ पर्यंत अस्तित्वात राहिला. हा करार संरक्षणात्मक स्वरूपाचा होता. पहिल्या महायुद्धाच्या काळात १९१५ इंग्लंडने इटालीशी गुप्त करार करून इटाली आपल्या बाजूला घेतले.

५) जर्मनी - रशिया पुनर्संरक्षणात्मक करार / भूमध्य सामुद्रिक करार इ.स. १८८७ :

इ.स.१८८५-८६ मध्ये बल्गेरियाच्या प्रश्नावरून रशिया-जर्मनी संबंध दुरावले होते. त्यामुळे रशिया फ्रान्सच्या जवळ जाईल याची भीती बिस्मार्कला वाटू लागली. यासाठी बिस्मार्कला रशियाच्या मैत्रीची गरज वाटू लागली. तर रशियाचे या वेळी इंग्लंड, ऑस्ट्रिया, बल्गेरिया, तुर्कस्थान यांच्याशी संबंध बिघडल्याने जर्मनीशी शत्रुत्व न करता मित्रत्व करावे या हेतूने व दोघांच्या गरजेतून हा करार २० ऑगस्ट इ.स.१८८७ला झाला.

१) बाल्कन प्रदेशात कोणत्याही राष्ट्राने सत्ता न वाढविता जैसे थे परिस्थिती टिकवावी.
२) तुर्कस्थानचे स्वातंत्र्य टिकवावे.
३) दोन राष्ट्रांपैकी एक राष्ट्रावर तिसऱ्या राष्ट्राने हल्ला केला तर करारातील दुसऱ्या राष्ट्राने तटस्थ राहावे.
४) हा करार तीन वर्षांपुरता मर्यादित राहील.

६) बिस्मार्कचे इंग्लंडविषयक धोरण :

बिस्मार्कचे इंग्लंडविषयक परराष्ट्रीय धोरणाचे सूत्र म्हणजे इंग्लंडला जर्मनीबाबत जी मैत्रीची ओढ आहे. तिला धक्का पोहोचणार नाही याची काळजी घेणे. जमिनीवर अजिंक्य असणाऱ्या जर्मनीला सागरावर अजिंक्य असणाऱ्या इंग्लंडशी स्पर्धा करण्याचे कारण नाही, असे बिस्मार्कचे मत होते. बिस्मार्कने नौदल व वसाहत स्पर्धा टाकली. उलट इंग्लंडला युरोपात शांततेची गरज होती. यामुळेच इंग्लंड-जर्मनी यांच्यात शेवटपर्यंत सहकार्याची भावना होती.

७) त्रिराष्ट्र संघ पद्धतीचे दोष :

१) बिस्मार्कची संघपद्धती अत्यंत नाजूक व गुंतागुंतीची होती. बिस्मार्कसारख्या कुशल राजनीतीज्ञ विल्यम दुसरा नसल्याने बिस्मार्कच्या अंताबरोबर संघपद्धतीचा अंत झाला.

२) जर्मनीच्या हितासाठी तीन सम्राटांचा करार घडवून आणला तरी ऑस्ट्रिया - जर्मनी द्विराष्ट्र करार केला व जर्मनी - रशिया यांच्यात इ.स.१८८७ मध्ये भूमध्य सामुद्रिक करार घडवून तीन सम्राटांचा

करारला सुरूंग लावला. बिस्मार्कच्या निवृत्तीनंतर आपला विश्वासघात केल्याचे रशियाला समजताच फ्रान्सला जाऊन मिळाला.

३) रशियासारख्या सामर्थ्यशाली मित्राला दुखवून बिस्मार्कने ऑस्ट्रियासारख्या कमकुवत राष्ट्राची मैत्री विकत घेतली. याचा उपयोग फारसा झाला नाही.

४) बिस्मार्कने टयुनिस वसाहतीबाबत फ्रान्स - इटाली यांच्यात वाद निर्माण केला; परंतु इटालीची मैत्री काचेच्या भांड्याप्रमाणे नाजूक असल्याने ती फुटली.

५) बिस्मार्कने इंग्लंडला आपल्या त्रिराष्ट्र मैत्री करारात न घेतल्याने हा कराराचा पायाच कमकुवत होता. शेवटी इंग्लडने बिस्मार्क विरोद्धी गट तयार केला होता.

बिस्मार्कने एखाद्या जादूगाराप्रमाणे युरोपच्या राजकारणात खेळ मांडून तो यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. इ.स.१८७१ ते इ.स.१८८७ पर्यंत जर्मनीभोवती संरक्षण करारपद्धतीची बळकट तटबंदी बिस्मार्कने उभारली; परंतु व्यवहारी राजनीती जर्मनीला पोषक ठरेल अशी त्याची योजना होती. त्याने आंतरराष्ट्रीय राजकारणात फ्रान्सला एकटे पाडण्याचा व युरोपात जैसे थे परिस्थिती ठेवून शांतता टिकवण्याचा प्रयत्न केला. इ.स. १८७० ते ९० युरोपच्या राजकारणाचा कणा म्हणजे बिस्मार्कने किंवा याच काळातील युरोपीय राजकारणाचे भवितव्य ठरविणारा न्यायाधीश होता. बिस्मार्कने कुटबुद्धी, मुत्सद्देगिरी आणि दूरदृष्टीने जर्मनीला अंतर्गतदृष्टया बलवान बनवून युरोपचे नेतृत्व करण्याचा जर्मनीला मान मिळवून दिला.

बिस्मार्कने जर्मनीला संरक्षणासाठी अनेक संघ व उपसंघ निर्माण केले. त्यामुळे दुसरा गट निर्माण झाला. दोन्हीं गटांत मोठ्या प्रमाणात स्पर्धा सुरू झाली. यातूनच पहिले महायुद्ध सुरू झाले. म्हणून संघ पद्धतीच पहिल्या महायुद्धास जबाबदार होती, अशी टीका केली जाते. त्याबरोबर बिस्मार्कच्या रक्तपात आणि कणखर धोरणावरही टीका केल्या जातात. जर्मनीचे भवितव्य ठरवतानाच २० मार्च इ.स.१८९० मध्ये पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला.

आपली प्रगती तपासा

प्रश्न : तीन सम्राटाचा करार सांगा.

१२.३ त्रिमित्र राष्ट्र करार त्रिमित्र संघ (Triple Entente) १९०७

त्रिमित्र राष्ट्रकराराची सुरूवात १८९४च्या फ्रान्स-रशिया लष्करी कराराने झाली. १९०२ मध्ये इंग्लंड-जपान मैत्रीकरार, १९०४ मध्ये इंग्लंड-फ्रान्स यांच्यातील समझोता करार घडून आला. १९०७ मध्ये इंग्लंड-रशिया यांच्याशी मतभेद मिटले. आणि त्यानंतर इंग्लंड - फ्रान्स - रशिया यांच्यात

त्रिमित्र करार झाला. या कराराची पार्श्वभूमी स्वरूपाची माहिती यामध्ये घेण्यात येत आहे.

१) द्विराष्ट्र लष्करी करार (फ्रान्स-रशिया) - १८९४ :-

जर्मनीच्या बिस्मार्कने जगाच्या राजकारणात फ्रान्सला एकही शत्रू मिळू नये असे प्रयत्न केले. परंतु १८९० मध्ये बिस्मार्कच्या राजकीय अंत झाला. यावेळी ही राजकीय कोंडी फोडण्याचा फ्रेंच प्रजासत्ताकाने प्रयत्न केले. जर्मनी, ऑस्ट्रिया, इटाली हे एकत्र आल्याने फ्रान्सच्या सुरक्षितेची व स्वातंत्र्याची भिती निर्माण झाली. आफ्रिकेतील अनेक मुद्यावरून इंग्लंड-फ्रान्सच्या यांच्यात वाद होते. इंग्लंड जर्मनीला जाऊन मिळाल्यास भिती वाढत होती. १८९० मध्ये रशिया जर्मनीच्या मैत्री करारातून मुक्त झालेली होती. याचा फायदा घेऊन फ्रान्सने रशियाशी जवळीक जोडण्याचा प्रयत्न सुरू केला.

१८८७ मध्ये तीन बादशहांच्या संघाचा शेवट झाला. तरीपण जर्मनीने १८८७ मध्ये रशियाशी तीन वर्षांसाठी करार केला. १८९० मध्ये जर्मनीच्या विल्यम कैसरने या कराराचे नुतनीकरण केले नाही. त्यामुळे करार संपला. त्यामुळे रशियाला नविन मित्राची गरज होती. याचा फायदा घेऊन फ्रान्सने जलद हालचाली सुरू केल्या. रशियाच्या झार विरोधी चळवळ करणाऱ्या अनेकांनी फ्रान्सचा आश्रय घेतला होता. झारची सहानुभूती प्राप्त करण्याच्या हेतूने फ्रान्सने अनेक क्रांतीकारकांना कैद केली. त्यामुळे फ्रान्स हा आपला मित्र म्हणून झार पाहू लागला. लष्करी डावपेच व लष्कराची पुनर्रचना करण्यासाठी रशियात परिषद भरली. यावेळी फ्रेंच लष्कर म्हणून प्रमुख मार्गदर्शनासाठी झारने बोलवले होते. दोन्ही देशांच्या लष्करी प्रमुखांच्या वाटाघाटी होऊ लागल्याने दोन्ही देशात जवळकीचे संबंध वाढले. १८९१ मध्ये फ्रान्सच्या नाविक तुकडीने रशियाला भेट दिली. रशियन राज्यकर्त्यांनी, लष्कराने व रशियन जनतेने त्यांचे भव्य स्वागत केले. फ्रेंच राष्ट्रध्वजस झारने मानवंदना दिली. रशियन बॅडवर फ्रेंच राष्ट्रगीत 'मार्सेल्स' वाजविण्यात आले. यामुळे फ्रेंच जनता आनंदी झाली. कित्येक शतकांपासूनचे हाडवैर दोन्ही राष्ट्र विसरली. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीही कोणाचा कायमचा शत्रू अथवा मित्र असत नाही हे फ्रान्स व रशियाने सर्व जगाला दाखवून दिले. जर्मनीच्या गटबाजीच्या राजकारणामुळे व विश्वासघातामुळे रशियाने जर्मनीला सोडून फ्रान्सकडे वळला.

रशियाला फ्रान्सच्या मैत्रीची गरज होती कारण फ्रान्सकडून आर्थिक मदतीची गरज होती. ती देण्यास फ्रान्सही तयार होते. यातून १८९१ मध्ये दोन राष्ट्रांच्यात एक करार झाला. हा करार म्हणजे जर्मनी - ऑस्ट्रिया - इटाली यांना एक आव्हान केल्यासारखेच होते. १८९२ मध्ये पुन्हा निश्चित स्वरूपाचा करार केला. परंतु या करारावर झारने सही केली नाही. १८९३ मध्ये झारच्या विचारात फार मोठा बदल घडून आला. फ्रान्सबरोबर निश्चित स्वरूपाचा करार करण्याचा निश्चय केला. डिसेंबर १८९३ मध्ये फ्रान्सशी लष्करी करार

करण्याची तयारी दाखवली त्यातून ४ जानेवारी १८९४ रोजी फ्रान्स-रशिया **द्विराष्ट्र लष्करी** करार अस्तित्वात आला.

कराराती़ल तरतुदी -

१) जर्मनीने किंवा जर्मनीच्या मदतीने ऑस्ट्रियाने रशियावर आक्रमण केल्यास फ्रान्सने सर्व सामर्थ्यांनिशी रशियात मदत करावी.

२) जर्मनीने किंवा जर्मनीच्या मदतीने इटालीने फ्रान्सवर आक्रमण केल्यास रशियाने आपल्या सर्व सामर्थ्यानिशी फ्रान्सला मदत करावी.

३) आक्रमणाच्या वेळी कारवाई करताना दोन्ही देशातील प्रमुखांनी परस्पर विचार करून संयुक्त निर्णय घ्यावेत व त्यांची संयुक्तपणे कार्यवाही करावी.

४) शत्रूंची मिळालेली गुप्त माहिती ताबडतोब परस्परांना पुरवावी.

५) दोन्ही राष्ट्रांनी इतर कोणत्याही राष्ट्रांशी स्वतंत्रपणे वेगळे करार करू नयेत.

६) हा करार गुप्त ठेवण्यात यावा. आणि त्रिराष्ट्र करार जोपर्यंत अस्तित्वात राहील तोपर्यंत हा करार अस्तित्वात राहावा.

हा करार फ्रान्स-रशिया यांना अतिशय फायदेशीर ठरला. बिस्मार्कच्या राजनैतिक डावपेचाला एक उत्तर असून फ्रान्सचे राजकारणातील एकाकीपण नष्ट झाला. जर्मनीला आता एकाचवेळी दोन आघाडीवर लढावे लागणार होते. बिस्मार्कच्या त्रिराष्ट्र करारामुळेच ढासळलेली युरोपाची परिस्थिती सावरण्यास मदत नाही. रशियाला फ्रान्सकडून मोठ्याप्रमाणात भांडवल प्राप्त झाल्याने औद्योगिक प्रगती व आधुनिककरणाला प्रारंभ झाला. रशियाने चीन, मंगोलिया, कोरिया, मांचुरिया इ. अतिपूर्वीकडील देशातील आपल्या हालचाली वाढविल्या. जर्मनी-इंग्लंड या राष्ट्रांवर या कराराचा परिणाम झाला. या मैत्री करारामुळेही इंग्लंड मित्र मिळवण्याच्या प्रयत्नात म्हणजे गजबाजीच्या राजकारणात सामील झाला. त्यातूनच १९०२ मध्ये इंग्लंड-जपान मैत्री करार घडून आला. युरोपच्या राजकारणात एकटे पडल्याने इंग्लंडने जपानशी मैत्री तह इ.स.१९०२ मध्ये केला.

२) जपान - इंग्लंड करार - ३० जानेवारी १९०२ :

मेईजी क्रांतीनंतर दिवसेंदिवस जपान आक्रमक व साम्राज्यवादी बनू लागले होते. जपानने इ.स.१८९४-९५ मध्ये चीनचा पराभव करून आशियाई देशात सामर्थ्यवान राष्ट्र म्हणून मान मिळवला. जपानमध्ये शांततावादापेक्षा साम्राज्यवादाला जास्त महत्त्व होते. मांचूरिया-कोरिया ताब्यात घेतल्यानंतर गरज वाढली. त्यानुसार पाश्चिमात्य राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध जोडावेत, चीन-कोरियाबरोबरच संबंध दृढ मैत्रीचे संबंध ठेवावेत. रशियाशी मैत्रीचे संबंध प्रस्तावित करून हितसंबंध निश्चित करावे, पण रशियाने अमान्य केल्यामुळे इंग्लंडशी मैत्रीचे संबंध जोडले. जपान - इंग्लंड यांच्या मैत्रीची कारणे पुढील प्रमाणे -

अ) जपानला मैत्रीची गरज :-

१) लिओतुंग व पोर्ट ऑर्थर परत दिल्याने दु:ख :

१७ एप्रिल १८९५ रोजी चीनबरोबर शिमोनोसेकीचा तह केला. त्या वेळी दोन बंदरे जपानला मिळाली; परंतु रशियाला भीती वाटू लागल्याने रशिया, जर्मनी, फ्रान्स या तीन राष्ट्रांमुळे लिओतुंग व पोर्ट ऑर्थर चीनला परत करावे लागले आणि ३ कोटी नुकसान भरपाई घेतली याचे जपानला दु:ख होते. रशियाचा पराभव करण्यासाठी इंग्लंडशी तह केला.

२) रशियाचे आशियातील साम्राज्य विस्तारवादी धोरणास बंदी :

रशियाने इ.स.१८९७ मध्ये चीनकडून पोर्ट ऑर्थरचा प्रदेश ताब्यात घेतला. ट्रान्स सैबेरिया रेल्वेसाठी चीनकडून नवीन सवलती मिळवल्या. रशियाची वृत्ती पाहून जपानने रशियाला प्रतिबंध करण्याचे धोरण निश्चित केले. मांचुरियावर वर्चस्व रशिया स्थापण्याची जपानला भीती वाटू लागल्याने, रशियाने धोर थांबवण्यासाठी इंग्लंडशी युती केली. त्याचप्रमाणे चीनमधील बॉक्सर बंडाचे निमित्त करून चीनला लष्करी मदत दिली. सैन्य परत न घेता मांचुरियातील रेल्वेच्या रक्षणासाठी सैन्य कायम ठेवावे आणि मांचुरिया कायम ताब्यात घ्यावा, हा रशियाचा विचार होता.

३) रशियाच्या पराभवासाठी :

जपानमधील साम्राज्यवादी गटांच्या प्रमुखांना एकट्या रशियाशी युद्ध करून पराभव करणे अवघड नव्हते, पण रशियाने जर इतर राष्ट्रांशी मैत्री केल्याने अवघड होते म्हणून मित्र मिळवणे गरजेचे होते.

४) इंग्लंडविषयी आपुलकीमुळे:

तीन राष्ट्रांच्या हस्तक्षेपात इंग्लंड नव्हते. आतापर्यंत संघर्ष नव्हता म्हणून मैत्री करणे शक्य झाले.

ब) इंग्लंडलाही मित्र मिळवण्याची गरज :

१९व्या शतकात आंतरराष्ट्रीय कराराच्या संदर्भातील अलिप्ततेच्या धोरणाचे पालन केले. याच काळात इ.स.१८७९ ऑस्ट्रिया-जर्मनी, इ.स. १८८२ ऑस्ट्रेलिया - जर्मनी इटली तर इ.स.१८९४ रशिया - फ्रान्स करार झाला. इंग्लंड - युरोपच्या राजकारणात एकटेच भासू लागले त्यामुळे मित्र मिळवण्याची गरज होती. त्याची कारणे पुढीलप्रमाणे -

१) आंतरराष्ट्रीय राजकारणात स्थान टिकवण्यासाठी :

ऑफ्रिकेतील कॅशोदा व बोअर युद्धाच्या वेळी पाश्चिमात्य लोकांनी बोअरची बाजू घेऊन इंग्लंडवर टीका केल्या. म्हणून स्थान टिकवण्यासाठी मित्राची गरज होती.

२) जर्मनीच्या आरमारात प्रचंड सुधारणा :

कैसर विल्समने इंग्लंडबरोबर संघर्ष करण्यासाठी नाविक सामर्थ्यास प्रचंड स्वरूपाची वाढ केली. त्यामुळे युरोपियन राष्ट्रांत आरमारी स्थान कायमचे टिकवण्याची गरज इंग्लंडला वाटू लागली. आरमारी दल, वसाहतीच्या संरक्षणासाठी पॅसिफिक महासागर महत्त्वाचा होता. जपानसारख्या कार्यक्षम राष्ट्राशी तह केल्यास पॅसिफिकमधून आरमार परत मायदेशी आणणे. इंग्लंडला शक्य होणार होते.

३) रशियाची स्थिती :

रशियाच्या अतिपूर्वेकडील साम्राज्यविस्तारामुळे ब्रिटिशांत मोठा प्रश्न निर्माण झाला. मांचुरिया, कोरिया ताब्यात घेतल्यास रशिया ब्रिटिशांच्या ताब्यातील भारत व इतर वसाहतीवर आक्रमण करणार ही भीती वाटू लागली. चीन असामर्थ्य असल्याने जपानीशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला.

४) जर्मनीकडून धिक्कार :

इंग्लंडने अलिप्ततेचा त्याग करून जर्मनीशी मैत्रीचे संबंध जोडण्याचा प्रयत्न केला; परंतु कैसर विल्यमने अमान्य केले. त्यामुळे जपानशी मैत्रीचा तह केला.

क) जपान - इंग्लंड मैत्री करार ३० जाने. १९०२

ब्रिटिश परराष्ट्रमंत्री लॅन्सडाउन आणि जपानीचा हायशी तादासू यांच्यात वाटाघाटी होऊन करार झाला. त्यातील तरतुदी पुढील प्रमाणे -

१) दोघांनी चीन-कोरियाची परिस्थिती कायम ठेवणे.
२) इंग्लंडने चीनमध्ये तर जपानने चीन-कोरियात सत्ता वाढ करणे.
३) हितसंबंधाच्या रक्षणासाठी एकत्र उपाययोजना करावी.
४) युद्धात एकापेक्षा जास्त उतरण्यास आपल्या मित्राला सैन्यासह मदत करावी.
५) आपल्या हितास बाधा येईल असा तह दुसऱ्याबरोबर करू नये.
६) परस्परात मतभेद झाल्यास एकत्र येऊन विचारविनिमय करून दूर करावे.

इ.स.१९०५ मध्ये या तहात दुरूस्ती करण्यात आली. त्यानंतर इ.स.१९१०, इ.स.१९१२ पर्यंत हा करार टिकून राहिला. इ.स.१९२१च्या वॉशिंग्टन परिषद बोलावली त्या वेळी या कराराचा शेवट झाला.

३) इंग्लंड - फ्रान्स द्विशत्रू मैत्रीकरार - १९०४ :-

जर्मनीच्या विरोधात फ्रान्सने रशियाबरोबर मैत्रीकरार घडवून आणला. त्यानंतर इंग्लंडशीही प्रयत्न सुरू केले. परंतु इंग्लंड-फ्रान्स या दोन राष्ट्रामध्ये फार जूने शत्रूत्वाचे संबंध होते. फ्रान्सचा परराष्ट्रमंत्रीडेलकासे

याने फ्रान्स - इंग्लंडच्या मैत्रीचा पाया घातला. इंग्लंड - फ्रान्स द्विराष्ट्र मैत्रीकरार घडवून आणण्यास अनेक घटना जबाबदार आहेत.

इंग्लंड - फ्रान्स यांनी सुदामचा प्रदेश मिळवण्याचा प्रयत्न केला. यासाठी फ्रान्सने कॅप्टन मार्चंट याच्या नेतृत्वाखाली सैन्य पाठवले तर इंग्लंडने सेनापती किचनेर याला पाठवले. दोघांनीही सुदाममधील **फॅसोडा** येथे आपापले राष्ट्रध्वज फडकाविले. त्यामुळे दोघांच्यात वाद सुरू झाला. सुदाम हे इजिप्तचे राज्य असून इजिप्तवर इंग्लंडचे वर्चस्व असल्याने सुदामवरही इंग्लंडचे अधिकार आहे. म्हणून फ्रेंचानी सुदाम सोडावे अशी मागणी इंग्लंडने केली. तर इजिप्तचे मांडलिकत्व झुगारून सुदाम हे स्वतंत्र राष्ट्र आहे. म्हणून इंग्रजांनी इजिप्त जिंकून घेण्याचा जेवढा अधिकार आहे तेवढाच अधिकार सुदान जिंकून घेण्याचा फ्रान्सला आहे असे फान्स सरकारने इंग्लंडला कळवले.

फ्रान्स परराष्ट्रमंत्री डेल्कासे याने इंग्लंडबाबत सामोपचाराचे व मुत्सद्देगिरीचे धोरण स्वीकारले. कारण अजून जर्मनीचा सुड घ्यावयाचा होता. आल्सेस व लॉरेज प्रांत परत प्राप्त करावयाचे होते. हे रशियात मैत्रीमुळे साध्य करून घ्यावयाचे होते. म्हणून इंग्लंडबरोबर शत्रूत्वाचे धोरण परवडणारे नव्हते. शिवाय इंग्लंडच्या आरमाराची भिती वाटत होती. म्हणूनच डेल्कासे यांनी इंग्लंडशी सामोपचाराने वाटाघाटीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. इंग्लडने हा प्रश्न लष्कराच्या जोरावर सोडवण्याचा प्रयत्नही केला. तसे जाहीर करून एक प्रकारे फ्रान्सला युद्धाची धमकीही दिल्यासारखे होते. डेल्कासेला फॅसोडापेक्षा इंग्रज मैत्री अतिशय महत्त्वाची वाटत होती. कारण प्रत्यक्ष युद्ध झाले तर फ्रान्सचा प्रचंड तोटा होणार होता. म्हणून त्याने बिनशर्थ फॅसोडा सोडून दिला. त्यामुळे फ्रान्स - इंग्लंड यांच्या मैत्रीचे वातावरण हळूहळू निर्माण होऊ लागले.

१८९५ पासून दक्षिण आफ्रिकेत इंग्रजांच्या बाबतीत अनेक घटना निर्माण झाल्या होत्या. जर्मनीचे ब्रिटिश विरोधी धोरण, बोअर युद्धचा प्रश्न होता. या काळात सर्व युरोपीयन राष्ट्रांच्या विरोधात तोंड द्यावे लागत होते. पूर्वेकडे फ्रान्स - रशिया - जर्मनी यांनी संयुक्तपणे इंग्लंडला विरोध करून रशियाचे साम्राज्यविस्ताराचे धोरण राबवले. रशियाच्या धोरणाला पायबंद घालण्यासाठीच इंग्लंडने जपानबरोबर करार केला. रशियाच्या धोरणामुळे आशिया खंडातील इंग्रजांच्या वसाहतीला धोका निर्माण होऊ लागला. रशिया - जपान युद्धाचे वातावरण निर्माण झाले होते. या युद्धात फ्रान्सने उतरू नये यासाठी इंग्लंड प्रयत्न करत होते त्यातूनच इंग्लंड-फ्रान्सची जवळीक निर्माण झाली. तसेच बर्लिन-बगदाद रेल्वे योजनेमुळे अधिक जवळीक निर्माण झाली.

१५०४-०५ युद्धात जपानने रशियाचा पराभव केल्याने फ्रान्सला रशियाच्या मैत्रीमध्ये आधार वाटत नव्हता. त्यामुळे इंग्लंड - फ्रान्स यांच्यात ८ एप्रिल १९०४ रोजी मैत्रीकरार झाला. या करारातील तरतुदी पुढीलप्रमाणे -

१) मोरोक्कोमधील फ्रान्सचे खास अधिकार इंग्लंडने मान्य करावेत.
२) इजिप्तमधील इंग्लंडचे खास अधिकार फ्रान्सने मान्य करावेत.
३) न्यू फाउंडलँड, सयाम, मादागास्कर येथील मासेमारीचे अधिकार फ्रान्सने सोडून द्यावेत.
४) त्याच्या मोबदल्यात इंग्लंडने फ्रान्सला पश्चिम आफ्रिकेत सवलती द्याव्यात.
५) या करारात दोन गुप्त गोष्टीचा समावेश करण्यात आला. त्या म्हणजे

अ) जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीजवळ फ्रान्सने तटबंदी करू नये.
ब) मोरोक्को मधील सुलतानाच्या सत्तेचा फ्रान्सने शेवट केल्यास त्यापैकी काही प्रदेश फ्रान्सने स्पेनला द्यावा.

या कराराला फ्रान्सच्या इतिहासात अतिशय महत्त्व आहे. इंग्लंडच्या मैत्रीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात फ्रान्सची पत व प्रतिष्ठा वाढली. इंग्लंड जर्मनीचा दोस्त बनेल ही फ्रान्सला वाटणारी भीती नष्ट झाली. या कराराचे इंग्लंड-फ्रान्समध्ये जनतेने मोठ्या उत्साहाने स्वागत केले. रशियन मैत्रीमुळे फ्रान्सची आंतरराष्ट्रीय राजकारणाता प्रतिष्ठा वाढली. परंतु जपानने रशियाचा पराभव केल्याने फ्रान्सला जर्मनीची जास्त भिती वाटत होती. परंतु इंग्लंड मैत्रीमुळे पुन्हा फ्रान्समध्ये आत्मविश्वास वाटला. परंतु फ्रान्स - जर्मनी यांच्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या कराराने जर्मनी अतिशय अस्वस्थ झाला. फ्रान्स - इंग्लंड हे अनेक शतकाचे शत्रू असूनही ते एकत्र आले याची भिती कैसरला वाटू लागली. इंग्लंडच्या मैत्रीमुळे जर्मनीच्या चोहोबाजूनींच शत्रू राष्ट्राकडून वेढले गेला. रशियन मैत्रीचा व इंग्लंडला न दुखवण्याच्या बिस्मार्कच्या धोरणाचे महत्त्व आता कैसरला समजले परंतु आता वेळ संपलेली होती. कैसरने मैत्रीकरार, तोडण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला परंतु अपयश आले. उलट यांच्या फुट न पडता ते अधिक जवळ आले. त्यातूनच **इंग्लंड-फ्रान्स-रशिया** यांच्यात **त्रिमित्र राष्ट्र** करार घडून आला.

४) त्रिमित्र राष्ट्र करार (Triple Entente) १९०७:-

इंग्लंड - फ्रान्स यांच्यात समझोता झाल्यानंतर इंग्लंडने रशियाशीही असाच समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. अतिपूर्वेकडे चीन, तिबेट तसेच मध्यपूर्वेत अफगाणिस्थान, इराण, इराक व पूर्व युरोपमध्ये बाल्कन प्रदेशावरून इंग्लंड-रशिया यांच्यात दुबळेपणा जाहीर झाला. तसेच पूर्वेकडील साम्राज्य विस्ताराला पायबंद बसला. कैसरने फ्रान्सपासूनच रशियाला फोडण्याचा प्रयत्न केला. तसेच १९०५ मध्ये जर्मनी-रशिया यांच्यात कैसरने एक करार घडून आणला. परंतु या करारास दोन्ही देशाकडून मान्यता मिळाली नाही. याचा फायदा घेऊन इंग्लंडने रशियाबरोबर समझोता करून वादग्रस्त प्रश्न सोडवण्याचे ठरवले. त्यातूनच मैत्रीचे वातावरण तयार झाले. यासाठी मोरोक्को प्रश्नासंदर्भात चर्चा सुरू झाली.

मोरोक्को ही वसाहत आफ्रिकेतील असून या प्रश्नाने युरोपामध्ये गुंतागुंत वाढली. मोरोक्को हे छोटेसे स्वतंत्र मुसलमानी राज्य होते. जिब्राल्टरच्या खाडीजवळ असल्याने राजकीय डावपेचाच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. अब्दुल अझीझ याची सत्ता होती. या प्रदेशावर फ्रान्सने आपले हक्क सांगून अनेक सवलती प्राप्त करून हा प्रदेश नियंत्रणाखाली आणला. यासाठी फ्रान्सने इंग्लंड, इटाली, स्पेन यांना विश्वासात घेतले. परंतु जर्मनीला विश्वासात घेतले नाही. त्यामुळे जर्मनीने इंग्लंड-फ्रान्स यांच्यात वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कैसरने मोरोक्कोमधील फ्रान्सच्या हालचालीला विरोध केला. सर्व युरोपियन राष्ट्रांचे आर्थिक हितसंबंध मोरोक्कोमध्ये गुंतलेले आहेत.१८८० मध्ये १३ राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेने मोरोक्कोमध्ये सर्व राष्ट्रांना समान व्यापारी अधिकार दिले होते. म्हणूनच मोरोक्कोबाबत कसलाही बदल करण्याचा अधिकार एकट्या फ्रान्सला नाही. यासाठी संबंधीत राष्ट्रांची आंतरराष्ट्रीय परिषद बोलवावी अशी मागणी कैसरने केली.

मोरोक्को संबंधीचा वादग्रस्त प्रश्न सोडविण्यासाठी स्पेनमधील अलिनसिरास या गावी १६ जानेवारी १९०६ रोजी युरोपीय राष्ट्रांची परिषद बोलविण्यात आली. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, रशिया, इराण, ऑस्ट्रिया, अमेरिका, स्वीडन, स्पेन, पोर्तुगाल इत्यादी बारा राष्ट्र हजर होती. या परिषदेमध्ये फ्रान्सला अनुकूल असेच निर्णय घेण्यात आले. या परिषदेने घेतलेले निर्णय पुढील प्रमाणे

१) सर्व युरोपियन राष्ट्रांनी मोरोक्कोंचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व मान्य करावे.
२) मोरोक्कोमध्ये शांतता व सुव्यवस्था टिकविण्यासाठी स्विस इन्स्पेक्टर जनरलच्या आधिपत्याखाली फ्रान्स यांचे आंतरराष्ट्रीय पोलिसदल ठेवण्यात यावे.
३) बड्या राष्ट्रांचे मोरोक्कोमधील आर्थिक हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, जर्मनी इत्यादी राष्ट्रांनी भांडवल पुरवून मोरोक्को मध्ये स्टेट बँक स्थापन करावी.

अलिनसिरास परिषदेने फ्रान्सला अनुकूल असे निर्णय घेतले. तसेच निर्णयाच्यावेळी जर्मन मित्रातील मतभेद स्पष्ट झाले दिसून आले. त्यामुळे मोरोक्को प्रश्नावरून जर्मनी आक्रमण बनली. त्यामुळे जर्मनी कोणताही निर्णय केव्हाही घेईल व युद्ध पेटेल अशी भिती इंग्लंडला वाटत होती. फ्रान्सप्रमाणे रशियाबरोबर मैत्री करावी असे इंग्लंडला वाटत होते. तर इंग्लंड - रशिया या आपल्या मित्रांतील वाद मिटावे व आपला गट सामर्थ्यशाली बनावा असे फ्रान्सला वाटत होते यामुळे यांच्यात एकत्र येण्याचे वातावरण निर्माण झाले. शिवाय जर्मनीने इंग्लंडच्या आरमाराला शह देण्यासाठी आरमार विस्ताराचे धोरण संसदेत मंजूर करून घेतले. जर्मनीचा एकंदर लष्करी खर्च १/३ ने वाढवला. या घटनामुळे इंग्लंडने रशियाबरोबर समझोता घडवून आणला. १८९४च्या फ्रान्स-रशिया व १९०४च्या फ्रान्स - इंग्लंड, कराराचे ३१ ऑगस्ट १९०७ रोजी त्रिमित्र राष्ट्र करारात रूपांतर झाले. या कराराने

तिबेट, इराण, अफगाणिस्थान या मध्य आशियातील देशाबाबत दोन्ही देशात असलेले मतभेद मिटवण्यात आले. **त्रिमित्र राष्ट्र करारातील तरतुदी पुढीलप्रमाणे -**

१) रशिया आणि ब्रिटिशांचे हिंदुस्थानातील साम्राज्य यांच्या दरम्यान असलेल्या तिबेटचे स्वातंत्र्य दोघांनीही मान्य करावे.
२) रशियाने अफगाणिस्थानमध्ये हस्तक्षेप करू नयेत.
३) अफगाणिस्थामध्ये ब्रिटिशांचा प्रभाव रशियाने मान्य करावा व अफगाणिस्थानशी इंग्रजांमार्फत संबंध प्रस्थापित करावेत.
४) इंग्लंडनेही अफगाणिस्थानच्या राजकीय परिस्थितीत बदल केला जाणार नाही याबाबत रशियाला आश्वासन दिले.
५) इराणेच अखंडत्व दोघांनीही मान्य करावे. तसेच इराणमध्ये मुक्तद्वार व्यापारपद्धती असावी.
६) इराणचे तीन भाग निर्माण करून त्यापैकी एक भाग रशियाच्या, एक भाग इंग्लंडच्या प्रभावक्षेत्राखाली असावा. ठरलेला एक भाग मध्य इराण स्वतंत्र असावा.

त्रिमित्र करार म्हणजे जगाच्या राज्यकारणातील महत्त्वाचा टप्पा होय. कारण दोन राष्ट्रातील शत्रूत्व नष्ट झाले. इंग्लंड-फ्रान्स - रशिया या तीन राष्ट्रांची युती व त्यातून तीन राष्ट्रांच गट तयार झाली. हा तिघांच्याही दृष्टीने फायदेशीर होता. कारण कैसरला याची भिती वाटू लागली. फ्रान्स अल्सेस व लॉरेन्स हे प्रांत परत मिळवण्याचा प्रयत्न करेल. तर रशिया बल्कनमध्ये आक्रमण पवित्रा घेईल अशी भिती जर्मनीला वाटू लागली. १९०७ मध्ये त्रिराष्ट्र करार (जर्मनी, इटाली, ऑस्ट्रिया) विरोधी त्रिमित्र राष्ट्र (फ्रान्स, इंग्लंड, रशिया) करारामुळे युरोपाची दोन गटात विभागणी झाली. थोड्याच काळात या दोन गटात लष्करी सामर्थ्यांची स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेतूनच पहिले महायुद्ध सुरू झाले.

आपली प्रगती तपासा

प्रश्न : त्रिमित राष्ट्र करार सांगा.

१२.४ सारांश :

युरोपच्या राजकारणात फ्रान्सला एकटे पाडण्याच्या हेतूने बिस्मार्कने अनेक राष्ट्रांशी करार केले. त्यातूनच जर्मनीच्या नेतृत्वाखाली त्रिराष्ट्र कराराच्या उदय झाला. या करारात जर्मनी - ऑस्ट्रिया - इटाली समाविष्ट झाली. याच्या उलट फ्रान्सने आपल्या संरक्षणासाठी व स्वातंत्र्यासाठी स्वतंत्र गट निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यातून फ्रान्स-इंग्लंड-रशिया यांच्यात त्रिमित्र करार निर्माण झाली. परिणामी युरोपाची दोन गटामध्ये विभागणी होऊन गटबाजीचे राजकारण सुरू झाले. स्वत:च्या सामर्थ्याची व सत्ता प्राप्तीची स्पर्धा सुरू झाली त्यातूनच पहिले महायुद्ध सुरू झाले. त्यामुळे बिस्मार्कची संघ पद्धती

जगाला शापीत ठरली. कारण या महायुद्धामध्ये प्रचंड प्रमाणात वित्त - जीवीत हानी झाली.

१२.५ दीर्घोत्तरी प्रश्न:

१) जर्मनीच्या नेतृत्वाखालील त्रिराष्ट्र करार स्पष्ट करा.
२) फ्रान्सच्या नेतृत्वाखालील त्रिराष्ट्र कराराचे महत्त्व स्पष्ट करा.
३) बिस्मार्कची संघपद्धती जगाला शापीत ठरली. भाष्य करा.
४) युरोपचे गटबाजीचे राजकारण पहिल्या महायुद्धास जबाबदार होते का स्पष्ट करा.

❖❖❖

१३

पहिले महायुद्ध - पॅरिस शांतता परिषद

प्रा. शिंदे बी. डी.

प्रकरण रचना :

१३.० उद्दिष्टे

१३.१ प्रस्तावना

१३.२ पहिल्या महायुद्धाची कारणे

१) बिस्मार्कची संघपद्धती जगाला शाप ठरली. २) राष्ट्रवादाची भावना

३) लष्करीकरणाचे अतिरेकी धोरण ४) वंशवादाचे नवे खुळ

५) युरोपियन विकृत मत ६) आर्थिक साम्राज्यवाद

७) कुटनीतीतील कमालीची गुप्तपणा ८) महत्त्वाकांक्षी कैसर विल्यम

९) आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव १०) वर्तमानपत्रांचा विषारी प्रचार

११) जर्मनीत प्रशियन संस्कृतीचे प्राबल्य १२) अल्सेस - लोरेन्सचे दु:ख फ्रान्सच्या मनात

१३) पूर्वीय प्रश्नातील संघर्ष १४) बोस्निया - हर्जेगोविना यांची डोकेदु:खी

१५) ट्रिस्ट - ट्रेटिनो प्रदेश मिळवण्याची इटालीची महत्त्वाकांक्षा

१६) तात्कालिक कारण - महायुद्धास प्रारंभ

१३.३ युद्धाची वाटचाल - मध्यवर्ती सत्तांचा पराभव

१३.४ जर्मनीच्या पराभवाची कारणे

१) इंग्लंडचे श्रेष्ठ दर्जाचे आरमार २) अमेरिकेचा दोस्त राष्ट्रांच्या बाजूने युद्धप्रवेश

३) जर्मन राष्ट्राला सैन्याची कमतरता ४) दोस्तांना वसाहतीकडून मोठ्या प्रमाणात मदत

५) जर्मनीची मित्र राष्ट्रे अतिशय कमकुवत.

१३.५ पहिल्या महायुद्धाचे परिणाम

१) पहिल्या महायुद्धात अफाट प्राणहानी २) महायुद्धामुळे आर्थिक हलाकी

३) अमेरिकेचा बलाढ्य सत्ता म्हणून उदय ४) जर्मनीची दुरवस्था

५) स्वयंनिर्णयाचे तत्व व सार्वमताचा कौल ६) युद्धाचा धसका - राष्ट्रसंघाची निर्मिती ७) सामाजिक जीवनावर परिणाम ८) आर्थिक परिणाम

९) लोकांचा पाहण्याचा दृष्टीकोन बदलला १०) साम्राज्यवादाचा पाडावा

११) औद्योगिक क्रांतीस सुरूवात १२) हुकूमशहांचा उदय

१३) वसाहतीमध्ये स्वातंत्र्य चळवळीला प्रारंभ १४) जर्मनीत प्रजासत्ताक

१३.६) शांतता परिषद

१) परिषदेची ध्येय २) परिषदेसमोरील अडचणी ३) परिषदेतील महत्त्वाच्या व्यक्ती ४) शांतता परिषदेच्या आधारभूत गोष्टी ५) शांतता परिषदेचे कामकाज

१३.७ व्हसांयचा तह

अ) व्हर्साय तहाच्या तरतुदी

१) प्रादेशिक तरतुदी २) आर्थिक तरतुदी

३) लष्करी तरतुदी ४) कायदेशीर तरतुदी

ब) व्हसांय तहाचे टीकात्मक परिक्षण

१) दोस्तांनी तहजर्मनीवर लादलेला होता. २) व्हर्साय तह लोकांचा नसून मुत्सद्यांचा तह ३) व्हर्साय तह खूप कडक होता. ४) तहामध्ये देवाणघेवाण स्वीकारली नाही. ५) विल्सनचा ध्येयवाद व क्लेमेन्सीआंचा स्वार्थ यांची सांगड होय. ६) व्हर्साय तहाने जर्मनीचा विश्वासघात ७) युद्ध खंडणीही तरतुद दोघांवरही अन्याय करणारी होती. ८) तहाचा सर्वात महत्त्वाचा दोष म्हणजे सुडबुद्धीने लादला. ९) युरोपचे अनेक तुकडे १०) तहातील आरमारी तरतुदी ११) युद्ध खंडणीची तरतुदही दोस्तांना हानीकारक.

१३.८ सेंट जार्मेनचा तह -

१) प्रादेक्षिक तरतुदी २) लष्करी तरतुदी

३) आर्थिक तरतुदी ४) राजकीय तरतुदी

५) कायदेशीर तरतुदी

१३.९ सारांश

१३.१० दीर्घोत्तरी प्रश्न

१३.० उद्दिष्टये

१) पहिल्या महायुद्धाच्या कारणांची माहिती सांगणे.

२) पहिल्या महायुद्धाची वाटचाल - स्वरूप याची माहिती देणे.

३) पहिल्या महायुद्धाचे परिणाम सांगणे.

४) शांतता परिषदेविषयी माहिती देणे.

५) व्हर्सायचा तह समजावून देणे.

१३.१ प्रस्तावना :

युरोपच्या राजकारणात गटबाजीच्या राजकारणाचा उदय झाला. त्यातून सत्ता संघर्ष, सामर्थ्यशाली, साम्राज्यविस्तार, लष्करी वाढ यामध्ये स्पर्धा सुरू झाली. त्यातून १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. जर्मन गटाचा या युद्धात १९१८ मध्ये पराभव झाला. युद्धसंदर्भात व जगात शांतता निर्माण करण्यासाठी फ्रान्समधील पॅरिस शहरामध्ये शांतता परिषद भरवण्यात आली. या परिषदेमध्ये इंग्लंड, फ्रान्स, इटाली, अमेरिका, जपान या राष्ट्रांनी एकत्र विचार करून अनेक तह केले. शांतता परिषदेने जर्मनीवर व्हर्सायचा तह लादला. तसेच राष्ट्रसंघाच्या स्थापनेचा निर्णय घेतला.

१३.२ पहिले महायुद्ध :

२०व्या शतकातील महत्त्वपूर्ण घटना म्हणजे पहिले महायुद्ध होय. बाल्कन युद्धे संपली तरी लष्करीदृष्ट्या सामर्थ्यवान बनण्याचा प्रयत्न युरोपात चालू होता. साम्राज्यविस्ताराच्या महत्त्वाकांक्षामुळे महायुद्ध पेटले होते. महायुद्ध म्हणजे १९व्या शतकातील मानवी संस्कृतीने केलेल्या असामान्य प्रगतीतील अडथळा होय. इ.स.१९१४-१८ या काळात दोन युरोपियन राष्ट्रांच्या गटात झालेल्या युद्धांना जागतिक महायुद्ध म्हटले आहे. हे अतिशय विनाशकारी होते. युद्ध जवळजवळ ४ वर्ष ११ महिने म्हणजे १५६५ दिवस लढले. युद्धात बॉम्ब हल्ले, कत्तली, रोगराई, दुष्काळ मोठ्या प्रमाणात निर्माण झाला. या युध्दाची कारणे पुढील प्रमाणे –

१. बिस्मार्कची संघपद्धती जगाला शाप ठरली :

बिस्मार्कने परराष्ट्रीय धोरणात फ्रान्सला एकाकी पाडण्याच्या प्रयत्न करत असताना, आपल्याला मित्र मिळवले. त्यातूनच इ.स.१८७९ जर्मनी - ऑस्ट्रिया यांच्यात लष्करी व मैत्री करार घडून आला. तर इ.स. १८८२ इटालीला सामील करून तीन देशांचा मैत्री करार घडवून आणला. याच वेळी रशिया व फ्रान्सची मैत्री होऊन दिली नाही; परंतु इ.स.१८९० मध्ये त्यांच्या जवळीक होऊन इ.स.१८९४ मध्ये फ्रान्स - रशिया मैत्री करार झाला. इंग्लंडला आंतरराष्ट्रीय राजकारणात एकाकीपणाचे धोरण जाणवल्याने भीती वाटू लागली. त्याने जर्मनीशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला, पण अपयश आले. इ.स. १९०२ मध्ये इंग्लंड - जपान मैत्री होऊन इ.स. १९०४ मध्ये इंग्लंड -फ्रान्स यांच्यात मैत्री झाली तर इ.स.१९०७ मध्ये या रशिया सामील झाला. त्यामुळे इंग्लंड - फ्रान्स रशिया, जपान हा एक गट झाला. दुसरा जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, तुर्कस्थान, इटाली असा गट झाला. या दोन गटात परस्पर स्पर्धा व द्वेषभावना निर्माण झाली. बिस्मार्कने युरोपात तो गुप्त कराराचा डोलारा उभारला. त्याची परिणती इ.स.१९१४ च्या महायुद्धात घडून आली व एकमेकातील गुप्त करार हा युरोपला शाप ठरला.

२. राष्ट्रवादाची भावना :

माणसाच्या मनात कुठे तरी खोलवर दडलेले काही विकार असतात. वेळप्रसंगी ते तो व्यक्त करून अनेक हिंसक स्वरूपही धारण करतो. आंतरराष्ट्रीय प्रश्न सहकार्याने व शांततेने न सुटण्याचे मुख्य कारण म्हणजे आत्यंतिक राष्ट्रवाद होय. राष्ट्राराष्ट्रांच्यातील संघर्ष सोडिवण्यासाठी न्यायालयात नव्हते. युद्ध सज्ज, शस्त्रास्त्रनिर्मिती आणि युद्ध पेटविण्याचे प्रयत्न इत्यादीमुळे स्वत:च्या राष्ट्राचे सत्य व मानवी श्रेष्ठतेपुढे अन्य समाजाला व नागरिकाला तुच्छ मानने. राष्ट्रवादामुळेच फ्रान्स अल्सेस-लॉरेन परत मिळवण्यासाठी धडपड करत, तर इंग्लंड - जर्मनीचे वैर याच भावनेमुळे निर्माण झाले.

३. लष्करीकरणाचे अतिरेकी धोरण :

युरोपातील प्रमुख राष्ट्रात एकमेकांबद्दल विश्वास न राहिल्याने लष्करीकरणाचे धोरण अमलात आले. त्यामुळे खर्च वाढला. गुप्त करारामुळे परस्परविषयी संशय व अविश्वास निर्माण झाला. युरोप एक लष्करी छावणी बनली. बिस्मार्कच्या राजकारणाचे प्रमुख सूत्र म्हणजे जर्मनीत लष्करीदृष्टया स्वयंपूर्ण बनवणे. त्यामुळे इतरांना भिती वाटू लागल्याने त्यानेही लष्कराची वाढ केली. विनाशक व विध्वंसक शस्त्रांची निर्मिती केली. जर्मनीच्या विल्यम कैसरने नाविक दल अजिंक्य करून इंग्लंडशी वैर निर्माण केले. त्यातूनच युद्धाला जवळ बोलवले.

४) वंशवादाचे नवे खुळ :

राष्ट्रवादानंतर वंशवादाचे नवे खुळ निर्माण झाले. विशिष्ट वंशाच्या सर्व लोकांना एकत्र आणण्याची स्वप्ने वंशवादाचे पुरस्कर्ते पाहू लागले. रशिया स्लाव्हवंशियाचा त्राता तर जर्मनीने जर्मनवंशाचे नेतृत्व केले. त्यातून चळवळी निर्माण केल्या. त्याचा मुख्य हेतू साम्राज्यविस्तार करणे हा होता. मध्ययुगीन धार्मिक क्रांतीनंतर युरोपात सार्वभौम राज्य अस्तित्वात आले. हे स्वार्थासाठीच सर्वस्वी मोकळी होती. सार्वभौमत्व व स्वातंत्र्याच्या अतिरेक झाल्याने स्पर्धा सुरू झाली.

५) युरोपियन विकृत मन :

राजकारणी लोकांनी केलेला प्रचार व शस्त्र स्पर्धेमुळे राष्ट्रवादाच्या अतिरेकीपणामुळे संपूर्ण युरोपात अस्थिरता निर्माण झाली होती. राष्ट्रांनी दिलेली वचने न पाळल्याने जनतेच्या विश्वासाला मोठा धक्का बसला होता. त्यामुळे परस्पर - अविश्वास, संशय व फसवेगिरीचे वातावरण निर्माण झाले. कोणत्याही हालचालीला विकृत अर्थ लावला जात असे. त्यामुळे युरोपात एक प्रकारे विकृत अशी परिस्थिती होती. त्याची परिणती महायुद्धात होणेही गोष्ट स्वाभाविक होती.

६) आर्थिक साम्राज्यवाद :

युरोपमध्ये १८व्या शतकात औद्योगिक क्रांती जन्माला आली आणि १९व्या शतकात तिचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. त्यातूनच वसाहती, बाजारपेठा, कच्चा माल मिळवण्यासाठी साऱ्या युरोपात स्पर्धा सुरू झाली. यातूनच त्यांच्या द्वेष निर्माण होऊन तो विकोपास गेला. प्रत्येकाला साम्राज्याची हाव सुटली. त्यातून आर्थिक संघर्षाला सुरूवात झाली. जर्मनीने आफ्रिकेत व अतिपूर्वीकडे वसाहती मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यामुळे इंग्लंडने त्यास विरोध केला. त्यामुळे जर्मनी - इंग्लंड यांच्यात वैर झाले.

७) कुटनीतीतील कमालीचा गुप्तपणा :

आंतरराष्ट्रीय राजकारणात गुप्तपणा होता. देशातील मंत्र्यांनाही कराराची माहिती नसे. त्यामुळे परस्पर अविश्वास व संशय निर्माण झाला. इ.स. १९०६ इंग्लंडचा विदेशी मंत्री सर एडवर्ड याने फ्रान्सशी लष्करी करार केला, तरी पार्लमेंटला माहिती नव्हता. गुप्त नीतीमुळे विरोधी राष्ट्रे त्यांना आक्रमक व लष्करी करार समजून आपली युद्ध सिद्धांतात वाढवीत होते. महायुद्धानंतर ऐतिहासिक संशोधनानंतर हे कराराचे संरक्षण स्वरूप होते हे सिद्ध केले.

८) महत्त्वाकांक्षी कैसर विल्यम :

उद्योगप्रधान जर्मनीचे नेतृत्व कैसर विल्यम करत होता. तो विलक्षण महत्त्वाकांक्षी सत्ताधीश होता. युरोपात जर्मनीच्या नेतृत्वाखाली जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, बाल्कन राष्ट्रे, तुर्कस्थान यांचे संघराज्याचे स्वप्न पाहत होता. तो अतिशय गर्विष्ठ, रागीट स्वभावाचा, जबर महत्त्वाकांक्षी होता. 'जर्मनी सर्वश्रेष्ठ बनावे किंवा सर्व नष्ट व्हावे,' या घोषणेवर नितांत श्रद्धा होती. इंग्रजांबद्दल वाईट भावना होती. इ.स. १८७० नंतर नाविक दलाची प्रचंड वाढ करून इंग्लंडला शह देण्याचा प्रयत्न केला. त्याच्या या स्वभावामुळे पहिल्या महायुद्धाच्या खाईत जग लोटले.

९) आंतरराष्ट्रीय संघटनेचा प्रभाव :

देशादेशातील संबंधावर नियंत्रणासाठी आंतरराष्ट्रीय कायदा अस्तित्वात होता; परंतु अंमलबजावणीसाठी संघटना अस्तित्वात नव्हती. पण गुप्त करार, कायदे मंडळ अंधारात ठेवले होते. हेग परिषदेने अनेक ठराव मांडले व पास केले. पण त्यांच्या नियंत्रणाला अर्थ नव्हता. सर्वमान्य सुप्रीम कोर्ट अस्तित्वात नव्हते. हेग परिषदेने युद्ध रोखण्याचे नियम पाळले नाही. त्यामुळे ते अपयशी ठरले. अनेक करार झाले, पण त्याविरोधी कोणतीही ठाम भूमिका घेतली नाही.

१०) वर्तमानपत्रांचा विषारी प्रचार :

युरोपातील वृत्तपत्रांनी जो प्रक्षोभक आणि विषारी प्रचार केला. त्यांनी एकमेकांविरूद्ध लोकमत प्रक्षुब्ध झाले. वर्तमानपत्रांनी देशाची राष्ट्रीय भावना भडकविण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही प्रश्नांचा विचार शांतपणे न करता

वर्तमानपत्रांनी अतिरंजित स्थान वृत्त कथन केले. त्याचा लोकमतावर विपरित परिणाम झाला. बिस्मार्कने वर्तमानपत्रांना दोष देताना सांगितले की, युरोपिय राजकारणातील सौहार्द वर्तमानपत्रांनी विषारी लिखाणामुळे शांतता नाहीशी झाली व त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठा कटुपणा निर्माण झाला आहे. इंग्लंड - फ्रान्स, जर्मनी - इंग्लंड यांच्यातील वाद मोठ्या प्रमाणात निर्माण केला.

११) जर्मनीत प्रशियन संस्कृतीचे प्राबल्य :

इ.स. १८७०मध्ये जर्मनीचे एकीकरण करून जर्मनीने प्रशियन संस्कृती आपलीशी करून घेतली. त्यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. प्रशियाचा युद्धावर मोठा विश्वास होता. युद्धात जो विजय होईल त्याच्या बाजूने सत्य असते असे मत प्रशियन लोकांचे होते. युद्ध हीच सर्वश्रेष्ठ गोष्ट आहे असे प्रशियाला वाटते. **मिराबो म्हणतो** की, 'प्रशियाचा राष्ट्रीय उद्योग युद्ध आहे,' तर **नित्शे म्हणतो** की, 'युद्ध हे नेहमी चांगल्या कारणाकरिताच होत असते.' या तत्त्वज्ञानाचा जर्मन तरुण कोवळ्या मनावर मोठा सखोल ठसा उमटला होता. जगातील सर्व प्रश्न पाशवी बळानेच सुटतात ही जर्मन तरुणांची श्रद्धा होती. या तत्त्वज्ञानाची परिणती महायुद्धात घडून आली.

१२) फ्रान्सच्या मनात अल्सेस - लोरेनचे दु:ख :

इ.स.१८७१ जर्मनीने पाशवी बळाचा उपयोग करून फ्रान्सपासून अल्सेस - लॉरेन परगणे जबरदस्तीने हिसकावून घेतले होते. त्यामुळे फ्रान्स दुखावला होता. तो परत मिळवण्याकरिता कटिबद्ध झाला. फ्रान्सने सूडाची भावना सतत जागृत ठेवण्यासाठी, पॅरिसमध्ये स्ट्रास्टबर्गचा पुतळा उभारल्याने सतत आठवण राहिली. पॉल डेरूलीडच्या गीतामुळे सूडाची भावना जागृत झाली. मोरोक्को मिळवण्यात जर्मनीने अडथळा आणला. त्यामुळे सूडाची भावना फ्रान्समध्ये निर्माण झाली.

१३) पूर्वीय प्रश्नातील संघर्ष :

तुर्की राजवटीमुळे बाल्कन प्रदेशात अत्यंत असमाधानकारक परिस्थिती निर्माण झाली. मॅसेडोनिया कोणाच्या ताब्यात असावा याबाबत ग्रीस, सर्बिया व बल्गेरिया यांच्यात चुरस सुरू झाली. बाल्कन प्रदेशात बड्या राष्ट्रांचे हितसंबंध गुंतले होते. बोस्नियात पेचप्रसंग निर्माण झाला. त्यामुळे रशियाने सर्बियाला पाठिंबा दिला. कारण स्लाव्ह जमातीचे लोक होते. त्यावर ऑस्ट्रिया हंगेरीचे वर्चस्व होते. परंतु अल्बेनिया नवे राष्ट्र निर्माण झाल्याने विशाल सर्बियाचे स्वप्न भंग पावले. त्यामुळे मोठा संघर्ष निर्माण झाला. पूर्वीच्या प्रश्नांचा विचार करता व तेथील घडामोडींचा तपशीलवार विचार केल्यास यातून महायुद्धाचा उदय झाला.

१४) बोस्निया - हर्जेगोविना यांची डोकेदु:खी :

हे दोन प्रांत ऑस्ट्रिया - हंगेरीने आपल्या साम्राज्यास जोडल्याने बाल्कन प्रदेशात डोकेदु:खी निर्माण झाली. इ.स.१८७८ बर्लिन काँग्रेसच्या तहानुसार बोस्निया व हर्जेगोविना या प्रांताचा कारभार ऑस्ट्रिया - हंगेरीवर सोपवण्यात आला. त्यावर तुर्की सुलतानाचे सार्वभौमत्व कायम होते. परंतु इ.स. १९०८ ऑस्ट्रिया-हंगेरीने दोन प्रांतांची तमा न बाळगता साम्राज्यात विलीन करून घेतले. त्यामुळे सर्बिया कायमचा दुखावला. या दोन प्रांतातील लोकसुद्धा स्वातंत्र्यासाठी चळवळ निर्माण करत होते. त्यामुळे कायमचे शत्रुत्व निर्माण झाले. त्यातूनच महायुद्धाचा भडका झाला. ऑस्ट्रिया - सर्बिया तेढ हे पहिल्या महायुद्धाचे महत्त्वाचे कारण समजले जाते.

१५) ट्रिस्ट ट्रेटिनो प्रदेश मिळवण्याची इटालीची महत्त्वाकांक्ष :

या प्रदेशात इटालीची लोकवस्ती होती; परंतु मालकी ऑस्ट्रियाची होती. त्याची मुक्ती घडवण्याची इटालीची महत्त्वाकांक्षा होती. यामुळे शांतता टिकवणे अशक्य होती. आड्रिआटिक समुद्रावरील वर्चस्वाकरिता इटाली - ऑ. हंगेरी यांच्यात स्पर्धा निर्माण झाली. त्यातून महायुद्ध घडले.

१६) तात्कालिन कारण - महायुद्धाला प्रारंभ

युरोपात स्फोटक वातावरणात भयंकर घटनेची ठिणगी पडली आणि महायुद्धाने पेट घेतला. ऑस्ट्रियन राजकुमाराचा खून हे त्याचे कारण होय. बाल्कन प्रदेशातील सर्बिया व ऑस्ट्रिया हंगेरी यांच्यात अत्यंत कटू स्पर्धा निर्माण झाली. स्लाव्ह जमातीचे एकीकरणासाठी अनेक गुप्त करार झाले. ऑस्ट्रियन सम्राटाचा पुतण्या आर्यड्यूक फ्रान्सिस फर्डिनंड व त्यांची पत्न हे दोघे बोस्निया प्रांताची राजधानी सरजेव्होला भेट देण्यासाठी गेले. तेव्हा २८ जून १९१४ रोजी भर रस्त्यात खून झाला. त्यामुळे मोठा प्रक्षोभ निर्माण झाला. या प्रकरणाची चौकशीअंती खुनी सर्बियन वंशाचा व सर्बियन अधिकाऱ्यांनी शस्त्रे पुरविली ते स्पष्ट झाले. त्यामुळे ऑस्ट्रियन जनतेत सर्बियाविरूद्ध युद्धाची मागणी केली. अखेर २३ जुलै सर्बियास निर्वाणीचा संदेश पाठवला की, खुनाची चौकशी व ऑस्ट्रिया - हंगेरीविरोधी प्रचार बंद झाला पाहिजे, ही मागणी केली आणि त्याचे उत्तर ४८ तासांत द्यावे; परंतु सर्बियाने या अटी अमान्य केल्या. हा वादाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर ठेवणयाला सर्बियाने तयारी दर्शविली. पण ऑस्ट्रियाने फेटाळून लावली. इंग्लंड, फ्रान्स, रशिया मध्यस्थीने ऑस्ट्रियाची मुदत वाढवण्याचा प्रयत्न केला, पण ते अमान्य केले. शेवटी फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, इटाली यांच्या बैठकीची मागणी केली. पण याला जर्मनीने विरोध केला. शेवटी ऑस्ट्रियाने २८ जुलै १९१४ रोजी सर्बिया विरूद्ध युद्ध पुकारले.

आपली प्रगती तपासा

प्रश्न : पहिल्या महायुद्धाची कारणे सांगा.

१३.३ युद्धाची वाटचाल - मध्यवर्ती सत्तांचा पराभव

ऑस्ट्रियन राजपुत्राच्या खूनानंतर एक महिन्याने म्हणजे २८ जुलै १९१४ रोजी युद्धास सुरूवात झाली. ३१ जुलै रोजी रशियाने सर्बियाच्या बाजूने युद्धात प्रवेश केला. १ ऑगस्टला जर्मनीने पूर्व आघाडी तर ३ ऑगस्टला पश्चिम आघाडीवरून युद्ध सुरू केले. बेल्जीनयमच्या स्वातंत्र्यासाठी ४ ऑगस्टला इंग्लंडने युद्धात प्रवेश केला. त्यामुळे इंग्लंड, फ्रान्स, रशिया, सर्बिया, बल्जीयम, जपान इ. दोस्त राष्ट्राच्या बाजूस, तर जर्मनी, ऑस्ट्रिया, बल्गेरिया, तुर्कस्थान इ. राष्ट्रे दुसऱ्या बाजूला सामील झाले. या युद्धात युरोपमधील बहुतेक सर्व राष्ट्रे, आशिया, आफ्रिका खंडातील वसाहती, अतीपूर्वेकडील चीन, जपान तर पश्चिमेकडे अमेरिका खंडातील राष्ट्र व वसाहती या युद्धात सहभागी झाले. हे युद्ध समुद्र, जमिनी, आकाश येथे, आशिया, आफ्रिका, युरोप या तिन्ही खंडात ४ वर्षे ११ महिने युद्ध लढले.

जर्मनीने एकाच वेळी पूर्व - पश्चिम आघाड्यावर युद्ध करावे लागेल हे गृहीत धरून पूर्व आघाडी संरक्षणात्मक पवित्रा घेतला. जर्मनीने प्रथम पश्चिम आघाडीवर लढा सुरू केला. फ्रान्समध्ये जाण्यासाठी बेलजीयमचा वापर जर्मनीला गरजेचा होता म्हणून जर्मनीने बेलजीमकडे विनंती केली. त्यास नकार दिल्याने जर्मनीने बेलजीयमवर हल्ला चढवला. प्रतिकार करूनही २० ऑगस्ट १९१४ रोजी बेलजीयमने शरणागती स्वीकारली. त्यानंतर प्रचंड वेगाने हालचाली करून जर्मन फौजा फ्रान्समध्ये पोहचल्या. इंग्रज, फ्रेंचांनी स्वसरंक्षणासाठी तात्काळ आधार घेतली. जर्मनीने यार्न नदीपर्यंत मजल मारली. दोस्तांनी बर्डून पर्यंत माघार घेतली. दोन्ही पक्षांनी खंदक खाणून परस्परांसमोर उभे होते. संरक्षणात्मक ठाण्यांची व खंदकांची सुरूवात केल्याने दोघांचीही आगेकूच थांबली.

ऑस्ट्रियाने सर्बियावर हल्ला चढवून पूर्व आघाडीवर युद्ध सुरू केले. सर्बियाच्या मदतीला रशिया धावून आला. त्यामुळे जर्मनीने १ ऑगस्ट १९१४ रोजी पूर्व आघाडी सुरू केली. रशियाने ऑस्ट्रियातील गॅलेशिया प्रदेशात उतरण्याने जर्मनी - ऑस्ट्रिया यांनी माघार घेतली. प्रशियातील टनेनबर्ग येथे जर्मनीने रशियाचा पराभव केला. त्यामुळे रशियाने माघार घेतली. जर्मनीने रशियन पोलंडवर हल्ला चढविला. रशियाचा पुन्हा पराभव झाला. पश्चिम आघाडीप्रमाणेच पूर्व आघाडी दोन्ही राष्ट्रांनी संरक्षणात्मक बनवली.

पूर्व - पश्चिम आघाडीवर युद्ध सुरू असतानाच सागरावरही युद्ध सुरू होते. जर्मन आरमाराने इंग्रज आरमारांचा व व्यापारी जहांजीची समाचार घेण्याचा प्रयत्न केला. त्यास फारसे यश मिळाले नाही. दोन वर्षात ब्रिटिश आरमाराने जर्मन आरमाराचा विनाश केला. डॉगरबॅक व हेलिगोलँड येथे झालेली सागरी युद्ध अतिशय महत्त्वाची ठरली. या युद्धात दोघांचेही प्रचंड नुकसान झाले. युद्ध सुरू होताच ब्रिटिशांचा मित्र जपानने पूर्वेकडे युद्धास सुरूवात केली. जपानने

किलोचे हे जर्मन बंदर जिंकून जर्मन आरमार नष्ट केले. आरमारांच्या दृष्टीने जेटलॅंडची लढाई अत्यंत महत्त्वाची झाली. इंग्रजांनी जर्मनीची नाकेबंदी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे जर्मनीने इंग्लंड आरमार नष्ट करण्याचा प्रयत्न केला. जर्मनी, तिच्या दोस्त राष्ट्रांना कोणत्याही प्रकारची मदत होणे अवघड झाल्याने जर्मनीने पाणबुड्यांचे युद्ध सुरू करून काही काळ इंग्लंडची नाकेबंदी केली. त्यामुळे अमेरिका युद्धात उतरली. त्यामुळे जर्मनीला पाणबुड्यांचे युद्ध महागत पडले.

१९१४ ते १९१६ पर्यंत मध्यवर्ती सत्ता सामर्थ्यशाली होती. जर्मनीच्या नेतृत्वाखाली अनेक विजय मिळवले. परंतु युद्ध दीर्घकाळ लांबल्याने सर्व जबाबदारी एकट्या जर्मनीवर पडल्या. त्यामुळे अखेरच्या टप्प्यात जर्मनी कमकुवत बनली. तरी दोस्त राष्ट्र सामर्थ्यशाली होती. जर्मनीपुढे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या होत्या. तरीपण जर्मनीने पश्चिम आघाडीवर पुन्हा जोरदार हल्ला केला परंतु यश मिळाले नाही. २९ सप्टेंबर रोजी बल्गेरियाने शरणागती स्वीकारली. पॅलेस्टाईनच्या मोहिमेत तुर्कांचा पूर्णपणे पराभव झाला. ३१आक्टोंबर रोजी तुर्कस्थाने शरणागती पत्करली. ४ नोव्हेंबर १९१८ रोजी ऑस्ट्रियानेही युद्धबंदी मान्य केली. त्यामुळे पूर्व आघाडी पूर्णपणे कोसळली. शेवटी शांततेची मागणी केली. ३ ऑक्टोंबर रोजी जर्मनीने विल्सनकडे शांतता तहाची मागणी केली. ९ नोव्हेंबर १९१८ रोजी कैसर विल्यमने राजत्याग करून हॉलंडला पलायन केले. राजसत्तेचा शेवट झाला. जर्मनीमध्ये लोकसत्ताक स्थापन झाल्याची घोषणा करण्यात आली. नव्या हंगामी सरकारने दोस्ताकडे युद्धबंदीची याचना केली. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता जर्मनी दोस्त राष्ट्र यांच्यात युद्धबंदी करण्यात आली. पहिल्या महायुद्धाचा शेवट झाला.

आपली प्रगती तपासा

प्रश्न : पहिल्या महायुद्धाची वाटचाल सांगा.

१३.४ जर्मनीच्या पराभवाची कारणे

पहिल्या महायुद्धात जर्मनीने प्रचंड तयारी केली होती. जर्मन सैन्य, सेनापती दोस्तापेक्षा जास्त होते. सेनापती हिंडेनबुर्ग व लुडेनडॉर्फ यांनी शेवटपर्यंत दोस्तांशी मोठ्या हिमतीने संघर्ष केला परंतु अपयश आले. जर्मनीच्या पराभवाची विविध कारणे पुढील प्रमाणे -

१) इंग्लंडचे श्रेष्ठ दर्जाचे आरमार :

विल्यम कैसरने इंग्लंडच्या तोडीचे आरमार निर्माण करण्याचा प्रयत्न केला, तरी पण इंग्लंडचे आरमार अजिंक्यच राहिले. कारण इंग्लंडच्या आरमाराने जर्मनीची नाकेबंदी केल्याने जर्मनीची उपासमार होऊ लागली. कच्चा मालाअभावी कारखाने बंद पडले. तर इंग्लंडला आपल्या वसाहतीतून मोठ्या प्रमाणात कच्चा माल मिळून ताकद वाढवली.

२) अमेरिकेचा दोस्त राष्ट्राच्या बाजूने युद्धप्रवेश :

इंग्लंडची नाकेबंदी करण्यासाठी जर्मनीने अनियंत्रित पानबुड्याचे युद्ध पुकारले. त्यात अमेरिकन जहाजे नष्ट झाले. त्यामुळे अमेरिकेने दोस्तांच्या बाजूने युध्दात प्रवेश केला. त्यामुळे जर्मनीला शरणागती पत्करावी लागली.

३) जर्मन राष्ट्राला सैन्याची कमतरता :

जर्मनी सतत ४ वर्षे दोस्तांबरोबर झुंजत होता. त्या काळात अनेक तरुण मारले गेले होते. त्यामुळे जर्मनीत फक्त स्त्रिया, लहान मुले, वृद्ध हेच शिल्लक राहिले. त्याबरोबर जर्मन सेनापती युद्धात माघार घेण्यास तयार नव्हते. त्यामुळे अनेक लोक ठार झाले. शेवटी सैन्याअभावी पराभव पत्करावा लागला.

४) दोस्तांना वसाहतीकडून मोठ्या प्रमाणात मदत :

इंग्लंडच्या आरमारामुळे त्यांच्या वसाहती सुरक्षित राहिल्या. त्यातून इंग्लंडने कच्चा माल, सैन्य मोठ्या प्रमाणात मिळाले होते. त्यामुळे ते जर्मनीशी संघर्ष करू शकते. परंतु जर्मन वसाहती जपान - इंग्लंडने जिंकून घेतल्याने जर्मनीला मदत मिळाली नाही.

५) जर्मनीची मित्र राष्ट्रे अतिशय कमकुवत :

ऑस्ट्रिया, तुर्कस्थान, बल्गेरिया हे जर्मनीचे मित्र राष्ट्र होते. परंतु ते कमकुवत असल्याने जर्मनीला मदत करू शकले नाही. उलट जर्मनीला त्यांना मदत करावी लागत असे. त्यामुळे सर्व युद्धाचा भर एकट्या जर्मनीवर पडला. ती ताकद पेलण्याची जर्मनीमध्ये नव्हती.

आपली प्रगती तपासा

प्रश्न - जर्मनीच्या पराभवाची कारणे सांगा.

१३.५ पहिल्या महायुद्धाचे परिणाम

१) पहिल्या महायुद्धात अफाट प्राणहानी :

हे युद्ध युरोपियन राष्ट्रे, आफ्रिका, आशिया खंडात झाले. तसेच ते जमीन, आकाश, पाणी या तिन्ही ठिकाणी लढले. या युद्धात जगातील २८ देशांनी भाग घेतला होता. १/१६ जगातील लोक अलिप्त राहिले होते. दोस्तांच्या बाजूने ४ कोटी ३० हजार सैन्य ठार झाले. २ कोटी २० लाख लोक जखमी झाले. यातील १/३ लोक कायमचे निकामीच झाले. ७० लाख शिपाई कैदीत पडले. या युद्धाचा एकूण खर्च ९५० अब्ज डॉलर्स होता. त्यात एकट्या जर्मनीचा ४ हजार कोटी पौंड खर्च झाला.

२) महायुद्धामुळे आर्थिक हलाकी :

युद्धकाळात शेती, उद्योगधंदे बंद पडले. युद्ध साहित्याच्या निर्मितीसाठी पैसा व माणसे खर्ची पडली. आवश्यक वस्तूंचा तुटवडा पडला. त्यामुळे महागाई, चलन फुगवटा मोठ्या प्रमाणात वाढला. परिणामी अमेरिकेकडून पैसा घेतला. युरोपातील कारखाने, खाणी, कालवे, रेल्वे सर्व उद्ध्वस्त झाले. त्यामुळे उत्पादन क्षमता कमी झाली.

३) अमेरिकेचा बलाढ्य सत्ता म्हणून उदय :

अमेरिकेमुळे दोस्त युद्धात विजयी झाले. अमेरिकेने अनेक राष्ट्रांशी व्यापारी करार केले होते. ती रक्कम परत मिळवण्यासाठी ६ एप्रिल १९१७ रोजी अमेरिका महायुद्धात उतरली आणि राजकारणात आपले प्रस्थ बसविले. दोस्तांना मदत करून अर्थकारणावरही प्रभाव निर्माण केला. प्रत्येक गोष्टीत अमेरिकेशिवाय घडामोडी होत नसे. अमेरिकेचे स्थान उंचावले. शिवाय ते युरोपचे धान्याचे कोठार होते. त्यामुळे अमेरिकेने जगाचे नेतृत्व करण्यास प्रारंभ केला.

४) जर्मनीची दुरवस्था :

जर्मनीचा युद्धात पराभव झाल्याने दोस्तांनी जबरदस्त दंड लादला होता. तहाच्या वाटाघातीच्या वेळी जर्मनीचे म्हणणे ऐकून घेतले नाही. किरकोळ बाबतीतही जर्मनीचा अपमान केला जात असे. जर्मनीच्या वसाहती लुटल्या. शिवाय शस्त्रकपातीची सक्ती केली. जर्मनीचे सार्वभौमत्व संपवले. त्यामुळे जर्मनीच्या मनात चीड निर्माण झाली.

५) स्वयंनिर्णयाचे तत्त्व व सार्वमताचा कौल :

विल्सनच्या स्वयंनिर्णयाचे तत्त्व दोस्तांनी आपल्या फायद्याचे होईल असेच राबवले. कोणत्याही प्रश्नावर सार्वमत घेऊन जनतेचा कौल असेल. त्याप्रमाणे सोडविणे जास्त इष्ट मानले. त्यानुसार जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान इ. साम्राज्य कोसळून नवीन लॅटिव्हिया, लियुवानिया, इस्टोनिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हाकिया इ. राष्ट्रे निर्माण झाली. एकूण २१ नवीन राष्ट्रे निर्माण झाली.

६) युद्धाचा धसका राष्ट्रसंघाची निर्मिती :

कोणताही प्रश्न संघर्ष, युद्धाने सोडविण्यापेक्षा व सहकार्याने सोडविण्यासाठी आणि विल्सनच्या प्रेरणेने व प्रयत्नाने राष्ट्रसंघाची स्थापना १० जानेवारी १९२० झाली. कायम स्वरूपाची आंतरराष्ट्रीय संघटना प्रथम अस्तित्वात आली. युद्धतील हानी व वातावरणाचा धसका मनावर बसल्याने राष्ट्रसंघाची स्थापना केली.

७) सामाजिक जीवनावर परिणाम :

महायुद्धातील जीवनात व विचारपद्धतीत आमूलाग्र क्रांती झाली. जुनी ध्येय, श्रद्धा, जीवनमूल्य पायदळी तुडवली. युद्धातून नवीन पिढी ही अश्रद्धा, चैनी, विलासी, बेदरकार व जुन्या पिढीचा तिरस्कार करणारी निपजली. त्यांच्या या विचारामुळे समाजात खूप मोठी दरी निर्माण झाली.

८) आर्थिक परिणाम :

युद्ध काळात अर्थव्यवस्था कोलमडली, कारखाने बंद पडले. त्यामुळे कामगार बेकार झाले. युद्धानंतर हजारो सैन्य मुक्त झाले. त्यांची बेकारीत भर पडली. काम न मिळाल्याने निराशागस्त जीवन बनले. मुलकी जीवनावर दूरगामी परिणाम झाला. यामुळे बेकारीत वाढ झाली. त्यामुळे महागाई मोठ्या प्रमाणात पसरली.

९) लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलला:

युद्धामुळे जीवन विस्कळीत झाल्यामुळे उदारमतवाद, सांसदीय, राज्यपद्धती, लोकशाहीऐवजी जनतेला साम्यवाद, हिंसाचार, अर्थिक राष्ट्रवाद, हुकुमशाही जास्त आत्मियता वाटू लागली. तर्कशुद्धता, शिष्टचार, ईश्वर, मानव यावरील श्रद्धा व समाजातील समस्या, संस्कृती, त्यावरील श्रद्धा इ. गोष्टी पार ढासळून पडल्या. त्याऐवजी बंडखोरी विचारप्रणाली, क्रूर वर्तन व हकालपट्टी या गोष्टींना ऊत आला.

१०) साम्राज्यवादाचा पाडावा :

जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, रशिया, तुर्कस्थान इ. पाडाव होऊन लोकशाही स्थापन झाली. युरोपातील हुकुमशाही राजेशाहीचा पाडाव झाला. नवीन विचारप्रणाली व सतत प्रचारामुळे बंडखोरांनी लोकशाही राजवट स्थापन केली.

११) औद्योगिक क्रांतीस सुरूवात :

युरोपातील सर्व कारखानदारी युद्धाच्या काळात उद्ध्वस्त झाली. त्यामुळे जगाच्या बाजारपेठेत पक्क्या मालाची गरज भासू लागली. ही युरोपची गरज भागवण्यासाठी अविकसित देशात औद्योगिक क्रांतिची सुरूवात झाली.

१२) हुकूमशहाचा उदय :

युद्धानंतर अनेक देशात हुकूमशहांचा उदय झाला. त्याचे नवे तत्त्वज्ञान उदयाला आले. रशियाने बोल्शेव्हिकचे तत्त्वज्ञान सांगितले. त्यात कामगारांची हुकूमशाही अभिप्रेत केली होती. कार्ल मार्क्सच्या तत्त्वाप्रमाणे लेनिनचे नवे प्रयोग सुरू केले. नवे राजकीय व आर्थिक सिद्धांत मांडले. इटालीत मुसोलिनीने फॅसिझमचा पाया घातला. जर्मनीत हिटलरने नाझी पक्षाची हुकूमशाही अस्तित्वात आणली. यातून अनेक संघर्ष निर्माण झाले. त्यांनी प्रगतीत वाढ करण्यासाठी नवे संशोधन निर्माण केले. हायड्रोजन अणुबॉम्बचा शोध लावला.

१३) वसाहतीमध्ये स्वातंत्र्य चळवळीला प्रारंभ :

विल्सनच्या १४ तत्त्वातील स्वयंनिर्णय या तत्वानुसार स्वातंत्र्याची मागणी वसाहतीने केली. त्यासाठी त्यांनी लोक जागृती करून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न सुरू केला. राष्ट्रसंघाने ही वसाहतीचा राज्यकारभार सुधारण्यासाठी प्रयत्न केला. त्यामुळे वसाहतीने स्वातंत्र्याची मागणी केली.

१४) जर्मनीत वायमर प्रजासत्ताक :

कैसर विल्यम नेदरलँडला पळून गेला. जर्मनीची सूत्रे नव्या वायमर सरकारच्या हाती आली परिस्थितीमुळे जर्मनीत अराजकता माजली. त्यातून जर्मनीच्या राजकारणात हिटलरचा उदय झाला.

आपली प्रगती तपासा

प्रश्न : पहिल्या महायुद्धाचे परिणाम सांगा.

१३.६ शांतता परिषद :

२८ जुलै १९१४ रोजी जागतिक महायुद्धाला सुरूवात झाली. जर्मनी - ऑस्ट्रियाच्या बाजूने तुर्क, बल्गेरिया, हंगेरी यांनी भाग घेतला तर इंग्लंड फ्रान्सच्या बाजूने त्यांच्या वसाहती. चीन, जपान, इटाली, अमेरिका होती. अमेरिकेच्या युद्ध प्रवेशाने युद्धाचे चित्र बदलले. १९ सप्टेंबर १९१८ रोजी बल्गेरियाने, ३१ ऑक्टोबर तुर्कस्थानने, ४ नोव्हेंबर ऑस्ट्रियाने शरणागती पत्करली. आम्ही जर्मनीला सन्मानाने वागवू, या विल्सनच्या शब्दावर विश्वास ठेवून १८ नोव्हेंबर १९१८ रोजी जर्मनीने **युद्धबंदी** केली. या वेळी जो करार झाला त्यानुसार

१) जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान यांनी जिंकलेला प्रदेश सोडून द्यावा.
२) जर्मनीने ऱ्हाईन नदीपर्यंत फौजा मागे घ्याव्यात.
३) जर्मनीने ताबडतोब मोठी जहाजे व मोठ्या तोफा व युद्धसाहित्य दोस्तांच्या हवाली करावे.
४) जर्मनीने रशियाबरोबर केलेला ब्रेस्टील टोव्हास्क तह रद्द करावा.

शस्त्रबंदी सुरूवातीस ३६ दिवसांची होती. या काळात युरोपची पुनर्रचना केली जाईल, अशी अपेक्षा होती. परंतु दोस्तांना शक्य न झाल्याने १३ डिसेंबर, १६ जानेवारी, १६ फेब्रुवारी अशी पुन्हा युद्धबंदी स्वीकारण्यात आली. या प्रत्येक वेळी ३३ दिवसांची मुदत स्वीकारली होती. परंतु जानेवारी १९१९मध्ये परिषदेच्या कामकाजास सुरूवात पॅरिस शहरात केली. कारण युद्धाचा जास्त ताण सहन केल्याने पॅरिसची निवड करून फ्रान्सचा सन्मान केला. पराभूत राष्ट्रासह रशियाला परिषदेला बोलावले नव्हते. दोस्त आणि त्यांच्या वसाहती अशी एकूण ३२ देश या परिषदेला हजर होते.

१) परिषदेचे ध्येय :

१) जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थानमधून राजेशाहीचे उच्चाटन करून साम्राट नष्ट करणे. तेथील प्रजेला स्वयंनिर्णयाचा अधिकार देऊन युरोपची पुनर्रचना करायची.

२) जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान यांच्या युरोपबाहेरील वसाहतीचे भवितव्य निश्चित करणे.

३) जर्मनी व तिच्या मित्रांकडून युद्धखंडणी वसूल करणे.

४) सर्व देशात शस्त्रकपात घडवून आणणे.

५) युद्धानंतरच्या समस्या सोडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करणे.

२) परिषदेसमोरील अडचणी :

१) परिषदेत उघड चर्चायामुळे लोकमताचा दबाव येत असल्याने निर्णय घेणे कठीण होते असे.

२) परिषदेत भाग घेतलेली प्रचंड संख्या उपस्थित होती.

३) अनेक योजना व गुप्त तह यामुळे प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे अवघड होते.

४) पॅरिसची निवड हीच मुख्य अडचण होती.

५) युद्धखंडणी घेण्यावरून वादविवाद निर्माण होत असे.

६) शस्त्रकपातीबाबत मतभेद होते.

७) निर्णय कमिटीतील राष्ट्रांचा सहभाग व चर्चा

३) परिषदेतील महत्त्वाच्या व्यक्ती :

१८ जानेवारी १९१९ रोजी व्हर्सायच्या प्रसिद्ध आरसे महालात परिषदेचे उद्घाटन झाले. या परिषदेतील फक्त नेत्यांना न्याय मिळाला. रशिया व पराभूत राष्ट्रांना प्रदेश नाकारला होता. एकूण ३२ देशांचे प्रतिनिधी हजर होते. निर्णयास विलंब पाहून १० बड्याने निर्णय घ्यावे त्यास सर्व प्रतिनिधींनी मान्यता द्यावी; परंतु पुन्हा विलंब लागला. त्यामुळे अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इटाली, जपान या पाच **बड्या राष्ट्रांनी** निर्णय घ्यावे.

अ) अमेरिकेचे अध्यक्ष विड्रो विल्सन :

विल्सन हा सर्वांत महत्त्वाची व्यक्ती असून अमेरिका युद्धात पडल्यापासून शांतता तह पूर्ण होईपर्यंत सर्व महत्त्वाची जबाबदारी विल्सनने पार पाडली. विल्सन ध्येयवादी, स्वप्नाळू वस्तुस्थितीकडे डोळे झाकणारा, आदर्शाच्या मागे धावणारा नेता होता. काही काळ त्याने राज्यशास्त्राचा प्राध्यापकाचे काम केल्याने, लबाड्या फसवेगिरी माहित नव्हती. लोकांच्या चांगुलपणावर विश्वास होता. साहजिक विल्सनला व त्याच्या शब्दांना परिषदेत वजन प्राप्त झाले. विल्सनला शांततेचे वेड असल्याने जगात कायमची शांतता नांदावी. यासाठी १४ कलमी योजना जाहीर केली. दोस्ताने व इंग्रज-फ्रेंचाने त्याच्या योजनेतील राष्ट्रसंघाची कल्पना उचलून धरली. राष्ट्रसंघ स्थापन झाला. जर

कोणाला न्याय हवा जर अन्याय झाला तर राष्ट्रसंघाच्या माध्यमातून दूर करता यावे, असे विश्वास होता. पुढे व्हर्सायचा तह अमेरिकन सिनेटने फेटाळून राष्ट्रसंघावर बहिष्कार टाकला ही कृती जगाच्या दृष्टीने चुकीची ठरली.

ब) फ्रान्सचा पंतप्रधान जॉर्ज क्लेमेन्सीओ :

हा पॅरिस शांतता परिषदेचा अध्यक्ष होता. जर्मनीच्या आक्रमण धोरणामुळे फ्रान्समध्ये सतत सरकार कोलमडले जात होते; परंतु क्लेमेन्सीओने पराभूत फ्रान्सला युद्धोत्सुक बनवले. त्यामुळे शेवटपर्यंत युद्धात फ्रान्सने तग धरला म्हणून त्याला अध्यक्ष बनवले. तो तिक्ष्ण बुद्धीचा, वृद्ध, अनुभवी, कुणाबद्दलही दयामाया नसलेला राजकारणी वाघ म्हणून ओळखला जात होता. तो स्वप्नाळू वृत्तीचा, भांडखोर स्वभावाचा परिषदेत बहुतेक वेळा झोपलेला असत. फ्रान्सच्या हितसंबंधाला धोका निर्माण होताच तो चवताळून उठत असे. जर्मनीबाबत तो अतिशय आग्रही होता. जर्मनीला लष्करीदृष्ट्या पंगू बनवावे, जबर युद्धखंडणी लादून आर्थिकदृष्ट्या दुर्बल बनवावे, जर्मनी कधीच स्वत:च्या पायावर उभा राहू नये, असे मत होते. तो मुत्सद्दी व राजकारणी डावपेच यात तरबेज होता. त्याला विनोदाची साथ लाभली होती. विनोद करून सर्वांची टर उडवत असे.

क) इंग्लंडचा लॉईड जॉर्ज :

लॉईड जॉर्ज इंग्लंडचा प्रतिनिधी, परिषदेतील सर्वोत्तम नेता आणि लोकशाहीचा चाहता उदारमतवादाचा भोक्ता होता. साहजिकच जर्मनीला उदार वागणूक मिळेल अशी त्याच्याबद्दल अपेक्षा होती. मात्र तो वास्तववादी व लवचिक धोरणाचा असल्याने त्याने उदारमतवादाला मुरड घातली. कारण युद्धखंडणी वसूल करू यावर निवडणूका जिंकल्या होत्या. त्यामुळे त्याच्या धोरणात बदल झाला. जर्मनीचे खच्चीकरण झाले पाहिजे, असे क्लेमेन्सीओचे मत तर जर्मनीला उदार व सन्मानाने वागवले पाहिजे, असे विल्सनचे मत. या दोन भिन्न विचारांतून समन्वय साधून जर्मनीवर तह लावला.

ड) इटालीचा पंतप्रधान ओरलँडो :

इटालीचा पंतप्रधान, विद्वान, कसलेला राजकारणी, फर्डा वक्ता, कायद्याचा विशेष अभ्यास असलेला म्हणून तो प्रसिद्ध होता. दुर्दैवाने परिषदेवर फारसा प्रभाव पाडता आला नाही. इ.स. १९१५च्या लंडन तहानुसार जो प्रदेश प्राप्ती होणार होता तो विल्सनमुळे मिळाला नाही.

वरील चार देशांच्या प्रमुख नेत्यांशिवाय जपानचाही युद्ध जिंकण्यात वाटा होता. साहजिकच प्रतिनिधींचा बड्यांच्यात समावेश केला होता. मात्र जपानने युरोपच्या पुनर्रचनेबाबत रस घेतला नाही आणि अतिपूर्वेकडे आपले निर्विवाद श्रेष्ठत्व मिळावे अशी जपानची महत्त्वाकांक्षा होती. या गोष्टीची पूर्तता झाली. मात्र अमेरिकेने जपानला तीव्र विरोध केला होता.

आपली प्रगती तपासा

प्रश्न : शांतता परिषदेमधील महत्त्वाचा व्यक्ती सांग.

४) शांतता परिषदेच्या आधारभूत गोष्टी :

१) गुप्त तहांची अंमलबजावणी करणे अवघड
२) रशियन क्रांतीनुसार विचारविनिमय
३) अल्पसंख्याकांचा प्रश्नासंदर्भात चर्चा
४) बड्या राष्ट्रांच्या हितसंबंधातील गुंतागुंत
५) विल्सनच्या योजना

अमेरिकेचा अध्यक्ष विल्सन लोकशाहीवादी व शांततेचे वेड असलेला होता. साहजिकच त्याने अमेरिका युद्धापासून दूर ठेवण्याचा, युद्ध मिटवण्याचा, शांतता प्रस्थापित करण्याचा युद्धकाळात प्रयत्न केला. दुर्दैवाने या बाबतीत यश आले नाही. एवढेच नव्हे तर अगतिकपणे विल्सनला युद्धामध्ये उतरावे लागले. अमेरिकेच्या युद्ध प्रवेशावेळी १४ कलमी योजना, चार तत्त्वे, चार युद्ध ध्येय व वैशिष्ट्ये अशा विविध योजना जाहीर केल्या.

१४ कलमी योजना - ८ जानेवारी १९१८ :

विल्सनने अमेरिकेच्या युद्ध घोषणेनंतर सिनेटपुढे भाषण करताना ८ जानेवारी १९१८ रोजी आपली १४ कलमी जाहीर केली. या योजनेप्रमाणात जगाची आदर्श तत्त्वावर पुनर्रचना व्हावी. युद्ध कल्पनेला कायमचे तडीपार करता यावे व जगात कायमची शांतता नांदावी, अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली. त्यानुसार १४ कलमी योजनेतील तरतुदी होत्या.

१) गुप्त राजनीतीचा त्याग करणे
२) सागर संचार स्वातंत्र प्रत्येकाला असावे
३) अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापार सर्वांसाठी खुला असावा
४) वसाहतीचे संरक्षण व त्यांची प्रगत राष्ट्राकडे विश्वस्त म्हणून न्यायी वाटणी करावी.
५) शस्त्रकपात सर्व राष्ट्रांनी करावी
६) रशियातून दोस्तांनी फौजा परत बोलावणे.
७) बेल्जियमच्या तटस्थेला सर्वांनी मान्यता द्यावी.
८) १८७१ मध्ये फ्रान्सवर झालेला अन्याय दुर करावा
९) ऑस्ट्रिया हंगेरी यातील लोकांना स्वयंनिर्णयाचा अधिकार द्यावा.
१०) राष्ट्रीयत्वाच्या तत्त्वावर इटालीची फेररचना करावी.
११) सर्बिया, मॉटेनिग्रो व रूमानिया यांना परकीयांच्या जोखडातून मुक्त करावे.
१२) तुर्की साम्राज्याच्या प्रजेला स्वयंनिर्णयाचा अधिकार द्यावा.
१३) स्वतंत्र पोलंडची निर्मिती करावी व पोलंडला समुद्रकिनारा मिळवून द्यावा.
१४) राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात यावी.

विल्सनने युरोपच्या पुनर्रचनेबाबत या योजना जाहीर केल्या होत्या. विल्सनमुळे दोस्तांनी युद्ध जिंकले असल्याने, या योजना वाऱ्यावर सोडून देता येत नव्हत्या. मात्र त्या जशाच्या तश्या अंमलात आणता येत नव्हत्या. कारण एक तर या योजना प्रचारित स्वरूपाच्या होत्या. त्यात अनेक गोष्ट परस्परविरोधी असल्याने त्यांची अंमलबजावणी अशक्य होती.

५) शांतता परिषदेचे कामकाज-१८ जानेवारी १९१९ :-

१८ जानेवारी १९१९ रोजी फ्रान्सच्या व्हर्साय येथील **आरसे महाल** राजवाड्यात जर्मन एकीकरणाच्या ४८व्या वर्धापन दिनी फ्रान्सचा अध्यक्ष **पॉईन केअर** याने उदघाटन केले. या परिषदेने मध्य युरोप, मध्य आशिया, अतिपूर्वेकडील प्रदेशाबाबत पुनर्रचना केली. या परिषदेने १) जर्मनी बरोबर व्हर्सायचा तह २८ जून १९१९.२) ऑस्ट्रिया बरोबर सेंट जार्मेनचा तह १० सप्टेंबर १९१९. ३) बल्गेरिया बरोबर न्यूलीचा तह २७ नोव्हेंबर १९१९.४) हंगेरी बरोबर ट्रॉयनॉनचा तह ४ जून १९२०. ५) तुर्कस्थान बरोबर सिव्हर्सचा तह १० ऑगस्ट १९२०. या पाच तहांपैकी ४ तह पराभूत राष्ट्रांनी स्वीकारले. मात्र तुर्कस्थानच्या केमाल पाशाने सुलतानाला बडतर्फ करून सिव्हर्सचा तह फेटाळून लावला.

आपली प्रगती तपासा

प्रश्नः शांतता परिषदेच्या आधारभूत गोष्टी सांगा.

१३.७ व्हर्सायचा तह २८ जून १९१९

युद्धबंदीपूर्वी तह सन्मानाने व वाटाघाटीने करण्याचे आश्वासन विल्सनने दिले होते; परंतु प्रत्यक्षात जर्मन प्रतिनिधीला वाटाघाटीसाठी बोलावले नाही. मसुदा जर्मनी पोचण्यापूर्वी यातील तरतुदी समजल्याने जर्मनीने दुय्यम दर्जाचे अधिकार पाठवले. हा दोस्तांत अपमान वाटला. शेवटी जर्मनीचा परराष्ट्रमंत्री रॅण्ड्यूझ पॅरिसला पाठवला. त्याचा अतिशय अपमान करण्यात आला. युद्धाची सर्व जबाबदारी जर्मनीवर लादली. अखेर नाखुशीने व्हर्सायचा तह जर्मनीने स्वीकारला. या परिषदेत ३२ राष्ट्रांचे एकूण ७० प्रतिनिधी व त्यांचे सल्लागार मंडळ हजर होते. अखेर २८ जून १९१९ रोजी जर्मनीने तहावर सही करून युद्ध संपवले.

अ) व्हर्साय तहाच्या तरतुदी : २८ जून १९१९

पॅरिस शांतता परिषदेने जर्मनीवर लादलेला हा व्हर्सायचा तह अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण या तहाने जर्मनीवर भयंकर अन्याय केला. त्यामुळे जर्मनी सूडाने पेटली. यातूनच दुसरे महायुद्ध उद्‌भवले. म्हणूनच दुसऱ्या जागतिक महायुद्धाची बीजे व्हर्साय तहात होती, असे म्हटले जाते. व्हर्साय तह सुमारे १५ भागात असून, २३० पानाचा आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी त्याचे प्रादेशिक तरतुदी, लष्करी तरतुदी, आर्थिक तरतुदी, कायदेशीर तरतुदी व इतर तरतुदी अशा प्रकारे त्याचे वर्गीकरण केले जाते.

१) प्रादेशिक तरतुदी :

व्हर्सायच्या तहाने जर्मनीला पश्चिम, उत्तर, पूर्व सीमेवर फार मोठ्या प्रदेशावर पाणी सोडावे लागले. जर्मनीला स्वतःच्या देशातील प्रदेश पुढीलप्रमाणे सोडावा लागला.

अ) जर्मनीची पश्चिम सीमा :

जर्मनी व फ्रान्स या दोन देशांत नैसर्गिक सरहद्द नव्हती. दोन वेळी जर्मनीने फ्रान्सवर आक्रमण केल्याने, फ्रान्सने **र्‍हाइनलँड** प्रदेशाची मागणी केली व र्‍हाईन नदी नैसर्गिक सरहद्द ठरवावी परंतु १०० टक्के जर्मन असल्याने ते अमान्य केले व फ्रान्सच्या संरक्षणासाठी संरक्षण फळी तयार केली ती पुढीलप्रमाणे :- **संरक्षण फळी बनवण्यासाठी तरतुदी :**

१) र्‍हाईन नदीच्या पश्चिमेकडे ५२ किलोमीटर रूंदीचा जर्मन प्रदेश निर्लष्करी बनवावा.

२) या प्रदेशात १५ वर्षांसाठी दोस्तांच्या फौजा ठेवाव्यात दर पाच वर्षांच्या अंतराने या फौजा काढून घाव्यात.

३) र्‍हाईत नदीवरील पूल व मोक्याच्या ठिकाणी दोस्त राष्ट्रांच्या फौजांच्या ताब्यात असावीत.

सार प्रांता संदर्भात धोरण :

र्‍हाईन लँड मिळवण्यात अपयश आल्याने फ्रान्सने या प्रदेशाच्या बाजूचा सार प्रांताची मागणी केली. तेथे बहुसंख्य जर्मन होते. मात्र जर्मनीने फ्रान्सच्या दगडी खाणी उद्ध्वस्त केल्या होत्या म्हणून फ्रान्सने या प्रदेशाची मागणी केली; परंतु त्याला नकार दिला. पण या प्रदेशातील दगडी कोळसा घेण्याचा अधिकार फ्रान्सला १५ वर्षांसाठी देण्यात आला. नंतर या प्रांताचे सार्वभौमत्व घेऊन फ्रान्स की जर्मनी यात सामील व्हावे हे तेथील जनतेच्या मनावर राहिली.

ब) जर्मनीची उत्तर सीमा :

१) बेल्जियमला प्रदेश : या सीमेवर बेल्जियमची सरहद्द होती. जर्मनीने हल्ला करून बेल्जियमचे प्रचंड नुकसान केले होते. याबद्दल बेल्जियमला नुकसान भरपाई मिळवून देण्याची गरज होती म्हणून या सरहद्दीवरील युपेन, मालमेडी मार्सनेट तीन जर्मन बंदरे बेल्जियमला दिली.

२) डेन्सार्कची प्राप्ती : व्हिएन्ना परिषदेने इलेरिवग प्रांत डेन्सार्कला दिला होता. इ.स.१८६४ मध्ये बिस्मार्कने डेन्मार्कचा पराभव करून तो प्रांत जर्मनीला जोडला. मात्र या वेळी तो प्रांत डेन्मार्कला दिला.

क) जर्मनीची पूर्व सीमा :

१) डॅन्मिक बंदर : (डान्झिग बंदर) : डान्झिग बंदर व परिसरातील सुमारे ७०० चौ.कि.मी.चा प्रदेश जर्मनीतून अलग करण्यात आला. हे बंदर आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सर्वांना खुले करण्यात आले. वास्तविक १३व्या शतकात प्रशियाने वसवलेले हे बंदर वंशिक, धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक सर्वच दृष्टीने हे बंदर जर्मनीचे होते. परंतु ते अलग करण्यात आले.

२) पोलंडची निर्मिती : या प्रदेशात पोलंड हे सर्वांत दुर्दैवी राष्ट्र प्रशिया, ऑस्ट्रिया व रशिया या तीन बड्यांच्यामध्ये असलेला हा प्रदेश त्यांनी पोलंडचे अनेक वेळा आपापसात वाटणी करून स्वातंत्र्य नष्ट केले होते. विल्सनच्या १४ कलमी योजनेत पोलंडला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे व पोलंडला समुद्र किनारा देण्याचे आश्वासन दिले होते. म्हणून व्हर्साय तहाने पूर्व प्रशियाचा फार मोठा प्रदेश पोलंडला देऊन स्वतंत्र, पोलंडची निर्मिती केली. डान्झिग बंदरचा २४० मैल लांब व ५० मैल रूंद अशी पोलंडला पोलिसांना कॉरिडॉर देण्यात आले.

३) सायलेशियाची वाटणी : सायलेशियाचा प्रदेश सार्वमताशिवाय मिळावा अशी झेकोस्लोव्हाकियाची मागणी होती; परंतु विल्सनने त्याला विरोध केला. मात्र सार्वमताच्या आधारे सायलेशियाचा काही भाग झेकोस्लोव्हाकिया व रूमानियाला देण्यात आला. मात्र या बदलामुळे जर्मन वंशाचे लोक पारतंत्र्यात होते. अनेक उद्योगधंदे, खाणी यास जर्मनीला मुकावे लागले.

४) मेमेल बंदर : व्हार्साय आणि हे बंदर तात्पुरते लिथुवानियाला दिले. इ.स.१९२३ मध्ये लिथुवानियाने आक्रमण करून हे बंदर बळकावले. इ.स.१९२४ मध्ये राष्ट्रसंघाने याला मान्यता दिली.

जर्मनीचा प्रादेशिक तोटा : व्हर्साय तहाने ६ दशलक्ष लोकसंख्या, २५ हजार चौ. मैलाचा प्रदेश जर्मनीला सोडून द्यावा लागला. त्यामुळे २ लक्ष जर्मन पारतंत्र्यात गेले. या तहामुळे ६५ टक्के लोखंड, ४५ टक्के कोळसा, ७२ टक्के झिंक व ५७ टक्के बीड उद्योगधंदे यास जर्मनीला मुकावे लागले.

ड) जर्मन वसाहती नष्ट : इ.स.१९१४ पर्यंत जर्मनीने इंग्लंड, फ्रान्सच्या खालोखाल प्रचंड साम्राज्य जिंकले होते. साम्राज्यवादी राष्ट्राकडून वसाहतीचे शोषण होते म्हणून त्या वसाहती काढून घ्याव्यात. विश्वस्त म्हणून राष्ट्रसंघाकडे सुपूर्द कराव्यात अशी विल्सनची मूळ कल्पना, जेत्यांनी या कल्पनेचा फायदा घेऊन जर्मनीच्या वसाहती राष्ट्रसंघाने काढून घेतल्या. व विश्वस्त म्हणून त्या अन्य देशांना दिल्या त्या पुढीलप्रमाणे :

१) कामेरून टोगोलँड - फ्रान्स

२) जर्मनीच्या दक्षिण आफ्रिकेतील - इंग्लंडला

३) चीनमधील जर्मन प्रदेश व विषववृत्ताच्या उत्तरेकडील बेटे - जपान
४) विषववृत्ताच्या दक्षिणेकडील प्रदेश - ऑस्ट्रेलिया प्रदेश - ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड

तोटा : जर्मनीच्या प्रदेशाचा

या बदलामुळे सुमारे २५ दशलक्ष लोकसंख्या व १९ दशलक्ष चौ. मैलाचा प्रदेश याशिवाय या प्रदेशातील जर्मनीची गुंतवणूक जर्मनीच्या विविध कंपन्या, रेल्वे इ. जर्मनीला गमवावे लागले.

आपली प्रगती तपासा

प्रश्न : व्हर्साय तहातील प्रादेशिक तरतुदी स्पष्ट करा.

२) आर्थिक तरतुदी :

अ) युद्धखंडणी : व्हर्साय तहातील मुदत खंडणी ही तरतूद अतिशय अन्यायकारक व जर्मनीत संताप निर्माण करणारी होती. कारण विल्सनने आम्ही कोणावर युद्ध खंडणी लादणार नाही, असे जाहीर केले होते. मात्र जर्मनीकडे दोस्तांनी ५ नोव्हेंबर १९१८ रोजी युद्ध बंदीचा प्रस्ताव मांडला. त्या वेळी दोस्तांच्या नागरिकांची जी हानी झाली ती जर्मनीने भरून द्यावी, अशी सूचना केली. त्यानुसार लष्कराची पेन्शन्स व मयत सैनिकाच्या विधवा पत्नीला दिली जाणारी पेन्शन्स अशा मागण्या वाढत जाऊन शेवटी युद्धाचा सारा खर्च जर्मनीने भरून द्यावा, अशी दोस्तांनी मागणी केली. व्हार्साय तहातीला कलम नं. २३७ प्रमाणे दोस्त राष्ट्रे व युद्धातील त्याचे सहकारी युद्धाची जबाबदारी जर्मनीवर टाकत आहेत. जर्मनी तिचा स्वीकार करत आहे. जर्मनीकडून नुकसान भरपाई घेण्याबाबत दोस्त राष्ट्रांत एकमत झाले. शेवटी जर्मनीने ५०० कोटी डॉलर्स सोने व वस्तुच्या रूपात दोस्तांना द्यावे, असे ठरले. दोस्तांच्या प्रत्येक देशाचे नुकसान भरपाईचा आकडा निश्चित करण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स, इटाली, अमेरिका यांचा प्रत्येकी एक व बेल्जियम, डेन्मार्क, चीन, जपान इ. देशांचे पाच प्रतिनिधींचे कमिशन नेमले. त्या कमिशनने ६ अब्ज ७ कोटी डॉलर्स एवढी प्रचंड युद्धखंडणी जर्मनीवर लादली.

ब) व्यापारी निर्बंध :

१) १६०० टन क्षमतेची सर्व जहाजे जर्मनीने नष्ट करावीत किंवा दोस्तांच्या हवाली करावीत.
२) यापेक्षा कमी क्षमतेची २५ टक्के व मासेमारीची २५ टक्के जहाजे नष्ट करावीत.
३) जर्मनीने पुढील पाच वर्षांच्या काळात दोन लक्ष टन क्षमतेची जहाजे दोस्तांस पुरवावीत.
४) जर्मनीचा भिल कालवा व स्टेरीन बंदर आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुले करण्यात यावे.

५) ऱ्हाईन, डॅन्यूब, ओडर, निमेन एल्ब इ. जर्मनीतील मोठ्या नद्या आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुल्या करण्यात याव्यात.
६) जर्मनीला चीन व मोरोक्कोमध्ये असलेले खास व्यापारी अधिकार काढून घेण्यात आले.
७) फ्रान्स, बेल्जियम, इटलीला १० वर्षांपर्यंत दगडी कोळसा पुरवावा.

थोडक्यात जर्मनीवर प्रचंड युद्धखंडणी आणि अनेक व्यापारी निर्बंध लादून जर्मनीने आर्थिक खच्चीकरण केले.

३) लष्करी तरतुदी :
जर्मनीने आपल्या लष्करी सामर्थ्याने हे युद्ध पेटवले होते. साहजिकच जर्मनीला लष्करीदृष्ट्या पंगू बनवले तर पुन्हा अशी आपत्ती उद्‌भवणार नाही, म्हणून व्हर्साय तहाने जर्मनीवर पुढील लष्करी निर्बंध लादले.

१) जर्मनीतून सक्तीची लष्करी सेवा नष्ट करावी.
२) जर्मनीचे जास्तीत जास्त १ लाख खडी फौज ठेवावी.
३) या सैन्यातील शिपायाने कमीत कमी १२ वर्ष तर अधिकाऱ्यांनी कमीत कमी २५ वर्षे नोकरी केली पाहिजे.
४) लष्कराबाहेर जर्मनीत कोणतेही लष्करी प्रशिक्षण देण्यात येऊ नये.
५) जर्मनीने जास्तीत जास्त १५ हजार आरमार ठेवावे व १५०० आरमारी अधिकारी ठेवावेत.
६) १० हजार टन क्षमतेपेक्षा जास्त अद्ययावत युद्धनौका नष्ट कराव्यात. ६ फुअर्स (नाव), १२ विनाशिका व १२ सुरूंग पेट्या याव्यतिरिक्त सर्व युद्ध साहित्य दोस्तांच्या हवाली करावे अथवा नष्ट करावे.
७) जर्मनीच्या पश्चिम किनाऱ्यावर ५० कि.मी. रूंदीचा निर्लष्करी टापू बनवावा.

थोडक्यात जर्मनीचय लष्कराचे खच्चीकरण करून दुर्बल बनवले गेले.

४) कायदेशीर तरतुदी :
व्हर्साय तहातील २३९ कलम युद्ध गुन्हेगाराबाबत आहे. जर्मन लोकांत प्रचंड संताप निर्माण करणारी ही तरतूद जर्मन नेत्यांनी युद्ध पेटवले. आंतरराष्ट्रीय निर्णय नियम करार पायदळी तुडवले म्हणून दोस्तांनी सुमारे १०० जर्मन नेत्यांची यादी तयार केली व त्याची न्यायालयीन चौकशी करण्याची तरतुदी करण्यात आली. एक नंबरचा आरोपी विल्यम कैसर हॉलंडला पळून गेला होता. हॉलंडने दोस्तांच्या ताब्यात देण्यास नकार दिला. चौकशीच्या वेळी जर्मन नेत्याच्या गुन्ह्याबरोबर दोस्तांचीही अनेक पापे चव्हाट्यावर आली असती. दोस्तसुद्धा या तरतुदीच्या अंमलबजावणीबाबत फारसे काटेकोर राहिले नाहीत. कारण नाममात्र या लोकांची न्यायालयीन चौकशी केली व जुजबी शिक्षा ठोठावल्या. या यादीतील दोन नंबरचा आरोपी रिचर्ड मार्शल,

हिडेनबुर्ग होते. तो इ.स.१९२५ मध्ये जर्मन प्रजासत्ताकाचा अध्यक्ष बनला. दोस्तांनी याला विरोध नव्हे तर त्याचा साधा निषेधसुद्धा केला नाही.

आपली प्रगती तपासा

प्रश्न : व्हर्साय तहातील आर्थिक तरतुदी सांगा.

ब) व्हर्साय तहाचे टीकात्मक परीक्षण

व्हर्साय तह हा आधुनिक जगाच्या इतिहासातील सर्वात वादग्रस्त दस्तावेज होय. या तहाचे जेवढे समर्थक आहेत तेवढेच टीकाकार आहेत. हा तह जुलमी, अन्यायी, असून जर्मनीच्या स्वाभिमानाला धक्का देणारा, विश्वासघात करणारा असे वर्णन लोकांनी केले. तर युरोपच्या स्वाभिमानाला धक्का देणारा तह असे दोस्त राष्ट्रींनी म्हटले आहे. हा तह ध्येयवाद व व्यवहारात यांची सांगड घातली जाते. यामुळे या तहाच्या वेळी अनेकांनी या तहावरून जगात दुसऱ्या महायुद्धाची वाटचाल सुरू होईल, अशी भीती व्यक्त केली. पुढे ती भीती योग्य होती हे सिद्ध झाली.

१) दोस्तांनी तह जर्मनीवर लादलेला होता :

परस्पर देवाणघेवाण, वाटाघाटी केल्या नाहीत. जर्मन प्रतिनिधींना फक्त दोनदाच बोलावले. ते म्हणजे परिषदेचा मसुदा स्वीकारताना व शेवटी तहावर सही करताना. यामुळे हा तह आमच्यावर लादला अशी जर्मनीची भावना झाली. यामुळे जर्मनीचा स्वाभिमान दुखावला. युद्ध करणे गुन्हा आहे पण पराभव पत्करणे गुन्हा नाही. परिषद जर्मनीच्या न्याय देण्यासाठी नाही तर, जर्मनीची लूट करण्यासाठी आहे असे जर्मनीचे मत झाले. साहजिकच तह वाटाघाटीने झाला नाही तो पाळण्याचे जर्मनीवर बंधन उरले नाही. याबाबत दोस्तांचे असे मत होते की, आमच्यात पुनर्रचनेबाबत मतभेद होते. जर्मन प्रतिनिधीला बोलावले असते तर त्याने फायदा घेतला असता. जर्मनीत लोकशाही कधीच नव्हती. वाटाघाटी, चर्चा यापेक्षा त्यांना हुकूमशाहीची भाषा माहीत होती.

२) व्हर्साय तह लोकांचा नसून मुत्सद्यांचा तह :

युद्ध काळात सर्वसामान्य जनतेने खूप हालअपेष्टा सहन केल्या होत्या. दोस्तांनीही जनतेला अनेक प्रकारची आश्वासने दिली होती. मात्र तह करताना ही आश्वासने यांचा विचार केला नव्हता. मुत्सद्याने हवी तशी पुनर्रचना केली, जो लोकांचा नव्हे तर तो मुत्सद्यांचा तह होता, अशी टीका केली जाते.

३) व्हर्साय तह खूप कडक होता :

जर्मनीवर अन्याय करणारा, कोणत्याही स्वाभिमानी राष्ट्रांनी स्वीकारावा असा तह नव्हता तर दोस्तांनी जर्मनीला उदार वागवले असते तर कदाचित जर्मनीने या तहाचे पालन केले असते; परंतु जर्मनीला लष्करीदृष्ट्या पंगू व आर्थिक

दुर्बल बनवले होते. सर्व जागी अपमान केला. जोपर्यंत जर्मन दुबळा होता तोपर्यंत नाईलाजाने तह पाळला. पण लवकरच जर्मनीने तहाच्या चिंधड्या करण्यास तयार झाला.

४) तहामध्ये देवाणघेवाण स्वीकारली नाही :

शस्त्रकपात, सागरी संचार, स्वातंत्र्य वसाहतीच्या शोषणाचे उच्चाटन यासारख्या अनेक आदर्श तरतुदी मांडल्या. त्याच्या आधारावरच जर्मनीतील शस्त्रकपात घडून आणली. जर्मन नद्या, बंदरे आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी खुली ठेवली. जर्मनीचे साम्राज्य उद्ध्वस्त केले. पण यातील एकही गोष्ट दोस्तांनी स्वीकारली नाही किंबहुना जर्मनीची जहाजे, शस्त्रास्त्र मिळवली. वसाहती वाटून घेतल्या. जर या आदर्शाचा सर्वांनी स्वीकार केला असता तर अशी जर्मनीची पुन्हा युद्धाची भाषा झाली नसती.

५) व्हर्साय तह म्हणजे विल्सनचा ध्येयवाद व क्लेमेन्सीओचा स्वार्थ यांची सांगड होय :

युद्धकाळात विल्सनने पुनर्रचनेबाबत अनेक आदर्श गोष्टी मांडल्या. त्यात राष्ट्रसंघाची स्थापना हे वेड होते. क्लेमेन्सीओने राष्ट्रसंघाच्या स्थापनेस मान्यता देऊन विल्सनला आनंदी केले. यावर आपल्या मागण्या रेटण्यात मोकळा झाला. यामुळे आदर्श व वास्तव यांची देवाणघेवाण होऊन हा तह घडून आला.

६) व्हर्साय तहाने जर्मनीचा विश्वासघात :

युद्ध समाप्तीपूर्वी आम्ही जर्मनीला सन्मानाने वागवू, वाटाघाटीने तह करू, अशी आश्वासने दोस्तांनी दिली होती. पण प्रत्यक्षात जर्मन प्रतिनिधीला वाटाघाटीस बोलावणे नाही. अन्यायकारक तह लादला. त्यामुळे दोस्ताने आमचा विश्वासघात केला, अशी जर्मनीची भाषा येऊ लागली.

७) तहाचा सर्वात महत्त्वाचा दोष म्हणजे सूडबुद्धीने लादला :

दोस्तांनी बहुतेक वेळा वाटाघाटी, बहुमताचा निर्णय, सार्वमत यासारखे लोकशाहीचा देखावा केला. पण प्रत्यक्षात भाषा लोकशाही तर वृत्ती हुकूमशाहीची होती, असे दिसून येते.

८) युद्धखंडणीची तरतूदही दोस्तांना हानीकारक :

जर्मनी दोस्तांना खंडणी देऊ लागला होता. युद्धकाळात अमेरिकेच्या घेतलेल्या कर्जाचे हप्ते या पैशातून भरू लागला. त्या वेळी जर्मनीस युद्धखंडणी देणे शक्य नाही असे स्पष्ट झाले. त्या वेळी फ्रान्सने जर्मनीवर हल्ला केला. या वेळी अमेरिका जर्मनीला अर्थसहाय्य करू लागली. त्यामुळे अमेरिकन पैसा अमेरिकेतच परत येऊ लागला. त्यामुळे जगात आर्थिक महामंदीचा फटका बसला. या तहाने जर्मनीचा १/८ भूभाग जर्मनीच्या साऱ्या वसाहती, १५ टक्के

शेत जमीन, १२ टक्के पशुधन, १० टक्के कारखाने, २/५ दगडी कोळसा इ. जर्मनीला मुकावे लागले.

थोडक्यात जर्मनीला अन्यायकारक असल्यास तो तह पाळण्याची जर्मनीवर नैतिक बंधन राहिले नाही. ज्याप्रमाणे इ.स.१८७०-७१ मध्ये फ्रान्सचा पराभव व त्यातच फ्रान्स असमाधानी राहिला. त्यामुळे जगाची पहिल्या महायुद्धाकडे वाटचाल सुरू झाली. इ.स.१९१९ मध्ये जर्मनीवर अन्याय झाल्याचे व्हर्साय तहातून दुसऱ्या जागतिक महायुद्धाकडे वाटचाल झाली म्हणून व्हर्साय तहातच दुसऱ्या जागतिक महायुद्धाची बीजे होती, असे म्हणतात.

आपली प्रगती तपासा

प्रश्न : व्हर्साय तहाचे परिक्षण करा.

१३.८ सेंट जार्मेनचा तह १० सप्टेंबर १९१९ ऑस्ट्रिया

पॅरिस शांतता परिषदेने पराभूत ऑस्ट्रियासाठी बनवलेला तह. पॅरिसच्या उपनगरात सेंट जार्मेन येथे २ जून १९१९ रोजी स्वीकारला. १० स. १९१९ रोजी त्यावर ऑस्ट्रियाने सह्या करून त्याला मान्यता दिली.

१) प्रादेशिक तरतुदी :

ऑस्ट्रियन साम्राज्य म्हणजे राष्ट्रवादाचे गाठोडे. त्यामुळे ऑस्ट्रिया सम्राज्याचा उद्ध्वस्त करून अनेकांना स्वातंत्र्य दिले जाईल, अशी विल्सनची घोषणा होती. त्यामुळे या तहाने ऑस्ट्रियाला पुढील प्रदेशावर पाणी सोडावे लागले.

१) हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, पोलंड, युगोस्लाव्हिया यांना स्वातंत्र्य, ऑस्ट्रियातील बोहेमिया, मोरेव्हिया हंगेरीचा उत्तर भाग मिळवू झेकोस्लोव्हाकिया नवे राष्ट्र बनवले.
२) ऑस्ट्रियन साम्राज्यातील पोलंडचा काही भाग गॅलेशियाला दिला.
३) युगोस्लाव्हिया नवे राष्ट्र - हर्जेगोव्हिना, बोसनिया, डालमेनिया हे प्रांत सर्बियास जोडून युगोस्लाव्हिया नवे राष्ट्र बनवले.
४) ऑस्ट्रियन साम्राज्याचा काही भाग इटाली व रूमानियाला देण्यात आला.
५) ऑस्ट्रिया - जर्मनी ऐक्यास मनाई करण्यात आली.
थोडक्यात, या प्रदेशातील बदलाने ३ कोटी ९९ हजार लोकवस्ती व १ लाख चौरस मैल प्रदेश ऑस्ट्रियाला गमवावा लागला.

२) लष्करी तरतुदी :

१) ऑस्ट्रियातील सक्तीची लष्करी सेव असू नये.
२) ३० हजारांपेक्षा जास्त सैन्य ठेवू नये.
३) डॅन्यू नदीतील ३ लढावू जहाजाशिवाय अन्य आरमार नष्ट करावे व आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी खुले करावे.
४) हवाई दल उभारू नये.

३) आर्थिक तरतूद :
व्हर्साय तहाप्रमाणे या तहाने ऑस्ट्रियावर युद्धखंडणीसाठी कमिशन नेमले ते ठरवेल त्याप्रमाणे ऑस्ट्रियाने नुकसान भरपाई द्यावी. याशिवाय ऑस्ट्रियाच्या मोठ्या व्यापारी नौका, जगभरचे ऑस्ट्रियाचे अधिकार व सवलती हिरावून घेण्यात आल्या.

४) राजकीय तरतुदी :
राष्ट्रसंघाची सदन व आंतरराष्ट्रीय कामगार संघटना या गोष्टी तहास जोडण्यात आल्या. त्यानुसार सर्व राजकीय हक्क कमी करण्यात आले.

५) कायदेशीर तरतूद :
जर्मनीप्रमाणे युद्धे पेटवण्यास ऑस्ट्रियाला जबाबदार धरणे. ऑस्ट्रियातील गुन्हेगाराची यादी करून न्यायालयामार्फत चौकशी करण्यात आली.

थोडक्यात युद्धापूर्वी युरोपात ऑस्ट्रिया बलाढ्य सत्ता होती. मेरी थेरसा हिने ऑस्ट्रियाला बलाढ्य बनवले. ऑस्ट्रियाच्या मेटरनिकने युरोपमधील एक बलाढ्य सत्ता म्हणून मान मिळवले. पण हे स्थान या तहाने सुंपष्टात आणले.

आपली प्रगती तपासा
प्रश्न : सेंट जार्मेनच्या तहातील तरतुदी सांगा.

१३.९ सारांश

जर्मनीच्या वैसर विल्समच्या धोरणांमुळे पहिले महायुद्ध घडून आले. आकाश, सागर, जमिन या तीनीही ठिकाणी तसेच आशिया, आफ्रिका, युरोप खंडामध्ये युध्द झाले. जास्त काळ युद्ध झाल्याने शत्रू व दोस्त गटांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले. पहिल्या महायुद्धासारखे पुन्हा संकट येऊ नये व जागतिक शांतता टिकवण्यासाठी दोस्त शब्दांच्या नेवृत्वाखाली पॅरिस येथे शांतता परिषद घेण्यात आली. जर्मनी व तिच्या दोस्त राष्ट्रांना युद्धास जबाबदार धरून युद्धाचा सर्व खर्च त्यांच्यावरच लादण्यात आलेली होता. यासाठी वेगवेगळे तह करण्यात आले. जर्मनीला सर्व बाबतीत कायमचे दुबळे बनवण्याच्या हेतूने अतिशय अन्यायकारक व एकातर्फ व्हर्सायचा तहा लादण्यात आलेला होता.

१३.१० दीर्घोत्तरी प्रश्न :

१) पहिल्या महायुद्धाची कारणे परिणाम स्पष्ट करा.
२) शांतता परिषदेचा आढावा घ्या.
३) जर्मनीच्या पराभवाची कारणे सांगा.
४) व्हर्साय तहामध्येच दुसऱ्या महायुद्धाची बीजे पेरली होती स्पष्ट करा.
५) व्हर्साय तहातील तरतुदींचा आढावा घ्या.

❖❖❖

१४

रशियातील सुधारणायुग-राज्यक्रांती

प्रकरणातील महत्त्वाचे मुद्दे

१४.० उद्दिष्टे

१४.१ प्रस्तावना

१४.२ लोहपुरूष झारनिकोलस प्रथम (१८२५ ते १८५५) :-

१) निरंकुश शासन व्यवस्थेचे आधार स्तंभ
२) कायद्याचे साहितीकरण
३) थर्ड सेक्सन नावाची यंत्रणा
४) देशाची वित्त व्यवस्था
५) शिक्षण क्षेत्रावर अनेक बंधने
६) उदारमतवादी विचार, साहित्यावर बंदी
७) राजसानेला अनुकूल चर्चचे धोरण
८) निकोलसच्या राजवटीचे स्वरूप
९) दास प्रथेसंदर्भात भूमिका

१४.३ मुक्तिदाता झार अलेक्झांडर दुसरा (१८५५ ते ८१) :-

१) भूदास मुक्ती कायदा :-

अ) भूदास मुक्ती कायद्याची कारणे

१) सामाजिक व राजकीय कारणे
२) आर्थिक कारणे
३) नैतिक भूमिका
४) क्रिमियनच्या युद्धातील पराभव

ब) भूदास मुक्ती कायद्याचे स्वरूप

क) भूदास मुक्ती कायद्याचे गुण-दोष

२) झेम्स्त्वो : स्थानिक स्वशासन संस्था

३) न्यायालयीन सुधारणा

४) शैक्षणिक सुधारणा

५) लष्करी सुधारणा

६) वित्त व्यवस्थापन

७) लोरिस - मेलिकोबा घटना

१४.४ रशियन राज्यक्रांतीची कारणे :

१) समाजातील विषम समाज रचना २) अकार्यक्षम दुर्बल झारशाही
३) वैचारिक जागृती ४) रशियन राज्यक्रांतीचा उद्‌गाता कार्लमार्क्स

५) रशियाचे औद्योगिकीकरण ६) निहिलिझम
७) साम्यवादाचा उदय ८) प्रातिनिधिक लोकशाहीला अपयश
९) पहिले जागतिक महायुद्ध

१४.५ रशियन राज्यक्रांतीची वाटचाल:

१) पेट्रोग्राडची क्रांती २) हंगामी सरकार ३) बोलशेहिक क्रांती - ७ नोव्हेंबर १९१७

१४.६ रशियन राज्यक्रांतीचे परिणाम :

१) फॅसिक्षम विरूद्ध कम्युनिझम संघर्षाचा उदय २) वसाहतीतील स्वातंत्र्य लढ्याला व्यापकता प्राप्ती झाली.
३) पाश्चात्य राष्ट्रांनी पुरस्कारिलेल्या उदारमतवादी कल्पनांना आव्हान. ४) क्रांतीने नवीन समाज निर्माण केला.
५) नवीन समाजात कामगाराला अग्रक्रम ६) रशियन साम्राज्यवादांचा अंत
७) रशियाला जागतिक राष्ट्रांत स्थान मिळाले. ८) धर्मसंस्थेचे महत्त्व संपले.
९) प्रचंड भौतिक प्रगती १०) पंचवार्षिक योजनेची देणगी
११) जगात कामगारामध्ये जागृती १२) उदारमतवादाचा विचार खोटा.
१३) साम्यवादामुळेच आंतरराष्ट्रीय लष्करी करार.

१४.७) सारांश

१४.८) दीर्घोत्तरी प्रश्न

१४.० उद्दिष्टे :-

१) झार निकोलस प्रथम याचे विचार समजावून घेणे.
२) निकोलसने रशियात केलेल्या सुधाराणेचा आढावा घेणे.
३) रशियातील भूदास प्रथेची माहिती मिळवणे.
४) अलेक्झांडरच्या विविध सुधारणेची माहिती घेणे.
५) राज्यक्रांतीस जबाबदार असणाऱ्या घटकांची तपशीलवार नोंद घेणे.
६) राज्यक्रांतीची वाटचाल व घटना याची माहिती मिळवणे.
७) राज्यक्रांतीचे परिणाम काय याचा अभ्यास करणे.

१४.१ प्रस्तावना

रशियामध्ये १६१३ ते १९१७ या काळात **रोमनोव्ह राजवंशाची** राजकीय सत्ता होती. या राज घराण्यातील राजाला **झार** म्हणून ओळखत असत. रशियामध्ये या घराण्यातील काही झार राजाने लोककल्याणकारणी सुधारणा घडवून आल्या. त्याचप्रमाणे अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कारही केलेला होता. याच पार्श्वभूमीवर १८२५ मध्ये झार निकोलस पहिला याने सत्ता हाती

घेतली. त्याचवेळी सैनिकांनी व उदारमतवाद्यांनी बंड केल्याने त्यांनी नियंत्रण राजसत्ता अंमलात आणली. याने पाश्चत्य संस्वृती, विचार, कल्पना रशियात येऊ नये व सर्व क्षेत्रावर आपले वर्चस्व निर्माण करण्याच्या विचारारातूनच अनेक क्रांतीकारी कठोर निर्णय घेतले. त्यामुळे त्यास **लोहपुरूष** म्हणतात. झार निकोलस नंतर **अलेक्झांडर दुसरा** १८५५ ते १८८१ या काळात रशियाच्या सत्तेवर होता त्याने अनेक महत्त्वाच्या सुधारणा केल्याने रश्यात सुधारण युगाचे पूर्व सुरू झाले भूदासांना भू-स्वामीच्या गुलामगिरीतून मुक्त केल्याने त्यास **मुक्तीदाता** म्हणून रशियाच्या इतिहासात ओळखले जाते. झार निकोलस पहिला व आलेक्झांडर दुसरा यांचय सुधारणांचा आढावा या प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे.

१८वे शतक क्रांतीने पेटलेले शतक म्हणून ओळखले जाते. औद्योगिक क्रांती, अमेरिकन क्रांती, फ्रेंच राज्यक्रांती ही या शतकातील तीन ठळक उदाहरणे होय. औद्योगिक क्रांतीने उत्पादनाच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल करून जगाचा चेहरामोहरा बदलून टाकला. अमेरिकन क्रांती साम्राज्यशाहीला टोला दिला व लोकशाहीची स्थापना केली. फ्रेंच राज्यक्रांतीने राजेशाही, सरंजामशाही, धर्मगुरूची सत्ता उलटून स्वातंत्र्य, समता, बंधुभाव याचा जगाला संदेश दिला. २०व्या शतकात सर्व जगाच्या इतिहासात इ.स.१९१७ ची रशियन क्रांती अभूतपूर्व ठरली. ती जवळजवळ ७०-७५ वर्षे ही क्रांती जीवंत राहिली. सर्व जग या क्रांतीने धास्तावले आहे. कारण जगातील भांडवलशाहीचे उच्चाटन करून जगभर कामगारांचे राज्य प्रस्थापित करण्याचे व भांडवलशाही उलथून टाकण्याचे या क्रांतीचे स्वप्न आहे.

१४.२) लोहपुरूष निकोलस प्रथम (१८२५ ते ५५) :-

अलेक्झांडर पहिला यास औरस संतती नव्हती. त्याने आपला बंधू **कॉन्सस्टांईन** याला राजपद देण्यासाठी पत्रव्यवहार केला. परंतु कॉन्सस्टांईनने राजपद नाकारले. त्यामुळे अलेक्झांडरने आपल लहान भाऊ निकोलस पहिला याल आपला उत्तराधिकारी निवडला. त्यामुळे अलेक्झांडरच्या मृत्युनंतर निकोलस प्रथम हा १८२५ मध्ये रशियाचा सम्राट बनला. तो उदारमतवादाचा कट्टर शत्रू होता. नियंत्रण, पोलिसांची दडपशाही, स्वातंत्र्याचे अपहरण इ. गोष्टी त्याच्या राजवटीचे वैशिष्ट्ये होते. दैवी सत्तेचा पुरस्कर्ता असल्याने राज्यकारभाराबाबत त्याची वेगळी भूमिका होती. त्यामुळे तो जनतेत अप्रिय ठरला.

अलेन्झांडरच्या मृत्यूनंतर कॉन्सस्टांईनने निकोलसला नवीन झार म्हणून मान्यता दिली. वॉसी येथे मुलकी व सैनिकी अधिकाऱ्यांना साम्राटांशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेण्याचे आदेश दिले. २६ डिसेंबर १८२५ रोजी निकोलसने राजनिष्ठेची शपथ घेण्याचा समारंभ आयोजित केला. परंतु सैन्यातील गुप्त क्रांतीकारक दलाने निकोलस हा उत्तराधिकारी नाही असा

समज पसरवला. त्यामुळे बंड झाले. रशियातील उदारमतवाद्यांनी कॉन्स्टस्टंईनला पाठिंबा दिला. कॉन्सस्टांईन आणि कॉन्स्टीट्युशन ही घोषणा बनवली. सर्व देशभर चळवळ सुरू केली. परंतु ही चळवळ सुशिक्षित व शहरी लोकांपुरती मर्यादित राहिली.

निकोलसने हा उठाव मोडून काढला व अनेकांना कठोर शिक्षाही दिली. प्रमुख पाच बंडखोर नेत्यांना फाशीची शिक्षा दिली. ही घटना **कीव्ह** येथे घटली होती. त्यामुळे अभिजात धर्मावरील त्याचा विश्वास नष्ट होऊन निकोलसचे मतपरिवर्तन झाले. त्याने ३० वर्षांच्या काळात उदारमतवादी चळवळी नष्ट करण्याच्या हेतूने अनेक सुधारणा केल्या.

१) निरंकुश शासन व्यवस्थेचे आधारस्तंभ :-

निकोलस विरोधी उदारमतवाद्यांनी बंड केले. त्यामुळे शासन व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी निकोलसने पाच आधार घेतले.

१) ब्युरॉक्रसी म्हणजे एकनिष्ठ नोकरवर्ग २) सैनिकी राजतंत्र ३) हेरगिरी ४) पुरातन धर्माधिष्ठित चर्च नियंत्रण ५) राष्ट्रवाद ही पाच तत्त्वे झारशाही काळाची वैशिष्ट्ये ठरली. जनतेच्या मागण्यानुसार सुधारणावादी उपक्रम सुरू केले.

२) कायद्याचे संहितीकरण :-

रशियातील जुने - नविन कायद्याचा अभ्यास करण्यासाठी **स्वोरेन्स्की** याची नियुक्ती केली. त्याने अतिशय अवघड कामगिरी पूर्ण करून १८३३ मध्ये सर्व कायद्यांचे संहितीकरण केले. त्यामुळे मुलकी व न्याय व्यवस्थेमध्ये सुधारणा झाल्या.

३) थर्ड सेक्सन नावाची यंत्रणा :-

रशियातील उदारमतवादी चळवळी दडपून टाकण्यासाठी थर्ड सेक्सन नावाची यंत्रणा प्रस्थापित केली. याचा प्रमुख पोलिस अधिकारी होता. उदारमतवादी, क्रांतिकारी व्यक्तींना विना चौकशी तुरूंगात डांबण्यात येत असे. त्यांना हद्दपारीची शिक्षा ठोठवण्यासाठी खास अधिकार पोलिसांना देण्यात आले. ३० वर्षांच्या काळात १५ लक्ष लोकांना सैबेरियात हद्दपार केले. अनेकांना फाशी दिली. उदारमतवाद्यांना रशियात प्रवेश बंदी केली. तसेच परदेशी प्रवासावर बंदी घातली.

४) देशाची वित्त व्यवस्था :-

रशियामध्ये सतत युद्ध, संघर्ष असल्यामुळे चलनवाढ झाली. त्यामुळे वस्तुंच्या किंमती वाढल्या. शेतकऱ्यांना कर्ज न मिळाल्याने शेती उत्पादन कमी झाले. परिणामी परदेशी व्यापार घटला. आर्थिक गोंधळ नष्ट करण्यासाठी निकोलसने **मॅगन्क्रीन** या अर्थतज्ज्ञाची नियुक्ती केली. मुद्रास्फिती

रोखण्यासाठी नवीन नोटांची राशी विशिष्ट सुवर्णनाण्याच्या प्रमाणात चलनात आणली. ३५:१ असा व्यवहाराचा विनिमय दर होता. ही सुधारणा व्यापारी क्षेत्राला अतिशय फायदेशीर ठरली. सरकार तर्फे आवश्यक निधी म्हणून बँकांत डिपॉझिट ठेवण्याची प्रथ सुरू केली. वर्ण भेद न करता सर्वांना कर्जाची सोय केली. त्यामुळे उद्योग, शेती व्यवसायला पैसा प्राप्त झाला. त्यामुळे उत्पादन वाढले. युरोपियन देशांशी व्यापारी करार करण्यात आले. त्यामुळे व्यापारात वाढ झाली.

५) शिक्षण क्षेत्रावर अनेक बंधने :-

रशियात उच्च शिक्षणाचा मुख्य उद्देश देशाला कार्यक्षम प्रशासक मिळावा ऐवढाच होता. फ्रान्स व जर्मनीतील क्रांतीकारी विचारांचा प्रसार सुशिक्षित वर्गात होऊ नये यासाठी अनेक बंधने घातली. या शिस्तीत राहणे पसंत नाही अश्या प्राचार्यांनी, शिक्षकांनी सेवेचा त्याग केला. शाळा - कॉलेजात सैनिकी शिस्त तरुण वर्गात निर्माण केली. यासाठी गणवेश, कवायत, इ. गोष्टी सक्तीच्या केल्या.

६) अदारमतवादी विचार, साहित्यांवर बंदी :-

निकोलसने आपल्या ३० वर्षाच्या काळात पाश्चात्य संस्कृती, विचार कल्पना येऊ नयेत. तसेच रशियात पूर्वपरंपरागत समाज व्यवस्था व झारची अनियंत्रित राजसत्ता राहावी, यासाठी प्रयत्न केला. उदारमतवादी वर्तमानपत्रांवर अनेक निर्बंध लादून ती बंद केली. अश्याच प्रकारच्या वाङ्मयावरही बंदी घातली. अशी पुस्तके जप्त करून जाळून टाकली असे साहित्य बाळगणाऱ्यावर खटले भरले. काहींना हद्दपार केले.

७) राजसत्तेला अनुकूल चर्चचे धोरण :-

रशियन समाजावर धर्माचा व चर्चचा प्रभाव होता. निकोलसने **ऑर्थोडॉक्स चर्चही** संस्था सरकारी संस्था बनवली. त्याच्या माध्यमातून राजसत्तेला अनुकूल असेच आचार-विचार अमंलात आणले होते. चर्चेने अनियंत्रित राजसत्तेला धार्मिक दृष्टिकोनातून पाठिंबा दिला.

८) निकोलसच्या राजवटीचे स्वरूप :-

निकोलसच्या काळात राजवटीला पोलिस राज्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे उत्पादनाचा मोठा हिस्सा खर्च होत होता. परंतु राजसत्तेने युद्धयंत्र, प्रशिक्षण, नविन युद्ध साहित्य इ. दुर्लक्ष केले होते. मुलभूत कायद्यात असे सांगितले होते की, रशियाचा झार निरंकुश व अनियंत्रित राजसत्तेचा अधिकारी आहे. परमेश्वरानेच लोकांना सांगितले आहे की, तो सर्वेच्च अधिकारी असल्याने त्याच्या आज्ञा पाळण्यात ईश्वराचे आदेश समजून त्याच्या आज्ञा पाळाव्यात.

९) दास प्रथे संदर्भात भूमिका :-

रशियातील दास प्रथेमध्ये सुधारणा व्हावी अशी प्रामाणिक इच्छा निकोलसची होती. भू-मालकांनी भू-दासांचे शोषण करून असे सांगितले. यासाठी मालक वर्गाने दासांची कर्तव्य सांगावीत असे स्पष्ट केले. त्याचा फारसा परिणाम झाला नाही. कारण तो निर्णय मालकांवर सोपवला होता. १८०५ मध्ये झारने **मिनिस्ट्री ऑफ स्टेट प्रॉपर्टीन** (सरकारी मालमत्तेची देखरेख करणारा विभाग) स्थापन केला. शेती करणाऱ्यांना सहकारी पद्धतीने व्यवसाय करण्याची संधी दिली. बड्या शेतकऱ्यांचे ६ हजार कम्युन्स निर्माण केले. सहकारी पद्धतीनुसार सरकारी जमिनीची वाटप केली.

झार निकोलस पहिली यांना १५२५ ते ५५ या काळात रशियाची राजसत्ता हाती घेतली. त्याने अनेक कठोर निर्णय घेऊन उदारमतवादी व क्रांतीकारी संघटना, विचारवंत यांच्यावर बंदी घातली. त्याच्या या निर्णयामुळे त्याला लोहपुरूष म्हणतात.

आपली प्रगती तपासा :-

प्रश्न : झार निकोलसचे वित्तव्यवस्थेसंदर्भात धोरण

१४.३ मुक्तिदाता झार अलेक्झांडर दुसरा : (१८५५-१८८१) :

रशियातील शेतकऱ्याला गुलामगिरीच्या जाचक व मानहानीकारक बंधनातून मुक्त करून स्वातंत्र्य देणारा झार म्हणून आलेक्झांडर दुसरा याला महत्त्व प्राप्त झाले. त्यालाच **स्वातंत्र्याचा झार** किंवा **मुक्तिदाता झार** असे म्हटले आहे. झार निकोलस पहिला याच्या नंतर अलेक्झांडर गादीवर येणार हे निश्चित असल्याने, त्याला सर्व प्रकारचे शिक्षण देण्यात आले. १८४१ मध्ये राष्ट्रीय सभेचा सभासद म्हणून निवड झाली. वडिलांच्या अनुपस्थितीत तो सभेचे अध्यक्षपद स्वीकारत असे. क्रिमियन युद्धाच्यावेळी सेंट पीटर्सबर्गचा गव्हर्नर होता. ऑस्ट्रियन आघाडीवरील रशियन सेनापती म्हणून काम केले. एकवेंद्री शासनावरच त्याचा दृढ विश्वास होता. झार निकोलस पहिला मृत्यु पावल्यानंतर १८५५ मध्ये रशियाच्या गादीवर आलेक्झांडर दुसरा आला त्याने रशियात अनेक प्रकारच्या सुधारणा केल्या.

१) भूदासमुक्ती कायदा :

अलेक्झांडरने रशियामध्ये ज्या सुधारणा केल्या त्यामध्ये शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्याने महत्त्वाचा निर्णय घेतला तो म्हणजे रशियन शेतकऱ्यांना गुलामगिरीतून मुक्त करणे. यासाठी ३ मार्च १८६१ रोजी 'मुक्ततेता आदेश' या नावाचा आदेश काढला. रशियातील भूदासमुक्ती कायद्या केला.

अ) भूदास मुक्ती कायद्याची कारणे :-

१) सामाजिक व राजकीय कारणे :-

रशियन समाजामध्ये अनेक शतके भूदास पद्धत रूजलेली असून सामाजिक विषमता, आर्थिक दारिद्र्य मोठ्या प्रमाणात होते. दु:ख, अपमानीत जीवन यामुळे असंतोष निर्माण झालेला होता. त्यातून रशियात अनेक वेळा भूदासांनी उठाव केला. १९व्या शतकात शेतकऱ्यांच्या उद्रेकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले होते. सरकारला हे उठाव दडपून टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत होता. भूदासांच्या स्फोटक परिस्थितीमुळे राष्ट्रातील शांतता, सुरक्षितता नेहमीच धोक्यात येत होती. त्यामुळे भूदास पद्धत बंद करून शेतकऱ्यांचा असंतोष दूर करून, त्यांना दिलासा देणेही एक राजकीय गरज होती. त्यातून कायदा निर्माण केला.

२) आर्थिक कारणे :

१९व्या शतकात भूदास पद्धत राष्ट्राच्या अर्थ व्यवस्थेला घातक ठरू लागली. कारण या काळात वस्तुविनिमयाऐवजी मुद्राविनिमय व स्पर्धायुक्त बाजारपेठ वाढल्या. भूदासाचे निकृष्ठ दर्जाचे श्रमशक्ती व उत्पादन असल्याने राष्ट्रीय उत्पन्न घसरत होते. तर दुसरीकडे याच वेळी भूदासांची संख्या वाढत होती. अल्प प्रमाणात व भूदासांच्या पालनपोषणाची जबाबदारी यामुळे जमीनदार वर्गालाही कालबाह्य झालेली भूदास पद्धत नको होती. या शतकांमध्ये संरजामशाही अर्थव्यवस्थेचे रूपांतर भांडवलशाही अर्थव्यवस्थेकडे मार्गक्रमण होत होते. शहरी विभागातून कारखान्यात श्रमशक्तीची गरज होती. ग्रामीण भागातील श्रमशक्ती शहरी भागाकडे ओळखण्याची गरज असल्याने भूदास पद्धत बंद केली. शिवाय राजसत्तेलाही धोका निर्माण होणार नाही.

३) नैतिक भूमिका :

रशियातील बौद्धिक व भावनिक वातावरणामुळे सुद्धा भूदासमुक्ती कायद्याला कारणीभूत ठरणे. भूदास पद्धतीतील अन्याय, असमानता व आर्थिक पिळवणूक, मानहानी यासंदर्भात नामवंत साहित्यिक विचारवंत व उदारमतवादी यांनी भूदास मुक्तीची गरज व्यक्त करणारी विचार मांडले. जमिनदारवर्गाला गरज असूनही ती पद्धत टिकवून ठेवण्याची भाषा बोलत नव्हते. एकंदरीत ही पद्धत रद्द करावी असाच विचार होता.

४) क्रिमियाच्या युद्धातील पराभव :-

रशियाचा क्रिमियाच्या युद्धात पराभव झाल्याने रशियाची आर्थिक लष्करी व नैतिक बाजू दुबळी असल्याचे स्पष्ट झाले. सैनिकांची आर्थिक परिस्थिती, शारीरिक दौर्बल्य, मानसिक, उदासिनता व दुबळेपणा या मुळेच पराभव झाला आहे. रशियन समाजाची ती परिस्थिती आहे तीच परिस्थिती लष्करात ही निर्माण होऊ लागली आहे हे स्पष्ट झाले. त्यामुळे राष्ट्राला राजकीय स्थैर्य, लष्करी सामर्थ्य आणि आर्थिक प्रगती साध्य करण्यासाठी प्रथम भूदास पद्धत

बंद करणे गरजेचे आहे. हे अलेक्झांडरने ओळखले होते. पॅरिस शांतता कराराच्या अटी व सुधारणा अलेक्झांडरने जनतेला कळवल्या.

ब) भूदास मुक्तीचा कायदा - १९ फेब्रु. (३ मार्च) १८६१ :

भूदास मुक्ती संदर्भात देशातल्या वेगवेगळ्या क्षेत्रातून आलेल्या सुचनांचा अभ्यास करण्यात आला. एडिटिंग कमिशन, जनरल कमिशन व मंत्र्यांची मुख्य समिती यांची संयुक्त बैठक जानेवारी १८६१ मध्ये अलेक्झांडरच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीमध्ये भूदास मुक्तीचा ऐतिहासिक ठराव मंजूर करून कायदा बनवला. या कायद्यावर अलेक्झांडरने ३ मार्च १८६१ रोजी सही केली. त्यानंतर १२ दिवसाने त्या कायद्याला जाहिरनाम्याद्वारा प्रसिद्धी दिली. या कायद्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे.

१) या कायद्यानुसार जमीनदारांच्या जमीनीवर राबणारे १०.७ दशलक्ष भूदास व सरकारी शेतांवर राबणारे सुमारे १२.८ दशलक्ष भूदास (१८५९च्या गणनेनुसार) यांना भूदासातून मुक्तता करण्यात आली.
२) जमीनदरांचा भूदासावरील मालकी हक्क नष्ट होऊन ते कायद्याने स्वतंत्र्य झाले. त्यांना वैयक्तिक स्वातंत्र्य देण्यात आले. स्वत:च्या मर्जीनुसार विवाह करणे, मालमत्ता विकत घेणं, व्यापार करणे, न्यायाल्यात तक्रारी करणे इ. हक्क प्राप्त झाले.
३) जमीन मालकाला विमोचन भरपाई म्हणून काही देण्यात येणार नाही. तसेच स्वतंत्रता प्राप्तीनंतर या भूदासांना कोणत्याही प्रकारची सरकारकडून आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
४) कृषक - दासांना स्वतंत्र नागरिकाचे हक्क मिळतील. त्यांच्या वहीवाटी खालील शेतजमिनी वैयक्तिक मालकीच्या म्हणून मानल्या जातील. पण त्यांचा मालकाशी कारार करून नवीन जास्तीची जमीन खरेदी करता येईल.

क) भूदास मुक्ती कायद्याचे गुणदोष :

१) भूदास विमोचन कायद्याने रशियातील शेतकऱ्यांची गुलामगिरी नष्ट झाली. परंतु दारिद्र्य, हालअपेष्टा यातून सुटका झाली नाही. २५% पेक्षाही कमी जमिनी मिळाली. विमोचन देय या सरकारला द्यावा लागणाऱ्या करामुळे आर्थिक दारिद्र्य वाढले. जमिनदारांनीही अत्यंत हलक्या प्रतीची जमिन भूदासांना दिली होती.
२) भूदास मुक्तीबरोबरच जुनी समाजरचना कोलमडली. लष्करी व मुलकी प्रशासन वर्गावर झार प्रशासन अवलंबून होते या वर्गाचे विशेषधिकार रद्द केल्याने त्याची शक्ती व प्रतिष्ठा कमी झाली. त्याचा झारशाहीवर परिणाम झाला.
३) भूदास मुक्ती कायद्याने शेतकऱ्यांचे व राष्ट्राचे आर्थिक व कृषि प्रधान न सुटल्याने उदारतादी, बुद्धिवादी आणि जहाल गट यांच्यातील असंतोषही वाढतच गेला.

आपली प्रगती तपासा

प्रश्नः भूदास कायद्याचे स्वरूप सांगा.

२) 'झेम्स्त्वो' स्थानिक स्वशासन संस्था :

अलेक्झांडरची अत्यंत महत्त्वाची दुसरी सुधारणा म्हणजे **सत्तेचे विकेंद्रीकरण** होय. १८६१ पूर्वी झारची अनियंत्रित राजेशाही असून, सर्व देशासाठी एकच कायदे मंडळ होते. १८६१च्या कायद्याने सरंजामशाही काळातील अधिकार वर्गाचे विशेषाधिकार रद्द केले. त्यामुळे स्थानिक शासनाची नवी व्यवस्था तयार केली. १३ जानेवारी १८६४ रोजी **झेम्स्त्वो** किंवा **स्थानिक स्वशासन संस्थेचा** कायदा घोषित करण्यात आला. या कायद्यानुसार रशियाच्या प्रत्येक प्रांतात व जिल्ह्यात लोकशाही स्वरूपाची स्थानिक समिती व कार्यकारी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या समितीमध्ये बडे जमिनदार, व्यापारी, शेतकरी व शहरातील नागरिक यांना प्रतिनिधित्व दिले. झेम्स्त्वो (विधानसभा) सदस्यांच्या निवडणूकीकरता जिल्ह्यातील जमीनदार, ग्रामीण कम्युन्स आणि शहरवासीय लोक अशी तीन गटात मतदारांची विभागणी करण्यात आली. त्यासाठी मतदानाची व उमेदवाराची पात्रता ठरवण्यात आली. या तीन गटातून जिल्हा झेम्स्त्वेवर प्रतिनिधी पाठवत असे. जिल्हा झेम्स्त्वोचे प्रतिनिधी प्रांतिक झेम्स्त्वोकरिता प्रतिनिधी निवडून पाठवत. प्रांतिक झेम्स्त्वो त्यांच्या सदस्यातून कार्यकारी मंडळाच्या किंवा झेम्स्त्वो बोर्डाच्या सदस्यांची निवड करत. स्थानिक जमीनदार धर्माचा प्रमुख व त्या त्या जिल्हा झेम्स्त्वोचा पदसिद्ध अध्यक्ष असे. या सर्व संस्था सर्वोच्य विधिसमंत संस्थेच्या म्हणजे सिनेटच्या देखरेखी खाली असत.

या स्थानिक सभाकडे आपल्या क्षेत्रात नवे कर बसविणे, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, तुरूंग, चर्च, अनाथालये, सहकारी संस्था स्थापन करणे. शेतकऱ्यांना शेतीविषयक तज्ज्ञ सल्ला उपलब्ध करून देणे, अग्निसंरक्षण विमा इ. महत्त्वाची कामे केली जात. प्रत्येक विभागावर सरकारचा प्रतिनिधी व सरकार प्रमुख म्हणून राज्यपालाची नेमणूक केली. त्याची निवड प्रत्यक्ष झारकडून होत असून तो आपल्या कामासाठी झारला जबाबदार असे. वरील प्रत्येक बाबीत त्याला नकाराधिकारच होता.

३) न्यायालयीन सुधारणा :-

रशियातील न्यायव्यवस्था अतिशय मागासलेली, लाचलुचपत, भ्रष्टाचार, दिरंगाई यांनी पोखरलेली होती. सरदार, अमीर, अमराराव यांच्याकडे न्यायदानाचा अधिकार होता. न्यायालयातील दंड त्यांना मिळत असल्याने ते जास्तीजास्त दंड आकारात होते. बड्यांच्या लहरीनुसार न्यायदान होत असल्याने उदारमतवाद्यांनी व जहालवाद्यांनी न्यायव्यवस्थेवर प्रचंड टिका केल्या. अलेक्झांडरने सुत्र हाती घेतल्यानंतर न्यायव्यवस्थेकडे लक्ष दिले. न्याय व्यवस्थेची पूनर्रचना केली.

झारने पाश्चिमात्य देशातील न्यायव्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी १८६१ मध्ये एक कमिशन स्थापन केले. त्या कमिशनच्या शिफारशीच्या आधारे १८६४ चा **ज्युडिशिअरी ॲक्ट** पास करून न्याय व्यवस्थेतील अनेक दोष दूर करण्याचा प्रयत्न केला. कायद्यासमोर सर्वांची समानता, न्यायालयाचे स्वातंत्र्य, आरोपीला बचावाची संधी व त्रुटी पद्धती या तत्वांचा मान्यता देण्यात आली. न्यायव्यवस्था व सरकार यांच्या अधिकारात फरक केला. न्यायालयाखाली जिल्हा व फिरती न्यायालये स्थापन केली. कायदेतज्ज्ञ अशा पगारी नोकरांच्या नेमणूका केल्या. किरकोळ गुन्ह्यांचे कामकाज **मानसेवी** न्यायाधीशांकडे देण्यात आले. **सिनेट** या उच्च न्यायालयाची स्थापना केली. दिवाणी व फौजदारी खटल्याला अंतिम निकाल या न्यायालयाकडे सोपवली. फौजदारी खटल्यासाठी **ज्युरीची पद्धत** स्वीकारली सर्व कायद्याने संहितीकरण करण्यात आले. राजकीय गुन्हेगारीसाठी ही नवी न्यायपद्धती वापरली नाही.

४) शैक्षणिक सुधारणा :-

अलेक्झांडरने प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणात बदल करण्यासाठी **गोलोव्हनिन** या अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्याच्या शिफारसीनुसार अनेक बदल घडवून आणले. जून १८६४च्या प्राथमिक शिक्षण कायद्यानुसार खास जिल्हा शिक्षण मंडळांच्या देखरेखीखाली स्थानिक व नागर शासनाद्वार शाळा सुरू करण्यात आला. डिसेंबर १८६४ च्या माध्यमिक शिक्षण कायदा प्रसिध्द केला. जर्मनीचे दर्जेदार आखाडे, शैक्षणिक केंद्रे सुरू केली. तांत्रिक व व्यावसायिक शाळेंची निर्मिती करण्यात आली. १८६३ मध्ये विद्यापीठांना स्वायतत्ता बहाल करून सरकारी नियंत्रणातून मुक्त केले. विद्यापीठांतर्गत प्रत्येक शाखेला आवश्यक त्या पदाधिकाऱ्याची निवड करण्याचा अधिकार देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या प्रवेशावरील कडक निर्बंध रद्द केले. गरीब विद्यार्थ्यांना नि:शुल्क शिक्षक व इतरांच्या बाबतीत शुल्कात घट केली. स्त्री शिक्षणावर बंद होते. विद्यार्थ्यांना संघटन स्वातंत्र्य नव्हते. शासकीय समितीद्वारा विद्यापीठांचा कारभार चालत असे.

५) लष्करी सुधारणा :

रशियाचा क्रिमियन युद्धात मानहानीकारक पराभव झाल्याने लष्करात सुधारणा घडवून आणण्याची गरज होती. सैनिकांची अस्त्रे - शस्त्रे यामध्ये बदल करणे. सैन्यांचे विविध तुकड्यामध्ये विभाजन करणे. अधिकारीवर्गाला सैनिकी शिक्षण देणे, वैद्यकिय सेवा अधिक कार्यक्षम करणे न्यायालयीन पद्धतीतील कठोरता कमी करणे इ. बाबीची अतिशय गरज असल्याचे अलेक्झांडरला दिसून आले. त्यामुळे लष्करात सुधारणा करण्याचा निर्णय घेतला. यासाठी युद्धमंत्री **दिमित्री मिल्युतिन** यांच्याकडे जबाबदारी सोपवण्यात आली.

दिमित्री मिल्युतिन याने युरोपीय राष्ट्रांच्या लष्करी पद्धतीचा अभ्यास करून अनेक महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणल्या. १३ जानेवारी १८७४ रोजी लष्करासंबंधी सुधारणा कायदा पास करण्यात आला. या कायद्याची उपयुक्तता लक्षात घेऊन सरकारच्या विरोधकांनीही पाठिंबा दिला. या कायद्याने सर्व वर्गासाठी लष्करी सेवा सक्तीची करण्यात आली. वयाच्या २०व्या वर्षांनंतर प्रत्येकांनी ६ वर्षांची लष्करी सेवा सक्तीने करावी. त्यानंतर ९ वर्षे राखीव दलातील आणि त्यानंतर ५ वर्षे शिबंदीतील सेवाकाळ सक्तीचा करण्यात आला. लष्करात मृत्युदंडाची शिक्षा रद्द करण्यात आली. शेतकरी वर्गातील तरुणांनी सैन्य भरती होऊन बौद्धिक प्रगती करणे.

६) वित्त व्यवस्थापना :

सरकारी वेंद्रिय कोषागार स्थापन करून, अंदाजपत्रक प्रसिद्ध करण्याची प्रथा सुरू केली. वित्तव्यवस्थेचे आयोजन, उद्योगधंद्यांना कर्जे देणे, पत मंजूर करणे अश्या कामासाठी १८६६ मध्ये **स्टेट बँकेची** स्थापना करण्यात आली. मुद्रणावरील व प्रवासावरील निर्बंध रद्द केले. उद्योगधंदे व व्यापारावरील अनेक निर्बंध शिथिल केले. अंतर्गत जकात कमी केली. परदेशी माला व परकीय भांडवल रशियात येण्यासाठी अनेक सवलती देण्यात आल्या. रेल्वेमार्गासाठी खाजगी कंपन्यांना उत्तेजन देण्यात आले. या कंपन्यांना अनेक प्रकारच्या सवलती व आर्थिक मदत सरकारकडून देण्यात आली.

७) लोरिस - मेलिकोव घटना :

अलेक्झांडरच्या राज्यारोहणाच्या रजत जयंती उत्सवाची तयारी १८८० मध्ये सुरू होती. त्यावेळी अलेक्झांडरच्या हत्येचा पुन्हा प्रयत्न झाला. त्यामुळे क्रांतिकारी चळवळ नष्ट करण्याची गरज निर्माण झाली. तसेच जनतेला राजकीय हक्क व सवलती देणे आवश्यक आहे. याची जाणीव झाली. क्रांतीकारी अधिवेश नष्ट करणे व जनतेला राजकीय हक्क व सवलती देण्याच्या हेतूने खार्कोव प्रांताचा गव्हर्नर लोरिस मेलिकोव याची नियुक्ती केली.

लोरिस - मेलिकोव याने राष्ट्रीय समस्यांची चर्चा करण्यासाठी अमीर-उमराव व स्थानिक शासनसंस्था यांच्या प्रतिनिधींची सभा बोलविली. राष्ट्रीय वित्त पुनर्रचनेकरता एक व राष्ट्रीय शासनाकरिता एक अशी दोन मंडळांची स्थापना करण्यात यावी. या दोन मंडळांची केलेल्या शिफारसी झेम्स्वो व नगरपालिका समितीच्या प्रतिनिधी मंडळासमोर ठेवव्यात. या मंडळाने चर्चा करून आपला अहवाल कौन्सिल ऑफ स्टेटकडे पाठवावा. कौन्सिल ऑफ स्टेटकडून मान्यता मिळाल्यानंतर तो अहवाल व सुचना सम्राटाकडे पाठवावा, अश्या स्वरूपाची लोरिस - मेलिकोव घटना योजनेची रूपरेषा होती.

ही योजना खऱ्या अर्थाने घटना नव्हती, की जनतेच्या हक्कांची सनदही नव्हती. सम्राटाच्या सर्वाधिकाराला कोठेही धक्का नव्हता. तरीपण सम्राटाला भिती वाटत होती. १३ मार्च १८८१ रोजी अलेक्झांडरने लोरिस - मेलिकोव

योजनेच्या मसुद्यावर सही केली. परंतु या योजनेचे वास्तव आलेच नाही. कारण त्याच दिवशी दहशवादी संघटनेचा सदस्य **ग्रिनेवत्स्की** याने फेकलेल्या बॉबने अलेक्झांडर ठार झाला.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न : अलेक्झांडरच्या लष्करी सुधारणा स्पष्ट करा.

१४.४) या क्रांतीने सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनात बदल घडवून आणला. एवढेच नव्हे तर पाश्चात्त्य जीवनमूल्य, पाश्चात्त्य अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, नीतीमूल्य यांना जबरदस्त आव्हान केले. औद्योगिक क्रांतीमुळे कारखानदारी हिरवळली. नवा कामगार वर्ग उदयास आला. उत्पादन साधनांची मूठभर लोकांकडे मालकी होती. ते कामगारांचे शोषण करत असत. कामगाराच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. यातून या क्रांतीने एक नवा दृष्टिकोन निर्माण केला. कार्ल मार्क्सचा सिद्धांत या क्रांतीने सत्यात उतरवला. या क्रांतीचे तत्त्वज्ञान जगातील कामगारांमध्ये लोकप्रिय ठरले. त्यामुळे सर्व जगातील कामगारांचे संघर्ष होऊन, भांडवलशाही उलथून साम्यवाद पसरवण्याचा या क्रांतीचा प्रयत्न आहे. मात्र रशियाला आर्थिक क्षेत्रात अपयश येऊ लागल्याने रशियाने जागतिक क्रांतीचे स्वप्न सोडून साम्यवादाला मुरड घालण्यास प्रयत्न चालवला आहे. जागतिक शांततेच्या दृष्टीने ही घटना सुदैवी आहे, या प्रलयकालीन प्रभावी **क्रांतीस पुढील गोष्टी कारणीभूत ठरल्या.**

१) रशियातील विषम समाजरचना :

क्रांतिपूर्व काळातील समाजरचना ही १८व्या शतकात फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वी फ्रान्समध्ये ज्या प्रकारची होती, त्याच प्रकारची रशियात होती. रशियात सरंजामशाही व्यवस्था शाबूत होती. रशियन समाजात दोन वर्ग होते. **पहिल्या वर्गात** रशियन झार, त्याचे नातेवाईक, सरंजाम सरदार, जमीनदार यांचा वर्ग होता. देशातील उत्पन्नाची सारी साधने या मूठभर लोकांच्या हाती होती. उरलेला सारा समाज **दुसऱ्या वर्गात** मोडत होता. त्यामध्ये सरंजाम सरदाराच्या, जमीनदारांच्या जमिनीत राबणारा भूदास, छोटे शेतकरी, शेतमजूर, कारागीर इ. समावेश होता. या लोकांकडे उत्पन्नाची साधने नसत. पहिल्या वर्गाच्या मेहनबानीत या लोकांना जगावे लागत होते. इ.स. १८६१ मध्ये भूदासाची मुक्तता करण्यात आली; परंतु झारने तो प्रयत्न अर्धवट सोडल्याने खऱ्या अर्थाने भूदासांची मुक्तता झाली नाही.

थोडक्यात, रशियातील सर्वसामान्यांची परिस्थिती अत्यंत नाजूक होती. जमिनीची मालकी ठराविक लोकांच्या हाती असल्याने शेतीचे उत्पन्न कमी. युरोपियन देशाच्या नव्हे तर भारत-चीन देशाच्या तुलनेने रशियातील शेतीचे उत्पन्न कमी होते. यातच वारंवार पडणारे दुष्काळ सर्वसामान्यांच्या दु:खात भर

घालणारे होते. झारची आक्रमक वृत्ती आणखी जनतेला दारिद्र्यात लोटत होती. यामुळे सर्वसामान्य जनता क्रांतीसाठी प्रवृत्त झाली होती.

२) अकार्यक्षम दुर्बल झारशाही :

क्रांती ही दारिद्र्याच्या पोटी जन्म घेत असते. रशियात कमालीचे दारिद्र्य होते. हे दारिद्र्य दूर करण्याचे, सर्वसामान्यांचे जीवन सुखी बनवण्याची क्षमता झारशाहीत नव्हती. रशियात सुमारे ३०० वर्षांपासून **रोमॅनोव्ह** घराण्याची वंशपरंपरागत सत्ता होती. रशियातील सर्वच राजे झार या नावाने ओळखले जात. वंशपरंपरागत राजेशाही एक महत्त्वाचा दोष म्हणजे अपवादात्मक चांगले राजे निपजतात. रशियातील **पिटर-दि-ग्रेट** याचा अपवाद वगळता सर्वच राजे अकार्यक्षम, दुर्बल, भ्रष्टाचारी होते. क्रांतीकारातील झार, निकोलस दुसरा हा सर्वांहून कळस होता. त्याने देशात भयंकर अत्याचार केले. जनतेवर अनेक युद्धे लादली. पाश्चात्त्य विचार रशियात पैलावू नये म्हणून त्याने वर्तमानपत्रांची, जनतेच्या मूलभूत स्वातंत्र्याची मुस्कटदाबी करणारे रानटी उपाय योजले. यामुळे यांच्याविरूद्ध संतप्त वातावरण झाले. इ.स.१९०५ मध्ये जपानने रशियाचा पराभव केला. त्यामुळे झारचा दुबळेपणा उघड झाला. आपल्या अनियंत्रित सत्तेला फाटा द्यावा व लोकशाही प्रस्तावित करावी यासाठी लोकांनी क्रांती केली; परंतु यापासून काही बोध घेतला नाही. इ.स. १९०६ नंतर कामगाराच्यात फूट पाडून पुन्हा अनियंत्रित कारभार सुरू केला. अनियंत्रित भ्रष्ट झारशाहीला विरोध होऊ लागला. तो स्वतः अकार्यक्षम व दुर्बल होता. तो आपली पत्नी **झारीना** हिच्या सल्ल्याने राज्यकारभार करी. झारीनावर **रासपुटीनी** या साधूचा प्रभाव होता. त्याला राज्यकारभाराचे ज्ञान नसताना कारभारात हवा तसा धुडगुस घातला. त्यामुळे देशभर असंतोष निर्माण झाला. झारच्या धोरणामुळेच रशिया-जपान युद्धात पराभव झाला. त्याचा परिणाम क्रांती स्पष्ट झाला.

३) वैचारिक जागती :

रूसो, व्हॉल्टेस्यू, व्हॉल्टिअर या तत्त्ववेत्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीची वैचारिक भूमिका तयार केली. त्याप्रमाणे लिओ टॉलस्टॉय, गॉर्की, तुर्जेनिव्ह डोस्कोव्हस्को इ. अभिजात लेखकांनी रशियन राज्यक्रांतीची वैचारिक भूमिका तयार केली. या लोकांनी क्रांतीसाठी कधी शस्त्र हातात घेतले नाही; परंतु आपल्या लिखाणातून तत्कालीन शासन संस्था कशा सडल्या, नासल्या असून अधोगतीस पोचल्या आहेत हे दाखवून दिले. त्यांनी कनिष्ठ वर्गाचे दुःख जगाच्या वेशीवर टांगून क्रांतीची आवश्यकता लोकांना पटवून सांगितली. लिओ टॉलस्टॉयने कादंबरीतून सरंजाम सरदार व त्यांचे विलासी जीवन आणि त्यांच्याकडून भूदासाचे होणारे शोषण याचे चित्र लोकांपुढे मांडले. भूदासाच्या सर्वसामान्यांच्या दुःखाला वाचा फोडली. रशियातील अनेक साहित्यिकांनी, विचारवंतांनी रशियन जनतेला जागृत केले. झारशाही सरंजामशाही उलथून टाकण्यासाठी आवश्यक ती वैचारिक भूमिका तयार केली.

४) रशियन राज्यक्रांतीचा उदगाता कार्ल मार्क्स :

रूसों फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्‌गाता मानला जातो. क्रांतीपुत्र नेपोलियनने असे म्हटले की, रूसो झाला नसता तर फ्रेंच राज्यक्रांती झाली नसती. रूसोचे फ्रेंच राज्यक्रांतीस जे स्थान आहे तेच रशियन क्रांतीत मार्क्सला स्थान आहे.

कार्ल मार्क्सचा जन्म इ.स.१८१८ मध्ये जर्मनीत एक ज्यू कुटुंबात झाला. बर्लिन व बॉन विद्यापीठात शिक्षण झाले. त्याच्या क्रांतिकारक विचारामुळे जर्मनीतून व पुढे फ्रान्समधून हकालपट्टी झाली. तो इंग्लंडमध्ये स्थायिक झाला. तेथे इतिहास, तत्त्वज्ञान या विषयाचे लेखन, वाचन, कामगार संघटित करण्याचे कार्य केले. त्याच्यावर हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडला होता. मात्र हेगेलचे तत्त्वज्ञान डोक्यावर उभे होते ते मी पायावर केले, असे मार्क्स म्हणत असे. या काळात युरोपमध्ये औद्योगिक क्रांती ऐन भरात होती.

कामगाराच्या शोषणामुळे कामगार संघटित होऊ लागले होते. मार्क्सने साम्यवादी तत्त्वज्ञान अत्यंत सोप्या भाषेत सांगितल्याने तो कामगारांत अतिशय लोकप्रिय झाला. त्याने इ.स.१८४४ मध्ये **कम्युनिस्ट जाहीरनामा** हा पहिला ग्रंथ प्रकाशित केला. त्यात त्याने, या संघर्षात तुम्ही काही गमावणार नाही. कारण तुमच्याजवळ कामाशिवाय दुसरे काही नाही तर तुम्ही जिंकला तर तुम्ही कारखान्याचे मालक व्हाल. मार्क्सचे क्रांतीचे आव्हान रशियात वणव्याप्रमाणे पेटले. यातून रशियाची क्रांतीकडे वाटचाल सुरू झाली.

५) रशियाचे औद्योगिकीकरण :

१८व्या शतकात युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली. रशिया तसा युरोपियन देश पण औद्योगिकदृष्टया अप्रगत मागासलेला व शेतीप्रधान देश होता; परंतु औद्योगिक क्रांतीचे लोन हळूहळू रशियात येऊ लागले. विशेषतः इ.स.१८९४ मध्ये फ्रान्स रशिया मैत्री करारानंतर फ्रान्सने रशियात प्रचंड भांडवल गुंतवले म्हणून रशियाच्या औद्योगिक क्रांतीला वेग आला. नवे कारखाने, उदयास आले. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात ज्याप्रमाणे कामकारांची वाढती संख्या, कामगारांचे शोषण, कामगारांच्या समस्या या सर्व गोष्टी १९व्या शतकाच्या अखेरीस रशियात दिसू लागल्या. नव्यानेच औद्योगिक क्रांतीस प्रारंभ झाल्याने भांडवलदाराने कामगारांचे शोषण करून प्रचंड संपत्ती मिळवली. यामुळे भांडवलदार कामगार संघर्षास प्रारंभ झाला. त्यामुळे कामगार क्रांतीची भाषा बोलू लागले.

६) निहिलिझम :

रशिया जसा औद्योगिकदृष्टया मागासलेला तसा शैक्षणिकदृष्टया अप्रगत होता. रशियन समाजावर सरंजाम सरदारचे धर्मगुरूंचे वर्चस्व होते. युरोपमध्ये विद्येचे पुनर्जीवन झाल्याने नव्या कल्पना, नवा समाज उदयास आला. युरोपमध्ये यातून उदारमतवादी चळवळी झाल्या. हे लोन रशियात येऊ नये, असा झारने प्रयत्न केला; परंतु विचारांचे नवे वारे त्याला थोपवता आले

नाही. रशियातील उदारमतवादी चळवळी रूजू लागल्या. या लोकांनी सरंजामशाही नष्ट करावी, राज्याची सत्ता नियंत्रित असावी, जनतेने सारे मूलभूत अधिकार मिळवावे यासाठी सौम्य सनदशीर मार्गाने आंदोलन सुरू झाले; परंतु या बुद्धिवंतांना अपयश आले म्हणून ते अराजकवादाकडे ओढले.

या काळात मार्क्सची साम्यवादी विचारसरणी फोफावू लागली. मार्क्सचा समाजवाद व बकोनीचा अराजकवाद यातून रशियात नवीन तत्त्वज्ञान तयार झाले. ते **निहिलिझम** नावाने ओळखले जाते. त्यांनी बुद्धीला व तर्काला पटेल तेच खरे होते. यासाठी प्रस्ताविक शासन संस्था, धर्मसंस्था, समाजव्यवस्था मोडून काढली पाहिजे, असे या लोकांचे मत होते. इ.स.१८३३ मध्ये झार अलेक्झांडर दुसरा याच निहिलिझमवाद्याने खून केला. यानंतर सत्तेवर आलेला झार निकोलस दुसरा याने पोलिस यंत्रणा व भयंकर अत्याचार याच्या साहाय्याने ही निहिलिझमवाद्यांची चळवळ मोडून काढली. यातून रशिया समाजवादाकडे झुकली.

७) साम्यवादाचा उदय :

औद्योगिक क्रांती, कामगाराचा उदय व त्यांच्या समस्या यातूनच युरोपमध्ये साम्यवादाचा उदय झाला. युरोपमध्ये लुई ब्लँक, सेंट सिमॉ, फ्युरिया इ. साम्यवादी नेत्यांनी सर्वच युरोपियन देशांत कामगार संघटित करून भांडवलदाराविरूद्ध पेटवून दिले. इ.स. १८४८ मध्ये अनेक क्रांत्या झाल्या. त्या साम्यवादी होत्या; परंतु फारसे यश आले नाही. नव्याने औद्योगिक प्रगती घडून आलेल्या रशियात यादृष्टीने प्रयत्न झाले नाहीत; परंतु मॉर्क्सचे समाजवादी विचार रशियात लोकप्रिय ठरल्याने इ.स. १८९५ मध्ये रशियात कामगारांची वर्क्स डेमॉक्रॅटिक पार्टी स्थापन केली. भांडवलदारांविरूद्ध संघर्ष सुरू केला. सरंजाम सरदारांच्या शेतीवर राबणारा भूदास जमिनी ताब्यात घेण्यास तयार होता. भूदास, शेतकरी, शेतमजूर यांनी इ.स.१९०० मध्ये सोशल **रिव्होलेशन पार्टी** स्थापन केली.

रशियात झारशाही, भांडवलदार विरूद्ध कामगार व शेतमजूर संघटित होऊ लागले. त्याने तीव्र आंदोलन केले; परंतु बोल्शेविक गट (बहुमतवाला) व मेन्शेव्हिक (अल्पमतवाला) दोन गट निर्माण झाले. लेनिन हा बोल्शेविकचा नेता. त्याला रशियात फक्त कामगारांची क्रांती हवी होती. तो झारशाही उलथून टाकण्यास व क्रांती करण्यास इतर वर्गाचे सहकार्य घ्यायला तयार नव्हता. साहजिकच बहुमत असूनही लेनिनचा गट काही करू शकला नाही. याचा फायदा घेऊन झारने बहुमतावालाने हद्दपार केले. कामगारांचे नेतृत्व मेन्शेव्हिक गटाकडे आले. जपानने रशियाचा १९०५ मध्ये पराभव केला याचा फायदा घेऊन त्यांनी रशियात क्रांती केली. लोकशाही निर्माण केली.

८. प्रातिनिधिक लोकशाहीला अपयश:

इ.स.१९०४-०५ च्या युद्धात रशिया जपानकडून पराभूत झाला. या वेळी झारशाहीविरोधी धुमसत असलेला असंतोष विकोपाला गेला. सर्व देशभर

झारशाही व त्यांच्या लोकांचा धिक्कार केला जाऊ लागला. पराभवाच्या अपमानाने संतापलेला पिट्सबर्ग विद्यार्थ्यांनी झारशाहीचा धिक्कार करून झारशाही पदच्युत करा अशी मागणी करत मोर्चा काढला. यात मास्कोतील विद्यार्थी सामील झाले. यापाठोपाठ कामगारांचे संप, हरताळ पाहून मोर्चाला पाठिंबा दिला. अशा परिस्थितीत २२ जाने. १९०५ रोजी सेंट पिट्सबर्गमधील कामगारांचे गोबॅनच्या नेतृत्वाखाली प्रचंड मोर्चा काढला. झारने या लोकांच्या मागण्या मान्य न करता या मोर्चावर आपले घोडदळ सोडले. निःशस्त्र कामगारांची प्रचंड प्रमाणात हत्या झाली. रशियांच्या इतिहासात **रक्तरंजित रविवार** या नावाने ओळखला जातो. या हत्यामुळे जनता संतापली. सारा देश संप, हरताळाने पेटून उठला. त्यामुळे झारने ऑगस्ट १९०५ मध्ये जनतेच्या प्रतिनिधिंची ड्यूमा बोलविली जाईल, अशी घोषणा केली. इंग्लंडच्या धर्तीवर रशियात राजेशाही सुरू केली; परंतु झारने इ.स. १९०५ नंतर कामगारांत फूट पाडून पुन्हा आपल्या अनियंत्रित सत्तेचे पुनर्जीवन केले.

९) पहिले जागतिक महायुद्ध :

वरील कारणामुळे क्रांतीची पार्श्वभूमी तयार झाली. जनता झारशाही उलथून टाकण्यास तयार झाली. परंतु झारने लष्कराच्या व सत्तेच्या जोरावर चिरडून टाकली. अशा परिस्थितीत इ.स.१९१४ पहिले जागतिक महायुद्ध सुरू झाले. युद्ध आघाडीवर रशियाचा पराभव होऊ लागला. युद्धकालीन समस्या, पराभवाचे दुःख यातून मार्च १९१७ मध्ये झारशाहीचा शेवट करून रशियन क्रांती घडून आली.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न : रशियन राज्यक्रांतीची कारणे सांगा.

१४.५) क्रांतीची वाटचाल

१) पेट्रोग्राडची क्रांती :

रशियाने जागतिक महायुद्धात उडी घेतली. भ्रष्ट, अकार्यक्षम, झारशाहीमुळे सर्वत्र तुटवडा निर्माण झाला. अपुऱ्या युद्ध साहित्यामुळे सैनिक युद्ध आघाडीवरून पराभूत होऊ लागले. झारशाहीविरूद्ध भयंकर वातावरण तापले. ८ मार्च १९१७ रोजी **पेट्रोग्राडच्या** १ लाख कामगारांनी तर **मास्को** शहरात २५ हजार कामगारांनी प्रचंड मोर्चा काढून झारशाही उलथून टाकण्याची मागणी केली. झारने मोर्चा चिरडून टाकल्यास लष्कराला आदेश दिला. त्याने आदेश न मानता कामगारांशी हातमिळवणी केली. अशा परिस्थितीत जमिनीसाठी, कारखान्याच्या मालकीसाठी, भाकरीसाठी देशभर दंगली झाल्या. झारने ड्यूमा बरखास्त केल्याची घोषणा केली. ड्युमाने विसर्जित होण्यास नकार दिला. झार घराणे, नातेवाईक यांना तुरूंगात डांबले. राजकुमार जॉर्ज **एलव्हॉव** या समाजवादी नेत्याच्या नेतृत्वाखाली रशियात हंगामी सरकार स्थापन झाले. अशा प्रकारे ८ मार्च १९१७ रोजी झारशाहीचा शेवट होऊन रशियात प्रतिनिधी राजवट सुरू झाली.

२) हंगामी सरकार :

निकोलसच्या राजत्यागानंतर ड्युमाने समितीची निवड करून हंगामी सरकार स्थापन केले. त्यांनी सर्व राजकीय कैद्यांची ताबडतोब मुक्तता करण्याचा आदेश दिला. युद्धाबाबतचे नवीन धोरण जाहीर केले. ज्यू लोकांवरील सर्व नियंत्रण रद्द केले. रशियाकरिता नवीन घटना बनविण्यात येईल, असे जाहीर करून उदारमतवादी मानवतावादी कार्य केले; परंतु त्याच्या कारभाराला अंतर्गत विरोध होऊ लागल्याने मे १९१७ मध्ये जॉर्ज एलव्हॉन याने राजीनामा दिला आणि **केरेन्स्कीने** सत्ता हाती घेतली. केरेन्स्कीने मे ते नोव्हेंबर १९१७ पर्यंत अस्थिर परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला; परंतु असंतोष नष्ट करता आला नाही. भांडवलदार-कामगार यांच्यात ऐक्य तयार करता आले नाही. जर्मनीशी शांतता करण्यास विरोध केल्याने सैन्यात बेशिस्त निर्माण झाली. युद्धात सतत पराभवामुळे अपमान झाला व जनतेने युद्ध बंद करावे ही मागणी केली. पण केरेन्स्कीने अमान्य केले. याचा फायदा लष्काराने व लेनिनने घेतला.

३) बोल्शेव्हिक क्रांती - ७ नोव्हेंबर १९१७ :

केरेन्स्कीचे धोरण लेनिनला अमान्य होते. त्यातच रशियन सैन्यात कमालीची अस्वस्थता, शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने ताब्यात घेत होते तर बोल्शेव्हिक पक्षाने रेड गार्डनमध्ये कामगार जास्त संख्येत भरती केले. लेनिनच्या नेतृत्वाखाली क्रांतीचा सिद्धांत मांडला. ट्रॉटस्कीच्या सहकार्याने ७ नोव्हेंबर १९१७ रोजी बोल्शेव्हिक पक्षाने लेनिनच्या नेतृत्वाखाली क्रांतीचा निश्चय केला. कामगारांनी व क्रांतीकारकांनी एकदम उठाव करून सर्व राज्यकाराभाराची केंद्रे ताब्यात घेतली. रक्तपात न होता राजधानी बंडवाल्यांनी ताब्यात घेतली. केरेन्स्कीचे सरकार नष्ट करून ८ नोव्हेंबरला लेनिनने नव्या सरकारची सूत्रे अध्यक्ष्य या नात्याने हाती घेतली.

आपली प्रगती तपासा :

प्रश्न : रशियन राज्य क्रांतीची वाटचाली सांगा.

१४.६) रशियन राज्यक्रांतीचे परिणाम :

रशियात झारशाहीची अनिमंत्रित सत्ता, भ्रष्टाचारी, अकार्यक्षम असल्याने सर्वसामान्य जनतेचे हाल होत होते. झारने औद्योगिक प्रगतीला व नव्या विचारांना, कल्पनांना खोल खड्ड्यात गाडून आपली हुकूमशाही टिकवण्याचा प्रयत्न करत होता. परंतु औद्योगिक प्रगतीमुळे कामगार वर्ग उदयाला आला. या वर्गाला संघटित व मार्गदर्शन करण्याचे कार्य कार्ल मार्क्सने केले. त्यामुळे रशियात लोकजागृती होऊन आपल्या हक्कासाठी इ.स.१९०५ ला क्रांती केली. परंतु अपयश आले. यातून इ.स.१९१४ महायुद्धात पराभव झाल्याने ७ मार्च १९१७ ला रशियात क्रांती होऊन झारशाहीचा शेवट झाला आणि हंगामी सरकार अस्तित्वात आले. या वेळी

राजकुमार जॉर्ज एलव्हॉव व केरेन्स्की यांनी लोकप्रतिनिधी सरकारमध्ये कार्य केले; परंतु केरेन्स्कीच्या धोरणामुळे बोल्शेव्हिक लोकांनी त्याचे सरकार नष्ट करून ७ नोव्हेंबर १९१७ ला बोल्शेव्हिक क्रांती केली आणि ८ नोव्हेंबरला लेनिनने रशियाची सूत्रे हाती घेतली या राज्यक्रांतीचे परिणाम पुढीलप्रमाणे :

१) फॅसिझम विरूद्ध कम्युनिझम संघर्षाचा उदय :

कार्लमार्क्स व लेनिनने साम्यवादाचे नवीन तत्त्वज्ञान मांडले. त्यामुळे निरनिराळ्या विचारप्रणालीत संघर्ष निर्माण झाला. त्याचा आंतरराष्ट्रीय संबंधावर दूरगामी परिणाम झाला. भांडवलदार वर्गाला धक्का बसला. भांडवलदाराच्या संरक्षणासाठी साम्यवादी विरूद्ध फॅसिस्ट राष्ट्रांची साखळी तयार झाली. त्यातून संघर्ष निर्माण झाला.

२) वसाहतीतील स्वातंत्र्यलढ्याला व्यापकता प्राप्त झाली :

भांडवलशाहीची शेवटची अवस्था म्हणजे साम्राज्यवाद अशी साम्यवादी शिकवणीमुळे वसाहतीत चाललेल्या स्वातंत्र्यलढ्याल राजकीय संघर्षाचे स्वरूप न राहता सामाजिक आणि आर्थिक न्यायाकरिता लढा असे महत्त्व प्राप्त झाले. कम्युनिस्टाने वसाहतीच्या स्वातंत्र्यलढ्याला पाठिंबा दिला. त्यामुळे जागतिक संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले.

३) पाश्चात्त्य राष्ट्रांनी पुरस्कारिलेल्या उदारमतवादी कल्पनांना जबरदस्त आव्हान:

रशियन राज्यक्रांतीच्यावेळी उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, संसदीय राज्यपद्धती इ. पाश्चिमात्य संस्कृती निर्माण झालेली होती. या कल्पना उराशी बाळगलेल्या होत्या त्या निरूपयोगी आहेत. हे साम्यवादी विचाराने खोट्या ठरवल्या.

४) क्रांतीने नवीन समाज निर्माण केला :

रशियन राज्यक्रांतीनंतर विषमता लयास गेली. प्रत्येकाने आपल्या शक्तीनुरूप आणि गुणानुरूप काम करावे. त्या आधारावर नवीन समाज उदयास आला. या समाजात गरीब-श्रीमंत, भांडवलदार, जमीनदार, व्यापारी, धर्मगुरू त्या सर्वांना कामे करावे लागे. कामानुरूप वेतन सर्वांनाच देण्यात आले. रशियात श्रमणाऱ्यांच्या हातात सत्ता आली. समाजात कामगारांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. साम्यवादाच्या तत्त्वावर समाजाची पुनर्घटना निर्माण केली. समाजातील सर्वात खालचा थर म्हणजे कामगार त्याला सत्ता मिळाल्याने जगातील सर्व कामगारांत समाधान निर्माण होऊ लागले.

५) रशियन साम्राज्यवादाचा अंत :

बोल्शेव्हिक राज्यक्रांतीमुळे रशियन साम्राज्यशाहीचा सुद्धा शेवट झाला. पोलंड, फिनलंड, जॉर्जिया यात रशियन साम्राज्यवाद्याने मोठ्या प्रमाणात

दडपशाही चाललेली होती. रशियन राज्यक्रांतीने या दडपशाहीचा शेवट केला आणि त्या राष्ट्रांना स्वातंत्र्य दिले.

६) रशियाला जागतिक राष्ट्रांत स्थान मिळाले :

रशिया क्रांतीपूर्वी एक मागासलेले राष्ट्र होते. त्याला सुधारणांचा स्पर्शही झालेला नव्हता. इ.स.१९१७ बोल्शेव्हिक क्रांती घडून आल्यानंतर एक साम्यवादी राष्ट्र म्हणून रशियाचा जागतिक राजकारणात उदय झाला. जगातील लक्षावधी श्रमिक रशियाकडे नेतृत्वाच्या आशेने पाहू लागले. त्यामुळे एक बलशाही राष्ट्र म्हणून मान मिळाला.

७) धर्मसस्थेचे महत्त्व संपले :

मार्क्सवादी तत्त्वानुसार वर्गविहीत समाजरचना निर्माण रशियात झाली. धर्म ही व्यक्तीची खाजगी बाब आहे, असे स्पष्ट करून धर्मसंस्थेचे राजकीय हक्क व महत्त्व संपुष्टात कायद्याने आणले. त्यामुळे धर्मसंस्थांचे महत्त्व पूर्णपणे संपले.

८) प्रचंड भौतिक प्रगती:

रशिया क्रांतीपूर्वी अत्यंत मागासलेले व अप्रगत राष्ट्र होते; परंतु क्रांतीनंतर रशियात प्रचंड प्रमाणात औद्योगिकीकरणा प्रारंभ झाला. विदेशी तंत्रज्ञान, भांडवल गुंतवले आणि तंत्रज्ञानी लोकांना प्राधान्य देऊन प्रचंड प्रमाणात रशियाने आपली प्रगती घडवली.

९) पंचवार्षिक योजनेची देणगी :

पाश्चात्य लोकशाही पद्धतीने देशाचा विकास होत नाही हे रशियाला पटल्यानंतर रशियाने पंचवार्षिक योजनेद्वारे एक - एक विभागावर लक्ष केंद्रित करून विकास होतो हे जगाला दाखवून दिले. त्यामुळे पंचवार्षिक योजनेचे सर्व जगाने अनुकरण केले.

१०) जगात कामगारामध्ये जागृती :

रशियात राज्यक्रांती होऊन कामगारांची सत्ता स्थापन झाली. त्यामुळे जगातील कामगार जागृत झाले. आपल्या हक्कांसाठी प्रचलित शासन व्यवस्थेशी संघर्ष करू लागले. त्यामुळे त्या त्या देशांनी कामगारांच्या हितासाठी व सरंक्षणासाठी अनेक कायदे पास करून त्यांना स्थान देण्याचा प्रयत्न केला.

११) उदारमतवादी विचार खोटा केला:

रशियाच्या विकासासाठी नवीन राज्यघटनेत मूलभूत हक्क मांडून नैतिकदृष्टया व कायदेशीरदृष्टया महान कामगिरी जगापुढे ठेवली. सामाजिक क्षमता, स्त्री-पुरूषांना समान हक्क या गोष्टी या मार्गाने रशियात घडवून आणल्या आणि उदारमतवादी विचार खोटा केला.

१२) साम्यवादामुळेच आंतरराष्ट्रीय लष्करी करार :
साम्यवादाचे जागतिक स्वरूपाच्या धोरणामुळे आंतरराष्ट्रीय संघर्ष निर्माण झाला त्यामुळे सिटो, नाटो करार झाले. कोरिया, क्युबा, व्हिएतनाम ही युद्धे उद्‌भवली.

आपली प्रगती तपासा
प्रश्न : रशियन राज्यक्रांतीचे परिणाम थोडक्यात सांगा.

१४.७ सारांश

झार निकोलस पहिला याच्या राजवटीमुळे रशियात सुधारणा युगाला प्रारंभ झाला. त्याने शासन व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी पाच आधार स्तंभाचा उपयोग केला. जुन्या-नव्या कायद्यामुळे होणारा गोंधळ दूर करण्यासाठी कायदेसंहिता तयार केली. शिक्षण, वित्तव्यवस्था, दासप्रथा या संदर्भात अनेक बदल केले. तसेच उदारमतवादावर बंदी घालण्यासाठी, शाळा, कॉलेज, शिक्षण, वर्तमानपत्रे, साहित्य यावर अनेक निर्बंध लादले. रशियामध्ये आपली अनियंत्रीत राजशाही
स्थापन करून दैवी सिद्धांताचा पुरस्कार केला.

निकोलस पहिल्यानंतर रशियाच्या गादीवर अलेक्झांडर दुसरा सत्तेवर आला त्याने भूदासांची मुक्ती केली. त्याच प्रमाणे स्थानिक स्वशासन संस्था, न्यायालय, शैक्षणिक, लष्करी, वित्त यामध्ये अनेक महत्त्वाच्या सुधारणा केल्या. त्यामुळे रशियाचे दारिद्र्य कमी होऊन सामाजिक आर्थिक विकासाला प्रारंभ झाला.

रशियामध्ये क्षारशाहीची राजवट असून ती दैवी सिद्धांताचा व अनियंत्रित राजेशाहीचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या काळात रशियन समाजाची सामाजिक, आर्थिक अतिशय खराब होती. त्यातूनच उदारमतवादी व क्रांतीकारकांच्या प्रयत्नाने झारशाही नष्ट झाली. लेनिनच्या नेतृत्वाखाली रशियात कामगार वर्गाची सत्ता स्थापन झाली. रशियाच्या विकासासाठी लेनिन व स्टॅलिन यांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. त्यामुळे रशियाही एक महासत्ता बनली. जगाच्या एका गटाचे नेतृत्व त्यांनी केले. जगातील कामगारांसमोर एक वेगळा आदर्श ठेवला. तसेच विविध देशांच्या स्वातंत्र्य लढ्यांना प्रेरणा दिली.

१४.८) दीर्घोत्तरी प्रश्न :

१) झार निकोलसच्या अनियंत्रित राजेशाहीच्या काळातील सुधारणांचा आढावा घ्या.
२) भूदास मुक्ती कायद्याची कारणे - स्वरूप स्पष्ट करा.

३) झार अलेक्झांडर दुसरा यांच्या सुधारणा थोडक्यात स्पष्ट करा.
४) रशियन राज्यक्रांतीची विविध कारणे सांगा.
५) रशियन राज्यक्रांतीची विविध टप्पे स्पष्ट करा.
६) रशियन राज्यक्रांतीचे परिणाम सांगा.

❖❖❖